म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क. ५२४० ९५४

REFBK-0007397
REFBK-0007397

मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने

कै. वा. म. जोशी स्मारक व्याख्यानमाला

पुष्प १ लें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# वामन मल्हार

## वाङ्मय-दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. नं.

वा. ल. कुळकर्णी

मराठी ... मुंबई

REFBK-0007397
REFBK-0007397

द्वितीय आवृत्ति

किंमत ४ रुपये

: प्रकाशक :

डॉ. अ. ना. भालेराव

मराठी साहित्य संघ, सरस्वती,
गिरगांव, मुंबई ४.

प्रथम प्रसिद्धि १९४४
द्वितीय आवृत्ति १९५०

: मुद्रक :

रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, मुंबई नं. ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३६७५ वि: निबंध
क्रमांक ९९२० नों: दि: ३०।१७५

( १ ) पुढील चारीहि निबंध व्याख्यानांसाठीच मुळांत तयार केलेले असल्यामुळे त्यांत व्याख्यानांच्या सोयीने विषयाचें वर्गीकरण केलेलें आहे. उदाहरणार्थ, अगदी पहिल्याच व्याख्यानांत वामनरावांच्या भाषाशैलीचें विवेचन आलें आहे; तें प्रकरणशः ग्रंथलेखन करण्याचा उद्देश असता, तर वेगळ्या स्वतंत्र प्रकरणांतच आलें असतें.

( २ ) वामनरावांचें समग्र वाङ्मय मला कनेक कारणामुळे वाचतां आलेलें नाही. जें उपलब्ध झालें त्याची यादी शेवटी दिलेली आहे. त्यांचे 'विश्ववृत्तां' तील लेख एकत्र प्रसिद्ध होणें अत्यावश्यक आहे. मी ते सर्व लेख वाचूं शकलों नाही; अर्थात्‌च मी त्यांच्या स्वरूपाबाबत कोणतेंहि विवेचन प्रस्तुत निबंधांतून करूं शकलेलों नाही.

( ३ ) ह्या निबंधांचा उद्देश मूलतः वाङ्मय-दर्शनाचा आहे. त्यामुळे कांही ठिकाणीं विस्ताराचा दोष पत्करूनहि हें दर्शन यथोचित घडविण्याचा प्रयत्न केला आहे, असें दिसून येईल.

( ४ ) मुंबई साहित्य संघाच्या कै. वा. म. जोशी स्मारक समितीने फार मोठी जबाबदारी मजवर टाकली. माझे इतर व्यवसाय सांभाळून ठराविक वेळीं ह्या जबाबदारींतून मुक्त होणें मला जमलें नाही; त्यामुळे मजकडून हें ग्रंथलेखन होण्यास विलंब झाला; परंतु एवढा विलंब होऊनहि तें मनाजोगें उतरलेलें नाही, ह्याची मला योग्य ती जाणीव आहे.

( ५ ) ज्यांच्या प्रोत्साहनामुळे मी हें लेखनकार्य थोडेंफार तरी करूं शकलों त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें. आपला नामनिर्देश होणें हें त्यांना कितपत पसंत पडेल ह्याबद्दल मी साशंक असल्यामुळे मी तो करण्याचें टाळीत आहें.

[ आवृत्ति १ ली. ] वा. ल. कुळकर्णी

# प्रास्ताविक चार शब्द [ आवृत्ति १ ली ]

" वामन मल्हार : वाङ्मयदर्शन " या पुस्तकाच्या प्रकाशनाने मुंबई मराठी साहित्य संघ ही संस्था आज एका अभिनव, समुचित व महत्त्वपूर्ण अशा उपक्रमास प्रारंभ करीत आहे. या उपक्रमाच्या मागील भूमिका विशद करण्यासाठीं मी प्रास्ताविक चार शब्द लिहीत आहें.

दिवंगत प्राचार्य वामन मल्हार तथा तात्यासाहेब जोशी यांचा षष्ठ्यब्दीपूर्ति समारंभ मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थेने इतर अनेक संस्थांच्या सहकार्याने दि. १८ मार्च १९४३ दिवशीं येथील वागळे सभागृहांत मोठ्या थाटाने साजरा केला. त्यावेळीं वागळे सभागृहांत जमलेल्या वामनरावांच्या शेकडों चाहत्यांपैकीं एकाच्याहि मनांत अशी कल्पना आली नसेल की वामनरावांचा मृत्यु समीप येऊन ठेपला आहे. सर्वांची अशीच कल्पना आणि आशा होती की वामनरावांकडून त्यांच्या लौकिकास साजेल अशी साहित्यनिर्मिति या पुढील आयुष्यांत मोठ्या प्रमाणाने होत जाईल. पण विधिघटना निराळी होती. मंगळवार दि. २० जुलै १९४३ दिवशीं मृत्यूने या थोर साहित्यिकावर मुंबई नगरींतच झडप घातली. वामनरावांच्या अन्त्यविधीची सर्व व्यवस्था करण्याचें दुःखद कर्तव्य साहित्य संघासच करावें लागलें. चार महिन्यांपूर्वी संघानेच वामनरावांचा षष्ठ्यब्दीपूर्तिसमारंभ घडवून आणलेला असल्यामुळे वरील दुःखदायक कर्तव्य करीत असतांना संघास विधिघटनेच्या वैचित्र्याची तीव्र जाणीव झाली.

साहित्य संघाने इतर अनेक संस्थांच्या सहकार्याने वामनरावांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करण्यासाठी त्याच वागळे सभागृहांत दि. ३१ जुलै १९४३ दिवशीं एक प्रकट सभा भरविली. त्या सभेंत वामनरावांच्या स्मारकासंबंधी पुढील प्रस्ताव सर्वानुमतें संमत करण्यांत आला.

" कै. वामन मल्हार जोशी हे मुख्यतः सुविचारप्रवर्तक कादंबरीकार, तत्त्वज्ञानी लेखक व चिकित्सक टीकाकार असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन स्मारकाचा हेतु उच्च दर्जाची वाङ्मय-परंपरा पुढे चालू ठेवण्याचा असला पाहिजे. या दृष्टीने मुंबईतील साहित्यसंस्था व साहित्यसेवक यांच्या विद्यमाने भरलेली ही सभा असें ठरवीत आहे की कै. वामन मल्हार जोशी ह्यांचें पुढील

एक वा अनेक रीतींनी स्मारक करण्याकरितां त्यांच्या नांवाने आवश्यक असा स्मारकनिधि जमविण्यांत यावा.

( १ ) तत्त्वज्ञान, उच्च दर्जाची वाङ्मयीन टीका, ललित व शास्त्रीय वाङ्मय अशासारख्या विषयावर दरवर्षी एखाद्या अभ्यासू विद्वानाला एक किंवा अधिक व्याख्यानें देण्यासाठी निमंत्रण द्यावें व त्यांची योग्य ती आर्थिक संभावना करावी. हीं व्याख्यानें शक्य असल्यास पुस्तक रूपानें प्रसिद्ध करण्यांत यावींत.

( २ ) वरील विषयांवर एखाद्या विद्वान लेखकाकडून ग्रंथ लिहवून घेऊन व त्यास योग्य तें पारितोषिक देऊन तो प्रसिद्ध करण्यांत यावा.

( ३ ) वरील विषयावर प्रसिद्ध होणाऱ्या किंवा झालेल्या एखाद्या नवीन ग्रंथास योग्य तें पारितोषिक देण्यांत यावें.

( ४ ) वरील विषयांसाठी एखादें संदर्भ ग्रंथालय स्थापन करण्यांत यावें.

स्मारकाकरितां निधि जमविण्याची व्यवस्था व तो जमल्यावर वरीलप्रमाणे एका किंवा अनेक रीतींनी स्मारक करण्याची योजना मुंबई मराठी साहित्य संघाने करावी. स्मारकाची नक्की योजना कै. वामनराव जोशी यांच्या पहिल्या स्मृतिदिनाचे वेळी घोषित करण्यांत यावी. स्मारकाच्या व्यवस्थेकरितां वरील हेतूंशीं सुसंगत असे पोटनियम करण्याचा अधिकार मुंबई मराठी साहित्य संघाकडे राहील. ”

अनेक संस्थांच्या विद्यमाने भरलेल्या प्रकट सभेने केलेला वरील प्रस्ताव मुंबई मराठी साहित्य संघाच्या सभेने दि. २४ ऑक्टोबर १९४३ दिवशीं अंगीकृत केला व या बाबतींत आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास दिला. अशा रीतीने कैलासवासी प्राचार्य वामन मल्हार जोशी यांच्या स्मारकाची व्यवस्था करण्याचें कार्य मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थेकडे आलें.

स्मारकाच्या निश्चित योजनेसंबंधी संघाच्या कार्यकारी मंडळापुढे अशी एक कल्पना ठेवण्यांत आली की संघाने पुढाकार घेऊन या स्मारकासाठी बृहन्महाराष्ट्रांत एक मोठा निधि जमवावा व त्याच्या व्याजांतून कायम स्वरूपाचे कांहीं तरी स्मारक करण्याची योजना ठरवावी. ही कल्पना तात्त्विक दृष्ट्या जरी उत्तम होती तरी ज्याच्या व्याजांतून कायम स्वरूपाचें स्मारक करतां येईल एवढा मोठा निधि जमविण्यास कालावधि लागणार हें उघड होतें.

संघाची तर अशी इच्छा होती की १९४४ वर्षांच कांहीं तरी दृश्य स्वरूपाचें स्मारक करावें. म्हणून कार्यकारी मंडळाने असें ठरविलें की प्रकट सभेनें संमत केलेल्या प्रस्तावांत दर्शविलेल्या अनेक रीतींपैकी पहिल्या रीतीने स्मारक करावें. ती रीति म्हणजे व्याख्यानमाला करविणें ही होय. संघाच्या कार्यकारी मंडळाने हा जो निर्णय घेतला त्याचेंच फल म्हणजे प्रस्तुतचें पुस्तक होय.

या व्याख्यान मालेच्या बाबतींत संघाच्या कार्यकारी मंडळाने कांही पोट नियम केले आहेत. त्यांपैकी महत्त्वाच्या नियमांचा सारांश असा आहे; या व्याख्यानांची संख्या कमींत कमी तीन व जास्तींत जास्त पांच असावी. व्याख्यानास आरंभ करण्यापूर्वी नियुक्त व्याख्यात्याने व्याख्यानांची मुद्रण योग्य प्रत संघाकडे दिली पाहिजे. शक्य असल्यास हीं व्याख्यानें त्वरित छापून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था संघाने करावी. या व्याख्यानांबद्दल व्याख्यात्यास रु. २५० अल्पशी संभावना म्हणून द्यावेत. सध्या केलेल्या पोटनियमांचें मुख्य स्वरूप असें आहे. अनुभवाने आवश्यक वाटल्यास या पोटनियमांत बदल करण्याचा अधिकार संघास अर्थात आहेच.

दि. ३१ जुलै १९४३ दिवशीं भरलेल्या दुखवट्याच्या प्रकट सभेंत संमत झालेल्या प्रस्तावानुसार प्राचार्य वामनराव जोशी ह्यांच्या स्मारकाकरितां निधि जमविण्याचा अधिकार व कर्तव्य मुंबई मराठी साहित्य संघाकडे आलेले आहेत. पण संघाच्या दुसऱ्या अनेक कार्यांमुळें या बाबतींत विशेष प्रयत्न संघाकडून अद्याप झालेले नाहीत. म्हणून आजच्या या पुस्तक-प्रकाशन-प्रसंगीं वामनरावांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, स्नेही व अभिमानी, तसेंच मराठी भाषा व वाङ्मय यांचे प्रेमी, अशा सर्व लोकांना मी विनंती करतों कीं त्यांनी या कार्यास उदार हस्ताने साहाय्य करावें. हें साहाय्य दोन प्रकारांनी करतां येईल--एक प्रकार स्मारक निधीस देणगी देऊन व दुसरा प्रकार या पुस्तकाची प्रत विकत घेऊन. साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने असें ठरविलें आहे की या निधीचा आयव्यय स्वतंत्र ठेवावा. त्याप्रमाणें तो ठेवण्यांत येत आहे. या प्रथम व्याख्यानमालेचा खर्च—म्हणजे मुख्यत: व्याख्यात्यांना देण्यांत येणारी रकम व पुस्तकाचें मुद्रण—संघाने सध्याच्या परिस्थितींत स्वतःच करावयाचें ठरविलें आहे. मी अशी आशा करतों की मराठी-भाषा-प्रेमी जनता वर दर्शविलेल्या दोन प्रकारांनी स्मारक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



अनुक्रम ........................ दि. ........
क्रमांक ........................ नों: दि: ....

निधीस साहाय्य करून संघ करीत असलेल्या या प्रथम व्याख्यान-मालेचा खर्च भरून काढील इतकेंच नव्हे, तर स्मारकाचा एक स्थिर निधी स्थापण्यास संघास समर्थ करील.

या पुस्तकांच्या प्रति संघाच्या सभासदांना व स्मारकनिधीस देणगी देणारांना दोन तृतीयांश किंमतीस देण्यांत याव्या असें संघाने ठरविलें आहे. याचा फायदा संघाचे सदस्य व इतर गृहस्थ घेतील अशी मी आशा करतों.

या व्याख्यानमालेचा प्रारंभ करण्याचा मान संघाने ज्या साहित्यिकास दिला ते या पुस्तकाचे लेखक प्राध्यापक वामन लक्ष्मण कुळकर्णी हे होत. त्यांचा अगदीं थोडक्यांत परिचय करून देणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं. वामनरावांचा जन्म चोपडें येथें दि. ९ जून १९११ दिवशीं झाला. प्रथम पासून इंटरमीजिएटपर्यंत त्यांचें शिक्षण नाशिक येथे झालें. हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेजमध्यें दोन वर्षें शिकत असतांना वामनराव हे आपल्या वर्गांतील स्कॉलर होते. १९३१ वर्षीं ते इंटरमीजिएट परीक्षा उत्तीर्ण झाले व त्या वर्षी त्यांच्या कॉलेजांत ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यां-मध्यें ते पहिले आले. बी. ए. आणि एम्. ए. या परीक्षांचें त्यांचें शिक्षण येथील विल्सन कॉलेजांत झालें. १९३३ वर्षीं ते बी. ए. झाले. या परीक्षेंत त्यांचा ऐच्छिक विषय इंग्रजी हा होता व या विषयांत त्यांनी सन्मान (ऑनर्स) पदवी मिळविली. १९३५ वर्षी मराठी ( प्रधान ) व इंग्रजी ( गौण ) या दोन भाषा घेऊन ते एम्. ए. परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. या परीक्षेंत मराठी या विषयांत पहिले आल्याबद्दल त्यांना चिपळूणकर मराठी पारितोषिक मिळालें. सध्या ते विल्सन कॉलेजांत मराठीचें अध्यापन करीत असतात.

नियतकालिकांत प्रसिद्ध झालेले वामनराव कुळकर्णी यांचे अनेक लेख मीं वाचले आहेत. माझ्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अनेक सभांतून त्यांनी केलेलीं भाषणें मीं ऐकलीं आहेत. यांवरून माझा असा ग्रह झाला आहे की लेखन किंवा भाषण करण्यापूर्वी त्या विषयांचा जे साक्षेपाने अभ्यास करतात अशा तरुण साहित्यिकांपैकी वामनराव हे एक प्रमुख आहेत. आणि मुख्यतः याच कारणासाठीं संघाच्या कार्यकारी मंडळाच्या ‘ स्मारक उपसमिती ’ने प्रथम वर्षाचे व्याख्याते म्हणून त्यांची निवड केली. एका साहित्यिक वामन-

रावांच्या स्मारक व्याख्यानमालेचा आरंभ दुसऱ्या एका साहित्यिक वामन-रावांनी करावा हा एक चमत्कृतिजनक योगायोग आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या वाङ्मयीन योग्यतेबद्दल मी येथे कांही लिहूं इच्छित नाहीं. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर साहित्य-टीकाकार त्याचें महत्त्वमापन करतीलच. पण मला एवढेंच सांगावेंसें वाटतें की वाङ्मय-कलाकृतींच्या बाबतींत एका साहित्यिकाचें रसग्रहण किंवा चिकित्सक परीक्षण दुसऱ्या अनेक साहित्यिकांना संमत होईलच असें म्हणतां येत नाही. कारण अशा कला-कृतींकडे पाहण्याचे अनेकांचे अनेक दृष्टिकोन असतात. आणि या विविध दृष्टिकोनांतूनच अवलोकिलें असतां त्या त्या कलाकृतीचें सर्वांगीण रसग्रहण व परीक्षण होतें. हें सर्व खरें असलें तरी तरुण अभ्यासी साहित्यिक म्हणून वामनराव कुलकर्णी यांनी मुंबईत जी कीर्ति संपादन केली आहे त्या कीर्तीत त्यांच्या या पुस्तकानें भरच पडेल असा माझा दृढ विश्वास आहे.

हें पुस्तक अत्यंत अल्प अवधींत छापून प्रसिद्ध होत आहे. या बाबतींत संघाला अनेकांचें साहाय्य लाभलेलें आहे. त्या सर्वांचा येथे नामनिर्देश करणें शक्य नाही. तरी पण न्यू भारत मुद्रणालयाचे धनी रघुनाथराव देसाई, न्यू मनोहर प्रिंटिंग प्रेस ( वेष्टण मुद्रणालय ), वेष्टनावरील सजावट करणारे चित्रकार गोडसे व ब्लॉकमेकर श्रीयुत रेळे यांनी आपापलीं कामें अल्प अवधींत व सुंदर रीतीने करून दिलीं याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानल्याशिवाय मला राहवत नाहीं.

‘ सरस्वती ’
मुं. म. सा. संघाचें कार्यालय
आंबेवाडी पोष्टासमीप, मुंबई—४
२२-१२-१९४४

**अ. बा. गजेन्द्रगडकर**
अध्यक्ष
मुंबई मराठी साहित्य संघ

कै० मातोश्री

# ताईच्या स्मृतीस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. अ. ........

## आवृत्ति दुसरी

'वामन मल्हार : वाङ्मयदर्शन' ह्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा हा योग वामनरावांच्या वाङ्मयाच्या वाढत्या लोकप्रियतेचा निदर्शक आहे. हीं व्याख्यानें असल्यामुळें ह्या आवृत्तीसाठीं मी मूळ मजकुरांत फारच थोडा फेरबदल केलेला आहे. विवेचनांत कोठेंहि संदिग्धता राहूं नये ह्या हेतूनें जेवढी अधिक खबरदारी घेणें इष्ट वाटलें तेवढीच घेतली आहे.

'इंदु काळे आणि सरला भोळे' ह्या कादंबरीसंबंधी जे नवे विचार मनांत आले ते मी माझ्या टिपणवहींत केव्हां तरी लिहून ठेविले होते; माझ्या टिपणवहींतील तो उतारा जशाचा तसा पुरवणी मजकुरांत घातला आहे.

ह्या पुस्तकाच्या शेवटीं 'वामन मल्हार जोशी व त्यांचा काल' ही एक वेगळी पुरवणी जोडली आहे. वा. म. जोशी ह्यांच्या वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांना आणि अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या सर्वच विद्यार्थ्यांना ती उपयुक्त ठरेल अशी कल्पना आहे. वामनराव ज्या कालखंडांत वावरले, तो कालखंड म्हणजे अर्वाचीन वाङ्मयाचाच कालखंड होय. ह्या कालखंडांतील शक्य तों सर्व प्रमुख घटनांची नोंद सदर पुरवणींत केलेली आहे. मराठी कादंबरी-वाङ्मयांतील वामनरावांच्या कादंबऱ्यांचें स्थान लक्षांत यावें ह्या हेतूनें सदर कालखंडांतील सर्व प्रमुख कादंबऱ्यांची नोंद सदर पुरवणींत केलेली दिसेल. मात्र नाट्य, काव्य इत्यादि वाङ्मयाच्या इतर प्रकारांतील कृतींची नोंद करण्याकडे त्या मानानें कमी लक्ष पुरविलें आहे. वामनरावांची वैचारिक भूमिका लक्षांत येत असतांच महाराष्ट्राचा गेल्या ७०।८० वर्षांचा सांस्कृतिक इतिहास डोळ्यांपुढून जावा अशा हेतूनें ही पुरवणी तयार करण्यांत आलेली आहे. विशिष्ट घटना घडत असतांना वामनरावांचें वय काय होतें हेंहि ताबडतोब लक्षांत यावें अशी व्यवस्था पुरवणींत केलेली असल्यामुळें तिची उपयुक्तता अधिक पटावी. ह्या पुरवणीची कल्पना मला मॉरिस ऑसबोर्न ह्यांच्या 'धी रीयल बर्नार्ड शॉ' ह्या पुस्तकांतील पुरवणीवरून सुचली.

मुख्यत: कै. प्राचार्य अ. वा. गजेन्द्रगडकर ह्यांच्या प्रोत्साहनामुळेंच मी हें वामन मल्हारांच्या वाङ्मयदर्शनाचें बिकट काम कसेंबसें पार पाडूं शकलों. आज ह्या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचा सुयोग पाहण्यास ते आमच्यांत नाहींत हें मी माझें दुर्भाग्य समजतों.

२६-७-५०

**वा. ल. कुळकर्णी**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वागत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंः दि: ........

# वामन मल्हार : वाङ्मयदर्शन

## एक श्रेष्ठ वाङ्मयीन व्यक्तिमत्व

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

### मराठी गद्यलेखक व वाङ्मयानंद

असे थोडे गद्य लेखक आहेत कीं ज्यांचें लिखाण अनेक वेळां वाचलें तरी त्यांतील गोडी ही अवीटच राहते. अर्वाचीन काळांतील मराठी लेखकांकडे पाहूं जातां मला असे फार थोडे लेखक दिसतात. मी विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे निबंध अद्यापहि आवडीनें वाचीन, परंतु ते वाचीत असतां माझी दृष्टि ही त्यांच्या काळांत महाराष्ट्रांत जे वादविषय होते, ते समजावून घेणाऱ्याची व तद्भव आनंद चाखणाऱ्याची असेल; मी त्यांतील अभिनिवेशयुक्त भाषाशैलीने सुखावेन, त्यांतील उपरोध, उपहासाने माझ्या बौद्धिक आनंदांत थोडीबहुत भर पडेल; परंतु वाङ्मयाचें वाचन करीत असतां जो मनोविकास व्हावयाला हवा, जीवनविषयक जाणिवांचें क्षेत्र जें क्षणोक्षणीं विस्तीर्ण व्हावयाला हवें, जीवनांतील गूढ स्थळांवर प्रकाश पडल्यामुळें जीवनाचें कोडें उलगडतें कीं काय असें जें एक सारखें मधूनमधून वाटायला हवें, सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्या त्रिपुटींवरील आपली श्रद्धा जी अढळ व्हावयाला हवी व ह्या सर्व गोष्टी साधल्या जात असल्यामुळें जो एक अननुभूत आनंद व्हावयाला हवा, तो आनद विष्णुशास्त्र्यांचें लिखाण वाचतांना मला होत नाहीं; शिवराम महादेव परांजप्यांचें लिखाण वाचतांना होत नाहीं; टिळक, आगरकरांचें लिखाण वाचतांना होत नाहीं; ह्यांच्या लिखाणांत सत्तत्त्वांचें प्रतिपादन असेल; आगरकरासारख्यांच्या लेखणींत तर ह्या

सत्तत्त्वांवरील जाज्वल्य श्रद्धेचें तेज व सामर्थ्य दिसत असेल, तिच्यांतून व्यक्त होणारा सत्याबद्दलचा अभिनिवेश डोळे दिपवून टाकीत असेल, परांजप्यांची कल्पकता व त्यांची वक्रोक्ति ही अनेकदां सत्तत्त्वांचें संवर्धन व्हावें ह्याच उदात्त हेतूने अवतरलेली असेल, व टिळकांची विवेकवाणी कधी संयमाने तर कधी अभिनिवेशाने ह्याच सत्तत्त्वांचें प्रतिपादन करण्यासाठीं खर्ची पडलेली असेल; परंतु ह्या सर्व लिखाणांचें परिशीलन हें मला वाङ्मयपरिशीलनाने होणारा एक विशिष्ट प्रकारचा आनंद देऊं शकत नाहीं; ह्याचीं कारणें अनेक असतील. अशा प्रकारचा आनंद वाचकांना द्यावा अशा उद्देशाने ह्या सर्वांनीं आपापलें लिखाण केलेलेंच नसेल; व जो ज्यांचा उद्देश नाही तो साधला गेला नाही म्हणून त्याजवर रागावणें हें मूर्खपणाचें ठरत असेल, परंतु एवढी गोष्ट खरी की ह्या सगळ्या लेखकांचें लिखाण अशा प्रकारचें आहे की त्याचें परिशीलन हें प्रतिक्षणीं नवीन नवीन प्रकारचा वाङ्मयानंद माझ्या पदरांत टाकूं शकत नाहीं. मी माहितीसाठी, त्यांतील कल्पनासौंदर्य, भाषासौंदर्य, विवेचनसौंदर्य चाखण्यासाठीं, तद्वारां त्यांच्या काळांत शिरून एक वैचारिक फेरफटका मारून येण्यासाठीं, तें लिखाण वाचतों व येथून पुढेहि अवश्य वाचीन. वरील लेखकांच्या मानाने फारच आधुनिक ठरणाऱ्या राजवाड्यांचें लिखाणंहि मी ह्याच कारणांकरितां वाचतों, परंतु ज्ञानेश्वर, तुकारामादि पद्य लेखकांचीं काव्य वाचतांना मला जी गोडी वाटते ती ह्या लेखकांचें लिखाण वाचून कधींहि लाभत नाही, हें कबूल करणेंच भाग आहे.

## मराठी गद्यवाङ्मय व ‘ सूचना ’ गुण :

छंदोमय काव्य हें गद्यवाङ्मयापेक्षां क्षणोक्षणी नवा-नवा आनन्द द्यावयाला अधिक समर्थ असतें, अतएव काव्याची बरोबरी गद्यवाङ्मयाला ह्या बाबतींत कधीच करितां येणार नाही असें कोणी म्हणेल, तर तें बरोबरच आहे; परंतु जसें सगळेंच पद्यवाङ्मय हें प्रतिक्षणीं नवसौंदर्यदर्शन घडवूं शकत नाही, तसें सगळेंच गद्य-वाङ्मय हें त्याच्या एकदोनदा केलेल्या परिशीलनानंतर नवानंद द्यावयाला असमर्थ ठरतें अशांतला भाग नाहीं. काव्याच्या ठिकाणीं नवानंद देण्याची ही शक्ति ललितवाङ्मयाच्या इतर प्रकारांपेक्षां अधिक आहे ही गोष्ट खरी : ललितवाङ्मयाचा सर्वश्रेष्ठ गुण जो ‘ सूचना ’ किंवा ‘ ध्वनि ’

तो काव्यांत आधिक्याने वसत असल्यामुळें त्याचें परिशीलन हें अर्थसौंदर्य निष्पत्तीच्या दृष्टीने एकदा करून भागत नाही. त्यांतील सौंदर्याचा संपूर्ण आस्वाद घेण्यासाठीं तें वारंवार करावें लागतें; व प्रत्येक वाचनाबरोबर नवीं नवीं अर्थात्मक सौंदर्यें आपल्या दृष्टीला पडत असतात, हेंहि खरें. एवढेंच नव्हे तर जितक्या वेळां अधिक तें वाचलें जातें तितक्या वेळां त्यांत दडलेल्या सौंदर्याचीं वेगवेगळीं अंगें रसिक वाचकांस आधिक्याने प्रत्ययास येतात हा अनुभव आहे; अर्थात् हा अनुभव गद्य-वाङ्मयाच्या वाचकांच्या वाट्यास येत नाही असें म्हणतां येणार नाहीं. ‘ सूचना ’ ज्या प्रमाणांत काव्यांत वास करिते, त्या प्रमाणांत गद्य-वाङ्मयांत वास करीत नाही, ही गोष्ट खरी असली तरी तिचें गद्य-वाङ्मयांतील वास्तव्यच त्याच्या ठिकाणीं ही नवनवीन सौंदर्यें प्रतिक्षणी प्रगट करण्याची शक्ति आणतें हें उघड आहे. ललित-वाङ्मयाच्या सगळ्या गद्यप्रकारांतून ह्या ‘ सूचना ’ गुणांचें अधिष्ठान कसें असतें हें शोधून काढणें मनोरंजक असलें तरी तें आपणांस अभिप्रेत नाहीं. ललित-वाङ्मयाच्या गद्यप्रकारांतहि नवनवीन सौंदर्यें प्रगट करण्याची ही शक्ति वसत असते, एवढेंच आपण लक्षांत घेतलें आहे; व ज्या लेखकांच्या लिखाणांत ही अतिशयत्वानें असते त्या लेखकांच्या लिखाणांतील गोडी अवीट राहते हें त्यावरून स्पष्टच होत आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां अर्वाचीन मराठी गद्य ललित-वाङ्मयाच्या लेखकांमध्ये ही शक्ति कोणकोणत्या लेखकांच्या लिखाणांत विशेषत्वानें आढळतें तें आपण सहज जातां जातां पाहत आहोंत. नाटककारांत गडकरी, खाडिलकर, कोल्हटकरांचीं नांवें; कादंबरीकारांत हरिभाऊ आपटे ह्यांचें नांव व एकंदर सर्वच प्रकारच्या वाङ्मयाचा विचार करतांना श्री. तात्यासाहेब केळकर ह्याचें नांव, हीं नांवें डोळ्यांपुढे येतात; परंतु हीं नांवें डोळ्यापुढे आलीं तरी त्यांचें समग्र लिखाण डोळ्यापुढें येत नाही. त्यांतील कांही भाग तेवढा आलासा वाटतो; कांही भागाबद्दल अशाश्वती वाटते, कोठें बुद्धीची चमक दिसते, परंतु जीवनाचा अर्थ उलगडण्याची धडपड दिसत नाही; हा अर्थ शोधण्याचा धडपड करणारी, मधूनच थकून मूक बनणारी, परंतु त्या मूकावस्थेंतच अत्यंत बोलकी भासणारी, सखोल, व्यापक बुद्धि दिसत नाही; कोठे सहानुभूति दिसते, सूक्ष्मावलोकन दिसतें, जीवनाच्या विशिष्ट अंगोपांगांचें

अतिसूक्ष्म चित्रण करण्याचा प्रयत्न दिसतो, परंतु अशा वेळीं तेथे कांही स्थळीं 'हवें' ह्याच्याबरोबर 'नको' तेंहि चित्रिलें जातें, सहानुभूतीचें पर्यवसान कींव करण्यांत होतें, वास्तवाचें चित्र परिणामकारक व्हावें म्हणून भडक केल्याने अवास्तव होतें, खोटे भाव, खोटीं मूल्यें निर्माण होतात व जेथें हसूं यावयाला पाहिजे तेथें रडूं येतें व जेथें शोकरसाचा परिपोष व्हावयाला पाहिजे तो भाग हास्यास्पद वाटूं लागतो. कोठें ह्यापेक्षां वेगळाच प्रकार पाहावयाला मिळतो; तेथें माझ्या समजुतीप्रमाणे कलेपेक्षा जीवनाला फाजील महत्त्व दिलें जातें, किंवा असेंच म्हणावयाला पाहिजे की कला व जीवन ह्या दोहोंपेक्षाहि कारागिरीलाच तेथें अधिक महत्त्व असतें: हा कारागीर मानवी जीवनांतील स्त्रीपुरुषांना आपला कच्चा माल समजतो: ह्या कच्च्या मालांतून तो आपल्या पसंतीने एक दोन ठोकळे उचलतो, त्यांना हवे ते रंग फासतो व मग आपल्या आवडीच्या राजकीय सामाजिक तत्त्वपटांवर हीं प्यादीं फिरवितो; येथें त्या पटांना व त्यावर दिल्या जाणाऱ्या ह्या डावांना त्या प्याद्यांपेक्षा अधिक महत्त्व असतें, हें उघडच आहे, व हें सगळें कसब पाहून वाचकांच्या लक्षांत जर कांहीं राहत असलें, तर तो डावच राहतो; त्यावर फिरणारीं प्यादीं राहत नाहीत कीं दुसरें कांहीं राहत नाही.

## हरीभाऊंचें वाङ्मय :

हरीभाऊ आपटे ह्यांचें लिखाण मी फिरून फिरून वरील स्वरूपाचा आनंद मिळविण्यासाठीं वाचूं शकत नाहीं. आज मी तें परत वाचूं लागलों तर कदाचित् त्यांत उपयोजिलेल्या कथानिवेदनाच्या पुराणपद्धतींतील,—( आजच्या नवतंत्रसंपन्न काळांत झटकन् वेगळेपणामुळे भासमान् होणारें )—'नावीन्य' मला मोह घालील, नाही असें नाहीं; परंतु त्याने मोह घातलाच तर तो फारच थोड्या वेळापुरता, असें खेदाने म्हणावें लागेल. ह्या मोहाने मीं तें लिखाण वाचलेंच तर फार थोडें वाचीन; किंबहुना त्यामुळेच मी तें एखादे वेळीं बिलकुलहि वाचणार नाही. हरीभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांतून जें विशिष्ट समाजस्थितीचें सत्यदर्शन झालें आहे, त्याजसाठींच मीं त्यांचें लिखाण वाचलें तरी वाचीन. परंतु ह्या संबंधीहि अनुभव असा आहे की तें लिखाण वरचेवर वाचल्याने मला हव्या त्या आनंदाची प्राप्ती होत

नाहीं; हरीभाऊंनीं निर्माण केलेले स्त्रीपुरुष माझ्या डोळयासमोर तरळत आहेत, ते ज्या सुखदुःखकारक प्रसंगांतून गेले, ते प्रसंगहि हरीभाऊंच्या उज्वल प्रतिभेमुळे माझ्या डोळयासमोर हुबेहूब आजहि उभे राहूं शकत आहेत. त्यांतून हरीभाऊंनीं गुंफिलेला जीवनपट मला अद्यापहि मोहक वाटतो आहे, माजघर, ओसरी, ओटा, अंगण, स्वैंपाकघर, देवघर, परस, चावडी, तुळशीवृंदावन, माड्या, बैठकी, लोड, तकिये इत्यादि आपल्या महाराष्ट्रीय संस्कृतीशी एकजीव झालेल्या स्थळीं घडणारे त्या कादंबऱ्यांतील अनेकविध प्रसंग माझ्या मनश्चक्षूसमोर उभे राहूं लागले कीं मला महाराष्ट्राची— अस्सल महाराष्ट्राची आठवण होऊन परोपरीचा आनंद होतो; हें ‘ सदाशिव-पेठी ’ असलें तरी खरेंखुऱ्या मराठमोळा जीवनाचें चित्र आहे ह्याची एक-प्रकारें विलक्षण सुखद जाणीवहि मला होते; माझें हें येथील शहरी मन त्या काळांत वावरूं लागतें, त्या काळांतील जीवन जगूं लागतें; पुण्यासाताऱ्यांतल्या गल्यांतून, रस्त्यांतून, वाड्यांतून व चौकांतून वावरूं लागतें. समयीच्या उजे-डांत देवासमोर बसून प्रार्थना करणाऱ्या गरीब निराश्रित विधवा त्याला दिसतात, माधुकरी मागत घरोघरीं फिरणारीं ब्राह्मणांचीं मुलें त्याला दिसतात, शंकरमामंजी दिसतात, भावानंद दिसतात, यमू दिसते— हीं सगळीं माणसं पांढरपेशा वर्गांतीलच कां दिसतात ? असा मधूनच प्रश्न पडतो, नाही असें नाही. परंतु तात्रडतोब जें दिसतें तें इतकें सजीव, हूबेहूब, जीवंत स्वरूपांत दिसतें की तें तसें दिसत असल्यामुळे तो डोळयासमोर आलेला प्रश्न तेवढ्या-वरच राहतो.

परंतु असें असूनहि हव्या त्या प्रकारच्या आनंदाचा लाभ मला हरि-भाऊंच्या लिखाणाच्या परिशीलनाने होत नाही. हरिभाऊंच्या ठिकाणीं सूक्ष्मावलोकन होतें, सहानुभूति होती, मनुष्यस्वभावाचें ज्ञानहि अपूर्व होतें, परंतु मानवी जीवनाचा अर्थ काय, मनुष्याला प्रवृत्तिस्वातंत्र्य आहे की नाही, असल्यास मनुष्य त्याचा परमार्थाने स्वसुखाकडे कितपत उपयोग करतो, ह्यांत त्याला कितपत यश येतें, त्याच्या आयुष्यांत कार्याकार्य निर्णयाचे प्रसंग किती उत्पन्न होतात, त्याची कार्याकार्य निर्णयाची कसोटी काय असते, ह्या कसोटीनुसार मनुष्य जें सत्कार्य म्हणून ठरवितो व आचरतो, त्यापासून त्याला खरोखरच सुख होतें काय इत्यादि मानवी

जीवनासंबंधीच्या मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नांनी हरिभाऊंना कधींच भंडावलें नव्हतें; व म्हणून ह्या प्रश्नांचे पडसाद त्यांच्या लिखाणांत उमटावयाचें कांहींच कारण नव्हतें; अर्थात् ते ह्याप्रमाणे त्यांच्या लिखाणांत उमटले नाहीत, हें स्वाभाविकच आहे. जीवनाचें चित्र त्यानीं रेखाटलें, परंतु जीवन हें असेंच कां अशा प्रकारचा प्रश्न वाचकांच्या मनांत ते उत्पन्न करूं शकले असें वाटत नाही. त्यांच्या कादंबऱ्या वाचून त्यांतील जीवनचित्रांतील अनेकविध वैचित्र्यांनी वाचकाला जीवनाच्या बहुविधत्वाची सुखद जाणीव झाली असेल, त्यांतील उदात्त भागांच्या दर्शनाने त्याच्या चित्तवृत्ति उल्हसित झाल्या असतील, निंद्य, घृणास्पद, अतिहीन भागाच्या दर्शनानें त्याच्या अंतःकरणांत जुगुप्सा निर्माण झाली असेल, त्यांतील सुरूपतेने त्याच्या सौंदर्यदृष्टीचें पारणें फिटलें असेल, व कुरूपतेच्या दर्शनाने त्याला चीड आलेली असेल; परंतु ह्या असल्या परस्पर विरोधी गोष्टींची मोट बांधणाऱ्या जीवनाचा अर्थ काय ? ह्या सर्व गोष्टींचा मानवाच्या सुखासाठी उपयोग काय, ह्या असल्या जीवनांत वावरतांना मानवापुढे कोणते प्रश्न पडतात, व ते सोडवून आपलें जीवन लौकिकार्थाने व परमार्थाने यशस्वी करण्यास तो कितपत समर्थ ठरतो इत्यादि गहन प्रश्न वाचकांच्या मनांत त्या कादंबऱ्यांच्या वाचनाबरोबरच हरिभाऊ निर्माण करूं शकले नाहीत असें मला म्हणावयाचें आहें; अर्थात् हें हरिभाऊंचें लेखनकार्यच नव्हतें, असें म्हटलें असतां भागण्यासारखें आहे; आणि कोणीहि समंजस टीकाकार तसें म्हणेलच.. परंतु हार्डी, टॉलस्टॉय, रोमा रोलां, शेक्सपिअर, टागोर इत्यादि श्रेष्ठ लेखकांच्या लिखाणांत जें वैशिष्ट्य दिसतें तें पुष्कळांशीं त्यांच्या ठिकाणीं वरील स्वरूपाचे प्रश्न वाचकांच्या मनांत उत्पन्न करण्याच्या ह्या शक्तींत असतें असें मला वाटतें. मानवी जीवनासंबंधीचे हे मूलभूत स्वरूपाचे प्रश्न वाचकांच्या मनांत ह्या श्रेष्ठ ग्रंथकारांचे ग्रंथ वाचीत असतां आपोआपच घोळूं लागतात; ह्या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्याकरितां हे ग्रंथकार आपले ग्रंथ लिहीत असतात, असें म्हणतां येणार नाहीं; परंतु एवढें खरें की त्यांची मानवीजीवन चितारण्याची हतवटीच अशी असते की त्या चित्रांतूनच हे प्रश्न वाचकांच्या मनांत शिरावेत, त्यांनी तीं मनें भंडावून सोडावींत व तेथेंच घरें करून राहावें. शेक्सपिअरचें हॅम्लेट वाचतांना आपणाला ह्याच गोष्टीची जाणीव होते; ह्या जगाचे व्यवहार

किती गूढ आहेत, माणसाचें मन हें एक कसें न सुटणारें कोडें आहे, माणसाला खरोखरच स्वसुख ( लौकिकार्थानें ) प्यारें आहे काय ? कार्या-कार्यासंबंधीचा विचार हा शेवटी स्वसुखनाशास तर कारण होत नाही ना ? असल्या प्रकारचे कितीतरी प्रश्न हें नाटक वाचून खाली ठेवतांना आपल्या डोक्यांत थैमान घालूं लागतात; ज्या लिखाणांत असल्या प्रकारचे प्रश्न वाचकाच्या मनांत सहजगत्या उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें, तें एक अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा आनंद वाचकांच्या पदरांत टाकतें असेंच म्हणावें लागतें. डिकेन्सपेक्षां टॉलस्टॉय श्रेष्ठ ठरतो, तो ह्या अर्थानें; आणि ह्या आनंदाची मौज अशी असते की त्याची गोडी अवीट असते; त्या लिखाणाच्या प्रत्येक नव्या परिशीलनांतून नवनव्या सौंदर्याची सुखद जाणीव वाचकास होत असते व ह्या जाणिवेनें होणाऱ्या आनंदाची माधुरीहि तशीच नित्य नवीन असते. अशा प्रकारचा आनंद हरीभाऊंचें लिखाण त्याचें परत परत परिशीलन केलें असतां मला देऊं शकत नाहीं एवढेंच माझें म्हणणें.

## श्रेष्ठ कलावंताचें वाङ्मयकार्य :

अर्थात् अशा प्रकारचे जीवनासंबंधीचे मूलभूत स्वरूपाचे प्रश्न सहृदय वाचकांच्या अन्तःकरणांत सहजतया निर्माण करणें ही गोष्ट कांहीं साधी नव्हे. अशा वेळीं कलावन्ताचें हें वाङ्मयकार्य कोणत्या पद्धतीने घडत असलें पाहिजे ह्या विषयी विचार करणें अप्रस्तुत होणार नाहीं. जीवनाकडे पाहण्याची सदर लेखकाची दृष्टि ही केवळ स्थूलाबद्दलच्या कुतूहलाने प्रेरित असेल असें वाटत नाहीं; सर्वसामान्य ललितलेखक हा ज्या जिज्ञासाबुद्धीने व कुतूहलाने जीवन-व्यवहारांचें निरीक्षण करीत असेल, त्यापेक्षा थोड्या फार वेगळ्या कुतूहल-बुद्धीनें हा लेखक जीवनाकडे बघत असावा. त्याची दृष्टि ही स्थिरचित्ताची ज्ञानदृष्टी असावी. अनपेक्षित, अलौकिक, अद्भुत, लोकविलक्षण असें कांही दिसले की ज्यांचे नेत्र कुतूहलाने विस्फारित होतात, अशा सर्वसामान्य लेखकांची बालसदृश कुतूहलबुद्धि त्याचे ठिकाणीं असेलसें वाटत नाही: अनपेक्षिताच्या वा अलौकिकाच्या अवलोकनाने त्याला विस्मय वाटणार नाहीं, असें नाही, परंतु तेथें विस्मयापेक्षा जीवनासंबंधीच्या इतर जाणिवाच अधिक प्रबळ असतील. लोकविलक्षण घटनेच्या अवलोकनाने वेडावून जाण्याऐवजी

ह्या घटनेचा अर्थ काय हें शोधून काढण्याचाच यत्न त्याची बुद्धी करूं लागेल, आणि जीवनाचें गूढ अधिक गंभीर अर्थानें त्याला त्या क्षणीं प्रतीत होऊं लागेल. परंतु खरें म्हणजे ह्या लोकविलक्षण घटनांपेक्षां तो मानवांच्या सर्वसामान्य व्यवहारांमध्येच खरा अधिक रंगून जात असला पाहिजे; ह्या हरघडीच्या जीवनांतील साध्यासुध्या गोष्टींचा त्याच्या तत्त्वशोधक मनावर खोलवर परिणाम होत असला पाहिजे; ह्या साध्यासुध्या गोष्टींत दडलेलीं जीवनतत्त्वें लक्षांत आल्यानें त्याला एक प्रकारचें सात्त्विक समाधान लाभत असावें. जगांत दुष्टपणापेक्षा गैरसमजच दुःखास अधिक कारण होतात, असें त्याचें मानवांबद्दलच्या सहानुभूतीनें ओथंबलेलें तत्त्वशोधक मन त्याला ग्वाही देत असावें; ह्यामुळेंच मानवांच्या अन्तिम सुखाबद्दल एक प्रकारचा जबर आत्मविश्वास त्या मनांत उत्पन्न होत असला पाहिजे; मानव हा कधी तरी सुखी, पूर्णसुखी होणार, मानवाला सोसावीं लागणारीं दुःखें हीं त्यानें मनांत आणतांच नष्ट होणारीं आहेत, तीं बरीचशीं त्यानेंच निर्माण केलेलीं आहेत, आज त्याला ह्या गोष्टीची नीटशी जाणीव नसल्यामुळें तो त्यामुळें थोडाफार भांबावल्यासारखा दिसत आहे, पण उद्यां ही जाणीव झाल्यावर हीं दुःखें हां हां म्हणतां दूर व्हावयाला वेळ लागणार नाहीं, अशा सुखद विचारांनी तो मानवी जीवनाचें अवलोकन करीत असला पाहिजे. साहजिकच त्याचें मन सुप्रसन्न, चित्तवृत्ति उल्हसित, मनोवृत्ति उदार, व दृष्टि सहानुभूतिपूर्ण असणें स्वाभाविकच आहे. त्याच्या नजरेंतून सत्य हें सुटत नसणारच, परंतु सर्वसामान्य प्रेक्षक जें 'दिसतें' त्यालाच सत्य समजेल, तर हा जें 'असतें' तें शोधून काढीपर्यंत सत्याचा तलास करीत राहील. केवळ जें 'दिसतें' त्याचें चित्रण करून वाचकांचें घटका दोन घटका मनोरंजन करणें हें त्याचें काम नव्हे; जें 'दिसतें' तें पुष्कळदां जें 'असतें', त्यापेक्षा जास्त आकर्षक असेल व बहुधा असतेंहि; परंतु ह्या वरवरच्या आकर्षणाला, तुकतुकीला भुलून तो त्याचें दर्शन घडविण्याच्या भरीस न पडतां, जें 'असतें' त्याचाच शोध लावून, त्याचेंच दर्शन घडविण्याची खटपट करीत राहील; व म्हणूनच त्याच्या लिखाणांतून व्यक्त झालेलें जीवन हें खरेंखुरें असेल, जीवंत असेल, त्याच्यांत वरवरचा डोळे दिपविणारा आकर्षकपणा कमी असेल, सजावट नसेल, बनावट नसेल, झिलई नसेल, रचना, मांडणी

नीटशी नसेल; परंतु जीवनाच्या अंतःप्रवाहांचें साक्षात दर्शन असेल, जीवनाची अबाधितता त्यांतून प्रत्ययास येत असेल. जीवनव्यवहाराला आधारभूत असलेल्या सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्या त्रिपुटीचा साक्षात्कार त्यांतून होत असेल, व त्याच्या परिशीलनाने वाचकांच्या चित्तवृत्तीही लेखकाच्या चित्तवृत्तीप्रमाणेच शांत, सुप्रसन्न, उल्हसित व सहानुभूतिपूर्ण बनत असतील; भावना मूलतः चंचल खऱ्या, परंतु त्याच्या परिशीलनाने निर्माण होणाऱ्या भावनांना थोडीफार स्थिरता येत असेल. असल्या लिखाणाच्या वाचनानंतर आपल्या जीवनव्यवहारांकडे परत वळतांना वाचकांना उत्साह, आत्मविश्वास, आनंद वाटत असला पाहिजे. भलत्या आशा आकांक्षा उराशीं बाळगून जीवन सागरांत उडी घेऊं पाहणारा व मग त्यांच्या भाराखालीच बुडूं लागणारा मनुष्य असलें लिखाण वाचल्यावर हें खोट्या इच्छा अपेक्षांचें गांठोडें थोडा वेळ तरी दूर ढकलल्याशिवाय राहणार नाही. जीवनासंबंधीच्या चुकीच्या समजुतींना येथें जागा नसणार; जीवनाचीं हरघडीच्या व्यवहारांतील बारीकसारीक कोडीं ह्या लिखाणांत उलगडल्यासारखींच वाटणार; निदान तीं उलगडण्याकरितां कोणत्या दिशेने प्रयत्न व्हावयाला पाहिजे हें तरी त्यांतून कळल्याशिवाय राहणार नाही. जीवनांतील अत्यंत गूढ प्रमेयें जरी गूढच राहिलीं; तसेंच इतर जीं लहान मोठीं दुःखें आपल्या भोंवतीं घोंघावत असतात, त्यांजकडे कोणत्या दृष्टीने बघावयाला पाहिजे व त्यांचें निराकरण करण्यासाठीं कोणती वृत्ति आपण स्वीकारली पाहिजे, ह्या संबंधींचें निश्चित मार्गदर्शन जरी त्यांतून आपणांस झालें नाही, तरी सुनिश्चयाला अनुकूल अशी आपल्या मनाची तयारी करण्याचें सामर्थ्य ह्या लिखाणांत अवश्य असणार. म्हणूनच हें लिखाण वाचून सोत्साहाने जीवन-व्यवहारांत भाग घ्यावयाला आपण तयार होतों, जीवनाविषयी आनंदयुक्त, आशायुक्त, कुतूहल आपणांस वाटूं लागतें; पूर्णत्वाने जीवन जगण्याचा आपण प्रसन्न चित्ताने प्रयत्न करूं लागतों. जीवनांतील मांगल्याचा, आनंदाचा, पवित्रतेचा, उदात्ततेचा, हंसऱ्या सजीवतेचा आपणास साक्षात्कार घडतो व त्यामुळे अधिक हिरीरीने, अधिक समंजसपणें, अधिक यथार्थत्वाने व अधिक निर्धाराने हें जीवन जगण्याचा आपण प्रयत्न करतों.

**वामन मल्हारांचें लिखाण:**

वर ज्या प्रकारच्या लिखाणाचें वर्णन केलें आहे, त्या प्रकारचें लिखाण स्थूलमानाने कै. वा. म. जोशी ह्यांचे हातून लिहिलें गेलें असेंच मला पर्यायाने सुचवावयाचें आहे हें श्रोत्यांच्या लक्षांत आलेंच असेल. वामन मल्हारांचें लिखाण वाचीत असतां मला जो आनंद होतो तो हरिभाऊंचें लिखाण वाचीत असतां होणाऱ्या आनंदापेक्षा केवळ वेगळ्या स्वरूपाचा असतो, असें नव्हे, तर श्रेष्ठतर स्वरूपाचा असतो असेंच म्हटलें पाहिजे. (येथें हरिभाऊंचें उदाहरण जें घेतलें तें प्रतिनिधिक म्हणून घेतलें; परांजपे, कोल्हटकर किंवा केळकर ह्यांचे संबंधीहि असेंच म्हणावें लागेल.) वामन मल्हारांचें लिखाण वाचल्या-नंतर चित्तवृत्ति स्थिरावतात, मनाला प्रसन्नता येते, अन्तःकरणांतील सत्प्र-वृत्तींना नवी पालवी फुटूं लागते, जीवनावरील विश्वास वृद्धिंगत होतो, वृत्ति अन्तर्मुख परंतु आशायुक्त बनते व जीवनविषयक ज्या प्रश्नांनी डोकें भरून जातें ते प्रश्न श्रेष्ठ दर्जाचे असतात. जीवनाचा अर्थ समजूतदारपणें लावून घेतला पाहिजे, त्याबाबत गैरसमज, विकारवशता, पक्षाभिनिवेश इत्यादि मोहांना बळी पडतां कामा नये अशा प्रकारचे विचार मनामध्यें येऊं लागतात, माणसाच्या कर्तृत्वावरील आपला विश्वास वाढतो, त्याच्या भवितव्याबद्दल सकारण आशा वाटूं लागते, त्याच्या मार्गावरील अडचणींचें खरें स्वरूप काय आहे ह्याचा थोडाबहुत उलगडा होऊं लागतो व एकंदर जीवनाकडे आपण अधिक डोळसपणें, अधिक समंजसपणें, अधिक सहानुभूतीने, अधिक उत्साहाने पाहूं लागतों. ह्या सर्व जाणिवांपासून आपणास जो आनंद मिळतो त्याचें स्वरूप श्रेष्ठ असतें, हें काय सांगावयाला पाहिजे? त्याची गोडी अवीट असते; त्याचे ठिकाणीं अखंड नवोन्मेष फुलविण्याची शक्ति असते; व म्हणूनच वामन मल्हारांचे ग्रंथ कितीहि वेळां वाचले तरी त्यांतील सर्वस्व आपण ग्रहण केलें आहे असें कधीच वाटत नाही. जगांतील सगळ्याच श्रेष्ठ लेखकांविषयी असेंच विधान करावें लागतें; कारण त्यांच्या लिखाणांतील अगदी कोनाकोपऱ्यांतहि त्यांनी आपलें जीवनसर्वस्व ओतलेलें असल्यामुळे त्यांचा पूर्णत्वाने आस्वाद घ्यावयाला त्यांचें वारंवार परिशीलन करावें लागतें, व हें परिशीलन अनेकवार करूनहि त्यांचा आस्वाद पूर्णत्वाने घेतां येतोच असेंहि नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नों. दि. ...

## वाङ्मयीन व्यक्तिमत्व : सत्यभक्ति

वामन मल्हारांचें लिखाण, त्यांच्याच आवडत्या अद्वैत मताचा अनुवाद करून बोलायचें म्हणजे बहुविध असूनहि एकविध आहे, असें म्हणावें लागतें. तें अनेकरंगी असूनहि एकरंगी आहे : त्यांत नानात्व असलें तरी तत्वतः एकत्व आहे; तत्त्वशोधक, तत्त्वप्रचारक, कादंबरीकार, लघुकथा-लेखक, नाटककार, वाङ्मयविवेचक इत्यादि नानाविध भूमिकांतून त्यांनीं आपलें लिखाण वेळोवेळी केलेलें असलें तरी त्या सर्वच लिखाणांत अनुस्यूत झालेलें त्यांचें व्यक्तिमत्व सर्वार्थाने एकसंध आहे. सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्या तीन परमतत्त्वांच्या शोधार्थ हें सर्व लिखाण झालें आहे. मग तें नीतिशास्त्र व तत्संबद्ध असलेल्या इतर शास्त्राचें विवरण असो, जीवनांतील साध्यासुध्या व धीरोदात्त व्यवहारांचें व प्रसंगांचें चित्रण असो, वाङ्मयव्यवहाराच्या स्वरूपा-संबंधीचें, कार्यपद्धतीसंबंधीचें, हेतूसंबंधीचें विवेचन असो, किंवा शाळेंतील मुलींसाठी रचलेल्या नाट्यसंवादांचें लेखन असो; त्यांतून ह्या त्रिपुटीवरील लेखकाचा अत्यंत अढळ विश्वास व्यक्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. वामन मल्हार हे कुशल तत्त्वशोधक होते, ते एक नमुनेदार सद्गृहस्थ होते व अत्यंत चोखंदळ वृत्तीचे सौंदर्यसमीक्षक होते असें जें आपण म्हणतों, त्याचें बीज ह्या त्रिपुटीवरील त्यांच्या अढळ श्रद्धेमध्येच नाही काय ? हेंच अखंड, एकसंध व्यक्तिमत्व वामनरावांच्या सगळ्याच लिखाणांतून प्रतीत होत आहे. त्यांच्या लिखाणाच्या स्फटिकवत् जलाशयांत पडलेलें त्यांच्या व्यक्तिमत्वाचें प्रतिबिंब इतकें जीवंत आहे की त्या निर्मल वाङ्मयोदकाने भरलेल्या जलाशयाचें कौतुक करावें की त्यांत प्रतिबिंबित झालेल्या ह्या सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्यांची मूर्तिमान प्रतिमाच भासत असलेल्या मूर्तीला न्याहळीत राहावें हेंच कळत नाहीं. वामनरावांचें हें व्यक्तिमत्व इतक्या एकसंधपणें त्यांच्या सगळ्याच लिखाणांतून व्यक्त होण्याचें कारण त्यांची अढळ सत्यभक्तीच होय असें मला वाटतें. वामनरावांनीं जें खरोखर वाटलें तें लिहिलें, जें खरोखर सांगावेंसें वाटलें तें सांगितलें, जें चर्चावें असें वाटलें त्याचीच अन्तःकरण-पूर्वक चर्चा केली; त्यांत कोठे ढोंग नाही, कोठे विशिष्ट परिणाम साधण्याचा प्रयत्न नाही वा हव्यास नाही — व जेथे तो थोडाफार आहे, तेथे त्याची जाणीव लेखकालाच इतकी आहे की त्यामुळे तो प्रयत्न केवळ फसलेला आहे

असें नव्हे, तर तो फसल्यामुळें व आपण हें व्यर्थ साधण्याचा प्रयत्न केला, या जाणिवेमुळें ओशाळलेल्या लेखकाचा चेहराहि वाचकांस तेथेंच दिसत आहे— कोठे मुद्दाम रचना करून, घडाई करून, नाही ते भाव व्यक्त करण्याची, जमत नाहीत ते विचार मांडण्याची खटपट नाही, धडपड नाही. अमुक विचार बरे दिसतील म्हणून प्रतिपादावेत, अमुक रचना आकर्षक ठरते, तेव्हां ती साधण्याची खटपट करून पाहावी, लोकांना अमुक आवडतें म्हणून तें लिहून पाहावें, अमुक विषयाची छाननी करणें ह्याला आज लोकमान्यता आहे, म्हणून त्याची छाननी करावी, वा अमुक जीवनांगाचें अमुक एका पद्धतीने केलेलें दर्शन ह्याला आज विशेष मागणी आहे म्हणून त्याचा पुरवठा करावा— ह्या गोष्टींची त्यांचें लिखाण वाचतांना कोठे पुसट आठवणहि येत नाही. सगळें लिखाण आस्थापूर्वक, आत्मविचारांना जागून केलेलें आहे. सत्य-प्रीतीने, सत्यसंशोधनाच्या आवडीने, मानवजातीबद्दलच्या खऱ्या कळकळीने व सहानुभूतीने प्रेरित होऊन केलेले आहे, त्यामुळें त्यांत कोठेहि लपवालपवी नाही. लपंडाव नाही, सामान्यांना भुलविणारा वरवरचा दिखाऊपणा नाही, डागडुजी, रचना, सफाई, झाकापाक नाही. कांही वेळां खरें आत्मरूप झांकून टाकावयास लावणारी वा त्याला सफेती देऊन, उजळा देऊन तें डोळ्यांत भरेल असा त्यांत रूपपालट करावयास प्रवृत्त करणारी अशी प्रेक्षकांच्या, श्रोत्यांच्या, वाचकांच्या अस्तित्वांची जाणीव कांही कलावन्तांचे ठिकाणीं दिसून येते. ही जाणीव अर्थातच त्यांच्या कलेला हिणकसपणा आणीत असली तरी तिच्यामुळे झालेला त्या लेखकाचा विशिष्ट रूपपालट सर्वसामान्य प्रेक्षकांचें व वाचकांचें मनहरण थोडावेळ करूं शकतो. अशा प्रकारची श्रोत्यांची, प्रेक्षकांची व वाचकांची जाणीव वामनरावांच्या लिखाणांत कोठेंहि आढळत नाही; स्वेतररसिकापेक्षा स्वतःच्या समाधानाकरितांच तें झाल्याचा सर्वत्र भास होतो. सगळेंच लिखाण आत्मप्रत्ययांतून स्फुरलेलें असल्यामुळें निर्मल दर्पणांत उमटणाऱ्या बिंबाप्रमाणे त्यांचें व्यक्तिमत्व त्यांतून अविकृतपणे प्रगट होतें.

**सौजन्यबोधः :**

वामनरावांची दृष्टि ही सत्यान्वेषी खरी. ‘ नीतिशास्त्रप्रवेशा ’ सारख्या

लिखाणांत अनेक उलटसुलट प्रमाणांची सत्याच्या निकषावर छाननी करतांना तिची कुशाग्रता पानोनपानांतून प्रत्ययास येते; परंतु ह्या दृष्टीला सत्याइतकीच, किंबहुना थोडीबहुत अधिकच सौजन्याची चाड असल्यामुळे तिची धार ही कोठेंहि बोचक होत नाहीं; ज्या ज्या वेळी बुद्धि व भावना ह्यांचा झगडा सुरू होतो व दोन्हीहि पक्ष तुल्यबल आहेत असें वाटूं लागतें, त्या त्या वेळीं वामनराव प्रथम बुद्धीबद्दल कमालीचा आदर व्यक्त करून शेवटी हळूच भावनेच्याच पक्षाला येऊन मिळतात. नीतिशास्त्रप्रवेशांत ते एके ठिकाणीं लिहितात, "नीतीचीं सर्व तत्त्वें तर्काच्या दुर्बिणीला स्पष्टपणें दिसत नाहीत, म्हणून तीं त्याज्य असें मला वाटत नाही......प्रेमाचें सत्यत्व म्हणजे मान्यत्व भावनेवर आहे. तें तर्कानें सिद्ध करतां येण्यासारखें नाही. याप्रमाणेच ईश्वराचें अस्तित्व, आणि आत्म्याचें स्वतंत्रत्व व अमरत्व या तत्त्वांचेंहि. अपूर्ण ज्ञानाच्या अवस्थेंत हीं तत्त्वें तार्किक पद्धतीने सिद्ध झालीं नाहीत म्हणून तीं अश्रद्धेय किंवा अमान्य होत नाहींत." वामनरावांच्या ह्या सत्यान्वेषी बुद्धीला कठोरता कशी ती ठाऊक नाहीं, ह्याचें कारण उघडच आहे; सत्याचें शोधन हें अंती जीवनाला उपयुक्त ठरावें एवढ्यासाठीच आहे, मानवाचें कल्याण हेंच त्याचें साध्य आहे; तें मानवाच्या दुःखाला थोडेंबहुत जरी कारण झालें तरी त्यांत त्याची कर्तव्यच्युति आहे, तेव्हां असें होऊं देतां कामा नये; अखिल मानवसमाजाचें सुख व सत्यसंशोधन ह्यांचा नेहमींच मेळ बसला पाहिजे, ह्यांत नेहमी सलोखा, मित्रभाव असला पाहिजे, अशा प्रकारची सत्यशोधनाबद्दलची त्यांची भूमिका असल्यामुळें त्यांच्या सत्यशोधक वृत्तीमध्ये व दृष्टीमध्ये शास्त्रज्ञाच्या नजरेंतील भेदकता आलेली नसून दाणे टिपून आपल्या पिलांना भरविणाऱ्या मातेच्या नजरेंतील स्निग्धता आलेली आहे, हें स्वाभाविकच आहे.

### सौंदर्यदृष्टिः

सौजन्याला वाढीस लावणाऱ्या सत्याचें संशोधन करूं पाहणारी ही दृष्टि केवळ भूतदयावादी तत्त्वशोधकाची नाही, तर सौंदर्य पाहणाऱ्या, सौंदर्य ओळखणाऱ्या व सौंदर्य निर्माण करणाऱ्या कलावन्ताची आहे. मी असें बोलूं लागतांच आपणापैकी कांहीजण वामनरावांच्या कादंबऱ्यांत रचनेबाबत दिसून

येणाऱ्या प्रमाणबद्धतेच्या अभावाबद्दल, आणि सौंदर्यसिद्धीचे सर्वसामान्य नियम पाळतांना त्यांनी दाखविलेल्या हलगर्जीपणाबद्दल व इतर तत्संबद्ध दोषांबद्दल मला आठवण करून देतील; वामनरावांच्या लिखाणांतील ह्या दोषांची मला पूर्णपणे जाणीव आहे व त्यांच्या संबंधीचे माझे विचार मी वामनरावांचा कथालेखक ह्या दृष्टीने अधिकार काय होता हें स्पष्ट करीत असतांना व्यक्त करणारच आहें. येथें एवढेंच सांगतों कीं वामनरावांच्या लिखाणांतील वरील दोष लक्षांत घेऊनहि असेंच म्हणावें लागतें की वामनरावांची सौंदर्यदृष्टि ही बरीच चोखंदळ होती; वामनराव हे आळशी होते, आपल्या लेखन-व्यवहाराबद्दल तितकेसे दक्ष नव्हते, हलगर्जी होते, नीटसपणा, टापटीप, साफसुफी इत्यादि गोष्टींचें त्यांना वावडें होतें, वगैरे त्यांच्यासंबंधीच्या गोष्टी आपण त्यांच्या चरित्रांत वाचतों; त्यांवरून पाहतां असें म्हणावें लागतें की वामनरावांना सौंदर्यसिद्धीबाबत सर्व कळत होतें, पण हातून वळत नव्हतें; त्याकरितां करावी लागणारी वेगळी मेहनत व मशागत त्यांना जमत नव्हती; सफाईचा हात शेवटपर्यंत आपल्या लिखाणावरून फिरता ठेवणाऱ्या कलाचतुर कलावन्तांची दक्षता त्यांजपाशी नव्हती; मांडणी, रचना, आंखणी इत्यादि साधनांची त्यांना दखल असली तरी त्यांचा उपयोग करून घेऊन विशिष्ट सौंदर्यसाधना करून घेण्याइतकी फुरसत किंवा चिकाटी त्यांजपाशी नव्हती; व पर्वाहि फारशी नव्हती. किंवा असेंहि म्हणतां येईल की ज्या सौंदर्याने, ज्या सुरूपतेने, ज्या प्रमाणबद्धतेने, ज्या रंगसंगतीने, ज्या चित्राकृतींनी त्यांना वेड लावलें होतें व ज्यांना शब्दद्वारां व्यक्त करण्याची त्यांची धडपड चाललेली होती, त्यांचें स्वरूप बाह्य सौंदर्याच्या स्वरूपाहून भिन्न होतें, त्यांचा दर्जा अधिक वरचा होता, त्यांची जाणीव स्थूल दर्शनापेक्षां स्थूल दर्शनानेच होणारी होती; त्यांचें क्षेत्र वेगळें होतें, जीवनाच्या अंतरंगांतील सुरूपतेचें हें दर्शन होतें, बहिरंगांतील दिखाऊपणाचें नव्हतें. माणसाचे भाव, त्याचे विचार, त्याच्या हातून घडणारीं कर्में, त्याचा इतरांशीं येणारा संबंध, त्यांतून निर्माण होणारीं भावद्वंद्वें इत्यादींमध्यें जो साम्यविरोध, जी संगति, जी सुप्रमाणता, जी लयबद्धता आढळते तिनें वामनराव आकर्षित होत होते; बाह्य रूपसौंदर्याने नव्हे. व ह्या अन्तःसौंदर्याचा प्रत्यय येतांच त्याचें सोत्साहाने दर्शन घडवून आणण्यासाठीच ते उतावीळ होत असल्यामुळे

स्वाभाविकच त्यांचें बहिरंगांतील सुरूपतेकडे, रंगसंगतीकडे, प्रमाणबद्धतेकडे थोडेंफार दुर्लक्ष झालें यांत नवल नाही. त्यांच्या लिखाणांतील अन्तःसौंदर्यांत कोठे बेडौलपणा आलेला आहे काय हें रसिकांनी बघायला हवें; व तेथे जर अथपासून इतीपर्यंत सुरूपता आढळली तर तिच्या निर्मात्याला सौंदर्यदृष्टि होती हें कबूल केलें पाहिजे. सहृदयतेने सत्याचें संशोधन करूं पाहणारें वामनरावांचें समतोल मन सौंदर्यदृष्टीचा परिपोष करावयाला अत्यंत अनुकूल होतें असेंच दिसून येईल. सुसंगति, प्रमाणबद्धता, साम्यविरोध इत्यादि सौंदर्यतत्त्वांची जाणीव समतोलपणा अंगीं बाणलेल्या सहृदयाच्या ठिकाणीं असणार नाही, असें कधी तरी होईल काय ? अशाच्या ठिकाणीं ती अंगभूतच असणार हें उघडच आहे : वामनरावांच्याही ठिकाणीं ती पूर्णत्वाने वसत होती : 'कृष्णाबाई'च्या लघुकथांचें—'अनिरुद्ध प्रवाह' ह्या कथासंग्रहाचें—समीक्षण करितांना कोणत्या कथेंतील कोणतीं वाक्यें गाळलीं असतां त्यांच्यातील सुरूपतेला व अर्थातूच परिणामकारकतेला बाधा आली नसती, नव्हे उलट त्यांत भर पडली असती हें वामनरावांनीं मोठ्या कौशल्याने दाखविलें आहे. वामनरावांच्या सगळ्याच वाङ्मयविषयक टीकालेखांतून त्यांची ही चोखंदळ सौंदर्यदृष्टि दिसून येत आहे : तेथे प्रगट होणारें तिचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे हें पाहणें हा एक स्वतंत्र व्याख्यानाचा विषय आहे व तत्संबंधीच्या व्याख्यानांत तें स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न करीनच. येथे एवढेंच सूचित करावेसें वाटतें की सत्यशोधनाबाबत ज्याप्रमाणें वामनरावांचा 'जें दिसतें' त्यापेक्षा जें 'असतें' तें शोधून काढून रसिकांसमोर मांडण्याकडेच विशेष कटाक्ष होता किंवा सौजन्याबाबतहि वरवरच्या शिष्टाचारांपेक्षा खरी सुजनता कशांत आहे हें दर्शविण्याकडेच त्यांचा रोख होता, त्याचप्रमाणे त्यांच्या सौंदर्यदृष्टीबद्दलहि असेंच म्हणावें लागेल की तिची तृप्ति बाह्य रूपसौंदर्याच्या अवलोकनापेक्षां व दर्शनापेक्षां अन्तःसौंदर्याच्या अवलोकनाने व अभिव्यक्तीनेच यथार्थत्वाने होत होती.

### भाषाशैलींत प्रतिबिंबित झालेली सौंदर्यदृष्टि :

परंतु ही गोष्ट खरी असली तरी वामनरावांची ही अत्यंत चोखंदळ असलेली सौंदर्यदृष्टि त्यांच्या लिखाणाच्या बाह्यांगांतहि प्रगट झाल्याशिवाय

राहिलेली नाही. हेंहि त्याच क्षणी लक्षांत येतें. त्यांच्या लिखाणाच्या बाह्यांगांतील वेगवेगळया बाबींचा विचार ह्या निबंधांतून प्रसंगोचितपणें होईलच, येथें फक्त जातां जातां त्यांच्या लिखाणांतील एकंदर भाषाशैलीकडे मी आपलें लक्ष वळवितों. वामनरावांच्या सगळ्याच विवेचक लिखाणांतील भाषा ही अत्यंत सुबोध, अर्थवाहक, यथोचित व अत्यंत समर्पक शब्दांनी व कल्पनाचित्रांनी फुललेली अशी आहे, असा आपणांस त्यांच्या लिखाणाचें परिशीलन करीत असतां नेहमीच अनुभव येतो. ते विकासवादावरील वा आत्म्याच्या अमरत्वावरील आपले विचार व्यक्त करीत असोत, माडखोलकरांच्या एखाद्या पुस्तकावरील आपला अभिप्राय लिहीत असोत, एखाद्या नीतिशास्त्रविषयक वा समाजशास्त्रविषयक प्रश्नावर आपल्या कथांतील पात्रांकरवी वादविवाद करवीत असोत किंवा त्यांच्या कथेंतील एखाद्या स्त्रीचे वा पुरुषाचे आत्मगत विचार व्यक्त करीत असोत, आपल्या विरुद्ध पक्षाचे विचार समजून घेण्यासाठीं ते कागदावर उतरून काढीत असोत वा त्यावरील आपलें म्हणणें कधी विलक्षण संयमाने, तर कधी विलक्षण हिरीरीने पुढे मांडीत असोत; त्यांच्या भाषेचा डौल कधींहि बिघडत नाही; तिची तीच नेहमीची प्रसंगीं हसरी, प्रसंगीं धीर गंभीर, परंतु नीटस, सतेज, आकर्षक, व विचारी मुद्रा आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. त्यांच्या वाक्यांची घडण, त्यांच्या परिच्छेदांची ठेवण, त्यांतून व्यक्त होणाऱ्या विचारांचें निःसंदिग्ध दर्शन, गुंतागुंत, क्लिष्टत्व, दुर्बोधता इत्यादींचा संपूर्ण अभाव इत्यादि त्यांतील लेखनविशेषांबद्दल विचार करूं लागलों की ज्याप्रमाणे ह्यांच्यामागे असलेलें निःसंदेह, विवेकशील, निरभ्र, विकाररहित असें त्यांचें मन डोळ्यांपुढें येतें, त्याचप्रमाणे समतोलपणा, कोमलता, सुप्रमाणता, सुसंगति, औचित्य, इत्यादींची अंगभूतच आवड असलेली त्यांची अभिजात सौंदर्यदृष्टीहि डोळ्यांसमोर उभी राहते. येथें हेंहि लक्षांत घ्यावयाला पाहिजे कीं, वामनरावांची कल्पनाशक्तीहि अत्यंत तल्लख होती; तसेंच त्यांचें भावबलहि अत्यंत संपन्न होतें. कोणत्याहि प्रश्नावर विचार करूं लागल्यावर त्यांचें भावसंपन्न व विवेकशील मन त्याच्याशीं इतकें एकरूप होऊन जाई की वादविषयाशीं भावसाधर्म्य व विचारसाधर्म्य असलेलीं अनेक कल्पनाचित्रें त्यांच्या मनांत तरळूं लागत व त्यांच्या लिखाणांत जागोजाग उतरत. ह्या संबद्ध कल्पनाचित्रांनीच त्यांचें लिखाण इतकें

सुबोध, इतकें वाचनीय, इतकें आकर्षक व इतकें भाव व अर्थ वाहक बनविलें आहे. ह्या कल्पनाचित्रांना यथोचित शब्दांनी अभिव्यक्ति देण्याचें कार्य त्यांच्या अभिजात सौंदर्यदृष्टीच्या देखरेखीखालीच झालेलें असल्यामुळे तें अत्यंत नीटसपणे घडलेलें आहे असें दिसून येतें. नाहीतर नको त्या व नको तितक्या अलंकारांनीं नटलेल्या स्त्रीसारखें किंवा कांहीं आधुनिक मराठी ललितलेखकांच्या भाषाशैलीसारखें बेगडी स्वरूप त्याला आलें असतें. वादविषय समजावून देतांना जे दृष्टान्त, ज्या उपमा वामन मल्हार देतात व जीं रूपकें ते साधतात त्यांचें स्वरूप इतकें यथोचित असतें की, तीं सर्व त्यांच्या विवेचनाचीं अत्यंत प्रमुख अंगें ठरतात. 'नीतिशास्त्रप्रवेश' ह्या सारख्या ग्रंथांतील विवेचन अगदी अथपासून इतीपर्यंत जें इतकें सुबोध उतरलें आहे त्याचें कारण म्हणजे लेखकाचें लेखनविषयाबाबतचें सर्वांगीण व सखोल ज्ञान हें तर खरेंच, परंतु त्याबरोबरच त्याची अत्यंत तल्लख अशी संबद्धकल्पनासूचक कल्पनाशक्तीहि होय हें लक्षांत बाळगलें पाहिजे. ह्याच कल्पकतेच्या प्रभावामुळे व तिने निर्माण केलेल्या कल्पनाचित्रांच्या औचित्यपूर्ण अभिव्यक्तीमुळें वामनरावांचें 'भुतांच्या कारखान्या' पासून तों थेट 'नवमतवादा-' पर्यंतचें विवेचन हें वाचनीय व सुबोध झालें आहे. त्यांच्या सर्वच विवेचक लिखाणांत जागोजाग आढळणारे अर्थोचित व भावोचित दाखले, अर्थांच्या वा भावांच्या अतिसूक्ष्म छटा व्यक्त करणाऱ्या, वरून वरून समानार्थक वाटणाऱ्या परंतु सूक्ष्म अर्थभेद व्यक्त करून हव्या त्या विचारांची योग्य ती समज करून देणाऱ्या शब्द व वाक्यपंक्ति व ह्या सर्वांमुळें त्यांत उतरलेला प्रसाद हा गुण ह्या गोष्टी त्यांच्या ठिकाणीं असलेल्या ह्या संबद्ध-कल्पनासूचक कल्पनाशक्तीच्या अप्रतिहत संचारामुळेच तेथे अवतरल्या आहेत असें दिसून येतें कोणताहि तत्त्वचर्चात्मक विषय त्यांच्या हातांत सोपा बनतो, असें जें आपणांस त्या विषयाचें त्यांनी केलेलें विवेचन वाचीत असतां वाटतें, ह्याचें कारण असें की हें तत्त्वशोधन चालू असतांच त्यांचे हातून जें तत्संबद्ध कल्पनाचित्रांचें यथोचित रेखाटन होत असतें, त्याच्या शांत, मधुर व आल्हाददायक प्रकाशांत वाचक त्यांच्याबरोबर त्या तत्त्वशोधनाचा मार्ग सहज आनंदाने आक्रमूं शकतो; वामनरावांच्या ह्या कल्पनाशक्तीच्या विलासाचीं अनेक उदाहरणें त्यांच्या लिखाणाच्या पानापानांतून विखुरलेलीं आहेत;

येथे आपल्या परिशीलनासाठीं मी त्यांच्या एकाच लेखांतून एकदोन उदाहरणें घेतों. त्यांची कल्पकता, स्थूलमानाने पाहिलें असतां विरोधी भासणाऱ्या दोन सत्यांचें दर्शन परिपोषक व उचित अशा कल्पनाचित्रांच्या द्वारा किती सहजतया साधीत असे ह्याचें हें उदाहरण आहे : " विजेची तार ही निस्तेज असते, पण वीज आंत आली म्हणजे तीच विलक्षण तेजस्वी बनते; तसेंच सामान्य जनसमूहाचेंहि आहे. समाजांतील ' विभूति ' जड समाजांत चेतना उत्पन्न करतात. " असल्या शब्दांत राजकीय जहालांचें मत पुढे मांडून वामनराव तेंच मत नेमस्तांच्या वर्ताने लागलीच खोडून काढतात. ते म्हणतात, " वीज झाली तरी ती मातीला किंवा लाकडाला किंवा बुरणुसाला आपल्या स्पर्शाने विद्युन्मय करूं शकत नाही. तेव्हां तुमच्या विद्युत्तुल्य तेजस्वी विभूतीचें जेव्हां आगमन होईल तेव्हां समाज मातीच्या गोळ्यासारखा आहे असें पाहून त्याची निराशा करावयाची नसल्यास शिक्षणादि संस्कारांनी त्या मातीचें संशोधन करून तिच्यांतील सुवर्णादि धातु स्वतंत्र काढून ठेवणें चांगलें. " ज्या निबंधांतून वरील दोन वाक्यें उद्धृत केलीं, त्याच ' पक्षभेद आणि पक्षद्वेष ' ह्या अत्यंत मननीय निबंधांत राजकीय जहालांनी जातिभेदाबाबत दिलेला शृंखलेचा * दृष्टान्तहि ध्यानांत राहण्याजोगा आहे; " ' सत्य ' रूपी नारायणाची पूजा अलीकडे अधिक श्रद्धेने, निष्कामबुद्धीने व निश्चयाने होत आहे. " असलीं श्लेषात्मक अर्थसूचक वाक्यें तर वामनराव अगदीं सहजगत्या लिहीत असत. ह्या बाबत थोडेसें अधिक खोलवर पाहिलें तर असें आढळून येतें की वामनरावांच्या वैचारिकतेची बैठक ही बालपणापासूनच सुसंस्कृत धर्मसमजुतींवर व धर्मसंस्कारांवर झालेली असल्यामुळें त्यांच्या विवेकयुक्त विवेचनांतील बरेचसे दृष्टान्त हे आपल्या हरघडीच्या धार्मिक जीवनांतील व्यवहारांसंबंधीचे व त्यावर आधारलेले असे

---

* " पुढाऱ्याच्या हातून कांहीं कामगिरी व्हावयाची असल्यास त्यांना अनुयायी पाहिजेत; ..एंजिनाकडून कांहीं उपयुक्त कामगिरी करून घ्यावयाची असल्यास तें डब्यांना जोडलेलें असलें पाहिजे. मधली सांखळी तोडली किंवा काढून टाकली, तर त्याची उपयुक्तता कमी होईल. जातिभेद ही **शृंखला** असेल; पण ती तोडली असतां नायक व लोक यांमधील एक **सांखळी** तोडल्यासारखें होतें, यांत शंका नाही. "

असत व म्हणूनच ते आपल्या कानाला व मनाला मोठे हृद्य वाटतात; उदाहरणार्थ वरील वाक्याबरोबरच पुढील वाक्य पहा: “सारांश, ज्याची ज्याला आवड असेल आणि ज्याची ज्यांत गति असेल, तें त्याने उत्साहाने व स्वार्थत्यागपूर्वक करावें, म्हणजे कोणत्याहि देवाला केलेला नमस्कार जसा केशवाला जाऊन पोचतो तसा त्याचा प्रयत्न राष्ट्रकार्याच्या गंगेला जाऊन पोचेलच पोचेल.” ह्या साध्या विधानांतील सत्य हें देव, केशव, गंगा, नमस्कार इत्यादींच्या बरोबर मराठी वाचकांच्या डोक्यांत किती झटकन् उतरत असेल ह्याची स्वानुभवावरूनच कल्पना येईल. ह्या वाक्यासारखीं अगणित वाक्यें आपणाला वामन मल्हारांच्या लिखाणांत आढळतील. असलींच सोपीं अर्थसूचक वाक्यें सहजतया लिहावयाचीं हा त्यांच्या लेखणीचा धर्म होता. त्यांच्या विवेचनाची ज्योत्स्ना ह्या कल्पनाचित्रांच्या तारकांनीं विलक्षण आल्हाददायक बनली आहे. विशिष्ट तत्त्वांचें संशोधन करीत असतां वामनरावांची ही संबद्धकल्पना सूचक कल्पनाशक्ति विवेचनाला सुबोधता आणण्याचें कार्य किती सहजपणे करूं शकत असे, ह्याचें प्रत्यंतर म्हणजे नेमस्त व जहाल ह्यांच्या सद्धेतुमूलक अशा विरोधी मतांचें दर्शन ह्याच लेखमालेंतून करीत असतां वामनरावांनी अभावितपणे असल्याच स्वरूपाचा वाद प्राणिशास्त्रांत, तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत, धर्मशास्त्रांत, भूगर्भशास्त्रांत, कसा चालू आहे हें जें थोडक्यांत दाखवून दिलें आहे त्यांत आहे. त्यांच्या मतें हें विषयान्तर झालें आहे; परंतु खरें म्हणजे बहुश्रुतपणाने सुसंस्कृत बनलेल्या त्यांच्या कल्पनाशक्तीने स्वाभाविक प्रेरणेनेच त्यांचें हें विवेचन सामान्य वाचकांसाठीं इतर शास्त्रांतील साधर्म्यस्थळें वेंचून अधिक सुबोध व सुलभ केलें आहे. ह्याच लेखाच्या शेवटी शेवटी वामनरावांनी जें राष्ट्रशरिराचें रूपक साधलेलें आहे, तें त्यांच्या विवेकपूर्ण व स्थिरचित्त कल्पकतेचें एक सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणून वाचकांच्या सदैव लक्षांत राहील. अनेक रोगपीडित असें हें आर्यावर्तरूपी अवाढव्य राष्ट्रशरीर, त्याची रोग चिकित्सा करूं पाहणारे आस्थेवाईक परंतु एकांगी विद्वान्, त्याची अनेक मार्गांनी अहमहमिकेने सेवा करूं पाहणारे नानाविध देशसेवक ह्या सर्वांचें जें मनोरम परंतु तितकेंच सत्यदर्शी व म्हणूनच वाचकांना अन्तर्मुख बनविणारें शब्दचित्र वामनरावांनी रेखाटलें आहे, त्याची वाङ्मयीन मूल्यें आणि सौंदर्यमूल्यें अत्यंत श्रेष्ठ दर्जाचीं आहेत.

**वामनराव, केळकर व फडके : भाषाशैली :**

वामनरावांच्या ह्या चर्चात्मक लिखाणांतील भाषाशैलींतून व्यक्त होणाऱ्या सौंदर्यदृष्टीचा विचार करूं लागलों की मला ज्या दोन लेखकांच्या भाषाशैलीची वारंवार आठवण होते, ते लेखक म्हणजे तात्यासाहेब केळकर व प्रो. ना. सी. फडके हे होत. ह्या दोन्हीहि लेखकांच्या विवेचक लिखाणांतील भाषेचें स्वरूप मनोहर आहे ह्यांत संशय नाही. फडक्यांच्या लिखाणांतील रेखीवपणा केळकरांच्या लिखाणांत आढळत नसला, तरी बुद्धिविलास, कल्पनाविलास व सहजता ह्या गुणांनी त्यांच्या भाषेला विलक्षण मोहकता आलेली आहे. फडक्यांच्या रेखीव, वळणदार व नीटस लेखनाच्या मागे पूर्वयोजना असावी असा त्यांतील भाषाशैलीचें अतिरेखीव स्वरूप पाहून कांही वेळा संशय येतो: कांही ठिकाणीं तर तिचें स्वरूप पोषाखी बनल्यासारखें वाटतें; तिची सगळी ऐट साधलेली आहे, सहजसिद्ध नाही, असा क्वचित् भास होतो. तिचें रूप डोळ्यांत भरते, परंतु त्यांत बनावटीचा, सजावटीचा, दिखाऊपणाचा, आखीवपणाचा भाग नाही, असें वाटत नाही. उलट तो भाग बराच असावा असेंच सतत वाटत राहतें, व त्यामुळेंच कांही वेळानंतर त्या कृत्रिम पोषाखीपणाचा थोडाबहुत कंटाळा येतो; परंतु असें असूनहि त्यांच्या लिखाणांतील सफाई व विवेचनाचा नितळपणा—पारदर्शक नितळपणा—वाचकाला मोठा सुखावह वाटतो. वामनरावांच्या विवेचक लिखाणांतील भाषाशैलींत ही पारदर्शकता, हाच निर्मल नितळपणा दिसून येतो; परंतु ह्या सर्वांच्या मागे पूर्वयोजनेचा, विशिष्ट परिणाम साधण्याच्या हव्यासाचा संपूर्ण अभाव दिसून येत असल्यामुळें त्यांचें विवेचन हें अकृत्रिम, सहजसाध्य—प्रयत्नसाध्य नव्हे—सौंदर्यानें नटलेलें आहे असेंच वाटतें. ( फक्त साक्रेटिसाचे संवाद ह्याच त्याच्या ग्रंथांतील कांही * ठिकाणची भाषा ही कांही भाषादोषांनी

---

* कांही उदाहरणें :

‘ तो वर्ग विशिष्ट परिस्थितीचें कारण नसून कार्य होतें. ’ ( पान २७ )

‘ त्या परगण्यांत राहणारे मेलीटस नांवाचे मनुष्य तुम्हाला कदाचित् ठाऊक असतील. ’

‘ मला तर वाटतें की राजकीय सुधारणांचा योग्य स्थळी आरंभ करणारे पहिले मनुष्य मेलिटसच होत. ’　　[ पुढील पानावरील तळटीप पहा ]

डागाळलेली वाटते; परंतु याचें कारण एक तर तो ग्रंथ बहुतांशीं भाषांतरित स्वरूपाचा असल्यामुळे मुळांतील इंग्रजीचें मराठींत रूपांतर होत असतांना ते भाषादोष अभावितपणे घडलेले असावेत व दुसरें म्हणजे बरेच दिवस दप्तरांत पडून राहिलेलें त्या ग्रंथाचें हस्तलिखित प्रसिद्ध होत असतांना वामनरावांना तें सावकाशपणें संशोधून प्रकाशनासाठी तयार करावयाला फारशी फुरसतहि मिळालेली नसावी. कारणें कांहीहि असोत, ह्या ग्रंथामध्ये हे भाषादोष उरलेले दिसतात हें खरें; परंतु वामनरावांच्या इतर कोणत्याहि लिखाणांत ते आढळत नसल्यामुळे ह्या ठिकाणीं ते केवळ अपवादरूप भासतात; व म्हणूनच वामनरावांच्या एकंदर सहजसुंदर लेखनशैलीच्या मुद्रेवर ते केवळ गालबोटाप्रमाणेच भासतात: ) केळकरांच्या लेखनशैलींतील सहज कल्पनाविलास वामन मल्हारांच्या लिखाणांत तितकासा दिसत नाही. ह्याचें कारण त्यांची मूळ वृत्ति सत्यशोधकाची आहे, व हें सत्यशोधनाचें काम निरलसपणे, सरलपणे, अभिनिवेशाचा यत्किंचित्‌हि वास न येऊं देतां करणाऱ्याची आहे. त्यामुळे त्यांत उतरलेली सुबोधता, त्यांत उतरलेला प्रसाद, त्यांतील पारदर्शकपणा हा उत्कृष्ट शिक्षकाच्या अध्यापनांत सहजगत्या दिसून येतो तसल्या प्रकारचा आहे. केळकरांच्या लिखाणांतील कल्पनाविलासाने व बुद्धिविलासाने वाचक रंगून जातो; केळकरांना लेखन हें क्रीडनासारखेंच आल्हाददायी वाटतें; त्यांत ते रंगून जातात, ते क्रीडनामध्ये जातिवंत खेळाडू रंगून जावेत त्याप्रमाणे. त्यामुळेच त्यांत भाषेचा, विचारांचा, कल्पनांचा सहजविलास आपणांस पहावयास सांपडतो. त्यांत योजना नसते, परंतु उत्कृष्ट क्रीडनपटूचा आत्मविश्वास असतो. कधी गंभीर धीरोदात्तपणे, कधीं उच्छृंखलपणे, कधी धीटाईने, तर कधी बालसदृश अल्लडपणे त्यांची लेखणी आपली लेखनक्रीडा करीत असते. वामन मल्हारांच्या लेखणीचा हा

---

" जो कोवळ्या तरुण लोकांना सर्वगुणसंपन्न करण्याची विशेष खबरदारी घेतो त्याचाच आरंभ सुरथली आहे. '

' डेलेडसचीं ( एक कारागीर ) स्वतः केलेली कामें (works चें भाषांतर) हलत असत. ' ( पान ३१ )

' तें ( गलबत ) आल्यानंतर मला मरणाधीन करण्यांत येणार आहे, म्हणून विचारतों ! '

धर्म नव्हे. लेखनाला वामनराव क्वचित्‌च क्रीडेचें स्वरूप देतांना आढळतात. ते त्यांत रंगून जातात; परंतु त्या वेळीं त्यांच्या चेहऱ्यावर उत्कृष्ट खेळाडूच्या चेहऱ्यावरील बेफिकीर हास्य नसून स्थिरचित्त सत्यशोधकाच्या चेहऱ्यावरील जिज्ञासा व प्रशांतता असते; त्यामुळे त्यांच्या लेखनामध्ये प्रसन्नतेची, विवेकाची ज्योत्स्ना सर्वत्र पसरलेली असली, तरी केळकरांचें लेखनक्रीडाकौशल्य कोठेहि आढळत नाही; परंतु असें असूनहि वामनरावांच्या लेखनशैलीसंबंधी विचार करितांना मला केळकर व फडके ह्यांचीं नांवें आठवतात, ह्याचें कारण असें की वामनरावांच्या लिखाणांत फडक्यांची सफाई व केळकरांचा कल्पनाविलास ह्यांचें मनोहर मिश्रण दिसून येतें. फडक्यांच्या लेखनशैलीवर वामन मल्हारांच्या लेखनाचा परिणाम झाला असेलच असें मला म्हणावयाचें नाही; ( तो थोडा बहुत झाला असावा असें मला वाटतें. ) परंतु वामनरावांच्या ‘ नीतिशास्त्रप्रवेश ’ ची किंवा ‘ विचारसौंदर्य ’, ‘ विचारविलास’ इत्यादि निबंधसंग्रहांतील निबंधांची भाषा ही फडक्यांच्या नादमधुर अर्थवाहक सुसूत्र अशा लेखनाची मला नेहमींच आठवण करून देते, यांत शंका नाही.

## वामनरावांची शब्दशक्ति:

आपल्या लेखनांतून वामनरावांना पुष्कळ ठिकाणीं विशिष्ट शास्त्रीय पारिभाषिक शब्द वापरावे लागले आहेत: मुळांतील इंग्रजी शब्दांचीं हीं भाषांतरित रूपें आहेत. परंतु हे नवे शब्द बनवितांना वामनरावांनी त्यांच्या अर्थाबरोबर ध्वनीकडेहि लक्ष पुरविलें आहे असें सर्वसाधारणपणे दिसून येतें. असत्पात्रयुक्त दयार्द्रता, (undeserved sympathy) दृश्यवर्णनात्मक, (realistic), कल्पनासृष्टिप्रिय (idealistic) इत्यादि कांही आज कर्णकटु वाटणारे शब्दप्रयोग त्यांजकडून वापरले गेलेले असले तरी अनुग्रहवाद ( doctrine of grace ), विचारात्मक प्रत्युत्तर ( mental reaction ), अनुवादात्मक ( tautogical ), वर्तनवादी ( behaviourists ), अंग-झोडपें बोलिंग ( bodyline bowling ), शाब्दिक व आनुभविक ज्ञान ( deduction and induction ), बहुविश्रुत उदाहरण ( classical example ), स्थितिप्रिय ( conservative ), संपादित किंवा उपार्जित गुण (acquired characters ), सत्तत्त्ववाद ( doctrine of ideas ), संचारलेखन

( automatic writing ), प्रसुप्त विचार (unconscious thought), अन्योन्यसंपूरक लेख (cross correspondences), विचारसंक्रांती ( telepathy ) किंवा अतीन्द्रिय सहसंवेदना; सहजभेद (inborn variation), जनहितवाद ( utilitarianism ), ज्ञानतंतू व प्रवृत्तितंतू ( afferent and efferent nerves ), एकपेशी जीवजाति ( unicellular organism ) अनेकपेशी जीवजाति ( multicellular organism ); जलस्थलसंचारी ( amphibions ), बोधशून्य मन ( unconscious mind ); उद्देशपूर्वक विकसन (directed evolution), जीवनशक्ति (vital force), जीवप्रेरणा (Elan Vitale), अन्तःस्फूर्ती व अंतस्तादात्म्य ( instinct and intuition ) किंवा अन्तःसाक्षात्कार; नाममात्रसत्यवाद ( nominalism ), मनोमयसत्यवाद ( conceptualism ), प्राग्भाव ( pre-existence ), स्वतंत्रसत्यवाद ( realism ) इत्यादि त्यांनी उपयोजिलेले पारिभाषिक शब्द अर्थव्यक्तीच्या आणि ध्वनिमाधुर्याच्या दृष्टीने सर्वतोपरी यथोचित आहेत असेंच विचाराअन्ती मत द्यावें लागेल. त्यांच्या शास्त्रीय विवरणाला सुगमता आणावयाला हे अर्थवाहक व श्रुतिमनोहर शब्दप्रयोग कारण झालेले नसले तरी त्यांच्यामुळे त्या लिखाणाला दुर्बोधता आलेली नाहीं हें काय थोडें आहे ? वामनरावांनीं उपयोजिलेल्या ‘ न्यूनगंड ’ व ‘ अहंगडां ’नी तर आतां मराठींत कायमचेंच बिऱ्हाड थाटलेलें आहे; ते शब्द जरी कांहींना पसंत नसले तरी त्यांचे ऐवजीं दुसरे प्रतिशब्द सुचवून ते रूढ करण्यांत अद्याप कोणालाहि यश आलेलें दिसत नाहीं, हेंहि खरें आहे.

### एक श्रेष्ठ वाङ्मयीन व्यक्तिमत्व :

सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्या त्रिपुटीच्या शोधार्थ व उपासनार्थ वामनरावाचें एकंदर वाङ्मय कसें निर्माण झालें आहे व त्यांत ह्या तिहींची प्रतिमाच असलेलें वामनरावांचें व्यक्तिमत्व कसें स्पष्टपणें प्रतिबिंबित झालें आहे हें सहज स्थूलमानाने वरील परिच्छेदांतून दाखविण्याचा प्रयत्न केला व तदनुषंगाने त्यांच्या विवेचक लिखाणांतील भाषाशैलीचें थोडेसें सविस्तर परीक्षण केलें. ‘ वामनरावांचें बहुतेक लिखाण १९१२ ते १९१८ च्या दरम्यान म्हणजे आयुष्यांतील अत्यंत चिंतेच्या आणि मनस्तापाच्या काळांत

झालेलें आहे ' असें त्यांचे चरित्रलेखक श्री. ना. म. पटवर्धन लिहितात; व तें एका अर्थी बरोबरच आहे. ' नीतिशास्त्रप्रवेशा 'चें मुद्रण १९१९ मध्ये झालेलें असलें तरी त्याचें लेखन वरील काळांतच झालेलें आहे, व ' साक्रेटिसाचे संवाद ' १९२२ मध्येच प्रथम प्रकाशित झालेलें असलें तरी त्याचें लेखन १९१५।१६ सालींच, ' केसरी ' ' मराठा 'मध्ये काम करीत असतां वामनरावांकडून झालेलें होतें. वामनरावांच्या ' रागिणी ' व ' आश्रमहरिणी ' ह्या कादंबऱ्या व ' नवपुष्पकरंडका 'तील कथा ह्याच काळांत लिहिल्या गेलेल्या आहेत; व प्रसिद्ध झाल्या आहेत. परंतु ह्या सगळ्याच लिखाणांतील वातावरण अत्यंत प्रसन्न व उदात्त आहे. ह्या काळांत वामनरावांच्या नशिबीं जें अत्यंत खडतर जीवन आलें त्याची अगदी पुसट अशी छायाहि त्यांतील कोणत्याहि भागावर पडलेली आपल्याला दिसत नाही. वामनरावांच्या मनाच्या प्रसन्नावस्थेंत त्यांच्या हातून अतिशय चांगलें लिखाण लिहिलें जात असे, असें त्यांचे चरित्रकार म्हणतात. ही गोष्ट वामनरावांच्याप्रमाणें इतर अनेक लेखकांच्याबाबतहि सांगतां येईल, कारण तिच्यांतील सत्य हें सर्वसामान्य ठरेल असेंच आहे. वामनरावांच्या बाबतींत जें अधिक दिसून येतें—जें इंग्रजी वाङ्मयांत गोल्डस्मिथच्या बाबत विशेषत्वाने दिसून आलें—तें हें की मनाच्या अत्यंत प्रतिकूल स्थितींतहि त्यांच्या हातून घडलेल्या लेखनांत त्या स्थितीची यत्किंचित्‌हि छटा तर उमटलेली नाहीच, उलट तें वाचीत असतां लेखकाची तें लिहितांना किती प्रशांत, प्रसन्न, व आनंदी वृत्ति असली पाहिजे ह्याबद्दलचे विचार मात्र मनांत येऊन वाचकाला एक वेगळेंच समाधान लाभत आहे. वामनरावांच्या सर्वच लिखाणाबद्दल करावें लागणारें हें विधान त्यांच्या ह्या १९१२ ते २० ह्या काळांतील लिखाणासंबंधी विशेष कटाक्षाने करावें लागतें, तें एवढ्यासाठीं. ' नलिनी ' ' विचार-विलास ', ' सुशीलेचा देव ', ' इंदु काळे आणि सरला भोळे ', ' स्मृतिलहरी ' ह्या ग्रंथांत व ' विचार-लहरी ', ' विचार-सौंदर्य ' ह्यांतील स्फुट लिखाणांत प्रगट झालेलें वामनरावांचें तेंच सात्त्विक व्यक्तिमत्व ह्या खडतर काळांत त्यांच्या हातून घडलेल्या लिखाणांत प्रतिबिंबित झालें आहे. वामनरावांची तीच प्रशांत, सस्मित, सहानुभूतिपूर्ण मुद्रा त्यांतून डोकावते आहे. सत्य, सौजन्य व सौंदर्य या त्रिमूर्तीचें तेंच आवडतें ध्यान, भजन व पूजन वामनरावांकडून ह्या काळांत अनन्यभक्तीने, भोंवतालच्या परिस्थितीचा यत्किंचित्‌हि विपरीत परिणाम

लेखणीवर न होऊं देतां घडलेलें आहे. वामनरावांचें त्यांच्या लिखाणांतून प्रगट होणारें व्यक्तिमत्व एकसंध आहे असें जें वर विधान केलें तें एवढ्याच कारणा-करितां. १९२० सालीं 'नलिनी' ही कादंबरी प्रसिद्ध झाली; 'नीतिशास्त्रप्रवेशा'ची दुसरी आवृत्ति १९२३ सालीं बाहेर पडली. इतकीं वर्षें केलेल्या स्फुट निबंध-लेखनाचा व नाट्यसंवादांचा संग्रह ' विचार-विलास ' ह्या नांवाखालीं १९२७ सालीं बाहेर आला व त्यानंतर १९२९-३० सालपर्यंत वामनरावांकडून स्वतंत्र ग्रंथोत्पत्ति अशी झाली नाही. स्फुट टीकात्मक लिखाण अधूनमधून केलें जात होतें. परंतु रत्नाकरांत' १९२९-३० सालीं 'सुशीलेचा देव' प्रसिद्ध होईपर्यंत त्यांच्या हातून भरीव असें स्वतंत्र लेखन घडलें नाहीं, असें दिसून येतें. 'सुशी-लेच्या देवा ' नंतर चारपांच वर्षांनी 'इंदु काळे व सरला भोळे' 'प्रतिभे'तून क्रमशः प्रसिद्ध झाली; 'संजीवनी' व इतर नियतकालिकें ह्यांतून 'स्मृति-लहरी' हळूहळू प्रसिद्ध झाल्या; ह्या दरम्यानच्या काळांत १९३० सालीं वामनरावांना साहित्यसमेलनाचें अध्यक्षपद लाभलें व त्यांचें बरेंचसें साहित्यविषयक टीकात्मक लिखाण ह्याच काळानंतर म्हणजे १९३० नंतर लिहिलें गेलें. त्यांचें नीतिशास्त्र व तत्संबद्ध शास्त्रविषयक लिखाण १९२३ च्या अगोदर झालेलें असलें तर साहित्यविषयक विवेचनात्मक लिखाण हें त्यानंतरच्या काळांत लिहिलें गेलेलें आहे, असें दिसतें.

वामनरावांच्या एकंदर लिखाणाचे स्वाभाविक तीन भाग पडतात. पहिल्या विभागांत त्यांच्या कादंबऱ्या, लघुकथा, त्यांचे नाट्यसंवाद, एक नाटक व त्यांच्या ' स्मृति-लहरी ' इत्यादि ललितलेखन मोडतें. दुसऱ्या विभागांत त्यांनीं लेखनद्वारें व व्याख्यानद्वारें केलेली अनेक साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा येते व तिसऱ्या विभागांत तत्त्वशोधक व सत्यप्रचारक ह्या दृष्टींनी त्यांनी केलेलें लेखनकार्य आपणांस लक्षांत घ्यावें लागतें. वरील परिच्छेदांतून जागोजाग स्पष्ट केल्याप्रमाणे ह्या तिन्हीहि विभागांतून प्रगट होणारे वामनराव एकच होत ही गोष्ट वाचक कधींहि विसरूं शकत नाही. आपण वामनरावांच्या जीवनकालांत त्यांच्या आंवतीभोंवतीं वावरलेलों असल्यामुळें लौकिक जीवनांत प्रगट झालेलें त्यांचें व्यक्तिमत्व कोणत्या स्वरूपाचें होतें ह्याची तुम्हा आम्हांस थोडीफार कल्पना आहे; ती माझ्यापेक्षा आपल्यांतील अनेक वामनरावांच्या निकटवर्तियांना अधिक आहे, वामनरावांचे एक अत्यंत निकटवर्ति

श्री. ना. म. पटवर्धन ह्यांनीं त्यांच्या मृत्यूनंतर त्याजवर लिहिलेल्या लेखांतून व चरित्रात्मक ग्रंथांतून वामनरावांचें व्यक्तिमत्व माझ्यासारख्या अल्प-परिचितांसाठीं बऱ्याचशा परिणामकारकतेने चित्रित केलें आहे; त्यावरून असें दिसतें कीं, वामनरावांच्या ह्या लौकिक व्यक्तिमत्वाशी त्यांचें वाङ्मयीन व्यक्तिमत्व कोठेंहि विसंगत नाही; दोघांचा संपूर्णपणे मिलाफ झालेला आहे; थोड्याशा सूक्ष्म दृष्टीने पाहतां त्यांचें वाङ्मयीन व्यक्तिमत्व हें त्यांच्या लौकिक व्यक्तिमत्वापेक्षां तसूभर अधिकच श्रेष्ठ ठरतें. कारण लौकिक जीवनांत यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या वैशिष्ट्यांचा त्यांचे ठिकाणीं अभाव असल्यामुळें त्यांच्या व्यक्तिमत्वांतील काहीं अंगांचें, त्यांच्या प्रत्यक्ष जीवन-व्यवहारांतील दर्शन हें तितकेसें परिणामकारक ठरूं शकत नाहीं; त्या अंगांचें श्रेष्ठत्व तें दर्शन नीटसें पटवूं शकत नाहीं; क्वचित् त्यांच्या व्यक्तित्वाच्या खऱ्या स्वरूपाबद्दल गैरसमज मात्र निर्माण करतें; कारण मग सौजन्याला भीरुत्वाचें रूप येतें, विवेकयुक्त समंजसपणाला अनिश्चितीचें, संदिग्ध वृत्तीचें, धरसोडीचें रूप दिलें जातें, मूल्यमापनाबाबतच्या तरतमबुद्धीला व काटेकोरपणाला फाजील विचिकित्सेचें नांव मिळतें; सहजतेला व अकृत्रिमतेला गबाळेपणा व वेंधळे-पणा ह्या नांवांनी संबोधण्यांत येतें. परंतु ह्याच गोष्टी वाङ्मयांत गुणस्वरूपांत अवतरतात; व त्यांचें खरेखुरें कार्य त्यांतच सफलता पावतांना दिसतें. वामन-रावांच्या व्यक्तिमत्वाचीं हीं आणि इतर अनेक अंगें त्यांच्या वाङ्मयांत सात्विकता, सुभगता, व समतोलपणा आणावयास कारण झालीं आहेत. त्यांचें सत्यरूप त्यांतच प्रतिबिंबित झालें आहे व म्हणूनच लौकिक जीवनांत व्यक्त झालेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वापेक्षां तसूभर अधिक प्रभावी असें व्यक्तिमत्व त्यांच्या वाङ्मयांतून प्रगट झालेलें आहे असें मी म्हणत आहें.

आपणाला ललितलेखक वामनराव, वाङ्मयविवेचक वामनराव, व तत्त्वज्ञ वामनराव ह्यांची ओळख करून घ्यावयाची आहे. वामनरावांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची वरवर पाहतां भासमान होणारीं हीं तिन्हीहि दर्शनें तत्त्वतः एक-रूप आहेत हें आपणांस त्यांच्या स्वरूपांचीं यथार्थपणे ओळख करून घेतल्यास लक्षांत येणार आहे, तेव्हां ह्याच विविध अंगांचीं दर्शनें करून देण्याचा प्रयत्न मी माझ्या पुढील व्याख्यानांतून करणार आहें; व वामनरावांच्या वाङ्मयाच्या वाचनाने आपणांस होणारा आनंद हा अगदीं वेगळ्या स्वरूपाचा कां असतो ह्या प्रश्नाचाहि उलगडा तदनुषंगाने होतो का हें पाहणार आहें.

# वामनरावांचें ललितलेखन

## एक त्रासदायक विचारः

वामनरावांच्याललित लेखनासंबंधी विचार करितांना एक गोष्ट मधूनच मनाला जाणवते, ती अशी की त्यांचें बहुतेक सगळें ललितलेखन हें नियत-कालिकांच्या संपादकांच्या तगाद्यामुळेच मराठी वाचकवर्गाला मिळालेलें आहे. त्यांची ' रागिणी ' १९१४।१५ सालीं क्रमशः ' मासिक मनोरंजनां 'तून प्रसिद्ध झाली व ती प्रसिद्ध होत असतांच ' आश्रम-हरिणी ' 'मराठामित्रां ' तून प्रसिद्ध होऊं लागली. दुर्दैवानें वामनरावांचे चरित्रकार त्यांच्या लेखनाची फारशी दखल घेत नसल्यामुळे ' नलिनी ' ही कादंबरी वामनरावांनी कोणत्या परि-स्थितींत लिहिली तें नीटसें कळत नाही; परंतु त्या कादंबरीच्या लेखनकाळीं त्यांची अत्यंत खालावलेली आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां ती कथा वामनरावांनी प्रपंचाला मदत व्हावी ह्या हेतूनेच मूलतः लिहिलेली असावी, असें वाटतें. वामनरावांनीं ती स्वतःच १९२० सालीं प्रसिद्ध केली आहे. केवळ द्रव्यदृष्टीने वामनरावांनी फक्त हीच कथा लिहिलेली असावी. ती अर्थातच वामनरावांची ' नकटी *' कादंबरी ठरल्यामुळे वामनरावांचे बरेचसे टीकाकार यांच्या वाङ्मयाचें समालोचन करतांना तिचा केवळ नामनिर्देशच करितात. तिला थोडा वेळ बाजूला ठेवून त्यांच्या इतर लिखाणाकडे नजर टाकली तर काय दिसतें ? ' नलिनी ' च्या प्रकाशनानंतर बरोबर नऊ वर्षांनंतर १९२९।३० सालीं ' सुशीलेचा देव ' ' रत्नाकरां 'तून व त्यानंतर ४।५ वर्षांनीं ' इंदु काळे व सरला भोळे ' १९३५।३६ सालीं ' प्रतिभा ' पाक्षिकांतून अशा प्रथम प्रसिद्ध झाल्या. ' नवपुष्पकरंडक ' ह्या संग्रहांतील, ज्याला अनेक प्रकाशक 'गोष्टी' असें म्हणतात, तें लिखाण मनोरंजनांतून, नवयुगांतून, चित्रमयजगतां-

---

* ' नलिनी ' संबंधी वामनराव काय म्हणतात तें वाचण्यासारखें आहे:

" नकटें व्हावें पण धाकटें होऊं नये असें म्हणतात. नलिनी ही 'रागिणी 'ची धाकटी बहीण आहे, आणि ती नकटीहि आहे असें कांही लोक म्हणतात. तेव्हां तिचें जीवित कठीण होण्याचा बराच संभव आहे. "

—प्रस्तावना १९२०

तून व केरळकोकिळांतून वेळोवेळीं १९१८ चे आंत प्रसिद्ध झालेलें होतें; ' स्मृतिलहरी ' ह्या संग्रहांतील स्मृतिचित्रें ' संजीवनींतून ' व इतर नियतकालिकांतून कशींबशीं वेळीं अवेळीं प्रसिद्ध होत आलीं; व ' विचारविलास ' ह्या संग्रहांतील बहुतेक सगळेच नाट्यसंवाद हिंगण्यांतील वेगवेगळ्या संस्थांच्या वार्षिक संमेलनप्रसंगीं करून दाखविण्याकरितां प्रसंगानुसार लिहिले गेले. उरतां उरलें ' विस्तवाशीं खेळ ' हें नाटक: तें मात्र स्वतंत्रपणे पुस्तक रूपाने १९४० सालीं अवतरलें: वामनरावांच्या ह्या अल्पशा, खंडित परंतु बहुमोल ललितसाहित्यसेवेकडे पाहिलें असतां असें वाटतें की संपादकांच्या व प्रकाशकांच्या तगाद्यांमुळेच जर हें वाङ्मय आम्हाला आज उपलब्ध झालेलें असलें तर ह्या तगाद्याच्या अभावीं तें एखादे वेळीं निर्माणहि झालें नसतें की काय ? व मग तसें झालें असतें तर मराठी ललितवाङ्मय त्याच्या अभावामुळे आपल्यांतील एका बहुमोल भागाला मुकलें असतें की काय ? परंतु हा विचार मनांत येतो न येतो तोंच, जगांतील बरेचसें उत्तम वाङ्मय हें अशा रीतीनेच निर्माण होत असतें हें ध्यानांत येऊन वरील त्रासदायक विचाराची धार थोडीशी कमी होते; वामनरावांनी जेव्हां अगदीं खरोखरच लिहिण्यासारखें असें वाटलें तेव्हांच लिहिलें हें लक्षांत येऊन त्यांच्याबद्दल मनांत असलेला आदर द्विगुणित होतो व मिळालें आहे त्याबद्दल परमेश्वराचे आभार मानण्याकडेच मनाची स्वाभाविक प्रवृत्ति होते.

वामनरावांच्या ह्या संख्येने अत्यल्प परंतु गुणांनी महनीय असणाऱ्या ललितलेखनाचीं वैशिष्ट्यें काय आहेत तीं पाहण्याचा प्रयत्न करूं:

### रागिणी :

वामनरावांची ' रागिणी ' वाचून खालीं ठेवीत असतां आज जे विचार मनांत घोळूं लागतात त्यांचें स्वरूप सामान्यत: माझ्या बाबतींत पुढील प्रमाणें असतें: मीं मनांत म्हणत असतों: ह्या कादंबरीची रचना किती शिथिल आहे; वर्णिलेल्या घटनांत योगायोगाची तरी किती ठिकाणीं मदत घेतली आहे, प्रत्यक्ष कथेच्या सूत्राला अनावश्यक अशीं शास्त्रीबोवांसारखीं पात्रें कथेंत काय वावरत आहेत, निसर्गवर्णनांची योजना जशी पुष्कळ ठिकाणीं ठिगळवजा झाली आहे, तसेंच हीं वर्णनें करतांना वास्तवाकडेहि कांहीं कमी डोळेझांक झालेली

नाही; हिमालयावर ज्याप्रमाणें सर्व प्रकारच्या वृक्षवेली व सर्व प्रकारचे पशुपक्षी ग्रंथकाराच्या दृष्टीला दिसत आहेत, त्याचप्रमाणे (काकासाहेब कालेलकरांनी दर्शविल्याप्रमाणे) लेखकाने काशीमधील दुर्गाघाटाच्या अगदीं कडेपर्यंतचा मार्गहि गाडीघोड्यांना निष्कंटक करून टाकला आहे; ठिकठिकाणीं लांबचलांब आत्मगत भाषणें उपयोजिलेलीं असून तीं केवळ नाटकीच भासत नाहीत तर 'स्वयंपाकीणबाईच्या' किंवा 'किनतोब्यांच्या' भाषणांप्रमाणे कथापरिपोषाच्या दृष्टीने अनावश्यकहि वाटत आहेत, अद्भुताचा तर लेखकाने अगदी सढळ हाताने उपयोग केला असून साध्या कल्पकतेच्या विलासालाहि भरपूर वाव दिलेला आहे; प्रत्यक्ष जीवनव्यवहारांचीं अशीं वास्तव चित्रें शोधूं गेलों असतां तीं ह्या कथेंत फारच थोडीं सापडतील, व ज्या जीवनव्यवहारांचें ह्या कथेंत मुख्यतः चित्रण झालें आहे त्यांचें स्वरूपहि बरेचसें संकुचितच आहे नाही का? कथेंतील पात्रांना चरितार्थाची तर कोठेच काळजी लागलेली दिसत नाही; जीवनांतील हा सर्वांत मोठा वाटत असलेला प्रश्न त्यांच्या बाबतींत संपूर्णपणे सुटलेला असल्यामुळे त्यांच्या द्वारां आपल्या जीवनाचें जें चित्र व्यक्त होतें तें बरेंचसें मर्यादित क्षेत्रांतलें आहे असेंच वाटतें; कादंबरी वाचून खाली ठेवीत असतां जीवनाच्या विविधतेपेक्षा त्याच्या अद्भुततेचीच जाणीव अधिक तीव्रतेने होते. बरें, ह्या गोष्टी बाजूला ठेवून केवळ कथालेखनाच्या कलाकुसरीसाठी ह्या कथेकडे पाहिलें तर काय दिसून येतें?—जीवनाच्या नाट्यात्मक दर्शनापेक्षा प्रत्यक्ष कथनाच्या व निवेदनाच्या पद्धतीचाच (narration) अवलंब सगळीकडे केल्यासारखा दिसतो; त्यामुळे कथा कहाणीवजा वाटते. प्रसंगरेखाटनापेक्षा संभाषणलेखनाला महत्त्व दिलेलें दिसतें खरें, परंतु हें संभाषणलेखन जीवनाचे नाट्यात्मक दर्शन घडवून आणण्यासाठी केलेलें नव्हे; ह्या संभाषणलेखनाचा हेतु स्वभावदर्शन वा प्रसंगचित्रण हा नसून तत्त्वशोधनात्मक आहे व म्हणूनच त्या संभाषणांतून मानवी सहजप्रवृत्तींचा, सहजप्रेरणांचा, आशानिराशांचा, भावसंवेदनांचा खेळ दिसून येण्याऐवजी तर्काची, बुद्धीची, अनुमानशक्तीची कसरतच प्रत्ययास येत आहे. त्यामुळे अगोदरच सगळीकडे अतिमंदपणे वाहणारा कथाप्रवाह कांही स्थळीं तर अगदींच स्थिरावल्यासारखा दिसत आहे; कांहीं ठिकाणीं त्याला केवळ कपटनाट्याचें अतिरंजित स्वरूप आलेलें आहे, तर कांही ठिकाणीं त्यांतील

अत्यद्‌भुत घटनांनी आपली श्रद्धाबुद्धी कसोटीला लाविली जात आहे; पुष्कळ ठिकाणच्चीं प्रकरणारंभींच योजलेलीं आत्मगत भाषणें वाचीत असतां आपण कादंबरी वाचीत नसून एखाद्या जुन्या जमान्यांतील नाटकाचे प्रवेशच वाचीत आहोंत असा भास होतो आहे; प्रकरणांचीं प्रास्ताविकें वाचीत असतां कथेची आठवण पार बुजून जाऊन निबंधवाचनाचा प्रत्यय येतो आहे, व त्यांत आणखी प्रत्येक प्रकरणाच्या शीर्षकाखालीं उपयोजिलेल्या एका किंवा प्रसंगीं एकापेक्षां अधिक अशा संस्कृत व इंग्रजी सुभाषितांच्या वाचनाची भर पडली की ह्या प्रत्ययाबद्दल खात्रीच पटते आहे.

## ‘रागिणी’च्या काळचें मराठी कादंबरीलेखन :

ह्या व इतर अशाच आधुनिक कादंबरीलेखनपद्धतीच्या दृष्टीने सदोष वाटणाऱ्या गोष्टी आपणांस ही कादंबरी वाचीत असतांच लक्षांत येत असतात; व त्या लक्षांत येत असूनहि आपण ती आवडीने कडेपर्यंत वाचतों. व मग प्रश्न असा येतो की, लेखनतंत्राच्या दृष्टीने एवढी सदोष असलेली ही कथा आपण एवढ्या आवडीने वाचतों तरी कां? व तिच्या काळांत तरी ती एकदम लोकप्रिय कशी झाली? गेल्या तीस वर्षांच्या काळांत ‘रागिणी’च्या चार आवृत्त्या निघाल्या आहेत; ‘रागिणी’ ज्या काळांत लिहिली गेली त्या काळांत हरिभाऊ आपटे वैभवाच्या शिखरावर होतें. वि. सी. गुर्जर, नाथमाधव, ना. ह. आपटे हे त्या काळांत आपल्या कथनचातुरीने वाचकांचीं मनें आकर्षून घेत होते. कथात्मक वाङ्मयाच्या प्रकाशनालाच बव्हंशी ज्यांनी स्वतःला वाहून घेतलें होतें, अशा सुरस, सरस, भारतगौरव, कुटुंबशिक्षण, हिंद एजन्सी, मनोरंजन ग्रंथप्रसारक इत्यादि अनेक वाङ्मय-प्रकाशन-माला आपापलें कार्य मोठ्या यशस्वीपणे व हिरीरीने करीत होत्या. त्यांच्या मार्फत अनेक लहानमोठ्या भाषांतरित व स्वतंत्र कादंबऱ्या प्रतिवर्षी बाहेर पडत होत्या. इंग्रजी व बंगाली वाङ्मयांतील भाषांतरित लिखाणामुळे त्यांतील कांहीत रचनेबाबत विलक्षण सुबकपणाहि आढळत होताः नावीन्य आढळत होतें. आकर्षकपणा आलेला होता. कादंबरीलेखन हें बरेंचसें जुन्याच वळणावर चाललेलें असलें तरी भाषांतरांच्या द्वारां, रूपांतरांच्या द्वारां त्याच्या तंत्रांत व मंत्रांत इष्ट त्या सुधारणा तंत्रकुशल लेखकांकडून केल्या

जात होत्या. त्याच्या विषयांत व त्या विषयाच्या सजावटींत बदल होत होता. हरिभाऊ आपट्यांच्या वेळची शतकारंभीची परिस्थिति बदलली होती. हरिभाऊंच्या वेळी कथावाङ्मयाच्या क्षेत्रांत हरिभाऊंच्या तोडीचा लेखक कोणीहि नव्हता. त्यामुळे हरिभाऊंना आपल्या लेखनकौशल्याच्या जोरावर पुढे यावयाला फारसे प्रयास पडले नाहीत हें स्वाभाविक होतें. वामनरावांचें तसें नव्हतें: मासिक मनोरंजनांतून 'रागिणी' प्रसिद्ध होत असतांना हरिभाऊ अस्तप्राय झालेले नव्हते. व नाथमाधव, ना. ह. आपटे, वि. सी. गुर्जर, वा. गो. आपटे, कृ. के. गोखले, सी. के. दामले, सहकारी कृष्ण इत्यादि लोकमान्य कथालेखक आपल्या लेखनचातुरीने हजारों महाराष्ट्रीय सुशिक्षित कुटुंबांचें मनरंजन करीत होते; अशा वेळीं आपल्या पहिल्याच कादंबरीने लोकांचीं मनें स्वतःकडे संपूर्णपणें आकर्षून घेणें ही गोष्ट कांहीं साधीसुधी नव्हती. श्रीपाद कृष्णांना सुद्धा ह्या गोष्टीची, विविधज्ञानविस्तारासाठी १९१८ सालीं 'रागिणी आणि तिचीं भावंडें' ही आपली लेखमाला लिहीत असतांना पूर्ण जाणीव होती; कारण ह्या आपल्या लेखमालेंत ते लिहितात: "अलीकडे मनोरंजक वाङ्मयाच्या अनेक माला निघाल्यामुळे मराठी भाषेंत बऱ्यावाईट कादंबऱ्यांची बरीच भर पडली आहे. एकेका नाटक मंडळीच्या उदरांतून अनेक मंडळ्या निघत गेल्यामुळे व त्यांजकडून नवीन नवीन नाटकें होणें आवश्यक होऊन बसल्यामुळे नाट्यवाङ्मयांतहि सपाट्याने भर पडत आहे. कांही वर्षें उमेदवारी केल्याशिवाय कादंबरीकाराला किंवा नाटककारास प्रसिद्धी मिळणें कठीण होऊन बसलें आहे. तथापि ह्याहि नियमास अपवाद नसतात असें नाही. रा. रा. वामनराव जोशी अशा अपवादांपैकीच होत." वामनरावांच्या रागिणीने संपादिलेली लोकप्रसिद्धी अपवादात्मक होती असें कोल्हटकरांनी कबूल केलें आहे. बरें, ही अपवादात्मक गोष्ट वामनरावांनी साधली ती तंत्रकौशल्याच्या जोरावर म्हणावें तर तसेंहि नाही; उलट नेमक्या त्या अंगाचा तर वामनरावांच्या ह्या कादंबरींत अभाव होता. वि. सी. गुर्जर किंवा नाथमाधव यांच्या कथांतून कथानकाची कुतूहलजनक गुंफण करण्याचें जें कौशल्य दिसून येत होतें व दिलखुलास संवादलेखनाचें जें नवें कसब व्यक्त होत होतें, त्याचा वामनरावांच्या ठिकाणीं पूर्णपणें अभावच होता; परंतु अशा प्रतिकूल स्थितींतहि ज्या अर्थी 'रागिणी' ने महाराष्ट्रीय वाचकवर्गाचें मनहरण

केलें त्या अर्थी तिच्या ठिकाणीं कांही तरी सुसंस्कृत महाराष्ट्रीय मनाला आकर्षित करणारीं वैशिष्ट्यें होतीं हें उघडच आहे.

### ' रागिणी ' चा वाचकवर्ग :

एक गोष्ट मात्र वामनरावांच्या लोकप्रियतेसंबंधी नेहमीच लक्षांत ठेवली पाहिजे; ती ही की त्यांना ' रागिणी ' च्या प्रसिद्धीकाळीहि जो वाचकवर्ग मिळाला तो कथावाङ्मयाचा नेहमीचा सर्वसामान्य वाचकवर्ग नव्हता; तर त्यांतील सुशिक्षित व सुसंस्कृत असा वरचा वाचकवर्ग होता. तिचा आजचा वाचकवर्गहि तोच आहे व पुढेंहि तसलाच राहणार. ह्या सुविद्य व बहुश्रुत वाचकवर्गाला तरी ' रागिणी ' ने इतकें कसें वश करून घेतलें, हें पाहिलें पाहिजे. ह्या वाचकवर्गाची, कलात्मक व कलाकुसरीने युक्त असें लिखाण वाचण्याची आवड कांही कमी आहे अशांतला भाग नाही; ह्या वाचकवर्गाची लेखन-कलाकुसरीची आवडहि मोठी चोखंदळ आहे हें, आपण तो वर्ग जें इतर ललितलेखन वाचतो व प्रसंगीं वाखाणतो त्याच्या स्वरूपाकडे पाहून म्हणू शकतों; त्या वाचकवर्गाला फडके आवडतात तितकेच वामन मल्हार जोशी आवडत नसतील कदाचित्; परंतु त्याला फडक्यांबरोबर वामन मल्हारहि आवडतात असें म्हणावयास हरकत नाहीं; व एवढेंहि कांही थोडें नाही. म्हणूनच प्रश्न असा येतो की ' रागिणी ' मध्ये असें काय आहे व होतें की ज्यामुळे तिने तिच्या काळच्या लोकांचें लक्ष स्वतःकडे झटकन् वेधलें व ज्यामुळे लेखन कलाकुसरीबद्दल चोखंदळ बनलेल्या आजच्या वाचकांचेंहि चित्त वर सांगितलेले अनेक तंत्रदोष लक्षांत घेऊनहि ती थोडेंफार आजहि हरण करूं शकते ?

### महाराष्ट्र वाङ्मयाची परंपरा :

ह्या प्रश्नासंबंधी विचार करूं लागलों की तुम्हाआम्हा महाराष्ट्रियांच्या ठिकाणीं साधारणतः अंगभूतच असलेली तत्त्वचर्चेची आवड तर ह्या कादंबरीच्या लोकप्रियतेच्या मागे नाही ना अशी मधूनच एक शंका माझ्या मनाला चाटून जाते. आम्हा महाराष्ट्रियांच्या वाङ्मयाची जुनी परंपरा पाहिली तर तिच्यामध्येहि ह्या तत्त्वशोधक, तत्त्वजिज्ञासू वृत्तींतून जन्माला आलेलें व ह्याच वृत्तीचा उजळा मिळालेलें असें वाङ्मयच विशेष दिसून येतें. असल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २.३.६... दि: ...
क्रमांक ... नोंदणी ...

वाङ्मयाबद्दलची आपली आवड आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेली आहे असें दिसतें. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि वाङ्मय-सेवकांच्या कृतींचें पिढ्यान्‌पिढ्या जें महाराष्ट्रांत वाचन, श्रवण व पठण झालें आहे, त्यांतून ह्या आवडीचा जन्म झाला असावा, असें मला वाटतें. आमची वाङ्मयपीठिकाच अशा प्रकारची आहेः आजहि आमच्यापैकीं अनेकांना ‘ रूपककथा ’ आवडत आहेत : जीवनाकडे—जीवनव्यवहारांकडे तत्त्वशोधकाच्या दृष्टीने पाहण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याचें अगत्यपूर्वक स्वागत होत आहे. तत्त्वचर्चात्मक प्रबंध वाचण्याचा आम्ही प्रयत्न करीत नसलों तरी दाजीसाहेब तुळजापूरकर यांच्या ‘ माझें रामायणां ’ तील किंवा माडखोलकरांसारख्यांच्या कादंबऱ्यांतील तत्त्वचर्चा आपल्यांतील अनेकांना रसापकर्षक वाटत नाहीत, असें त्यांना जी वाचकवर्गाकडून मागणी आहे तिजवरून दिसत आहे; तेव्हां माझ्या मनाला चाटून जाणाऱ्या ह्या विचारांत अगदींच सत्यांश नाही असें वाटत नाही : अशा प्रकारचा विचार मनांत येऊं देण्याने आम्ही आत्मगौरवाच्या ( व कांहींच्या मतें आत्मवंचनेच्या ) दोषास पात्र होऊं असें कित्येकांस वाटेल; परंतु तो दोष थोडाफार पत्करूनहि मी असेंच म्हणेन कीं महाराष्ट्रवाङ्मयाची आजपर्यंतची प्रकृति लक्षांत घेतां तिच्यांत तत्त्वजिज्ञासा, तत्त्वशोधन व तत्त्वविवेचन ह्यांची आवड अधिक दिसून येते व महाराष्ट्रांतील वाचकवर्गाचीहि वाङ्मयाभिरुचि ह्या प्रवृत्तीला परिपोषक अशाच प्रकारची आतापर्यंत बनलेली आहे. कथालेखनाच्या प्रांतांत हरिभाऊ आपटे व त्यांचा समकालीन लेखकवर्ग ह्या प्रवृत्तीला अजिबात पारखा होता असें वाटत नाहीं. हरिभाऊंच्याहि कादंबऱ्यांत तत्त्वचर्चा आहेत, परंतु त्या डोळ्यांत भरतील इतकें त्याचें स्वरूप भडक नाहीं. श्री० सी. के. दामले ह्यांच्या १९१३ सालीं प्रसिद्ध झालेल्या ‘ जग हें त्रिविध आहे ’ ह्या, त्या काळीं लोकप्रिय झालेल्या कादंबरींतील तत्त्वचर्चात्मक संवाद आपणांपैकीं पुष्कळांना येथें आठवतील; शिवराम महादेव परांजपे ह्यांच्या लिखाणाचीहि आपणांस आठवण होईल. गोळ्यांचें ‘ हिंदुधर्म आणि सुधारणा ’ व त्या काळीं विशेष वाचल्या गेलेल्या ‘रासेलस’ व ‘सरस्वतीचंद्र’ ह्या तत्त्वज्ञानपर कथा हीं पुस्तकें आपल्या लक्षांत येतील. वामनरावांनी आपल्या ‘ रागिणी ’ ला काव्यशास्त्रविनोदाचें स्वरूप दिलें तें ह्या प्रवृत्तीला व सुसंस्कृत मराठी

वाचकांच्या अभिरुचीला अनुसरूनच. सर आर्थर हेल्प्स् यांच्या Friends in Coucil ह्या पुस्तकासारखें आपण कांहीं तरी लिहावें ह्या कल्पनेंतून ' रागिणी ' जन्मली व वामनरावांनी मराठी वाङ्मयांत अंगभूतच असलेल्या व तत्कालीन कथावाङ्मयांतूनहि अधून मधून डोकावत असलेल्या ह्या प्रवृत्तीला आपल्या पहिल्याच कथेंत निश्चित असें स्वरूप दिलें. ' तात्विक कादंबरीच्या जनकत्वाचा ' मान तात्यासाहेब कोल्हटकर मोठ्या गौरवानें वामनरावांना देतात व महाराष्ट्रांतील सगळयाच नामवंत टीकाकारांनी हा मान वामनरावांना वेळोवेळी दिलेला आहे. तो मान त्यांचाच आहे ह्याबद्दल संशय नाही. मला सांगावयाचें तें एवढेंच की वामनरावांनी ज्या प्रवृत्तीला निश्चित असें स्वरूप देण्याचा प्रयत्न केला ती प्रवृत्ति मराठी वाङ्मयांत त्यांचे काळीं व त्याच्या अगोदरहि होती; तिची सुसंकृत वाचकवर्गालाहि जाणीव होती व ह्याच वाचकवर्गाची वाङ्मयाभिरुचि वामनरावांनी आपल्या काव्यशास्त्रविनोदाने तृप्त केल्यावर तो काव्यशास्त्रविनोद ज्या पेल्यांतून पाजला गेला, त्याचा आकार, त्याची घडण, त्याची रचना, त्याचें बाह्यरूप इत्यादि गोष्टींकडे हवं तें मिळाल्याच्या आनंदाच्या भरांत वाचकांनीं, दुर्लक्ष करावें ह्यांत नवल तें काय ?

## तत्त्वशोधक वृत्तीचें एक वैशिष्ट्य :

शिवाय वामनरावांच्या ' रागिणींत ' व्यक्त झालेल्या तत्त्वशोधक प्रतिभेंत दुसरें एक मनोवेधक वैशिष्ट्य होतें; वामनरावांची तत्त्वजिज्ञासु वृत्ति ज्ञानाच्या एकाच प्रांतांत भ्रमण करण्यांत समाधान मानणारी नव्हती. तिला जितका धर्मव्यवहाराचा प्रांत आपल्या भ्रमंतीला अनुकूल वाटत होता, तितकाच वेदान्ताचा, वाङ्मयाचा, नीतीचा, समाजशासनाचा, कलेचा, आधिभौतिक शास्त्रांचा, राजकारणाचा, समाजसुधारणांचा प्रांतहि मनापासून प्रिय होता; तेव्हां ह्या सर्वच प्रांतांतील तिचा विलास एकसमयावच्छेदेकरून एकाच कादंबरींत पाहावयाला मिळाल्यामुळे वाचकांच्या भिन्न अभिरुचींचें एकाच वेळी समाधान व्हावें व त्यांना एका वेगळ्याच प्रकारच्या बौद्धिक आनंदाची उपलब्धी व्हावी ह्यांत काय नवल ? त्या वेळेच्या वाचकवर्गाचे आवडीचे वादविषय म्हणजे स्वदेशप्रीति, समाजसुधारणा, आणि धर्म व नीति ह्यांचें

स्वरूप. ह्या सर्वच प्रश्नांचा अत्यंत समतोलपणें वामनरावांच्या 'काव्यशास्त्र-विनोदांत' विचार झालेला; तोहि भय्यासाहेब, आनंदराव, भाऊसाहेब, शास्त्रीबुवा, नानासाहेब वगैरे सुसंस्कृत बुद्धिमान् व्यक्तींकडून; मग काय पाहतां? दुधांत साखर पडावी ह्या आनंदाने वाचकांनीं त्याचा आस्वाद घेतला असेल असें समजावयास हरकत नाहीं. ह्या पूर्वी 'हिंदुधर्म व सुधारणा' ह्या आपल्या ग्रंथांत गोळ्यांनी संभाषणांच्या द्वारां तत्त्वचर्चा करण्याचा प्रयत्न केला होता व तोहि त्यांतील कांहीं रोचक वैशिष्ट्यांमुळें बराच गाजला होता; परंतु तेथे कथाशरीर नव्हतें, व तत्त्वचर्चेचा प्रांतहि संकुचित होता; 'रागिणींत' कथा होती, तत्त्वचर्चा होत्या व त्या तत्त्वचर्चांचा प्रांत अत्यंत विस्तृत व बहुविध होता; त्यांत अनेक विषय* होते; त्यांतील कांहीं अत्यंत जिव्हाळ्याचे होते; तर कांहींचा आस्वाद कलावन्ताच्या ताटस्थ्याने घेतां येण्यासारखें त्यांचें स्वरूप होतें. तेव्हां लोकहितवादींचीं 'शतपत्रें,' 'निबंधमाला', 'सुधारकां'तील निबंध, भांडारकर, रानड्यांचीं धर्मपर व्याख्यानें, 'केसरीं'तील लेख, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, 'काळां' तील लिखाण ह्यांच्या वाचनाने अत्यंत सुसंस्कृत बनलेला तत्कालीन सुशिक्षित वाचकवर्ग 'रागिणी' कडे झटकन् आकृष्ट झाला हें स्वाभाविकच नाहीं काय?

परंतु एवढेंच 'रागिणी' च्या तात्कालिक लोकप्रियतेचें एकुलतें एक कारण नव्हतें :

---

* 'रागिणीं' त आलेल्या तात्त्विक चर्चांचे विषय :

बुद्धि आणि श्रद्धा : श्रेष्ठ कोंण? अन्तःप्रेरणा म्हणजे काय? मनुस्मृतींत स्त्रियांची निंदा केली आहे की स्तुति?; मनूने घातलेल्या निर्बंधांची कारण-मीमांसा; स्त्रीस्वातंत्र्य; धर्म खरा कीं भौतिक शास्त्रें खरी?; ब्रह्म निर्गुण की सगुण?; बुद्धीपासून फायदे व तोटे; सत्य आणि नीति; अन्तःस्फूर्तज्ञान विरुद्ध तर्कज्ञान; ईश्वराचें अस्तित्व; सृष्टीचा धर्म, स्वार्थ की स्वार्थत्याग?; जग आनंदमय व प्रेममय आहे की दुःखमय व कलहमय आहे?; संसार आनंददायक की दुःखकारक?; दुःख निर्माण करण्यांत ईश्वराचा हेतु काय असावा?; जगांत अन्यायाचें वास्तव्य आहे का?; नीतीचा उगम इत्यादि.

**रागिणीचें वैशिष्ट्य :**

'रागिणी' ज्या काळांत लिहिली गेली त्या काळांतील वाचकवर्गाला 'रागिणीं' ते आणखी नवें असें कांहीतरी आढळलें. हरिभाऊ आपटे ह्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांचा वाचकवर्ग हा पुष्कळच चोखंदळ होता. महाराष्ट्रांतील पांढरपेशा समाजाचें हरिभाऊंनी आपल्या समाज-कथांतून—हरिभाऊंच्या कादंबऱ्यांना समाजकथा न म्हणतां कुटुंबकथा म्हणावें असेंच मला पुष्कळ वेळा वाटतें - केलेलें चित्रण हें जसें विस्ताराच्या व विविधतेच्या दृष्टीनें अपूर्व होतें, तसेंच तें सखोल असल्या-कारणाने अत्यंत प्रत्ययकारी ठरलें होतें. महाराष्ट्रांतील मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजजीवनाचीं नानाविध सुखदुःखात्मक अंगें हरिभाऊंनी चितारलीं होतीं; व त्यांच्या दर्शनाने हजारों मराठी वाचकांना जसें सुखविलें होतें, तसेंच अन्तर्मुख बनविलें होतें. आगरकरांनी जें कार्य आपल्या निबंधलेखनाने सुरू केलें होतें त्याचाच प्रसार व प्रचार अधिक खोलवर व दूरवर करण्याचें काम हरिभाऊंचें कथावाङ्मय करीत होतें; जुन्यांतील हिणकस, अनिष्ट, कुज-लेल्या भागावर प्रकाश टाकणें हेंच प्रामुख्याने त्याचें कार्य होतें. त्यामुळें स्वाभाविकच हरिभाऊंचें लक्ष जितकें जुन्याकडे होतें तितकें नव्याकडे नव्हतें : त्यांना जुन्याचें चित्रण करून त्यांतील दोषस्थळांवर प्रकाशझोत टाकावयाचे होते व ह्या जुन्यांतून नवें निर्माण होणार असें सुचवावयाचें होतें; म्हणूनच ते ह्या जुन्याचें म्हणजेच समाजांतील बहुसंख्यांच्या गुणदोषात्मक स्थितींचें चित्र रेखाटण्यांत खऱ्याखुऱ्या कलावन्ताप्रमाणे रंगून गेले होते; व हें चित्र मोठ्या परिणामकारकपणे उतरवीत होते. परंतु ह्या परिणामकारक चित्रणाने म्हणा, त्यांच्या अगोदर होऊन गेलेल्या रानडे, आगरकरांसारख्या लोकनायकांच्या अविश्रान्त श्रमांमुळे म्हणा वा काळाच्या महिम्यामुळे म्हणा ह्या महाराष्ट्रीय मध्यमवर्गांत जी एक नवीन 'स्त्री' निर्माण होत होती व ह्या 'स्त्री' चें स्वागत करणारी, ह्या 'स्त्री' चा द्वेष करणारी, ह्या 'स्त्री' ची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करणारी जी एक नवी पुरुष-मंडळीहि निर्माण होत होती, तिच्याकडे हरिभाऊंचें लक्ष नव्हतें. लक्ष नव्हतें असें म्हणण्यांतील भावार्थ एवढाच की हरिभाऊंना तिची निर्मिति साधावयाची होती; तिचें कथात्मक चित्रण कर-ण्याचें कार्य ते इतरांवर सोपवूं पहात होते. ही जी नवीन 'स्त्री' निर्माण

होत होती, तिचे विचार अपरिपक्क होते; तिच्यांत उत्साह होता, हिरीरी होती, विलक्षण चैतन्य होतें, सुप्त स्वसामर्थ्याची कल्पना होती, स्वतःच्या कर्तृत्वाची थोडी अवास्तवच जाणीव होती; परंतु आपल्या जीवनकार्याविषयी निश्चित अशी कल्पना नव्हती, विवेक नव्हता; तडफ होती, सरलता होती, परंतु भोवतालच्या परिस्थितीची यथार्थ जाणीव नव्हती; आणि हें स्वाभाविकच होतें. ह्या नव्या 'स्त्री'च्या उदयाबरोबर तिच्या भोवतालची परिस्थिति तिच्याबाबत वेगवेगळे प्रश्नहि निर्माण करीत होती; त्या सर्वांची जाणीव होण्याइतकी ती अद्याप वैचारिक दृष्ट्या प्रौढ झालेली नव्हती; त्या वेळी ती आत्मविचारांत व आत्मगौरवांतच दंग होती. वामनरावांना ही नवी स्त्री दिसली व तिच्यासंबंधी निर्माण होऊं पाहणारे हे प्रश्नहि दिसले; तिच्याकडे कुतूहलानें, आदराने, विषादाने, भयाने, कुत्सेने, कुचेष्टेने, गांभीर्याने, तटस्थ वृत्तीने पाहणारे नानाविध पुरुष दिसले व ह्यांचें चित्रण ललितकथेच्या द्वारां करावें असें त्यांस वाटलें. उत्तरा, रागिणी, भय्यासाहेब, आनंदराव, शास्त्रीबोवा, भाऊसाहेब, नानासाहेब व जनुभाऊ यांची निर्मिति ह्याच इच्छेंतून झाली. 'रागिणी'चें पहिलें प्रकरण, 'जिचें मन शुद्ध, निष्कपट आणि प्रेमळ होतें, परंतु शिक्षणामुळे जिचे विचार बरेचसे बदलले होते व जिच्यामध्ये विलक्षण वावदूकता आलेली होती, जातीजातीमधील कृत्रिम भेद जिला पसंत नव्हता, व आपल्या समाजांतील स्त्रीपुरुषवर्गांमधील कृत्रिम भेद तर जिला बिलकुलच आवडत नव्हता; ब्राह्मणांनी इतर जातींना खाली ठेवण्याचा जसा प्रयत्न केला, तसाच प्रयत्न, सर्व पुरुषजातीने स्त्रीवर्गाला खाली दडपण्यासाठी केला व अजूनहि तसा प्रयत्न पुरुषवर्गाकडून होत आहे असें जी उघड उघड प्रतिपादन करीत असे. मनु, याज्ञवल्क्य इत्यादि ब्राह्मणाभिमानी आणि स्त्रीद्वेष्ट्या जुन्या शास्त्रकारांचें—विशेषतः मनूचें–नांव घेणेंहि जिला पाप वाटत असे' अशा हिंदु सफ्रेजेट उत्तरेसाठी वामनरावांनी सर्वस्वी खर्च केलें आहे, ह्यावरून त्यांच्या हेतूसंबंधी निश्चित कल्पना येते. वामनरावांना नव्या जुन्यांचा समंजसपणे मेळ घालूं पाहणारी, 'उच्चतम पावित्र्य, श्रेष्ठ चारित्र्य, आणि आनंदयुक्त शांतता हाच जिचा स्वभाव होता; सामान्य सुख-लालसा, लोकनिंदेची भीति व औदासिन्य, ही जिची केवळ क्षणिक विकृति होती', अशी आदर्श 'रागिणी' रंगवावयाची असली तरी त्यांच्या कलात्मक

दृष्टीला उत्तरेनेच—त्या काळांत निर्माण होणाऱ्या ह्या नव्या स्त्रीनेच आकृष्ट केलें होतें असेंच दिसून येतें.

**नवी ' स्त्री ' व ' नलिनी ' :**

उत्तरा व रागिणी * ह्या दोघीही आपापल्या परीने ज्याप्रमाणे ह्या नवीन उदयास येत असलेल्या स्त्रीच्या प्रातिनिधिक प्रतिमा होत्या त्याचप्रमाणे ह्या स्त्रीचीं थोड्याशा वेगळ्या परिस्थितींतील रूपें ' नलिनीं 'तील नलिनी व कमला ह्यांच्या व्यक्तिचित्रांतून डोकावत होतीं. कमलेचें वर्णन करितांना " या जगांत काय काय नवलाच्या गोष्टी आहेत—मग त्या वाईट असोत का चांगल्या असोत—हें जाणण्यास उत्सुक असलेली, स्वतःच्या सद्गुणांबद्दल फाजील खात्री असलेली तरुण, अननुभविक, अर्धवट शिकलेली मुलगी " असे शब्द वामनरावांनी योजलेले आहेत ' नलिनीं 'तील सगळेंच वातावरण १९०६।७।८ सालांतील म्हणजे कर्झनशाहीच्या काळांतील गुप्तकटांच्या राजकारणाचें आहे. परंतु कादंबरीची रचना अनेक दृष्टींनी सदोष झाल्यामुळे त्या कथेंतील नलिनी व कमला ह्यांचीं चित्रें वाचकांच्या नजरेंत फारशीं भरलीं नाहीत; परंतु ह्या नवोदित ' स्त्री ' बाबतच्या वामनरावांच्या धोरणाचा विचार करितांना हीं दोन्हीहि व्यक्तिचित्रें लक्षांत घ्यावींच लागतात. ' रागिणीं 'तील उत्तरा व रागिणी ह्या जनुभाऊंच्या कपटनाट्याला बळी पडत

* ' रागिणी 'च्या उत्तरार्धात उत्तरेच्या स्वभावांतील पालट वामनरावांनी दाखविलेला आहे; त्यावरून वामनराव हे स्थितिप्रिय वृत्तीचे होते, त्यांना आधुनिक स्त्रीचें मन कळलेलें नव्हतें असला आक्षेप कांही टीकाकार घेतांना दिसतात. परंतु एक तर उत्तरेचें चित्र रंगवितांना जी नवी ' स्त्री ' वामनरावांना दिसली तिचें स्वरूप वर वर्णिल्याप्रमाणे होतें व दुसरें म्हणजे उत्तरेंत झालेला पालट हा सामान्यतः कोणत्याहि बालिकेचा प्रौढ वयांत प्रवेश होत असतांना घडणारा मनःपालटच होता असें विचाराअंतीं वाटतें. वामनरावांना नवीन ' स्त्री 'चे केवळ गुणच दाखवावयाचे नव्हते. तिचा उताविळा स्वभाव, तिची संकुचित दुराग्रही दृष्टी ह्याहि गोष्टी त्यांना दिसत होत्या व म्हणूनच दाखवावयाच्या होत्या.

नाहींत; ‘ नलिनीं ’तील कमला दिवाणजीच्या कपटनाट्याला बळी पडते. हें तिचें बलिदान वामनरावांना कलात्मकतेने सुसंगतपणें रंगवितां आलेलें नसेल. त्यामुळें तें तितकेसें प्रत्ययकारी वाटत नाही; परंतु तत्संबंधीची वामनरावांची भूमिका समजावून घ्यावयास तें अत्यंत उपयोगी आहे; घर सोडून जातांना लिहून ठेवलेल्या पत्रांत कमला लिहिते, “ मी एका अर्थी पापी नाही. माझ्या मनाच्या विरुद्ध माझ्या हातून पाप घडलं. मी सांगत्यें कीं माझें मन पापी नाही. ” वामनरावहि कमलेच्या ह्या नैतिक दृष्ट्या झालेल्या अधःपतनाला उद्देशून लिहितात, “ अब्रूला बांगडीचीं उपमा देतात, आणि यःकश्चित् कारणांवरून ती बांगडी जन्माचीं फुटली, असें मानणारी जी वृत्ति आहे तिच्यांतील समंजसपणा मला तरी अद्याप पूर्णपणे कळलेला नाही...स्त्रियांच्या निर्दोषितेवर पुरुषांपेक्षां अधिक करडी नजर जी ठेवण्यांत येते, त्यांत न्यायाच्या किंवा नीतीच्या अंशापेक्षा कमी अधिक आर्थिक स्वातंत्र्याचा, कमी अधिक प्रबलतेचा व कमी अधिक हेव्याचा अंश अधिक आहे असें प्रथमदर्शनी दिसतें व मला तरी निदान द्वितीयदर्शनी देखील तेंच दिसतें. ” ह्या कथेंत एके ठिकाणीं वसंतराव, नलिनी व कमला ह्यांच्यामध्ये ‘ स्त्रीशिक्षण ’ ह्याच विषयावर वाद झालेला दाखविलेला आहे. ह्याच विषयावर नलिनी व कमला ह्या दोघींनी लिहिलेल्या निबंधांतून हा वाद निर्माण झालेला आहे. ह्या वादाच्या द्वारां वामनरावांनी ‘ शिक्षण ’ ह्या शब्दाचा अर्थ ही नवीन ‘ स्त्री ’ काय करीत होती हें सहजगत्या दाखवून दिलें आहे. कमला ललितकलांच्या शिक्षणालाच फक्त अनुकूल आहे तर नलिनी केवळ बुद्धिविकास हेंच शिक्षणाचें साध्य आहे असें प्रतिपादित आहे. शिक्षणाचें खरें कार्य काय आहे हें वामनरावांनी येथें वसंतरावांच्या मार्फत वदविलें आहे. ह्या नवीन ‘ स्त्री ’ कडे पाहण्याची वामनरावांची दृष्टी ही केवळ प्रशंसकाची होती असें नसून ती समंजस जाणत्याची होती; तिच्यांत सहानुभूति होती, परंतु सहानुभवाबरोबरच ध्यानांत येणाऱ्या दोषांचीहि तिला दखल होती, असें दिसून येतें. ‘ नलिनीं ’ तील दोन्हीहि स्त्रीचित्रें ह्या दृष्टीने अवश्य पारखण्यासारखीं आहेत. ‘ नलिनीं ’ तील ‘ कमलेच्या ’ व्यक्तिचित्राबाबत मी जेव्हां जेव्हां विचार करतों त्या त्या वेळी ‘ इंदु काळे व सरला भोळे ’ ह्यांतील इंदु काळे ही ह्या कमलेंतूनच १५ वर्षांनंतर उत्क्रान्त झाली आहे असें मला राहून राहून वाटतें. तीच बाह्य

देखाव्याची आवड, तेंच ललितकलांचें प्रेम, व तोच अविचारी आत्मविश्वास ह्या दोघींत मला दिसून येतो; अर्थात् इंदु काळेचें व्यक्तिचित्र अधिक कलात्मकतेने रंगविलें गेल्यामुळे अधिक परिणामकारक उतरलें आहे ही गोष्ट निराळी. राजकीय दृष्ट्या पक्क्या मवाळ असलेल्या आपल्या वडिलांच्या घरांत वाढलेली व कट्टर समाजसुधारकांच्या हाताखाली शिकलेली नलिनी ही छान-छोकीची आवड असलेल्या कमलेपेक्षां अधिक समंजस, अधिक बुद्धिमान् असली तरी एककल्ली व चुकीच्या मूल्यांना महत्त्व देणारी अशीच मुलगी आहे, यांत संशय नाही. ह्या दृष्टीनें विचार करतां तिचें चित्र हें बरेंच वास्तवदर्शी करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे असें वाटतें: " यौवनांत स्त्रीपुरुषांना ज्या ' कामाची ' कमी अधिक जाणीव भासूं लागते, त्याच कामाच्या प्रभावाने तिचें मन आतां बावरलेलें होतें, " असें एके ठिकाणी वामनराव लिहितात तर दुसरीकडे वसंतराव नलिनीशी बोलत आहेत अशा प्रसंगीं " मासिक मनोरंजनांत तसेंच अलीकडील कादंबऱ्यांत, वर्णन केलेला प्रेमयाचनात्मक मधुर प्रसंग आपणाला आतां अनुभवायला मिळणार असें तिला वाटलें " अशी एक सत्यदर्शी छटा हळूच आपल्या लेखनांत घालून ते नलिनीचें म्हणजे त्या काळीं उदयास येणाऱ्या एका नव्या स्त्रीचें व्यक्तिचित्र मोठ्या कौशल्याने वास्तवपूर्ण करितात.

### नव्या स्त्रींत होत गेलेला बदल :

जसजशी ही नवी ' स्त्री ' अधिकाधिक साकार होऊं लागली तसतसें तिचें सहानुभूतिपूर्वक परंतु अत्यंत मार्मिकपणे निरीक्षण करण्याचें कार्य ह्या नव्या परंतु आपल्या एकदोन ललितकृतींनीच सर्वांच्या ओळखीच्या झालेल्या लेखकाकडून आपोआपच होऊं लागलें व त्याचें दृश्यफळ ' सुशीलेचा देव ' आणि ' इंदु काळे व सरला भोळे ह्या दोन ललितकृतींच्या द्वारां मराठी वाचकांस मिळालें. ' नलिनी ' च्या प्रकाशनकालानंतर बरोबर दहा वर्षांनी वामनरावांची ' सुशीलेचा देव ' ही कादंबरी मराठी वाचकांच्या हातांत पडली; व तिच्या प्रकाशनकालानंतर बरोबर पांच वर्षांनी ' इंदु काळे व सरला भोळे हें वामनरावांच्या कादंबरीलेखनाचें शेंडेफळ आमच्या हातीं आलें. वामनरावांच्या ह्या चारीही कादंबऱ्या म्हणजे महाराष्ट्रांत उदयास येत असलेल्या नव्या ' स्त्री ' च्या व तिच्याशी संबद्ध असलेल्या पुरुषवर्गाच्या

गेल्या तीस चाळीस वर्षांतील मानसिक उत्क्रांतीचे टप्पे आहेत. 'रागिणी'-च्या लेखनकालीं ही स्त्री नुकतीच उदयास येत होती, तिला आत्मसामर्थ्याची जाणीव होत होती, तिच्याकडे पाहणाऱ्यांच्या दृष्टींत कुतूहलाचाच भाग अधिक होता. तिचे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न म्हणजे शिक्षण, प्रेम, विवाह व समान हक्क ह्याखेरीज दुसरे नव्हते; रागिणींत ह्या 'स्त्री' संबंधीच्या चित्रणांत ह्याखेरीज दुसरें कांही नाही हें स्वाभाविकच आहे; परन्तु 'नलिनी'मध्यें परिस्थिति बदलली आहे; विवाहाचा प्रश्न तर प्रामुख्याने पुढे येतोच आहे, परंतु त्याबरोबरच अर्धशिक्षित अविचारी प्रौढ कुमारिकांचा प्रश्नहि हळूच पुढे डोकावतो आहे; असल्या स्त्रीला पापी समजावयाचें की निष्पाप समजावयाचें हा तो प्रश्न आहे; अशा प्रकारचें गैरवर्तन सदर स्त्रीच्या हातून घडण्यास तिला मिळत असलेलें शालेय व गृहशिक्षण कितपत कारण आहे, हें शिक्षण स्वतःच्या सद्गुणांबाबत थोडासा फाजील आत्मविश्वास व जीवनाबद्दलचीं चुकीचीं मूल्यें तर तिचें ठिकाणीं निर्माण करीत नाही ना? अशा प्रकारच्या शंका लेखकाच्या मनांत ही कथा लिहीत असतांना घोळत असाव्यात असें वाटतें. शाळेंतील शिक्षकांच्या मतांची आणि राजकारणांत व समाजकारणांत विशिष्ट पक्षाचा अभिमान बाळगणाऱ्या आपल्या वडिलांच्या मतांची वेळीं अवेळी असंमजसपणे पोपटपंची करणारी 'नलिनी' सारखी स्त्री ही स्वतःच्या जीवनाविषयींचे प्रश्न सोडवावयाला किती असमर्थ होती, हें दाखवून देण्याचा वामनरावांचा तिचें शब्दचित्र रंगवितांना हेतु असावा, असें अधूनमधून वाटल्याखेरीज राहत नाही. वामनरावांची ह्या 'स्त्री'कडे पाहण्याची दृष्टी ही प्रशंसकाची नसून समंजस जाणत्याची होती असें जें वर मीं म्हटलें त्यांतलें मर्म हें आहे (श्रोत्यांनी येथें 'नलिनीं'तील मीनाबाजाराचा प्रसंग व त्यावरील वसंतरावांचें भाष्य अवश्य लक्षांत घ्यावें.)

## ध्येयवादी सुशीला

सुशीलेच्या वेळचें वातावरण थोडेसें वेगळें आहे. ज्या काळांत (१९०६-७-८) नलिनी व कमला ह्या वावरल्या आहेत, त्या काळांत सुशीलेचें बालपण गेलें आहे; तिच्या कथात्मक जीवनांतील कर्तृत्वाचा काळ हा बराच अलीकडील आहे. आता स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सुटल्यासारखा वाटत

आहे; जुन्यानव्याचा मेळ घालणाऱ्या एका सोज्वळ कुटुंबांत व बुद्धिमान् मुलांच्या संगतींत सुशीला लहानाची मोठी झाली आहे. सुशीलेचें रावबाशी लग्न ती शाळेंत जात असतांनाच होत आहे; म्हणजे फार प्रौढ वयांत होत आहे असें नाही. ती रावबाबरोबर संसार करते; स्पेन्सरच्या सतत शिकवणुकीने सुखवादी बनलेल्या रावबाच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाला स्वाभाविकच मान तुकवतें, त्याच्याशीं एकरूप होते, व प्रेमाने त्यालाहि मृदु बनविते, इतकें की तो जगांत देव नसला तरी एक 'देवी' आहे हें मानावयाला तयार होतो; परंतु रावबाबरोबर जीवनाचा प्रवास करीत असतांनाच ती जीवनाबद्दल सखोलपणे व स्वतंत्रपणे विचार करावयास शिकते, रावबाच्या सुखवादाला व जडवादाला आळा घालण्याचा प्रयत्न करते, त्यांत फसते व शहाणी बनते; अति झाल्यावर घर सोडून जाते, परंतु रावबाच्या मृत्युसमयीं समंजसपणें परत त्याच्याजवळ येते. अति झाल्यावर पतिदेवाला दूर सारण्याइतकी धिटाई ह्या नव्या स्त्रींत आलेली असली तरी तिच्यांतील माणुसकी मेलेली नाही. ती विचारी, समंजस, शहाणी बनत आहे. केवळ भावनेच्या आहारी जाऊन कोणत्याहि प्रश्नाचा तडकाफडकी सोक्षमोक्ष करण्याची तिची वृत्ति बदलत आहे. रावबाच्या मृत्यूनंतरचें सुशीलेचें जीवनचित्र हें वामनरावांकरवीं रंगविल्या जाणाऱ्या ह्या 'नव्या स्त्री'च्या चित्रांत स्वतःचे असे विशेष रंग भरते. पतीला देव मानणारी सुशीला विचारांतीं ध्येयाला देव समजूं लागते; व त्याचें भजन, पूजन व ध्यान ह्यांतच मग्न होऊन जाते. सुशीलेच्या परमेश्वरविषयक कल्पनांत कसकसा बदल होत गेला हें जाणून घेण्याचा प्रयत्न वामनरावांच्या ह्या कादंबरीवरील अनेक टीकालेखांनी केलेला आहे; सुशीलेच्या देवासंबंधीच्या कल्पनांतील विकास हेंच ह्या कादंबरीचें प्रधानकार्य असल्यामुळें त्या कार्याचें स्वरूप समजाऊन देण्याचा प्रयत्न करणें उचित खरें, परंतु तें मला येथें अभिप्रेत नाही. मला येथे सुशीलेच्या व्यक्तिचित्रांत ह्या नव्या स्त्रीचा तोंडावळा कसा व कोठे दिसत आहे तेंच पाहावयाचें आहे. ध्येय हाच देव ह्या विचारापर्यंत येऊन ठेपलेल्या आणि एका विशिष्ट ध्येयाचा ध्यास घेणाऱ्या सुशीलेची मानसिक प्रगति ही स्वतंत्र, स्वयंसाधित अशी आहे. बाळू, सुनंदा, रावबा, काफ इत्यादि भोंवतालच्या व्यक्तींच्या सहजीवनाचा, आपल्या वैवाहिक जीवनाच्या

शोचनीय पर्यवसानाचा, रावबाबरोबर त्याच्या कारखान्यांतील मजुरांचे प्रश्न सोडविण्याबाबत आलेल्या अनुभवांचा व बालपणापासून घडलेल्या संस्कारांचा हा स्वाभाविक थोडा बहुत परिणाम आहे हें उघडच आहे. परंतु त्यांत कमला, रागिणी, व नलिनी, किंवा वावदूक उत्तरा ह्यांच्यापेक्षां स्वतंत्र विवेचक निर्णायकशक्तीचा, निर्धाराचा, विवेकाचा, सारासार विचारशक्तीचा, आत्मस्वातंत्र्य व आत्मसामर्थ्य ह्याबद्दलच्या यथोचित जाणिवेचा भाग अधिक आहे असें दिसून येतें. सुशीला ही स्वतंत्रप्रज्ञा आहे; केवळ वावदुकी करणारी विदूषी नाही; तर आपल्या विचारांना प्रत्यक्ष कार्यरूप देण्याची धमक तिच्यांत आहे; ती आपले विचार कृतींत उतरविते, सोनगांवास मुलींची शाळा काढते व एक ' नवयुगीन विश्वकुटुंबी संस्था ' स्थापते : ' नाटक–कादंबऱ्यांना प्रेमाशिवाय विषयच नाही; राजकारणी पुरुषांना ' स्वराज्या ' शिवाय दुसरें कांहीं सुचत नाही, समाज-सुधारकांना विधवा-विवाह, स्त्रीशिक्षण, ब्राह्मण-ब्राह्मणेतर असलेच विषय सुचतात ! गरीब, महार-मांग, वडारी-डोंबारी यांची स्थिति कशी असेल, ही स्थिति अशी कां, ती कशी सुधारावयाची याचा कोणीच विचार करीत नाही, ' ह्या विचाराने बाळू व सुनंदा ह्यांच्या सारख्या बुद्धिमान, ध्येयनिष्ठ, तत्त्वशोधक तरुणांना ती आपल्या कार्यांत सहभागी करून घेते; केवळ त्यांचा आदर, त्यांचें प्रेम संपादून ती स्वतःला कृतार्थ समजत नाहीं; आपण पुनर्विवाह केल्यास आपल्या मुलींच्या शाळेच्या व ' नवयुगीन विश्वकुटुंब संस्थेच्या ' कार्याला जो लोकाश्रय मिळावयाला पाहिजे तो तितकासा मिळणार नाही, ह्या सुबुद्ध जाणिवेने ती बळवंतरावाबरोबर पुनर्विवाह करण्याचा आपला विचारहि शक्य तों वर मनावेगळा करिते; आपल्या कार्याबद्दल लोकांत पसरलेल्या गैरसमजाने चिडून, बिचकून वा बावरून न जातां ते दूर करण्याचा प्रयत्न करिते, व मग शेवटीं बळवंतरावांच्या ' बुद्धीच्या कुशाग्रतेला, स्वभावाच्या सरळपणाला, विनयाला, सत्यप्रियतेला, आणि प्रतिपक्षाच्या बोलण्याचा विपर्यास न करण्याविषयी मनांत वसत असलेल्या खऱ्या तत्परतेला, निराशेची छटा असलेल्या त्यांच्या रूपाला, बौद्धिक उच्चतेला, नैतिक आशावादाला, व उत्साहाला वश होऊन उभयतांनीं उभयतांना स्वीकारायचं, सांभाळायचं, उन्नतीच्या मार्गाला न्यायचं ' अशा नव्या ध्येयाने प्रेरित होऊन त्याच्याशीं म्हणजे खऱ्या पौरुषाशीं विवाहबद्ध होते.

सुशीलेच्या ह्या व्यक्तिचित्राकडे पाहिलें की हें वास्तवदर्शी नसून ध्येयदर्शी आहे असें वाटतें तें बरोबरच आहे; परंतु तें चित्रित असतांना सुशीलेसारखी नूतन ' स्त्री ' ही आपल्या सभोवती आजउद्या निर्माण होण्याचा संभव आहे ह्याबद्दलची निश्चितीहि लेखकाच्या अन्तर्मनांत खात्रीने वसत होती, हें उघड आहे. ह्या स्त्रीची स्वयंनिर्णायकशक्ति, तिचें कर्तृत्व, तिची लोकनायकी, तिची स्वतंत्रप्रज्ञा, तिची पुरुषाकडे पाहण्याची समंजस दृष्टी, इत्यादि गोष्टी त्यांच्या लक्षांत येऊं लागल्या होत्या. सुशीला ही स्त्रियांच्या समान हक्काबद्दल वादीच अभिनिवेशाने भांडतांना दिसत नाही, तिची ह्या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी अत्यंत विवेकपूर्ण अशी आहे. ती स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झगडत नसून मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे निर्माण झालेली जबाबदारी आपल्याला यथायोग्यपणें पार कशी पाडतां येईल ह्याचा विचार करितांना दिसत आहे : आपणांस मिळालेल्या आचारस्वातंत्र्याचा व विचारस्वातंत्र्याचा उपयोग सुबुद्ध, ध्येयप्रवण पुरुषांप्रमाणेच आपल्या समाजाचें, आपल्या बांधवांचें हित साधण्यासाठी कसा करितां येईल ह्याचा तिच्या मनाला घोर लागला आहे. सुशीला ही ह्या नव्या काळांतील समंजस, ध्येयवादी व कार्यप्रवण स्त्रीची प्रतिमा आहे.

## त्यागप्रिय सरला भोळे :

ह्याच शोधक दृष्टीने वामनरावांच्या इंदु काळे, सरला भोळे व ' आपण असे ध्येयनिष्ठ आहांत म्हणूनच माझी प्रेमाची एकनिष्ठा कायम राहिली ' असें नारायणराव पाठकास बजावणारी काशी ढवळे ह्या स्त्रियांची व्यक्तिचित्रें अवलोकिलीं तर काय दिसून येतें ? ह्या तिन्हीहि स्त्रिया १९२० ते ४० ह्या अलीकडील म्हणजे जवळजवळ आजच्या काळांतील आहेत. आजच्या पांढरपेशा वर्गातील सुसंस्कृत जीवनाचा ठसा त्यांपैकीं प्रत्येकीच्या व्यक्तित्वावर उमटलेला आहे : परंतु ह्याच नव्या समाजजीवनांतील कांहीं अत्यंत प्रभावी विचारांनी, वैशिष्ट्यांनी, आकांक्षांनी, आंदोलनांनी, त्यांच्या व्यक्तिजीवनांत वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न निर्माण केले आहेत. कांहींच्या बाबतींत विवाहाचा प्रश्न सुटलेला असला तर विवाहोत्तर जीवनाचा बिकट प्रश्न निर्माण होऊं पाहत आहे; ह्या नव्या सुशिक्षित स्त्रीवरची जबाबदारी प्रतिक्षणीं वाढत आहे, असेंच त्यांतून सूचित होत आहे. विनायकरावासारख्या

स्वार्थत्यागी देशसेवकाची पत्नी म्हणून सरला भोळे ही कष्ट उपसते आहे : दरिद्री व ध्येयप्रवण देशभक्ताची पत्नी व त्याच्या अपत्यांची माता ह्या दोन भूमिकांतून ती वावरते आहे; आपल्या पतीच्या समाजकार्यांत व देशकार्यांत त्याला प्रसन्न चित्ताने मदत करीत आहे : व त्याच्या मृत्यूनंतर त्याने सुरू केलेलें कार्य—' जनसेवेचें व्रत '—तसेंच नेटाने पुढें चालू ठेवण्यासाठी मोठ्या निर्धाराने पुढें पाऊल टाकीत आहे : सरलेचे हें धीरोदत्त व्यक्तिमत्व सुशीलेच्या व्यक्तिमत्वाइतकें झगझगीत नसेल, परंतु तें आकर्षक व हृद्य आहे, यांत संशय नाहीं. सुशीलेच्या व्यक्तिमत्वांत विद्युल्लतेची चमक असली तर सरलेच्या व्यक्तिमत्वांत नंदादीपाची स्निग्ध दीप्ति आहे. आपल्यावरील अनेक जबाबदाऱ्यांमधून ही सुजाण स्त्री आपला मार्ग आक्रमीत आहे. ह्या जबाबदारींची जाणीव व त्यांतून पार पडण्याइतकें बुद्धिबल आणि भावबलहि तिच्याजवळ आहे; ह्या दोन गोष्टींच्या जोरावरच ती आपल्या भोवतालच्या लोकांचें जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करीत आहे : ' सरलेला भोग अप्रिय नसला तरी जात्या ती त्यागप्रिय आहे. ' आपल्या प्रपंचाच्या अनेक अडचणी सोसूनहि ती काशी ढवळेच्या सुखाची व आपल्या भाऊ-भावजयीच्या संसाराची काळजी करीत आहे; पोरक्या अस्पृश्य चिंगीला पोटच्या मुलीप्रमाणे प्रतिपाळीत आहे व विनायकरावांच्या गैरहजेरींतच त्या पोरक्या मुलीचा विवाह जमवून देत आहे—सरलेच्या ह्या अबोल कर्तृत्वाकडे पाहिलें की ह्या ' नव्या स्त्री 'च्या ठिकाणी वामनरावांना केवढें जीवनसामर्थ्य दिसत होतें, तें लक्षांत येतें. जीवनांतील बहुविध दुष्कर कर्तव्यें पार पाडण्याच्या बाबतींत ही 'स्त्री' पुरुषाच्या बरोबरीनें पुढें येत आहे, असेंच वामनराव सूचित करीत आहेत. शेवटच्या पत्रांत भाऊ काळे लिहितो, " सरलेची एकंदर वृत्ति आणि तिची कर्तृत्वशक्ति पाहून आनंद होतो. लौकिक दृष्ट्या पाहिलें तर तिचें जीवित दुःखमयच गेलें व पुढेंहि तें तसेंच राहणार आहे. पण लौकिक दृष्टीहून उच्चतर अशी एक दृष्टी आहे. लौकिक दृष्ट्या ध्येयें म्हणजे दुःखें; पण ह्या दुःखांतच उच्च व सात्त्विक आनंद भरलेला आहे हें मार्मिकांना पटतें. " भाऊ काळ्यांनीं वर्णिलेल्या सात्त्विक आनंदाच्या मागे सरलेसारखी आजची ध्येयप्रवण स्त्री लागलेली आहे असेंच वामनरावांना दाखवावयाचें आहे.

**कलाप्रिय इंदु काळे :**

इंदु काळेचें व्यक्तिचित्र अवलोकित असतां मला नेहमी 'नलिनी' तील कमलेची आठवण होते, हें मीं मागेंच सूचित केलें आहे. नवीन शिक्षणाबरोबरच स्त्रीला आतां स्वातंत्र्य मिळालें आहे; पुरुषवर्गाकडून आदरयुक्त मान्यता प्राप्त झाली आहे; समाजजीवनाच्या औद्योगिक व ललितकलाविषयक निरनिराळ्या क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें स्वतंत्रपणें काम करण्याची त्यांच्यांत इच्छा उत्पन्नझाली आहे; ह्यांतूनच त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. व्यक्तिजीवन, कुटुंबजीवन ह्यासंबंधीचे आजचें वेगळे नाजूक प्रश्न जन्मास येत आहेत; ह्या प्रश्नांची जाणीव वामनरावांना होती : व म्हणूनच त्यांनी इंदु काळे निर्मिली : इंदु काळेला ललितकलांची–विशेषतः संगीताची व 'सुंदरतेची' आवड आहे; कलोपासनेला ती आपल्या इतर सामाजिक व कौटुम्बिक कर्तव्यांपेक्षाहि अधिक महत्त्व देत आहे : हें महत्त्व देत असतांना अर्थातच तिला कौटुम्बिक जीवनाचीं बंधनें पाळणें त्रासदायक होत आहे; कलोपासनेच्या ह्या वेडाने तिला भारलेलें आहे; त्याबरोबरच व्यक्तिस्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पनांनीहि पछाडलेलें आहे; अर्थात् ह्या दोन्हीहि कल्पना परस्परांना पूरक असल्यामुळें केवळ कलोपासनेसाठींच आपण आपल्या आचारस्वातंत्र्यावर बंधनें लादून घ्यावयाला तयार नाहीं, अशी ती आपल्या मनाची सोयीस्कर समजूत करून घेत आहे; स्वतःच्या सद्गुणांविषयी, चारित्र्याविषयी तिला विलक्षण आत्मविश्वास आहे; ती 'नटवी' आहे, भोगप्रिय आहे, अर्थात् संयम, समंजसपणा व विवेक तिच्याजवळ फारसा नाहीं; 'नैतिक तारेच्या सुराशीं कलेच्या तारेचा सूर जर जुळला नाही, तर जीविताची सतार बदसूर वाजूं लागेल आणि कोणालाच कांहीं आनंद व्हावयाचा नाही.' ह्याची तिला अधून मधून जाणीव होते, परंतु त्या जाणिवेनुसार तिच्याकडून आपल्या आचरणांत बदल होत नाही. The spirit is willing but the flesh is weak अशी तिची स्थिति आहे. "विवाहाबद्दलच्या जुन्या पुराण्या कल्पना मीं केव्हांच सोडल्या आहेत. पण पतीला फसविणें हें मी पाप समजतें. पति आवडेनासा झाल्यास घटस्फोट करणें हें पाप नव्हे, तर तें कर्तव्यकर्म मानतें," अशा प्रकारची भाषा ती वापरते. पण हें कर्तव्यकर्म आचरितांना जीं बंधनें अपरिहार्य असतात त्यांची तिला नीटशी जाणीव नाहीं.

वामनरावांनी इंदु काळे मार्फत ह्या नवीन स्त्रीच्याबाबत आज उद्भवणारे कला व नीति ह्यांच्या अन्योन्य संबंधाबाबतचे जे प्रश्न कथेतून विचारलेले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत : बायकांना स्वतःच्या कांहीं आवडी-नावडी नसाव्यात काय ? कलेच्या प्रेमाकरितां त्यांनी कलाकुशल लोकांशी परिचय केला तर तो वाईट काय ? कलावंत हा नेहमी वाईटच असतो काय ? आणि तो वाईट असला म्हणून त्याच्या कलेलाहि त्याच्या वाईटपणाचा विटाळ होतो काय ? हा विटाळ त्याच्याजवळ कला शिकणारांनाहि बाधक होतो काय ? आत्म्याची कलाविषयक जी भूक आहे ती लोकापवादाच्या भीतीने किंवा पतीला उगाच संशय येतो म्हणून दाबून टाकावी काय ? ह्या सर्वच प्रश्नांचीं उत्तरें वामनरावांनी ह्या कादंबरींतून दिलीं आहेत : त्यांचें सार म्हणजे " कलेकरितां थोडेंबहुत स्वातंत्र्य इष्ट आहे, पण नीतीचें 'ताल-तंत्र' संभाळलेंच पाहिजे. कलेची तहान भागविण्यासाठी नीतीच्या रक्ताचा घोट घेणें बरोबर नाही, " " 'कला' आणि 'कलि' हीं मनुष्याच्या ध्येयनिष्ठेचीं अपत्यें आहेत आणि कलेला स्वैरपणे वागूं दिल्यास तिच्या अंगीं कलीचे गुण येण्याचा संभव असतो " हेंच आहे.

## नवमतवादी विजया :

येथेंच मला वामनरावांच्या 'विस्तवाशीं खेळ' ह्या एकुलत्या एक नाटकाची आठवण होते; ह्याचें कारण तें नाटक असें आहे की तें त्यांतील अमृतराव, विभाकर ह्या बऱ्याचशा निष्क्रिय पुरुषपात्रांसाठी लक्षांत राहणार नाही. त्यांतील तंत्रदोषांमुळे व पुरातन पद्धतीच्या नाट्यशून्य रचनेमुळे नाटक म्हणूनहि रंगभूमीवर टिकणार नाही, व सदोष कथानकामुळें लक्षांतहि राहणार नाही. तें थोडेंफार लक्षांत राहिलें तर त्यांतील 'विजया' ह्या नवमतवादी स्त्रीच्या चित्रासाठीं व त्या चित्राच्या द्वारां वामनरावांनी थोड्याफार प्रमाणांत साधलेल्या समाजदर्शनासाठी; विजया ही आजची 'नवमतवादी' स्त्री आहे : 'स्वातंत्र्य तुम्ही कोण देणार ? मी जन्मतःच स्वतंत्र आहे आणि स्वतंत्रच राहणार,' 'सुशिक्षित बापांना देखील आपल्या मुली ताटाखालचीं मांजरं वाटतात. पण आतां तो काळ गेला. मी स्वतंत्र आहें; आणि स्वतंत्रपणे वागणार. कुठेहि पोटापुरतें मिळवून राहीन मी !' असें पुरुषांना व स्वतःच्या वडिलांना

बजावणारी, ' स्त्रीपुरुषांनी एकत्र बोलावं-चालावं, समाजाला भिऊं नये, विवाह-संस्थेची आतां जरुरी नाही ' असलीं मतें काळ, स्थळ व व्यक्ति लक्षांत न घेतां उतावीळपणे प्रतिपादणारी, परंतु स्वत्वाला जपणारी, स्वाभिमानी, निष्कपट, फटकळ, थोडीशी अविचारी अशी स्त्री आहे. आपण वेळी अवेळी प्रतिपादलेल्या बर्ट्रॅन्ड रसेलच्या मतांमुळे अडाणी नर्मदेच्या चरितावर किती अनिष्ट परिणाम झाला हें लक्षांत आल्यावर ' नवमतवादी बोलण्याचा निखारा एखादे वेळी अशी आग लावायचा, ही गोष्ट माझ्या ध्यानांत नाही आली... नवीन अनुभव आहे हा. विद्वानांनी अनेकदा सांगून जें पटलं नाही तें या एका अनुभवानं पटलं ' असें प्रांजलपणें कबूल करण्याइतका विवेक तिच्या जवळ आहे. चंद्रिका व नर्मदा ह्यांचीं चित्रें तिला पूरक आहेत. तिच्या व्यक्तिचित्रावरून वामनराव नवमतवादाच्या विरुद्ध होते किंवा आधुनिक नवमतवादी मंडळीच्या मतांचा विपर्यास करीत होते, असला ग्रह करून घेण्यापेक्षा नवमतवादाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण विवेकपूर्ण होता, एवढेंच लक्षांत घेणें समंजसपणाचें ठरतें. विजया हा इंदु काळेचीच परंतु समाजजीवनाच्या वेगळ्या क्षेत्रांतील उत्क्रान्त प्रतिमा आहे. तिचीं मतें म्हणजे आधुनिक स्त्रीने आधुनिक पुरुषाबरोबर पुढे टाकलेलीं पाऊलेंच आहेत : तीं योग्य मार्गावर पडतात की नाहीत हें वामनरावांसारखे विचारवंत पाहणारच.

रागिणी, उत्तरा, नलिनी, कमला सुशीला, सरला, इंदु व विजया ह्या आपल्या स्त्री-चित्रांच्या करवीं वामनरावांनी ह्या नवीन ' स्त्री 'चें दर्शन घडविलें आहे : त्या दर्शनाने रागिणीच्या वेळेचा वाचकवर्ग जसा आनंदला तसेच आज आपण सुखावत आहोंत : ह्या दर्शनांत एकाच वेळीं सहानुभाव आहे, कठोर सत्यदर्शन आहे, समंजसपणा आहे, भावी कालासंबंधी अपेक्षा आहेत, तसाच दुर्दम्य विश्वास आहे : आशावाद आहे व म्हणूनच तें दर्शन एवढें मनोवेधक उतरलें आहे.

## वामनरावांनी रेखाटलेलीं पुरुष-चित्रें :

आधुनिक 'स्त्री'च्या जीवनांतील गेल्या चाळीस वर्षांतील अनेक लहानमोठे प्रश्न ज्याप्रमाणे वामनरावांनीं आपल्या कादंबऱ्यांतून मोठ्या कौशल्याने चित्रित केले आहेत, त्याप्रमाणे ह्याच काळांतील महाराष्ट्रांतील सुशिक्षितपांढरपेशा पुरुषवर्गाच्या

जीवनांतील कांहीं महत्त्वाचे प्रश्नहि त्यांनी अत्यंत परिणामकारकपणे मांडलेले आहेत; वामनरावांकडून स्त्रियांचींच चित्रें रेखाटलीं गेलीं, पुरुषांचीं रेखाटलीं गेलीं नाहींत, अशा प्रकारचा वाद करण्यांत अर्थ नाही : त्यांत तथ्य असेल तर एवढेंच आहे की वामनरावांनी ह्या नवीन उदयास येणाऱ्या 'स्त्री'च्या जीवनाचें अत्यंत मार्मिक निरीक्षण केलेलें असल्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रें हीं अत्यंत प्रत्ययकारी उतरलीं व त्यांनी रसिकांचें जें चित्तहरण केलें त्यामुळेच त्यांचें त्यांच्या भोवतालील पुरुषवर्गाच्या चित्रांकडे त्या मानाने कमी लक्ष वेधलें गेलें; वामनरावांनी रेखाटलेली 'स्त्री' ही जितकी नवीन होती तितके त्यांनी रेखाटलेले 'पुरुष' नवीन नव्हते; हरिभाऊंपासून त्यांचीं चित्रें रेखाटलीं जात होतीं. त्यामुळे रसिकांच्या डोळयांत जितकी ही 'स्त्री' भरली तितके हे 'पुरुष' भरले नाहीत, यांत त्यांचा दोष नाही. व ह्याचा अर्थ वामनरावांकडून रेखाटलीं गेलेलीं पुरुष-वर्गाचीं चित्रें पुसट, अतिरंजित वा अप्रत्ययकारी होतीं असाहि नव्हे. तीं तितकींच आकर्षक आहेत असें मला वाटतें. हीं चित्रें समजावून घेणें म्हणजे गेल्या तीस-चाळीस वर्षांत धर्म, राजकारण व समाजकारण ह्या क्षेत्रांत महाराष्ट्रांत झालेल्या आंदोलनांचा इतिहास समजावून घेणें आहे. वामनरावांच्या कादंबऱ्यांतील सगळें राजकारण व समाजकारण ह्याच व्यक्तिचित्रांच्या द्वारा चित्रित झालें आहे. महाराष्ट्रांतील राजकारणांत व समाजकारणांत गेल्या दोनतीन पिढ्यांत झालेलीं आंदोलनें ह्याच व्यक्तिचित्रांच्या मार्फत वामनरावांनी ह्या कथांतून मुद्रित केलीं आहेत. 'रागिणीं'तील प्रागतिक मताचे 'अस्सल सुधारक' म्हणून गाजलेले नानासाहेब, थिऑसफीच्या वेडाने गृहत्याग करणारे भय्यासाहेब, मंगोपार्क, लिव्हिंग्स्टन, स्वेन हेडिन ह्यांच्यासारखे शोध लावून आपल्या देशाचें नांव त्रिखंडांत गाजावें, ह्या आज आपणांस विचित्र दिसणाऱ्या 'देशसेवेच्या व्रता'च्या दृष्टीने 'तरुण संन्यासी' ही संस्था स्थापूं पाहणारे आनंदराव, ह्या व्यक्ती नुकतेंच स्वदेशीचें वारें खेळूं लागलेल्या काळांतील कर्तृत्ववान् पुरुष-वर्गाच्या प्रातिनिधिक आहेत असें म्हणावयाला हरकत नाहीं. 'नलिनीं'तील सगळेंच वादळी वातावरण कर्झनशाहीच्या काळांतील म्हणजे इ. स. १९०६–७–८ मधील आहे. "कर्झनशाही ही देशहिताला घातुक झाली अशी कांहींची समजूत आहे. पण ही गोष्ट एका दृष्टीने खरी नव्हे. कर्झनशाही ही देशाभिमानाचा परिपोष करणारी वल्ली, स्वार्थत्यागाची आवश्यकता मनांत

बिंबेल अशा रीतीने शिकविणारी शाळा व स्वदेशप्रेमाची जननी होती. विदेश-द्वेषाने माखलेली व तें विष रक्तांत व हाडामासांत भिनविणारी अणकुचीदार नांगी किंवा गुप्त कट करण्याचा उन्माद उत्पन्न करणारी घातुक दारू असेंहि कर्झनशाहीचें लक्षण सांगतां येईल, " * ह्या शब्दांत वामनराव कर्झनशाहीचें वर्णन करितात. ह्याच वातावरणांत 'नलिनीं'तील स्त्री-पुरुष वावरत असल्यामुळे स्वाभाविकच गुप्तकटाच्या कपटनाट्यावर ह्या कादंबरीची उभारणी करण्यांत आली यांत नवल नाही. पोलिसखात्यांत नोकरी करणाऱ्या रंगरावाचें चित्र, हें सी. आय्. डी. तील मुख्याधिकारी डलहेड यांच्या 'सी. आय्. डी. तल्या हिंदी ऑफिसरांच्या डगला काढा म्हणजे तुम्हांला असंतुष्ट हिंदी जहाल लोक दिसतील,' ह्या विधानांतील अर्थ ध्यानांत घेऊन न्याहाळलें म्हणजे आपणांस त्या चित्रांत तत्कालीन परिस्थितीच्या वास्तव छटा दिसतील; रंगरावांना त्यांचे वडील आप्पासाहेब ह्यांनी मरतांना केलेला उपदेश, 'राजकीय गुन्ह्याचा तपास करण्याचें काम तुझ्याकडे आलं तर जपून वाग. सरकारशीं तर इमानाने वागच. पण लोकांना नाहक दुखवू नकोस. नाहीतर बंगाल्याप्रमाणे तुला प्राणाला मुकावं लागेल' हा लक्षांत घेतला म्हणजे तत्कालीन राजकीय चळवळीचें उग्र स्वरूप आपल्या डोळ्यापुढे उभें राहतें. रंगरावांनी केलेल्या राजकीय गुन्ह्याचें खरें स्वरूप कादंबरीच्या शेवटीं कळून येतें; एकंदर कादंबरीचें लेखन अनेक तंत्रदोषांनी डागाळलेलें असल्या-मुळे ह्या कथेंतील व्यक्तिचित्रें डोळ्यांत भरत नाहीत; परंतु तो विचार बाजूला ठेवला तर ज्वलज्जहाल रंगराव, स्वदेशी व्रताचें व बहिष्कार योगाचें यथाशक्ति अवलंब करणारा आणि देवगड बंदरांत आपल्या सोन्याच्या अांगठीवर कोणीहि आपणांस पैसे कर्जाऊ देत नाही असें पाहून 'राष्ट्रीय पक्षाच्या वृत्तीस अनुसरून स्वालंबनाची कास' धरणारा व फोनोग्राफ चालू करून 'पंधरा मिनि-टांत तीन आणे व एक हजामत फुकट' एवढें उत्पन्न गोळा करणारा, 'स्वदेश भक्तीने प्रेरित होऊन आम्ही जी जी गोष्ट करतों, ती ती तुम्ही (नेमस्त) क्षुद्र अर्थशास्त्राच्या धारवाडी काट्यांत कां जोखतां?' असें नेमस्ताभिमानी व जहाल-द्वेष्ट्या गोविंदरावांना व नलिनीला विचारणारा वसंतराव, आणि आपल्या मेहु-

* नलिनी. पानें २९-३०.

मराठी दा. क्र. ७३५०

ण्याने केलेल्या गुन्ह्याचें बालंट स्वतःवर खुषीने ओढवून घेऊन अज्ञातवास स्वीकारणारा व शेवटीं शेवटीं दारुण शिक्षाहि सोसावयास तयार असलेला विनायकराव— इत्यादि व्यक्तिचित्रें वामनरावांच्या पुढील कादंबऱ्यांतील चित्रांइतकीं कलादृष्ट्या जीवंत उतरलेलीं नसलीं, एवढेंच नव्हे तर तीं क्वचित् किंचित् बेडौल, किंचित् पुसट, किंचित् संदिग्ध अशीं उतरलेलीं असलीं व हास्यास्पद वाटत असलीं तरी तीं त्या काळांतील महाराष्ट्रांतील कर्तबगार पुरुषवर्गाच्या मनांतील विचारांचीं आंदोलनें स्पष्टपणें दाखवू शकतात असें मला वाटतें. ( वामनरावांची ' नलिनी ' ही कादंबरी आधुनिक तंत्रविशारदांच्या हातांत अत्यंत सुबक उतरली असती; त्यांच्या इतर कादंबऱ्यांतील व्यक्तींच्या मानाने ह्या कादंबरींतील स्त्रीपुरुष मानसिक व बौद्धिक दर्जाच्या दृष्टीने खालच्या पातळीवरचे असले तरी त्यामुळेच ते अधिक वास्तव वाटतात, व म्हणूनच त्यांचें चित्रण यथोचित कलात्मकतेने झालेलें नाही हें पाहून वाईट वाटतें. ' नलिनी ' ह्या कादंबरीचा शेवट काय झाला आहे ह्याचा मला नीटसा उलगडा होत नाही. ) ' नलिनीं ' तील वसंतराव, गोविंदराव, नलिनी यांजमध्ये झालेले वादविवाद तत्कालीन जहाल व मवाळ ह्या भिन्न पक्षांतील विचारसरणींचे आत्यंतिक अभिनिवेश व्यक्त करतात व ते वाचीत असतां आज आपणांस मोठी मौज वाटते. ' केसरीं ' तील आपल्या ' पक्षद्वेष आणि पक्षभेद ' ह्या लेखमालेंतून वामनरावांनी ह्या दोन्हीहि पक्षांच्या मतांचें अत्यंत प्रामाणिक दर्शन घडविलेलें असल्यामुळे त्याच्या प्रकाशांत माझ्यासारख्या तत्कालिन राजकारणाच्या अल्पपरिचितांना त्यांची मौज विशेष गोडीने चाखतां येते.

## सुशीलेची प्रभावळ :

जहाल व मवाळ ह्यांच्यांतील असल्याच वादांची मौज आपणांस ' सुशीले ' च्या देवांतील पहिल्या आठदहा प्रकरणांतून पहावयास मिळतेः राजकारण व समाजसुधारणा ह्या दोन्हीहि बाबतींत जहाल असलेले सुशीलेचे वडील विनायकराव, राष्ट्रीय पक्षाचे बाणेदार अभिमानी असलेले बाळूचे वडील विश्वासराव, व स्पेन्सरच्या विकासवादाचा सिद्धांत वेळी अवेळी प्रतिपादणारे व तदनुसार वर्तन करणारे नेमस्ताग्रणी गिरिधरराव ह्यांच्यामधील वादविवाद जसे तत्कालीन राजकारणाची व समाजकारणाची

परिस्थिति दर्शविणारे आहेत, तसेच व्यक्तिदर्शनात्मकहि आहेत; त्यामुळेच ते इतके कादंबरीशी एकजीव झाल्यासारखे वाटतात. विनायकराव, विश्वासराव व गिरिधरपंत ह्या तिघांचींहि व्यक्तिचित्रें लेखकाने अत्यंत सूचक छटांनी रेखाटलेलीं आहेत; व ह्या तिघांच्याहि द्वारा तत्कालीन सुशिक्षित व कर्तबगार पुरुषवर्गांत कोणत्या नव्या विचारांचें वारें वाहत होतें हें सूचित केलें आहे. 'सुशीलेचा देव' ह्या कादंबरींत सुशीला, बाळू, सुनंदा व रावबा ह्या व्यक्तींच्या मानाने विनायकराव, विश्वासराव व गिरिधरपंत ह्यांना कमी महत्त्व असलें तरी त्यांचें व्यक्तिचित्रण अत्यंत मार्मिकपणें झालेलें असल्यामुळे तें प्रत्ययकारी वठलें आहे. हे तिघेहि टिळक-गोखल्यांच्या वेळच्या सुशिक्षित महाराष्ट्रीयांचे हलते बोलते जीवंत प्रतिनिधी आहेत असेंच वाटतें. आपल्या 'नीतिशास्त्रप्रवेशांत' वामनरावांनी स्पेन्सरचा विकासवाद चिकित्सेने पारखून त्यांत तथ्यांश कितपत आहे हें सप्रमाण दाखवून दिलें आहे; ह्या विकासवादांतून उत्क्रान्त झालेला जडवाद व सुखवाद आगरकरांच्या शिकवणुकींत आढळत नसला तरी कांहीं सुधारकाग्रणींकडून त्या काळीं त्याचा विचार केला जात होता असें दिसतें. 'सुशीलेच्या देवा'तील गिरिधरपंत व रावबा ह्या दोन व्यक्तिचित्रांच्या मार्फत वामनरावांनी ह्या मतांच्या अनुयायांच्या जीवनाची शोकात्मिका रंगविली आहे. आपल्या म्हाताऱ्या आईबापांनाहि 'स्वाभाविक शिक्षा' करूं पाहणारा व त्याग हा भोगाचाच एक प्रकार आहे असें आस्थापूर्वक प्रतिपादणारा रायबा हा ह्या शोकात्मिकेचा मुख्य नायक आहे, परंतु सुशीलेच्या मनाच्या विकासाच्या दृष्टीने रायबाचें ह्या कादंबरींतील स्थान महत्त्वाचें असलें व त्याचें व्यक्तिचित्र कलादृष्ट्या अत्यन्त उठावदार झालेलें असलें तरी गांधीयुगांतील नव्या काळाचे प्रतिनिधी ह्या दृष्टींनी सुशीलेशेजारी उभे राहण्याचा मान बाळू व सुनंदा ह्यांचाच आहे. बळवंतराव स्थितप्रज्ञ, समतोल विचाराचा, कोणत्याहि प्रकारच्या पक्षाभिनिवेशाचा कंटाळा असलेला असा आहे. (जहाल मवाळांतील वादांना कंटाळूनच तर हे नवे तरुण तयार होत नव्हते ना ?) हिंदु मुसलमानांच्या तंट्याचे वेळी आपल्या समान धर्मियांचें मन दुखवून सत्यनिर्णय देण्याइतकें नैतिक बल त्याचे ठिकाणीं आहे, कोणत्याहि दोन पक्षांत सलोखा घडवून आणून सत्याची बाजू अधिक समर्पकपणे मांडली जाईल अशा प्रकारची मोहक, विवेकशक्ति त्याचे ठिकाणीं आहे.

'सुशीलेच्या देवाचे' एक टीकाकार सुनंदरावांच्या चित्रांत वामनरावांचें व्यक्तिचित्र पाहण्याचा प्रयत्न करतात; त्याच दृष्टीने विचार करतां मला बळवंतरावांच्या व्यक्तिचित्रांत देखील वामनरावांच्या व्यक्तिमत्वाच्या कांहीं थोड्याथोडक्या छटा उमटलेल्या नाहीत असें वाटतें. अर्थात् राष्ट्रीय पक्षाचा अभिमानी सुनंदराव हा निरभिमानता, त्याग, उच्च आकांक्षा, परहितदक्षता, इत्यादि गुणांचा पुतळाच आहे. कसल्याहि प्रकारच्या संकटांत आपली वृत्ति प्रसन्न ठेवण्याची कला त्याला साध्य झालेली असल्यामुळेच स्वतःच्या दोन्हीहि मुलांचा प्लेगने झालेला मृत्यु तो स्थिरचित्ताने पाहूं शकतो; व त्यानंतर हसू खेळूंहि शकतो. स्वसुखापेक्षा परसुखलाभांतच त्याला खरोखर परोपरीचा आनंद मिळतो. स्वदेशाकरितां, स्वबांधवांकरितां, व विशिष्ट ध्येयाच्या साधनेकरितां सुनंदासारख्या कित्येक बुद्धिमान् तरुणांनी केलेला अबोल स्वार्थत्याग गेल्या वीसपंचवीस वर्षांतील आपल्या देशाच्या राजकीय इतिहासांत फारसा नमूद झालेला नसला तरी त्याची जाणीव तुम्हाआम्हांला चांगलीच आहे.

**बुद्धिमान् वेडे :**

ह्याच विशिष्ट ध्येयांनी प्रेरित झालेल्या महाराष्ट्रांतील नव्या पिढींतील बुद्धिमान् वेड्यांचीं चित्रें वामनरावांनी आपल्या 'इंदु काळे व सरला भोळे' ह्या नितान्त मधुर कथेंत रेखाटलीं आहेत. वामनराव हे स्त्रियांइतकींच पुरुषांचींहि व्यक्तिचित्रें अत्यंत परिणामकारकपणे रंगवूं शकत याचें हें प्रत्यंतर आहे. ह्या कथेंतील इंदु काळे व सरला भोळे ह्या दोन व्यक्तिचित्रांइतकींच, किंबहुना त्यांपेक्षाहि अधिकच उठावदार अशीं विनायकराव भोळे व नारायणराव पाठक यांचीं व्यक्तिचित्रें आहेत. देशभक्ति व संसार ह्या विरोधी द्वंद्वांतून मार्ग काढण्याचा प्रश्न वामनरावांच्या कादंबऱ्यांतील अनेक व्यक्तींपुढे पडलेला आहे, परंतु विनायकराव भोळे ह्यांच्यापुढे पडलेल्या ह्या प्रश्नाचें स्वरूप थोडेसें वेगळें आहे. 'पतीकरितां तुम्हांला ध्येय सोडण्यास सांगतों आणि स्वतः पत्नीकरितां आपलें ध्येय सोडण्यास मी तयार नाही,' असें विनायकराव इंदु काळेला लिहितात. इतरांच्याबाबत हा प्रश्न त्यांच्या प्रेमविवाहांच्या पूर्वी व विशेषतः विवाहासंबंधीच उपस्थित झाला आहे व असतो; त्यामुळे त्यामध्ये रम्याद्भुततेचाच भाग अधिक असतो. विनायकरावांच्या पुढील प्रश्नांत रम्या-

द्भुततेचा भाग ( Romantic ) फार कमी असून कठोर वास्तवाचाच भाग अधिक आहे व म्हणूनच त्याचें चित्रण करितांना वामनरावांनी जें कौशल्य दाखविलें आहे तें वाखाणण्याजोगें आहे. विनायकराव भोळे ह्यांचे ठिकाणीं सुनंदरावांचे सगळे गुण असून शिवाय बळवंतरांवाच्या ठिकाणी असलेला मनाचा समतोलपणा आहे. स्वतःला गांधीवादाला संपूर्णपणे वाहून घेतलेला हा गृहस्थ ' टिळक, गोखले तसेच गांधी आणि केळकर हे एकमेकांना पूरक आहेत. पूर्वी टिळक-गोखले युगांत टिळक जहाल झाले म्हणून गोखल्यांना सरकार विचारूं लागलं. आतां गांधी जहाल झाल्यामुळे केळकर पक्षाला सरकार जवळ करील आणि त्याचं समाधान करण्याचा प्रयत्न करील. देशाचा यांत फायदा नाहीं का ? ' असेंहि विचारायला व समजायला कमी करीत नाही. आपण अंगिकारलेलें व आपणांस पटलेलें जनसेवेचें कोणतेंहि व्रत सतत चालू ठेवावयाचें हाच त्याचा बाणा आहे. ह्या कादंबरींतील सगळ्या स्त्रीपुरुषांना विनायकरावांबद्दल कमालीचा आदर आहे. ही सगळीच मंडळी आपलीं सुखदुःखें, आपल्या अडीअडचणी मन मोकळें करून त्यांचेजवळ सांगतांना दिसतात व तेहि समतोल, निराग्रही, सत्यान्वेषी व समंजस दृष्टीनें त्यांच्या शंकांचें, अडचणींचें निराकरण करितांना आढळतात. बळवंतरावांप्रमाणे विनायकरावांच्या तोंडवळयाचेंहि वामनरावांच्या तोंडवळयाशीं साम्य आहे. विनायकरावांचें व्यक्तिचित्र म्हणजे एका थोर महात्म्याचें व्यक्तिचित्र आहे असेंच पुस्तक खाली ठेवतांना वाटतें.

ह्याच कथेंतील, कंत्राटाच्या धंद्यांत अपार पैसे मिळवीत असतां गृहसुखास मुकू पाहणाऱ्या भाऊसाहेब काळ्यांचें चित्र आजच्या व्यवहारयुगांत परिचित भासत असलें तरी नारायणराव पाठक ह्यांच्या व्यक्तिचित्राइतकें तें आकर्षक वाटत नाही; ह्याचें कारण म्हणजे नारायणराव पाठक ह्या व्यक्तीचें विशिष्ट व्यक्तिमत्व हेंच असावें. बालमैत्रिण काशी ढवळे हिच्याशीं मनांतून विवाहबद्ध होऊं इच्छिणारा परंतु इतिहाससंशोधनाच्या वेडाने तो विचार मनाबाहेर ढकलणारा हा निग्रही ध्येयवादी पाहून जरी प्रो. पंगूंप्रमाणे कांहींना एखाद्या विशिष्ट व्यक्तीची आठवण होत असली तरी जीवन व कला ह्या दोन्हीहि दृष्टींनी अत्यंत उठावदार झालेलें त्याचें व्यक्तिचित्र हें डोळ्यांत भरल्याखेरीज राहत नाहीं; मनाचा कोवळा, वृत्तीचा निग्रही,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रमांक २३६७५ दि. ५८
क्रमांक ... नों. दि.

बुद्धीने तीव्र व चारित्र्याने शुद्ध असा हा इतिहाससंशोधनाच्या नादाने शुद्धबुद्ध विसरलेला ध्येयवादी शेवटीं विनायकरावांच्या सदुपदेशानें म्हणा वा काशी ढवळेविषयीच्या दुर्दम्य आकर्षणाने म्हणा मतान्तर करावयास तयार होतो, परंतु तेवढ्यांतच 'आशावृक्ष जळून जातात;' काशी ढवळेचा अंत होतो व परत 'श्रेष्ठ धारिष्ट' अंगिकारून नारायणराव आपल्या कार्याला लागतात. केवढें ध्येयवादित्व हें !

टिळक-गोखले युगांतील तीसचाळीस वर्षांत महाराष्ट्रांत झालेल्या वैचारिक आंदोलनांचे पडसाद वामनरावांच्या ह्या व्यक्तिचित्रांतून उमटलेले असले तरी त्यांच्या ह्या पुरुषवर्गाच्या चित्रांतील अत्यंत ठळक व उठावदार चित्रें हीं गांधीयुगांतील बळवंतराव, सुनंदराव, विनायकराव, ह्यांचींच आहेत. आनंदराव, विश्वासराव, गिरिधरराव, विनायकराव ( सुशीलेचे वडील ) ह्या अगोदरच्या पिढींतील व्यक्तिचित्रांची प्रभावळ त्यांना लाभलेली असल्यामुळें त्यांचें व्यक्तिमत्व विशेष उमटून दिसतें हें खरें; परंतु वामनरावांसारख्या सत्य, सौजन्य व सौंदर्य यांच्या चहात्याला आकर्षित करण्यासारखें ध्येयवादित्व व कर्तृत्व ह्या नवीनांमध्येच अधिक दिसत आहे; व म्हणूनच त्यांचीं त्यांच्या हातचीं चित्रें इतकीं परिणामकारक उतरलीं आहेत.

वामनरावांच्या पुरुषचित्रांची प्रभावळ अशा ध्येयप्रवण, सरळ मनाच्या, त्यागप्रिय, बुद्धिमान्, व विवेकशील सद्गृहस्थांची व महात्म्यांचीच बनलेली आहे. नानासाहेब, भाऊसाहेब, ह्यांच्या सारखे समंजस तत्त्वजिज्ञासू, भय्यासाहेबांसारखे धर्मजिज्ञासू, आनंदराव, वसंतराव, रंगराव ह्यांच्यासारखे देशभक्तीच्या विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेले साहसप्रिय तरुण, गिरिधरराव, रावबा ह्यांच्यासारखे निष्कपट असे केवळ बुद्धिवादी, बळवंतरावासारखे विवेकवादी, व विनायकराव, सुनंदराव, नारायणराव पाठक ह्यांच्यासारखे त्यागप्रिय ध्येयवादी हीं ह्या प्रभावळींतील रत्नें आहेत. त्यांपैकीं अनेकांत वामनरावांच्या त्यागप्रिय आणि विवेकशील अशा व्यक्तिमत्वाच्याच अनेक छटा उमटलेल्या असल्यामुळे त्यांचें दर्शन अत्यंत हृद्य झालें आहे. महाराष्ट्रांतील तीसचाळीस वर्षांतील वेगवेगळ्या विचारप्रवाहांचे, आंदोलनांचे, स्थित्यंतरांचे साद पडसाद त्यांच्या जीवनप्रवाहांतून उमटत आहेत; ते इतके स्पष्ट आहेत की ह्या कथांचें सहज परिशीलन करणाऱ्याच्या कानावरहि ते सहज पडतील.

**आश्रमहरिणी :**

वामनरावांच्या वाङ्मय-सृष्टींतील स्त्री पुरुषांचें हें ओझरतें दर्शन घडवून आणतांना मीं वाङ्मयप्रेमी रसिकांच्या आवडत्या 'आश्रमहरिणी'चा * उल्लेखहि केला नाही ह्याचें कारण उघड आहे; वामनरावांच्या इतर कादंबऱ्यांपेक्षां 'आश्रमहरिणीचें' वातावरणच वेगळें आहे. धौम्याबरोबर त्यांतील आश्रमजीवनाची ओळख करून घेत असतां आपण एकाच वेळीं कालिदासाच्या 'शाकुन्तला'चा व शेक्सपियरच्या A Mid-summer Night's Dream चा आस्वाद घेत आहोंत असें वाटतें. त्यांत काव्य आहे; तत्त्वज्ञान आहे; कल्पनासौंदर्य आहे; रम्याद्भुतता आहे; तितकाच वास्तवाचा भाग आहे; अशा प्रकारच्या रम्य कल्पनाधूसर वातावरणांत वावरणारे ह्या कथेंतील गभस्तिगति, सुलोचना, धौम्य, 'पूर्णप्रज्ञ' कुलपति हे स्त्रीपुरुष त्यांच्यांतील पावित्र्यामुळे, शुद्ध धर्मभावनेमुळे, सात्त्विकतेमुळे,

---

* 'आश्रमहरिणीं'तील कांही घटनांची कल्पना वामनरावांना Enoch Arden वरून सुचली असें जें ह्या कादंबरीच्या अनेक टीकाकारांचें म्हणणें आहे त्यांत ग्राह्यांश बराच आहे; तो वामनराव कबूल करतात. 'आश्रमहरिणीं'-तील पोथीची कल्पना आपल्याला प्रो. बेन ह्यांच्या तत्समान कल्पनेवर आधारलेल्या लघुकादंबऱ्यांवरून सुचलेली असण्याचा संभव आहे, असें वामनराव 'मी आणि माझीं पुस्तकें' ह्या भाषणांत म्हणतात.

'आश्रमहरिणी'च्या प्रथम प्रकाशनांत गभस्तिगति व सुलोचना ह्यांचा सर्पदंशाने अकल्पितपणे मृत्यु होतो असें शेवटीं दाखवून वामनरावांनी द्विपतिकत्वाचा प्रश्न टाळलेला आहे; परंतु पुढील आवृत्तींत हा आकस्मिक मृत्युप्रसंग गाळलेला असून धौम्य व गभस्तिगति दोघेहि सुलोचनेबरोबर आनंदाने आपलें उर्वरित आयुष्य घालवितात, असें दाखविलें आहे. वामनरावांनी पुढील आवृत्तींत हा जो धिटाईने बदल केला, तो प्रथम प्रकाशनाचेच वेळीं कां केला नाही, असा प्रश्न विचारतां येण्यासारखा आहे; परंतु पुढील आवृत्तींत तरी वाचकांच्या रूढ कल्पनांना जबरदस्त धक्का देणारा असा हा बदल कादंबरीच्या संविधानकांत वामनरावांनी केला यांत त्यांचें मनोधैर्य थोडेथोडकें प्रगट झालें, असें नाही.

जितके आपणापासून वेगळे भासतात तितकेच त्यांचे ठिकाणीं असलेल्या मनुष्यसुलभ विकारांमुळे, लहानमोठ्या भावगुणांमुळे ते आपणांस जवळचे वाटतात : वामनरावांनी त्यांच्या मार्फत आपल्या काळांतील कांही समाजप्रश्नांवर प्रकाश टाकलेला असला तरी ते स्त्रीपुरुष कथेंतील दूरस्थ वातावरणामुळे वामनरावांच्या वाङ्मयसृष्टींतील इतर स्त्रीपुरुषांजवळ बसूं शकत नाहींत : ते त्यांच्यापेक्षा अधिक काव्यमय, अधिक कोमल, अधिक कल्पनारम्य थोडेसे वेगळयाच जगांतील भासतात : सुलोचनेची निर्व्याजता व तिचें सरलत्व, गभस्तिगतीचीं सात्त्विकता, निग्रही वृत्ति व त्यागप्रियता; धौम्याची विनोदप्रियता, उल्हासवृत्ति, त्याचें बुद्धितेज आणि धाडस व ह्या सर्वांचीं भावसुलभ अन्तःकरणें ह्यांचा वाचकांच्या मनावर होणारा परिणाम सूक्ष्मकोमल असतो : त्यापासून निर्माण होणाऱ्या भावनांना शारीरिक विचारविकारांचा स्पर्शहि नसतो. 'गभस्तिगति हा तिला सूर्यासारखा वंदनीय होता; पण मी तिला चंद्रासारखा कमनीय अथवा रमणीय वाटत होतों' असें आपलें व आपल्या मित्राचें वर्णन करणारा धौम्य त्याच्या मनुष्यसुलभ विकारवशतेमुळे आपणांस अधिकच आवडतो : ह्या विकारवशतेमुळेच कुलपतीबरोबर त्याने शेवटीं घातलेला वाद व त्या वादाचे शेवटीं 'गुरुजी, क्षुद्र अहंकार मीं आजपासून सोडला. जगांत अहेतुक उच्च सात्विक प्रेम आहे, हें मी आज सिद्ध करून दाखविणार' असे त्याने काढलेले उद्गार त्याच्याबद्दल विलक्षण आत्मीयता आपले ठिकाणीं निर्माण करतात. सुलोचनेबरोबर आपण व गभस्तिगतीने केलेला उत्तरकाळांतील संसार नुसता सुखाचाच नव्हे तर आत्मोन्नतिकारक झाला असें तो सांगतो; व धौम्य व गभस्तिगति ह्यांच्या उदात्त व्यक्तिचित्रांच्या आपल्या मनांत ज्या प्रतिमा उमटलेल्या असतात, त्यांच्या अनुरोधाने आपणांसहि तें खरेंच वाटतें. परंतु 'जें झालें तें अपवादात्मक खरें, पण सृष्टीक्रमाला अनुसरून झालें. आमचें अनुकरण इतरांनीं करावें किंवा नाही हें मी काय सांगूं? द्विपतिकत्वाचें अनुकरण न केलेलें बरें, पण पुनर्विवाहाबद्दल मी निश्चित सांगूं शकेन की पुष्कळ वेळां तो आत्मोन्नतिकारक होऊं शकेल' ह्या शब्दांत धौम्य आपल्या आत्मकथेचा शेवट करतो : १५।१६ सालांतील ह्या कथेच्या वाचनांत रंगून गेलेल्या मराठी वाचकांना तरी वामनरावांना ह्यापेक्षां काय वेगळें सांगावयाचें होतें ?

### वामनरावांचीं बालचित्रें :

परंतु ह्या कादंबरींतून वामनरावांनी कांही शिकवणूक दिलेली असो वा नसो व ती अत्यंत परिणामकारक उतरलेली असो वा नसो, ही कथा वाचकांच्या जी वर्षानुवर्षें लक्षांत राहील ती तिच्यांतील काव्यमय, सात्त्विक, कल्पनामधुर व उदात्त वातावरणासाठी : ह्या कथेची स्मृति मनांत येतांच तें अत्यंत सुखद असें आश्रमाचें पवित्र वातावरण डोळ्यापुढें उभें राहतें : ते पूर्णप्रज्ञ ऋषि, ते धौम्याचे सवंगडी, तो ध्येयवादी सत्याग्रही गभस्तिगति, ते अंध जरत्कारु ऋषि, ती आश्रमहरिणी सुलोचना, ते त्यांचे रम्य विहार, खेळ, कृतनिश्चय— ह्यांचीं कल्पनाचित्रें मनांत येऊन आपणांस विलक्षण आनंद होतो. येथे जातां जातांच एक विचार सुचला तो लिहितों. वामनरावांना इतर प्रसंगवर्णनें फारशीं जमत नसलीं तरी लहान मुलांच्या क्रीडांचीं, रुसव्याफुगव्यांचीं, संभाषणप्रसंगांचीं वर्णनें त्यांना फारच उत्तम साधत असत, असें ' आश्रमहरिणीं 'तील ' दुर्ललितशैशव ' व ' बालतपोनिश्चय ' ह्या दोन प्रकरणांवरून व ' सुशीलेच्या देवां 'तील बाल-सुशीला, बाळू, सुनंदा, गवबा ह्यांच्या बालपणांतील लीलांच्या वर्णनांवरून वाटतें : ' सुशीलेच्या देवां 'तील मारुतीच्या देवळांतील पत्ते खेळण्याचा प्रसंग व क्रिकेटवरून गवबा, सुनंदा व बाळू यांत झालेल्या भांडणाचा प्रसंग हे दोन प्रसंग माझ्या सहज ध्यानांत येतात. हे प्रसंग मी कधींच विसरणार नाहीं. हीं वर्णनें वामनरावांना इतकीं कशीं साधत असत ह्यासंबंधी विचार करूं जातां असें दिसतें की एक तर वामनरावांची वृत्ति बालकांच्या क्रीडांत सहज रंगून जाणारी अशी होती व दुसरें म्हणजे वामनराव हे स्वतःच जन्मजात खेळाडू होते : व्यापक सहानुभूति, निरभिमानता, प्रसन्नता, इत्यादि त्यांच्या स्वभावांतील विशेष त्यांच्या ह्या वृत्तीला पूरक होते. वामनरावांचे चरित्रकारहि, तात्या लहान मुलांच्या मेळ्यांत स्वतःला कसे विसरून जात ह्याचें वर्णन करितात, त्यावरून ह्या प्रसंगदर्शनांची उपपत्ति लागूं शकते.

### वामनरावांची व्यक्तिदर्शनाची पद्धत :

वामनरावांच्या कादंबऱ्यांतील ह्या स्त्रीपुरुषांची ओळख करुन घेत असतांना स्वाभाविकच वामनराव ह्या स्त्रीपुरुषांचें आपल्या कथाद्वारा व्यक्तिदर्शन कसें साधीत असत तें पाहणें अगत्याचें ठरतें. ह्या संबंधांत वामनरावांनी स्वतः

काय उद्गार काढलेले आहेत ते आपण प्रथम पाहूं; आपल्याला व्यक्तीच्या पोषाखाचें, चेहऱ्याचें, हस्तक्षेपादि अवयवव्यापारांचें वर्णन साधत नाही हें ते प्रांजलपणें कबूल करितात व पुढें लिहितात:* "माझं लक्ष बाह्य पोषाखादि गोष्टींपेक्षां आंतर व्यापारांकडे अधिक आहे. म्हणून हे व्यापार माझ्या ध्यानांत येतात व राहतात. अर्थात् त्यांचें वर्णन मी करूं शकतों, आणि वर्णन जेथे चांगलं साधलेलं असतं तेथे वाचकांना बाह्य वर्णनाची उणीव फारशी भासत नाही. किंबहुना ज्याला त्याला आपल्या कल्पनेप्रमाणे मनश्चित्रें रंगविण्याची संधि मिळते..........कादंबरी लिहितां लिहितांच मला त्या त्या पात्राचं चित्र अधिकाधिक स्पष्ट आणि निश्चित होऊं लागतं. लिहितां लिहितांच त्याला मूर्त आणि सजीव रूप येतं. आधी अस्पष्ट आणि अमूर्त कल्पनाच असतात. मीं विशिष्ट व्यक्ति पाहून पात्रें कल्पिलेलीं नाहीत (याला दोनतीनच अपवाद आहेत.). माझीं बहुतेक पात्रें कल्पनानिर्मित आहेत आणि तीं थोडीशीं प्रतीकें आहेत...लिहितां लिहितां हे प्रतीकात्मक स्वरूप जाऊन त्यांना व्यक्तिमत्व व जीवंतपणा येऊं लागतो" लेखनाच्या आपल्या ह्या पद्धतीला वामनराव सदोष समजतात पण पुढे कबूल करितात: "पण तीमुळें एक फायदा असा होतो की, आधीच केलेल्या आराखड्याच्या चौकोनी मर्यादेचीं बंधनें नसल्यामुळे कल्पनाशक्तीचं तारू जिकडे जाईल तिकडे त्याला जातां येतं, आणि कित्येक वेळा तें भरमसाट भटकलें तरी कित्येक वेळा स्वैर गतीमुळे अकल्पित सौंदर्यस्थळें त्याच्या नजरेस पडतात." एवढें सगळें सांगून देखील "कांहीं म्हटलें तरी माझी पद्धति सदोष आहे हें अर्थात् मी कबूल करितों," असें ते शेवटीं लिहितातच.

वामनरावांची व्यक्तिदर्शनाची ही पद्धत सदोष आहे कीं नाहीं हें पाहण्यापूर्वी तिचें स्वरूप काय होतें हें त्यांच्या वरील विवेचनाच्या व त्यांनीं रेखाटलेल्या प्रत्यक्ष व्यक्तिचित्रांच्या स्वरूपाचा विचार करून समजावून घेण्याचा प्रयत्न करू. आपल्याला पोषाखाचीं, चेहरेपट्टीचीं, हस्तपादादि अवयव व्यापारांचीं वर्णनें साधत नाहीत असें वामनराव म्हणतात, व आपलाहि अनुभव हाच आहे की त्यांनीं निर्मिलेले स्त्रीपुरुष आपल्या ध्यानांत

* विचारलहरी : मी व माझीं पुस्तकें : पृष्ठ ४२

जे राहिले आहेत ते त्यांच्या बाह्यरूपांतील वैशिष्ट्यांमुळे राहिलेले नसून त्यांच्यांतील अंतर्गुणांच्या प्रतितीनेच राहिलेले आहेत. उत्तरा म्हटली की ' धनुष्याकृति भिवयांसारख्या ' एकाद्या विशिष्ट प्रकारच्या रूपवैशिष्ट्यानें ओळखली जाणारी एक स्त्री म्हणून डोळ्यांपुढे न येतां विशिष्ट अंतर्गुणांनी संपन्न अशी स्त्री म्हणूनच आपल्या डोळ्यापुढे येते. बळवंतराव सुनंदराव, सुशीला ह्यांच्या शरीराकृतींचा तपशील आपणांस वामनरावांच्या कादंबऱ्यांत कोठेहि फारसा सांपडत नाही; परंतु त्याबरोबरच तो सांपडत नसल्यामुळे त्यांचीं चित्रें यथार्थपणे डोळ्यांपुढें येत नाहीत, लक्षांत राहत नाहीत किंवा जाणवत नाहीत असेंहि नाही : नांव काढतांच तीं चित्रें व त्याबरोबरच ते स्त्रीपुरुष आपल्या डोळयांपुढे तरळूं लागतात : त्यांचें बाह्यरूप कसें असावें ह्या संबंधी आपलें मन आपल्यापुरतें सुसंबद्धपणें तर्क करूं शकतें, जणू काय वामनरावांच्या प्रतिभेने त्यांच्यांतील सत्त्व तेवढें आपल्या स्वाधीन केलेलें असतें : त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आपल्याला खरी खुरी जाणीव करून दिलेली असते : त्याचीं वैशिष्टें तेवढीं आपल्या ध्यानांत आणून दिलेलीं असतात; त्यांच्यांतील ' तत्त्वाचें ' आपणांस दर्शन घडविलेलें असतें व म्हणून त्यावरील आवरणाची, शरिराची, बाह्यरूपाची. आकाराची, त्यांच्या हालचालींतील विशिष्ट लकबींची आवश्यकता, त्यांचीं ओळख करून घेण्यासाठी आपणास वाटेनाशी होते. जें विकारी व नाशवन्त आहे त्याकडे दुर्लक्ष करून जें अविकारी व शाश्वत आहे त्याचेंच तेवढें नेमकें दर्शन घडवून आणलेलें असल्यामुळे त्यांत आकृति, रंग, रूपादि गौण गोष्टींची भर आपली कल्पकता सहज घालूं शकते. व्यक्तींतील शाश्वत, विश्वात्मक गोष्टींवर नेमका प्रकाश टाकून तिच्या सत्त्वांचें—तिच्या व्यक्तित्वाचें दर्शन घडवून आणणें त्यांच्या प्रतिभेला जमतें असें दिसतें. अशा प्रकारच्या प्रतिभेला interpretative imagination हें नांव वाङ्मयविवेचक देतात : आपण तिला निरूपणात्मक कल्पनाशक्ति असें म्हणूं.

## निरूपणात्मक कल्पनाशक्ति :

ही निरूपणात्मक कल्पनाशक्ति म्हणजे एक प्रकारची कलात्मक ज्ञानदृष्टीच. ही प्रत्यक्ष वस्तूचें खरेंखुरें आत्मरूप व्यक्त करून तिचीं अंतिम मूल्यें स्पष्ट करीत असते. वर्डस्वर्थच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ती वस्तुमात्राच्या

ठिकाणीं असलेल्या परमतत्त्वांचा शोध घेते ( it sees into the life of things ) : ती वस्तुमात्राचीं अंतिम मूल्यें, तत्त्वें, अर्थ लक्षांत घेते व त्यांच्या ज्या अंगांमध्यें वा व्यवहारांमध्यें हीं आत्मिक मूल्यें वास्तव्य करीत असतात, त्यांचेंच तेवढें दर्शन घडवून त्यांच्या द्वारा त्या वस्तूमात्रांचें खरें खुरें दर्शन घडविते. ही कल्पनाशक्ति ज्या कलावन्ताचे ठिकाणीं असते, तो निसर्गव्यवहारांकडे, मनुष्यव्यवहारांकडे, माणसांच्या मनोघटनांकडे ह्याच दृष्टीने पाहत असतो. प्रत्यक्षाच्या दर्शनानंतर त्याच्या चिंतनांतच तो जेव्हां रंगून जातो, तेव्हां त्याच्या चर्मचक्षूंना जें दिसलेलें नसतें पण अन्तश्चक्षूंना जाणवलेलें असतें तें त्याचे अन्तःचक्षू पाहूं लागतात. त्यांत अप्रस्तुताला, अनावश्यक गोष्टींना व अंगांना थारा नसतो; त्या प्रत्यक्षांतील ज्या अंगांच्या वैशिष्ट्यपूर्ण व सामर्थ्यशाली जाणिवेने हें चिंतन शक्य होत असतें त्याच अगदी थोड्या अशा महत्तम अंगांवर त्याचें मन त्या समयीं आपल्या साऱ्या चिंतनशक्ति केन्द्रित करीत असतें. हळुहळू त्या अंगांतील परमतत्त्व त्याच्या लक्षांत येऊं लागतें; त्या वस्तूचें वस्तुत्व, त्या व्यक्तीचें व्यक्तित्व, त्या जीवनव्यवहाराचें जीवनतत्त्व त्याला जाणवतें व मग तें ज्या अंगांच्या द्वारा जाणवतें त्या अंगांचें तेवढें दर्शन घडवून तो तें कलात्मकतेने प्रगट करण्याचा प्रयत्न करतो.

जगांतील अत्यंत श्रेष्ठ कलावन्तांचे ठिकाणीं ह्याच निरूपणात्मक प्रतिभेचा म्हणजे कल्पनाशक्तीचा आढळ दिसतो. शेक्सपिअर, कालिदास, व्यास ह्यांच्या वाङ्मयसृष्टींतील स्त्री-पुरुषांकडे नजर फिरविली तर आपणास ह्याच गोष्टीचा प्रत्यय येतो. शेक्सपिअरची डेस्डिमोना किंवा कालिदासाची शकुन्तला आपल्या डोळ्यांपुढे नांव काढतांच साक्षात् उभी राहते; ह्याचें कारण त्यांच्यांतील शाश्वत अंतिम मूल्यांचें दर्शन आपणांस त्या त्या नाटकांतून झालेलें असतें. वामनरावांनी आपल्या लेखन-पद्धतीविषयी ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या वरील विवेचनाशीं जमतात. वामनरावांच्या वाङ्मयसृष्टींतील स्त्रीपुरुषां संबंधीहि हीच गोष्ट मला जाणवते. वामनरावांनी त्यांचें जें दर्शन घडविलें आहे तें त्यांच्यांतील अविकारी, शाश्वत, परमतत्त्वांवर आधारलेलें असल्यामुळे त्यांचा आपल्या मनावर होणारा परिणाम हा अटळ राहील हें काय सांगावयाला पाहिजे ? त्यांच्या संबंधी लिहितांना त्यांनी त्यांच्या बाबतच्या अशा कांही गोष्टी

सूचित केलेल्या आहेत की ज्या अविकारी, शाश्वत स्वरूपाच्या आहेत; त्यांच्या बाह्य रूप-रंग-आकारादि विकारी गोष्टींवर त्या यत्किंचित्‌हि अवलंबून नाहींत; जणू त्यांचें 'तत्त्व' त्याच गोष्टींत भरून राहिलेलें आहे. अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार निसर्गव्यवहाराचें व मानवी स्वभावाचें चित्रण असल्याच अंतिम-मूल्य-दर्शनाने घडवून आणीत असतात, परंतु पुष्कळसे कथाकार ही गोष्ट विसरतात व आपण निर्मिलेल्या स्त्री-पुरुषांचें, त्यांच्या अत्यंत सूचक उक्तींच्या द्वारां वा क्रियांच्या द्वारां दर्शन घडविण्याच्या ऐवजी ते मोठ्या मेहनतीने त्यांचें अतिसूक्ष्म रूपवर्णन करून तें साधूं पाहतात. अशा वेळीं ते आपल्या कलेचें खरेखुरें कार्य विसरले असेंच म्हणावें लागतें. नव्हे आपण तसें समजतोंच व एका लेखकाच्या म्हणण्याचा अनुवाद करून बोलावयाचें म्हणजे असें कीं ते जसे आपली कला विसरतात त्याचप्रमाणे आपणहि त्यांना लवकरच विसरून जातों.

ह्या निरूपणात्मक कल्पनाशक्तीने युक्त असलेला कलावन्त जीवनव्यवहारां-कडेहि कोणत्या दृष्टीने पाहतो हें लक्षांत घेण्याजोगें आहे. जीवनव्यवहारांतील वरवरच्या तपशिलाकडे ह्याचें लक्ष नसतें. त्यांत निर्माण होणाऱ्या वा अंगभूत असलेल्या बाह्यरूप चित्राकृतींनी तो आकर्षित होत नाहीं; त्याला वरवरचें सौंदर्य भुलवूं शकत नाहीं; त्याची निरूपपणात्मक कल्पनाशक्ति ह्या जीवन-व्यवहारांतील अंतिम तत्त्वांचाच शोध लावूं पाहत असते; तिचे चक्षू जीवन-व्यवहारांतील अन्तःसौंदर्य न्याहाळीत असतात; अंतिम मूल्यांचें अवलोकन करीत असतात; व ह्या मूल्यांचें, ह्या परमतत्त्वांचें, ह्या अन्तःसौंदर्याचें दर्शन घडतांच जीवनव्यवहाराच्या ज्या अंगांच्या चिंतनांतून तें घडत असतें, त्याच अंगांच्या सूचक चित्रणांतून हे कलावन्त तें व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. हा प्रयत्न यशस्वी होणें न होणें हें त्या कलावन्ताच्या भावबलावर व कलात्मक अभिव्यक्तीला आवश्यक असणाऱ्या इतर गुणांवर व कौशल्यावर अवलंबून असतें.

वामनरावांनीं जीवनव्यवहारांचें दर्शन ह्याच पद्धतीने घडविलें आहे. आपल्याला पोषाखाचीं, रूपचर्याचीं, अवयवव्यापारांचीं, स्थलांचीं वर्णनें जमत नसत असें जें वामनराव म्हणतात, त्यांतील मर्म हेंच आहे. तसलीं वर्णनें करणें हा त्यांच्या प्रतिभेचा धर्मच नव्हता. त्यांच्या जीवन-चित्रणांत तपशील नाही परंतु तत्त्व आहे; सजावट नाही परंतु सौंदर्य

आहे; त्यांत जीवनाचें विविध दर्शन बाह्यरूपाने आलेलें नसलें तरी साररूपाने आलेलें आहे; व म्हणूनच तें इतकें सत्यदर्शी, प्रत्ययकारी उतरलें आहे : म्हणूनच त्यांतील व्यक्तिचित्रें हीं सदैव लक्षांत राहतात : सुखद स्मृतींप्रमाणे आपल्या अंतर्मनांत अनंत काळ दरवळत राहतात; त्यांनी आपल्या मनावर उमटलेलीं बिंबें नामरूपादि बंधनांनी निबद्ध नसतात : आपण नांवें विसरतों पण त्या व्यक्ति आपल्या लक्षांत राहतात. त्यांचें नित्य परिशीलन केलें तरी त्यांची गोडी अवीटच राहते : व नित्य नूतन सौंदर्य प्रकट करण्याची त्यांचे ठिकाणी असणारी शक्तीहि अखंडित असते.

## ललितलेखनांतील कलादोष : कारणमीमांसा.

ज्या ज्या ठिकाणीं वामनराव ह्या कल्पनाशक्तीच्या कार्यपद्धतीशीं प्रामाणिक राहिलेले नाहीत ज्या ज्या ठिकाणीं कलादृष्ट्या तत्त्वरूप असणाऱ्या गोष्टींकडे लक्ष न देतां कलादृष्ट्या अप्रस्तुत अशा गोष्टींकडे त्यांनी मुद्दाम लक्ष दिलें आहे, त्या त्या ठिकाणीं त्यांचें ललितलेखन हें थोडेंफार अप्रत्ययकारी उतरलें आहे, असें मला वाटतें. एरव्ही निर्दोष असलेली आपली लेखनपद्धति वामनरावांना सदोष वाटत असे ती ह्याच गोष्टीच्या जाणिवेमुळे असें मला वाटतें. ह्या व्याख्यानाच्या आरंभीं ' रागिणीं ' तील कलात्मक दोषांची वाचलेली लांबच लांब यादी श्रोत्यांच्या लक्षांत असेलच. वामनरावांच्या ' नलिनीं ' तून ' सुशीलेच्या देवां ' तून व थोड्याफार प्रमाणांत, ' आश्रमहरिणी ' व ' इंदु काळे व सरला भोळे ' ह्या कथांतून आढळणारे असल्याच प्रकारचे कलादोष दाखवितां येणार नाहींत असें नाही : ते दाखविणें हें बरेंचसें सोपें काम आहे. ह्या कादंबऱ्यांवर मासिक पुस्तकांतून व इतर नियतकालिकांतून जीं अनेक परीक्षणें आलीं, त्यांत हे दोषदर्शन आस्थेवाइकपणे करण्यांत आलेलें आहे व ह्यांतील बहुतेक दोष वामनरावांनीं ' मी व माझे टीकाकार ' ह्या लेखांत कबूल केलेले आहेत. तेव्हां ह्या उघडउघड दोषांचा पुनरुच्चार करून मी ह्या व्याख्यानांचीं पानें अडवीत नाही. त्यांतील मुख्य दोष कोणकोणत्या कारणांस्तव उत्पन्न झालेले आहेत व त्यांचें निराकरण कोणत्या कादंबऱ्यांतून कोणकोणत्या कारणांनी शक्य झालें आहे हें येथे जमल्यास दाखवून देण्याचा प्रयत्न करून पाहतों.

**प्रतिभेचा सहजधर्म : आत्मनिवेदनपर लिखाण :**

वामनरावांच्या सर्व कादंबऱ्यांचें परिशीलन केल्यानंतर जी एक गोष्ट आपल्या लक्षांत येते ती अशी की त्यांची शेवटची कथा ' इंदु काळे व सरला भोळे ' आणि तिच्या जवळजवळ वीस वर्षे अगोदर अवतरलेली ' आश्रमहरिणी ' ही कादंबरी व त्यांच्या ' स्मृतिलहरी ' ह्या कृति जितक्या कलादृष्ट्या परिणामकारक उतरलेल्या आहेत, तितक्या त्यांच्या इतर ललितकृति उतरलेल्या नाहीत; त्यांच्या इतर कादंबऱ्यांत कलादृष्ट्या बरेच दोष आहेत, तसे ह्यांत नाहीत. ह्याचें कारण काय असावें ? त्यांचा लहान, आटोपशीर बांधा हें तर त्याचें कारण नसेल ना ? विचारांअंतीं, हें त्याचें कारण असलें तर अत्यंत गौण स्वरूपाचें असावें असेंच मला वाटतें. वामनरावांच्या वर निर्देशिलेल्या कलात्मक प्रकृतीला म्हणजे निरुपणात्मक कल्पनाशक्तीला परिपोषक असें जर कोणतें लिखाण असेल तर तें म्हणजे आत्मपर निवेदनाच्या स्वरूपाचेंच असें मला वाटतें; जीवनाचें तटस्थ वृत्तीनें अवलोकन करणें वामनरावांना जमलें असतें परंतु त्याच तटस्थ वृत्तीने जीवनाचें चित्रण करितांना ज्या नाट्यात्मक दर्शनाचा अवलंब करावा लागतो, तें नाट्यात्मक दर्शन वामनरावांना जमत नव्हतें : व जमणेंहि शक्य नव्हतें; त्याचें कारण उघडच होतें : नाट्यात्मक दर्शनांत जीवनव्यवहारांतील वरवरच्या गोष्टींनाहि महत्त्व असतें : त्यांचें यथोचित चित्रण करून तद्द्वारां जीवनाची कल्पना वाचकांच्या मनांत निर्माण करावयाची असते; तेथे तंत्राला, आवश्यक तेवढ्या तपशीलालाहि महत्त्व असतें. संभाषणांचा तालमाल संभाळावा लागतो, कोठेहि सैलपणाला वाव नसतो. प्रसंगचित्रणाला महत्त्व असतें. वामनरावांच्या सरळसीध्या निरुपणात्मक कल्पनाशक्तीला ह्या गोष्टी जमण्यासारख्या नव्हत्या: तिला ताटस्थ्याने केलेल्या जीवनाच्या बाह्यांगदर्शनांतून जीवनाचीं तत्त्वें सूचित करणें कठीण जात होतें. नाट्यदर्शनाच्या पद्धतीने जीवनव्यवहाराचीं अनेकविध चित्रें रेखाटून त्यांतून त्याचें एकसंध दर्शन घडविणें शक्य नव्हतें. तिला निवेदनच जमत होतें: प्रत्यक्ष निवेदन हाच तिचा धर्म होता : आपल्या स्वैर विहाराला–श्रोत्यांनी येथें वर उद्धृत केलेल्या वामनरावांच्या स्वतःच्या लेखनपद्धतीसंबंधीच्या उद्गारांतील शेवटचीं वाक्यें लक्षांत आणावींत–तिला आत्मपर लिखाणाचेंच क्षेत्र विशेष पसंत पडावें यांत नवल तें काय ? निदान तिने ज्या ज्या वेळीं तें निवडलें

त्या त्या वेळी तिचा खराखुरा विलास फारशी कलाहानि न होतां त्यांतून पाहावयाला मिळाला यांत संशय नाही. मला वामनरावांच्या ललित-लेखनापैकी जे तीन ग्रंथ आवडतात ते तिन्हीहि ग्रंथ–म्हणजे ' आश्रमहरिणी,' ' इंदु काळे व सरला भोळे ' आणि ' स्मृति लहरी '—हे आत्मपर लिखाणाचेच नमुने असल्यामुळें त्यांत कलादोष क्वचित्‌च आढळतात. ' आश्रमहरिणी ' व ' स्मृतिलहरी ' हे तर बोलून चालून आत्मकथनपरच ग्रंथ; एक धौम्याचें आत्मकथन तर दुसरें धोंडोपंत बर्वे ह्या व्यक्तीच्या नांवाखाली वामनरावांनी केलेलें स्वैर स्मृतिचिंतन; तेव्हां दोन्हीहि ग्रंथांत वामनरावांच्या कल्पकतेचा मनोहर विलास पाहावयाला मिळावा यांत काय नवल ? आपण जितके धौम्याच्या आत्मकथेंत रंगून जातों, तितकेच गोष्टीवेल्हाळ तत्त्वज्ञ धोंडोपंतांच्या आठवणीहि कधी संपू नयेत असें आपणांस वाटतें; त्यांतलें विषयान्तर व पोटविषयान्तर आपणांस गोड वाटतें: त्यांतील तत्त्वचर्चेत आपण समरस होतों; त्यांतील तत्त्वचिंतनपर भाग आपल्या मनःचक्षूसमोरील धोंडोपंत बर्व्यांच्या व्यक्तिचित्रांत जीवंतपणा ओततो: त्यांतल्या त्या विस्कटलेल्या, अस्ताव्यस्त, योजनारहित आठवणींतून धोंडोपंत बर्व्यांचें आल्हाददायक व्यक्तिमत्व, अरुण-प्रभेंतून सूर्यबिंब बाहेर यावें त्याप्रमाणे आपल्या डोळ्यांत भरूं लागतें; ह्याचें कारण म्हणजे वामनरावांच्या प्रतिभेच्या मुक्त व स्वच्छंद विलासाला अत्यंत परिपोषक असें क्षेत्र ह्या आत्मपर आठवणींतून मिळालें होतें हेंच आहे.

वामनरावांच्या प्रतिभेला आत्मचरित्र-लेखनाचीं बंधनें तरी सोसलीं असतीं की नाही, ह्याबद्दल मला संशयच आहे. आत्मपर परंतु थोडेंफार स्वैर लेखन तिला मानवत होतें, म्हणूनच तिचा अत्यंत मनोहर विलास ' स्मृति-लहरी ' मध्ये दिसून येतो. सत्य व कल्पित ह्यांची हवी तशी भेसळ करण्याची वामनरावांना हीं स्मृति-चित्रें रेखाटतांना मुभा असल्यामुळे त्यांत त्यांच्या प्रतिभेचा मुक्त विलास जसा दिसत आहे, तसेंच त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या खूप वेगवेगळ्या अंगांचें अकृत्रिम दर्शनहि त्यांतून झालेलें आहे. त्यांत दिलखुलास तत्त्वचर्चा आहेत, अत्यंत सुखद अशीं विनोदस्थळें आहेत, त्यांतील संसार-चित्रें तर नितान्तरम्य आहेत: त्यांचे ठिकाणी अत्यंत निर्मल, पवित्र व सात्त्विक भावनांना उद्दीपित करण्याची सहजशक्ति आहे; सुशिक्षित, निष्कपट, तडफदार तरुणांचें मनोदर्शन त्यांत आहे, त्याचप्रमाणे प्रौढ पति-पत्नींमधील विकाररहित

प्रेमाचें अत्यंत प्रत्ययकारी चित्रण त्यांत झालेलें आहे: कुटुंबजीवनांतील ज्या अनेक लहानमोठ्या सुखदुःखात्मक प्रसंगांतून माणसांना आपल्या ठिकाणच्या परस्परांबद्दलच्या निःस्वार्थ प्रेमाला सहजतया व्यक्तता देतां देते, त्यांतील कांही वेचक प्रसंगांचें सहजचित्रण ह्यांत झालेलें आहे. ह्या स्मृतिचित्रांत जिव्हाळा आहे, गुजगोष्टी आहेत, काव्य आहे, तत्त्वज्ञान आहे—थोडक्यांत म्हणजे वामनरावांचें संपूर्ण व्यक्तिमत्व त्यांत आल्हाददायकपणें प्रतिबिंबित झालें आहे. ह्या सर्व गोष्टी वामनरावांनी केवळ आत्मचरित्र लिहिलें असतें तर कदाचित् साधल्या गेल्या नसत्या: कारण त्या लेखनप्रकाराचींहि बंधनें त्यांना कितपत मानवलीं असतीं ह्याबद्दल संशयच आहे.

## पत्रात्मक कथानिवेदन

आपणांस असें आढळून येतें की कथालेखनासाठी जरी वामनराव हे निवेदन-पद्धतीचाच अवलंब करीत असत, तरी त्यांतल्या त्यांत पत्रात्मक निवेदन—जें खरें एकमुखी संभाषण म्हणजे आत्मनिवेदनच असतें—त्यांना फार चांगलें जमत असे. फार चांगलें जमत असे ह्याचा अर्थ, कथालेखनाचीं कलात्मक बंधनें पाळून तें फार चांगलें जमत असे, असा आहे; याचें कारण असें की पत्रात्मक लिखाणांत ज्याप्रमाणें सहजगत्याच प्रगट होणारा जिव्हाळा अधिक त्याचप्रमाणे संभाषणाचीं, वर्णनाचीं, प्रसंगरेखाटनाचीं काटेतोल बंधनें पाळण्याची इतर दगदगहि कमी: ज्यांचा कंटाळा त्याच गोष्टींची अनावश्यकता: त्यामुळे वामनरावांसारख्या बोलक्या, ऐसपैसपणे गप्पा छाट-णाऱ्या, तत्त्वचर्चा करणाऱ्या, तत्त्वचिंतन करून परमतत्त्वांचा शोध लावूं इच्छिणाऱ्या लेखकाला हा लेखनप्रकार मोठा उपकारक ठरावा ह्यांत नवल नाही. त्यांच्या तत्त्वचिंतनात्मक वृत्तीला, त्यांच्या खेळकर व निर्मल विनोद-बुद्धीला, व त्यांच्या अंगभूत सौंदर्यदृष्टीला हा लेखनप्रकार फारच मानवला. 'सुशीलेच्या देवां'त वामनरावांनी जी अनेक ठिकाणी सुशीलेलाच स्वतःची कहाणी सांगावयाला लाविलें आहे तें उगीच नाही; किंवा ह्या कादंबरींतील शेवटलीं बरींच प्रकरणें जीं पत्रात्मक उतरलीं आहेत, तींहि उगीच नव्हेत. असें दिसतें की वामनरावांची प्रतिभा आपल्या आवडीचा, आपल्या प्रकृतीला साजेसा, आपल्या अभिव्यक्तीला अत्यंत अनुकूल असा लेखनप्रकार शोधीतच

होती. ' आश्रमहरिणी 'त तिला तो थोडाफार सांपडला होता; त्याचें रूप लक्षांत आलें होतें; परंतु त्याचीं इतर रूपें आकळलीं नव्हतीं; त्यांतलें वामनरावांच्या प्रतिभेला अत्यंत उचित असें रूप ' सुशीलेचा देव ' ही कथा लिहिली जात असतां अचानक आढळलें; व पुढे त्यालाच—त्या पत्रात्मक कथानिवेदनाच्या पद्धतीलाच—तिने स्वाभाविकपणे घट्ट धरून ठेवलें. कालान्तराने त्यांतूनच ' इंदु काळे व सरला भोळे ' ही सुबक कलाकृति निपजली.

' रागिणी ', ' आश्रमहरिणी ' व ' नलिनी ' ह्या तिन्हीही कथांच्या लेखनामध्ये—विशेषतः ' रागिणी ' मध्ये—वामनरावांनी आत्मगत भाषणांचा कथापरिपोषासाठी भरपूर उपयोग करून घेतलेला आहे असें आढळून येतें. तिचीं कांही कांही प्रकरणें तर केवळ एखाद्या व्यक्तीच्या ह्या आत्मगत भाषणांकरितांच लिहिलीं गेलीं आहेत. हा आत्मगत भाषणांचा उपयोग सदर कादंबऱ्यांतून प्रमाणाच्या बाहेरच झाला आहे; व तो दोषस्वरूप आहे. पात्रांच्या मनांत शिरून त्यांतील अन्तःकलहांचें चित्र रंगविण्याखेरीज वामनरावांकडून कथानकाचें पाऊल मुळीं ह्या कादंबरींत पुढे टाकलेंच जात नाही. हें मनोवगाहन पत्रात्मक कथनपद्धतींत सहजगत्याच साधलें जात असल्यामुळें तें वरील कादंबऱ्यांतून दोषरूप ठरलें तर ' सुशीलेचा देव ' आणि ' इंदु काळे व सरला भोळे ' ह्या कथांतून तें गुणस्वरूप ठरलें आहे. त्यांतील स्त्रीपुरुषांनी आपल्या मनांतील अन्तःकलहाला आपापल्या पत्रांतून दिलेली वाच्यता ही कथापरिपोषाला मदत करून शिवाय कथेच्या सौंदर्यांतहि केवढी मोठी भर टाकीत आहे ! ' रागिणी ', ' नलिनीं 'तील आत्मगतें व 'सुशीलेचा देव' आणि 'इंदु काळे व सरला भोळे' ह्यांतील मनोवगाहनें हीं सहोदर आहेत असें मला वाटतें; ' रागिणीं 'तील आत्मगतांचींच हीं पत्रात्मक निवेदनें उत्क्रान्त रूपें होत, असें वाटतें. त्या आत्मगतांचा जन्म ज्या वृत्तींतून झाला त्याच वृत्तींतून ह्या पत्रात्मक निवेदनांचा जन्म झालेला आहे. ह्या पत्रात्मक निवेदनाच्या पद्धतींत वामनरावांना आपल्या प्रतिभेच्या अभिव्यक्तीसाठी खरेखुरें कलादृष्ट्या प्रभावी असें साधन मिळालें, म्हणून तद्द्वारां तिचा विलास इतका आकर्षक रीत्या प्रगट झाला. ' इन्दु काळे व सरला भोळे ' ह्या कादंबरींत तंत्रात्मक किंवा कलात्मक दोष फारसे नाहीत—एखादा दुसरा तारखेचा दोष हा कलात्मक दोष ठरत नाही—ह्याचें कारण अगदी उघडच आहे. तंत्रात्मक किंवा कलात्मक दोष टाळण्यासाठी

वामनरावांनी येथे वेगळी जाणून बुजून खटपट केली आहे असें नव्हे. [ पुनरुक्तीचा व विषयान्तराचा दोष पत्करूनहि परत लिहितों की वामनरावांना लिखाणाच्या बाबतींत ‘ खटपट ’ हा शब्द ठाऊकच नसावा. अमुक प्रकारची ‘ खटपट ’ करून, अमुक पद्धति उपयोजून, अमुक एक परिणाम साधावा ह्या ईर्षेने, आस्थेने वा जाणिवेने ते कधीच लिहीत नसावेत. जें लिहिलें जाईल तें लिहावयाचें, हेंच त्याचें ध्येय असे व जें लिहिलें जाई त्याच्या मागची विचारांची व भावनांची बैठक मोठी शुद्ध व बलशाली असल्यामुळें कलादोष त्यांत अवतरले तरीहि तें लिखाण सुसंस्कृत वाचकांचें चित्तहरण सहज करीत असे. ‘ रागिणी ’ आवडते किंवा ‘ सुशीलेचा देव ’—तिच्यांत नऊ मृत्यु झालेले असूनहि—आवडते तें त्या कादंबऱ्या निर्दोष आहेत म्हणून आवडतात असें नव्हे तर त्यांच्यांत भरपूर दोष असूनहि आवडतात. मग हे दोष नसते तर त्या किती आवडल्या असत्या ह्याची कल्पनाच केलेली बरी. असो ]— सांगायचें कारण असें की ‘ इंदु काळे व सरला भोळे ’ ह्या कादंबरींत वामनरावांनी जो लेखनप्रकार उपयोजिला तो त्यांच्या प्रतिभेला इतका अनुकूल होता की, त्यांतून अभिव्यक्त होत असतां स्वाभाविकपणेच तिचें निर्दोष, निरुपाधिक असें कलापूर्ण स्वरूपच नेमकें अचूकपणे प्रगट झालें.

## आत्मपर लिखाण व तत्त्वचर्चा :

वामनरावांच्या इतर कादंबऱ्यांतून ठिगळवजा भासणाऱ्या ( परंतु आपल्या अन्तःसौंदर्याने वाचकांना आकर्षून घेणाऱ्या ) तत्त्वचर्चा आहेत; (त्या जितक्या अनावश्यक आहेत तितक्याच वामनरावांच्या वाङ्मयाच्या लोकप्रियतेला उपकारक, एवढेंच नव्हे तर कारण ठरल्या आहेत; तेव्हां त्या त्यांच्या कादंबऱ्यांत अनावश्यक आहेत असें तरी कसें म्हणावयाचें ? खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील अलंकृत भाषा ही कलादृष्ट्या अनावश्यक भासली तरी ती त्यांच्या ललितलेखनाचें एक आकर्षक वैशिष्ट्य ह्या दृष्टीने त्यांच्या लोकप्रियतेस कारण झालेली आहेच की नाही ? तसेंच ). फडक्यांनी आपल्या ‘प्रतिभासाधनां ’त वामनरावांना त्यांच्या ह्या अनावश्यक तत्त्वचर्चांबद्दल बराचसा सकारण दोष दिलेला आहे. बराचसा म्हणण्याचें कारण एवढेंच की तो वामनरावांचा महान् गुण व महान् दोष आहे; त्यामुळे त्यांच्या लिखाणांत

मराठी
ग्रंथ संग्रहालय



जसे कलादोष शिरले आहेत, तसेच त्याचें वैशिष्ट्य निश्चित करावयाला त्याच चर्चा पुष्कळशा कारण झाल्या आहेत. परंतु असें दिसून येतें की ज्या ज्या वेळी वामनरावांनी आत्मपर लिखाणाचा अवलंब केला आहे त्या त्या वेळी ह्या तत्त्वचर्चांचें, ' रागिणी ', ' नलिनीं ' तील ठिगळवजा भासणारें स्वरूप नष्ट झालें असून त्या कथापरिपोषाच्या गुंफणींत एकजीव—बऱ्याचशा एकजीव झाल्या आहेत. अगोदरच वामनरावांच्या कथांतील स्त्रीपुरुष हे बरेचसे बुद्धिजीवि आहेत : कोणत्याहि प्रश्नाकडे तत्त्वजिज्ञासुवृत्तीने पाहणें हा जवळजवळ त्यांचा प्रकृतिधर्म आहे : तेव्हां त्यांच्या संभाषणांत तत्त्वांचा उहापोह व्हावा, वेगवेगळ्या विषयांतील प्रश्नांची साधकबाधक चर्चा व्हावी हें बरेचसें स्वाभाविकच वाटतें : त्यांतल्या त्यांत हे प्रश्न त्यांच्या जीविताशीं, त्या जीवितांतील कांही अडचणींशीं जर संलग्न असतील तर ह्या तत्त्वचर्चांची कादंबरींतील अपकारकता पुष्कळच कमी होते यांतहि संशय नाही : 'रागिणीं' तील भय्यासाहेब व आनंदराव यांच्यामध्यें झालेला ' सन्मित्रकलह ' हा केवळ तत्त्वचर्चात्मक असूनहि ठिगळवजा भासत नाही ह्याचें कारण हेंच, व ' रागिणी ' मधील इतर बऱ्याच तत्त्वचर्चा ठिगळवजा वाटतात त्याचेंहि कारण हेंच. ' सुशीलेच्या देवां ' तील बहुतेक तत्त्वचर्चा ह्या कथापरिपोषासाठी व स्वभावपरिपोषासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्यामुळे त्या कोठेच फारशा बोचक ठरत नाहीत असा अनुभव आहे. ह्या कादंबरीविषयी विचार करतांना असें वाटतें की हिच्यांतील सगळ्याच प्रमुख व्यक्तींची आंतरिक प्रगति व उत्क्रान्ति दाखविणें हाच ह्या कथेचा मूलतः उद्देश असावा व म्हणूनच ह्या आंतरिक विकासाला सर्वतोपरी परिपोषक—नव्हे, पुष्कळ वेळा आवश्यक—ठरणाऱ्या तत्त्वचर्चा त्या कादंबरीच्या जीवनाला अपरिहार्य—किंबहुना आधारभूत ठरल्या असाव्यात; नव्हे, त्या तशा ठरल्या आहेतच; परंतु ह्या सर्व विचारांबरोबर हीहि गोष्ट खरी की ' सुशीलेच्या देवां ' तील बराचसा भाग हा आत्मपर लिखाणाने व्याप्त असल्यामुळे त्यांतील ह्या तत्त्वचर्चा ठिगळवजा भासत नसून त्यांचें रूप कथानिवेदनाशीं पूर्णपणे एकजीव झाल्यासारखें वाटत आहे. ह्याच दृष्टीने विचार केल्यास ह्या तत्त्वचर्चा ' इंदु काळे व सरला भोळे ' ह्या कादंबरींत कथाशरिराशीं ज्या संपूर्णपणे एकजीव झाल्यासारख्या वाटतात त्याची कारणमीमांसा करितां येण्याजोगी आहे. ज्ञानमार्ग विरुद्ध कर्ममार्ग,

कला विरुद्ध नीति, ध्येय विरुद्ध वस्तुस्थिति ह्या सारखे तत्त्वमूलक विषय, विनायकराव, नारायणराव, इंदु काळे, सरला भोळे ह्यांच्या सारख्या तत्त्वजिज्ञासु व्यक्ती व पत्रात्मक कथानिवेदनासारखी आत्मपर लेखनाला जवळ असलेली पद्धति ह्या त्रिवेणीसंगमांत त्या कादंबरीचें स्वरूप इतकें मनोहर व्हावें ह्यांत नवल वाटत नाही. काकासाहेब कालेलकर वामनरावांना 'सामाजिक जीवनाचें एक मोहन' (leaven) असें समजतात; वामनरावांच्या ह्या कादंबऱ्यांतील तत्त्वचर्चांनाहि मला तीच उपमा द्यावीशी वाटते: ह्या तत्त्वचर्चा म्हणजे त्यांच्या कादंबरी-लेखनाचें 'एक मोहन' च होत. दुधावरील सायीसारख्या त्या कांही ठिकाणी भासतात, तर 'इंदु काळे व सरला भोळे' ह्या कादंबरींत, पांगारकरांची उपमा घेऊन बोलावयाचें म्हणजे दुधांत साय जिरवावी त्याप्रमाणे वामनरावांनी कथाप्रवाहांत आपलें तत्त्वशोधन जिरवून त्या दोन्हीहि गोष्टी एकरूप केलेल्या आहेत, असाच सुखद प्रत्यय येतो.*

## कांही ठळक कलादोष

वामनरावांना प्रसंगांचीं, स्थळांचीं, माणसांच्या रूपांचीं व अवयव व्यापारांचीं वर्णनें नीटशीं साधत नसत व अशा प्रकारचीं वर्णनें करणें हा त्यांच्या लेखनप्रकृतीचा धर्महि नव्हता, हें आपण वर पाहिलेंच आहे; अर्थात् त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी असल्या प्रकारचीं वर्णनें करण्याचा प्रयत्न त्यांचे हातून कळत न कळत झाला आहे, त्या त्या ठिकाणी त्यामुळे बराचसा रसभंग झाला आहे असें आढळून येतें. 'रागिणीं'तील असल्या रसभंगात्मक वर्णनांचीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. ज्या ज्या ठिकाणी वामनरावांना असलीं अतिसूक्ष्म वर्णनें करणें भागच पडलें--म्हणजे असलीं वर्णनें करणें भागच आहे असें वाटलें त्या त्या ठिकाणींच अगोदर त्यांनी हीं वर्णनें केलेलीं आहेत. निसर्गवर्णनांच्या बाबत त्यांनी जो पुष्कळसा कल्पकतेवर व अलंकारमय भाषेवरच भर दिला आहे तो बाजूला ठेवला तरी असें दिसून येतें की, तीं त्यांचीं वर्णनें येथून तेथून सगळींच ठिगळवजा झालीं आहेत; तीं गाळलीं असतां कादंबरींतील वातावरणाला, कथानकपरिपोषाला, स्वभावरेखाटनाला वा अंतिम परिणामाला कांही बाधा येईल असें

* जिज्ञासूंनी कादंबऱ्यांत अवतरणाऱ्या ह्या तत्त्वचर्चांविषयीं वामनरावांचें मत काय होतें हें पाहण्यासाठीं त्यांचा डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांवरील लेख अवश्य वाचावा.

वाटत नाही; परंतु हीं वर्णनें बाजूला ठेवून त्यांनी केलेलीं मानवी व्यवहारांचीं वर्णनें पाहिलीं तरी असें दिसून येतें कीं तीं एक तर त्यांना साधलेलीं नाहीत, व दुसरें म्हणजे तीं त्यांनी कशीं तरी उरकून घेतलेलीं आहेत; व त्यामुळेच ' रागिणी ' तील वैराग्यखंडांतील ' योगायोग असा होता ! ' ह्या चोविसाव्या प्रकरणांतील प्रसंगवर्णनांप्रमाणे तीं पोरकट उतरलीं आहेत. प्रसंगवर्णन हें वामनरावांना साधत नसल्यामुळे ते एक तर तें उताविळपणे भरभर तरी उरकून टाकीत किंवा सावकाशपणे पाल्हाळाने तरी करीत बसत. त्यामुळे प्रमाण-बद्धतेच्या अभावीं येणारा बेडौलपणा, अतरंजितपणा, इत्यादि दोष त्यामध्ये आपोआप अवतरत; त्याबद्दलचें तारतम्य त्यांना राहत नसे. मात्र ह्या सर्व तपशीलवार वर्णनांबाबतचा जन्मजात कंटाळा त्यांचेकडून ठिकठिकाणी व्यक्त होत असे. ' रागिणी 'त जनुभाऊंकडून रागिणीचें प्रियाराधन होतें. त्यावेळीं जो प्रसंग घडतो त्यासंबंधी वामनराव लिहितात, " या प्रसंगाचें वर्णन जरी मोठें मनोरंजक होण्यासारखें आहे तरी तें येथें सविस्तरपणे करण्याचें आम्हाला साहस होत नाही." पुढे प्रत्यक्ष वर्णनाचे वेळीं थोडासा संवाद देऊन वामनराव लिहितात, " संविधानक कळावयाला ह्या ' सीन 'चें एवढें वर्णन बस्स झालें !" तारतम्य न राहिल्यामुळे वामनरावांचीं हीं वर्णनें पुष्कळ वेळा रसभंगात्मक कशीं होत असत हें पाहावयाचें असल्यास ' नलिनी ' ह्या कादंबरींत गोविंदरावांचें कुटुंब जलमार्गाने पळस्प्याला जात असतां बोटीवर घडलेल्या धांदलीचें जें वर्णन आलें आहे तें वाचावें : ह्यांत बोटीवरील प्रवाशांना बोट लागल्यामुळे ज्या ओकाऱ्या होत होत्या व त्यामुळे डेकवरील जागेंत सगळीकडे जी घाण पसरली होती तिचें वामनरावांनी इतक्या परोपरीने वर्णन केलें आहे की तें वाचवत नाही; ह्या किळसवाण्या वर्णनांतील उच्चांक खालील वाक्यांत गांठला गेला आहे, " शौचकूप रिकामा झाल्यावर प्रथम नलिनीने व नंतर कमळाबाईने शौचविधी कसबसा आटोपून घेतला; परंतु रमाकाकूंना त्या मोठमोठे हेलकावे देणाऱ्या बोटींतल्या शेतखान्यांत जाण्याची भीति वाटूं लागली. तथापि त्यांच्या मुलींनी त्यांना हरतऱ्हेने समजावून सांगितल्यावर व साहाय्य दिल्यावर ती वेळ कशी तरी निभावली. " येथें, असल्या किळसवाण्या तपशीलवार वर्णनांची अनावश्यकता लेखकाला त्या काळी पटलेली नव्हती की काय असा एक प्रश्न आपल्या मनांत येतो; किंवा लेखकाच्या

डोक्यांत जीवनाच्या वास्तवदर्शनाबाबत कांही चुकीच्या समजुती होत्या की काय अशीहि शंका मनाला चाटून जाते. अप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर " दिवाणजींनी बांबू, सुतळी, कोरें वस्त्र, मडकीं वगैरे आणण्याची दक्षता ठेवलीच होती " असें वामनराव सांगतात : हें सांगण्याची कलादृष्ट्या जरूरी नाही हें त्यांना लेखनसमयी समजत नव्हतें, असें का आपण समजायचें ? ' सुशीलेच्या देवा 'तील नवव्या व दहाव्या प्रकरणांत त्यांनी ' ओकाऱ्यांनाहि ' जें एवढें अवास्तव प्राधान्य दिलें आहे तें रसापकर्षक व अनाठायी वाटतें. अगदी सुरवातीच्या प्रकरणांत केवळ विनोदबुद्धीने ( व इतर कादंबरीलेखकांच्या नायिकावर्णनाच्या ठराविक पद्धतीचा उपहास करण्याच्या थोड्याशा स्तुत्य हेतूनें ) त्यांनी जें बालसुशीलेचें वर्णन केलें आहे त्यांतहि तिच्या ' नाकडोळ्यांचें ' वर्णन करितांना त्यांचा तोल गेला आहे असें दिसून येतें; त्याचप्रमाणे त्यांच्या ' नवपुष्पकरंडकां 'तील ' नांव बदलीन ' ह्या गोष्टीमध्ये असलेंच एक अतिरंजित स्वरूपाचें व तारतम्यरहित वर्णन आलें आहे; " यमुनेने डोळे पुसले व गालावरचे अश्रु व नाकांतील शेंबूड आंत ओढून ती जोरजोराने पावलें टाकीत...घरांत गेली " ( श्रीपाद कृष्णांसारख्या चोखंदळाला हें वाक्य फारच बोचलें, पण ) हें वाक्य काय दर्शवितें ? बीभत्स, कळाहीन गोष्टींचें वर्णन प्रमाणाबाहेर अतिरंजित झाल्याने वाचकाला एक प्रकारचा उबग येतो ह्याची जाणीव वामन मल्हारांना चांगलीच होती, असें त्यांच्या टीकात्मक लिखाणांवरून दिसून येतें; पण असें असून तोच दोष त्यांचे हातून पुष्कळ ठिकाणी घडला आहे, ह्याचें कारण वर सूचित केल्याप्रमाणे आपल्या प्रतिभेच्या विशिष्ट प्रकृतिधर्माशीं वामनराव येथें प्रामाणिक नव्हते हेंच दिसतें. वामनरावांच्या लिखाणाचा आस्वाद आपण एका वेगळ्याच हेतूने घेत असतो व तो आपला हेतु सफलित होत असल्यामुळे ह्या दोषस्वरूप गोष्टी त्याच्या लेखनाचा विचार करतांना लक्षांत येत असूनहि त्यांतील गुण लोपवूं शकत नाहींत ही त्यांतल्या त्यांत मोठी समाधानाची गोष्ट आहे.

## ' दुष्टत्वा 'चें चित्रण :

वामनरावांच्या लेखनांतील ह्या वर्णनांचाच विचार करीत असतां दुसरी जी एक गोष्ट माझ्या मनांत येत आहे ती येथें लिहून टाकतों. वामनरावांना

मानवी व्यवहारांचीं तपशीलवार वर्णनें करण्याचा जन्मजात कंटाळा होता ही गोष्ट तर खरीच, परंतु त्याबरोबरच दुसरी एक गोष्ट अशी की मानवी स्वभावांतील दुष्टत्वाचें, क्रौर्याचें, नीचतेचें वर्णनहि त्यांचे हातून चांगलेसें उतरत नसे; म्हणूनच वामनरावांच्या कादंबऱ्यांतील सुष्ट माणसें जितकीं जीवंत भासतात व लक्षांत राहतात तितकीं त्यांतील दुष्ट माणसें जीवंत वाटत नाहीत व लक्षांतहि राहत नाहींत. अगोदर म्हणजे असलीं माणसें त्यांच्या कथांतून फारशीं आढळतच नाहीत: 'रागिणीं' तील जनुभाऊ, 'नलिनीं' तील दिवाणजी आणि 'इंदु काळे व सरला भोळें' तील बिंदुमाधव म्हस्कर हीं तिन्हीहि स्वभावचित्रें ह्या दृष्टीने विचारांत घेण्यासारखीं आहेत. ह्या तिघांचींहि स्वभावचित्रें वामनरावांना तितकींशीं जमलेलीं नाहींत. तीं घाईनें तरी उरकलेलीं आहेत किंवा अतिरंजित तरी झालेलीं आहेत असें दिसतें. त्यांचीं चित्रें हीं जीवंत भासत नाहीत, तीं पुसट तरी वाटतात किंवा भडक तरी वाटतात. त्यांचें चित्रण करितांना वामनरावांकडून प्रत्यक्ष जीवनांत दिसून येणाऱ्या कांहीं मानवी स्वभावविशेषांचें संयमाने चित्रण झालेलें नसून असल्या 'दुष्ट', 'खल' पात्रांच्या चित्रणाविषयीं ललित वाङ्मयांत जे संकेत रूढ झालेले आहेत, त्यांचेंच अवलंबन झालेलें अधिक दिसून येतें. ह्याचें कारण शोधूं जातां असें दिसतें की वामनरावांची प्रकृतीच मुळीं असल्या व्यक्तींच्या जीवनव्यवहारांचें अवलोकन व ज्ञान करून घ्यावयास असमर्थ असल्यामुळें, त्यांचें त्यांच्या व्यवहारांचें चित्रण पुसट उतरलेलें असल्यास किंवा केवळ कल्पनेवर भर दिल्याने अत्यंत भडक व तऱ्हेवाईक उतरलेलें असल्यास त्यांत नवल नाही. जगांत दुष्ट माणसें फारशीं नाहीत; जगांतील बरींचशीं दुःखें हीं एकमेकांतील गैरसमजांमुळेच मानवांनी निर्मिलेलीं आहेत; जीं माणसें त्यांच्या कृत्यांवरून दुष्ट आहेत असें वाटतें तीं एका विशिष्ट परिस्थितीच्या तडाख्यांत सापडलेलीं असल्यामुळें तशीं बनलेलीं असतात, अशा प्रकारचीच सामान्यतः वामनरावांची विचारसरणी असल्यामुळे त्यांच्याकडून जेव्हां कारणपरत्वें 'खल पुरुष' रंगविले जात, तेव्हां त्यांचें कार्य म्हणजे त्यांच्या भोवतालील इतर व्यक्तींच्या स्वभावपरिपोषाला इष्ट ती मदत करण्याचें, अतएव कोंदणवजा म्हणजे दुय्यमच असे; म्हणूनच भोवतालच्या इतर व्यक्तींचें सरलत्व, त्यांची सात्त्विकता, त्यांच्या मनाचें औदार्य, इत्यादि गोष्टी डोळ्यांत भरतील अशा रीतीनें ह्या बिचाऱ्या खलपुरुषांना, कथानकाला

आवश्यक ठरणाऱ्या कपटनाट्याचा अवलंब करावयाला लेखक लावीत असे; ‘ रागिणी ’ तील जनुभाऊ व ‘ नलिनी ’ तील दिवाणजी हीं दोन्हीहि स्वभावचित्रें ह्या दृष्टीने विचार करतां वामनरावांनी मुद्दाम निर्माण केलेलीं, बनवलेलीं–बनावट अशीं वाटतात: ‘ इंदु काळे व सरला भोळे ’ तील बिंदुमाधव म्हस्कराचें शब्दचित्रहि अशाच प्रकारचें आहे. इंदु काळेसारख्या कला व नीति ह्यांच्या अन्योन्यसंबंधाविषयी स्वतंत्रपणें विचार करूं पाहणाऱ्या तरुणीला बिंदुमाधव म्हस्कर जी भुरळ घालतो ती आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाच्या जोरावर घालतो असें आपणांस तिने लिहिलेल्या पत्रांवरून दिसून येतें; परंतु या प्रभावी व्यक्तिमत्वाची प्रत्यक्ष जाणीव मात्र ही कादंबरी वाचीत असतां आपणांस, म्हणजे वाचकांस होऊं शकत नाही; ह्याचें कारण वामनरावांनी तें व्यक्तिचित्र जीवंत वाटेल अशा प्रकारें रंगविण्यासाठीं फारसे परिश्रम घेतलेलेच नाहींत. वामनरावांच्या कादंबऱ्यांतील हे सगळेच खलपुरुष अन्तीं आपल्या दुष्कृत्यांचीं कृष्णफळें भोगतात असें दिसतें; तेंहि ह्याबाबतचा जो संकेत आहे त्याला अनुसरून व वामनरावांच्या ध्येयवादाला धरूनच आहे. सांगण्याचा उद्देश असा की वामनरावांना हीं असलीं व्यक्तिचित्रें रंगविण्याचा जन्मजात कंटाळाच होता: जितका प्रसंगवर्णनाचा, स्थलवर्णनाचा, अवयवव्यापारवर्णनाचा त्यांना कंटाळा होता, तितकाच असलीं चित्रें रंगविण्याचा कंटाळा होता; ज्या ठिकाणी कथानकरचनेसाठी त्यांची अगदीं आवश्यकताच त्यांना भासली, त्याच ठिकाणी त्यांनी तीं योजलीं व त्यांचें चित्रण कसेंतरी आपलें इष्टकार्य साधण्यापुरतें उरकून घेतलें. जनुभाऊचें व्यक्तिचित्र रंगवितांना त्यांनी ‘ रागिणी ’ त काढलेले उद्गार जरी त्यांच्या लेखनकार्याच्या बाल्यावस्थेंतील, अतएव अप्रगल्भ व अनिर्णायक भासले तरी तेच त्यांच्या ह्या संबंधीच्या विचारसरणीची खरीखुरी दिशा दाखवितात असें मला वाटतें. ह्या संदर्भात ते लिहितात: “ ग्रंथकर्त्याने हें वर्णन आनंदाने गाळलेंहि असतें, पण जशी गोष्ट झाली तशी वर्णन करणें हें कथालेखक ह्या नात्याने त्याचें पवित्र कर्तव्य आहे. त्याच्या इच्छेवरच जर ही गोष्ट अवलंबून असती, तर त्याने ह्या गोष्टींत वाईट पात्र मुळीच आणलें नसतें; पण लोक जसे होते, तसेंच त्यांचें वर्णन करावयाचें असा त्याचा हेतु असल्यामुळे जनुभाऊंचें मानस थोडेंसें उघड्यावर आणणें किती जरी त्याच्या जिवावर आलें, तरी ती

गोष्ट त्याला करणें भागच आहे. " दुर्जनांचें स्वभावरेखाटन करण्याची वेळ आल्यास तें रेखाटन आवश्यक कां व कसें आहे हें ते नेहमीच मोठ्या आर्जवाने स्पष्ट करीत. ( जणू काय, असलीं व्यक्तिचित्रें आपण कादंबरींत घालतों हा एक आपल्या हातून घडणारा अक्षम्य गुन्हाच आहे, असें त्यांची मनोदेवता त्यांना सांगत असे. ) आणि त्यानंतर केलेलें हें व्यक्तिचित्र रेखाटन प्रत्यक्षपणें कलादृष्ट्या प्रत्ययकारी उतरत नसे, एवढेंच माझें म्हणणें.

**कल्पनेच्या बळावर साधलेले लेखनकौशल्यप्रकार :**

ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन आपण मनाशीं जर असें ठरवूं लागलों की खरोखरच वामनराव स्वतः म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या लेखनांत ज्याला ललितलेखनाची कलाकुसर म्हणतात ती कोठेहि नाही, तेव्हां ती त्यांना जमतच नसावी, तर आपलें हें मत चुकीचें ठरण्याचा संभव आहे; कारण लेखनांत सुरूपता, प्रमाणबद्धता, बांधेसूदपणा इत्यादि गोष्टी आणण्याकरितां जो थोडाबहुत खटाटोप करावयाला पाहिजे, जी थोडीबहुत काळजी घ्यावयाला पाहिजे, जी साफसुफी साधावयाला पाहिजे, ती करण्यास लागणारी आवश्यक ती चिकाटी व श्रम घेण्याची ताकद वामनरावांचेजवळ नसली तरी त्यांची कल्पनाशक्ति अत्यंत तल्लख असल्यामुळें त्यांच्या लिखाणांत कांहीं लेखनकलाकुसरीच्या गमती सहजगत्या अवतरलेल्या दिसून येतात. उदाहरणार्थ आपण रेखाटीत असलेल्या कथाचित्रांत कल्पितापेक्षा वास्तवाचा, सत्याचा, प्रत्यक्ष घटनांचाच भाग अधिक आहे हें वाचकांना पटवून देण्यासाठीं वामन मल्हार आपल्या कादंबऱ्यांतून ज्या युक्त्या योजतात त्या खरोखरच चिंतनीय आहेत. 'रागिणी' कादंबरींत, कारासिनी जातीबद्दल आनंदरावांनीं केलेल्या संशोधनाचें हस्तलिखित आपल्यापाशीच असून तें आपण लवकरच प्रसिद्ध करणार आहोंत असें आश्वासन ते देतात; व कारासिनी जातींतील लोकांकडून विजयगांवकर मंडळीचा जो छळ करण्यांत आला त्यासंबंधीचा तो सगळा अद्‌भुत, असंभाव्य, कल्पित कथाभाग हा वास्तव आहे असें भासविण्याचा प्रयत्न करतात. 'आश्रमहरिणी' मध्ये तर कथेच्या मूळ कल्पनेपासूनच वास्तवाभास निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनीं केलेला आहे : कथा पुराणकालीन आहे; ज्या पुराणांतून ती निवेदलेली आहे, तें पाराशरपुराण आपणास सांपडलेलें आहे असें ते सांगतात; एवढेंच नव्हे तर त्या पुराणाची दुसरी एक प्रत आपणास उपलब्ध झालेली असून

ऱ्या प्रतींतील पाठान्वये आपण आपल्या कथेच्या दुसऱ्या आवृत्तींत कांहीं ठिकाणीं आवश्यक ते फेरबदल केलेले आहेत असेंहि ते बजावतात : कथेचें ' भाषान्तर करतांना अर्थ स्पष्ट व सुबोध करण्याकडे विशेष लक्ष दिलें आहे. पोथीचीं पहिलीं पानें फाटलीं असल्यामुळें पहिले मंगलाचरणाचे श्लोक अर्धेमुर्धेच आहेत; ते अर्थात् ह्या भाषान्तरांत गाळले आहेत. तसेंच कांहीं दुर्बोध श्लोकही गाळले आहेत, हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे ' असें ते सत्यकथनाचा आव आणून प्रस्तावनेंत लिहितात व शेवटीं ' मूळ पोथी पुढे मागे छापण्याचा विचार आहे, किंबहुना ती छापावीच लागेल. ' असें आश्वासनहि देऊन हें वास्तवाभासाचें कपटनाटक पुरेपूर रंगवितात. ह्या कल्पित पोथींतील निवेदन अध्यायवारी करीत असतां त्यांनी ठिकठिकाणी मजकुरांत ज्या टीपा व तळटीपा जोडल्या आहेत—कोठे कांही दुर्बोध श्लोकांचा अर्थ नीट लागत नसल्याचा उल्लेख आहे, कोठे प्रक्षिप्त भाग दिसून आल्यामुळे तो गाळल्याचा उल्लेख आहे, कोठे विशिष्ट श्लोकांचा अर्थ ग्राम्य किंवा अश्लील असल्यामुळे तो पूर्णतया देण्याचें आपण टाळीत आहोंत असें स्पष्टीकरण आहे—ह्या सगळ्याच टीपा त्या मूळ पोथीबद्दल वाचकांच्या मनांत कुतूहल उत्पन्न करितात व वास्तवाभास उत्पन्न करण्याच्या लेखकाच्या हेतूला भरपूर मदत करितात. तत्कालीन पुराणप्रिय व नवविचारी अशा दोन्हीहि वाचकांना लेखकाच्या ह्या युक्त्या—युक्त्याऐवजी प्रयुक्त्याच म्हटलेलें बरें त्यांना—चकवूं शकल्या ह्यांत आश्चर्य कांहींच नाही. मराठी कथालेखनांत असल्याप्रकारच्या युक्त्या आतांपर्यंत कोणीच योजलेल्या नव्हत्या; त्यामुळे खुद्द ' केसरी 'चा परीक्षणलेखक फसला तर इतरांची काय कथा ? कादंबरीच्या प्रकाशनानंतर आपल्याकडे बऱ्याच लोकांकडून मूळ पोथीविषयी विचारणा झाली असें वामनराव म्हणतात, तें स्वाभाविकच वाटतें. ' सुशीलेच्या देवां ' तहि सुशीलेचें आपण रेखाटीत असलेलें जीवनचरित्र हें कल्पित नसून वास्तव आहे असें भासविण्यासाठी वामनरावांनी नानापरीच्या युक्त्या योजल्या आहेत. सुशीलेनें जें ' आत्मचरित्र ' अंशतः लिहिलेलें आहे तें आपणांस वाचावयास मिळालेलें असून शिवाय आपण लिहिलेलें हें तिचें कथाचरित्र त्याच्या मुद्रणापूर्वी तिने वाचलेलें व जागोजाग दुरुस्त केलेलें आहे असें ते बजावतात. परंतु नुसतें तसें सांगून ते थांबत नाहीत तर प्रत्यक्ष कथानिवेदनांत कांही ठिकाणी सुशीलेच्या

त्यावरील अभिप्रायाच्या तळटीपा देऊन आपलें विधान वास्तव आहे असें दाख विण्याचा प्रयत्न करितात; चौदावें प्रकरण तर 'सुशीलेच्या टीपा व आत्मचरित्रां तील भाग' ह्यांचें मिळूनच तयार झालेलें आहे व तें सर्व सुशीलेच्या हस्तलिखित आत्मचरित्रांतून उतरून काढलेलें आहे असें लेखकानें दर्शविलें आहे. ह्या प्रकरणाच्या सुरवातीच्याच परिच्छेदांत सुशीला लिहिते, " या ग्रंथकाराने माझ्या लहानपणची हकीकत अनेक लोकांकडून मिळवून त्यांतील त्याला मनोरंजक वाटलेला भाग बऱ्याच यथार्थतेने वर्णन केला आहे; पण एकदोन प्रकरणांत फारच चुका झाल्या आहेत, असें मला वाटतें. असें कां व्हावें हें मला समजत नाही. ग्रंथकार आज बरींच वर्षें माझ्या चांगल्या ओळखीचे आहेत. माझें अलीकडील कांही वर्षांतील अंतरंग त्यांना चांगलें माहीत आहे. माझ्या अंतरंगांत त्यांनी प्रवेश केला आहे. तेव्हां त्यांच्यापासून मी काय लपविणार ?— पण आताच्या एकदोन प्रकरणांत ते विलक्षणच घसरले. त्यांना कल्पनाशक्ति आहे. पण ते पुष्कळ ठिकाणी घसरले आहेत ही आश्चर्याची गोष्ट आहे. पुष्कळ पुरुष असे फसतात असें माझ्या अनुभवाला आलें आहे. " सुशीलेचीं ही वाक्यें लेखकाला हव्या असलेल्या वास्तवाभासाची रंगत चांगलीच वाढवितात असें दिसून येईल. 'सुशीलेच्या देवां' त वामनरावांनी खाजगी पत्रांचा व वर्तमानपत्रांतील उताऱ्यां चाहि ह्याच कारणासाठीं मोठ्या कौशल्याने उपयोग केलेला आहे. तो त्यांच्या लेखनप्रकृतीलाहि अत्यंत उपकारक कसा ठरला, हें आपण वर पाहिलेंच आहे. प्रो. ना. सी. फडके ह्यांच्यासारख्या चोखंदळ कलाकोविदाने आपल्या 'प्रतिभा-साधनांत' ह्याकरितां वामनरावांची पाठ थोपटली आहे. ह्या कादंबरीपासून वामन-रावांनी वास्तवाभास उत्पन्न करण्याची आणखी एक वेगळीच युक्ति योजलेली दिसून येते; ती अत्यंत परिणामकारक ठरली आहे; ती युक्ति म्हणजे आपलें स्वतःचें व्यक्तिचित्र कथापटांत घालणें ही होय. सुशीला, सुनंदराव, बळवंतराव यांचेबरोबरच 'वामनराव' हि 'सुशीलेचा देव' कादंबरींत मधूनमधून अवतरत असल्यामुळे एकंदर कथेला एक विलक्षण प्रकारचा जीवंतपणा व खरेपणा येतो; कथेंत वर्णिलेल्या घटनांच्या वास्तविकतेबद्दल, सत्यत्वाबद्दल एक प्रकारचा अनुकूल ग्रह वाचकांच्या मनांत त्यामुळे आपोआप निर्माण होऊं लागतो : निवेदनांत आपोआपच जिव्हाळा येतो व आपल्याबरोबरच वाचकांना कथाप्रवाहांतून पुढें नेण्याला लेखकाला सोयीचें, सोपें पडतें. वामनरावांना ह्या प्रयुक्तीची उपकारकता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23694 दि. 1.7.65—

किती जाणवली हें तिचा त्यांनी 'इंदु काळे व सरला भोळे' ह्याहि कादंबरींत जो यथोचित उपयोग करून घेतलेला आहे त्यावरून दिसून येतें. 'वा. म. जोशी' हें ह्या कथेंत मध्येच अवतरलेलें पात्र कथेंतील आपल्या भोवतालील प्रमुख पात्रांच्या सजीवतेंत अभावितपणें महत्त्वाची भर घालतें. ह्या कादंबरींतील पत्रात्मक निवेदनांतहि वामनरावांनीं कांही ठिकाणी ता. क. जोडून, कांही ठिकाणी कंसांत मजकूर घालून, तर कांही ठिकाणी "लाडिक-पणानें हट्ट करणाऱ्या छोटूला कडेवर घेऊन सौभाग्यवतीने चहा आणलेला आहे तो पाहून सुचलेली उपमाहि येथें लिहितों. आणि ५–१० मिनिटें चहा पिण्याकरितां आणि सौ. शीं बोलण्याकरितां थांबतों," अशीं वास्तवदर्शी वाक्यें पत्रांत उपयोजून आपलें वास्तवाभास निर्माण करण्याचें कार्य मोठ्या कौश-ल्याने साधलें आहे. ह्या मुद्द्यासंबंधी अधिक न लिहितां एवढेंच म्हणतों की वामनरावांच्या ठिकाणीं जी कल्पकता होती—जिचा मनोहर विलास त्यांच्या 'नवपुष्पकरंडकां' तील लिखाणांत विशेष दिसून येतो—ती असल्या प्रकारच्या ललितलेखनांतील कौशल्यप्रकारांना जन्म देण्यास अत्यंत अनुकूल होती. नवनिर्मिति कशी साधावी हें तिला स्वभावतःच उमजत होतें. त्यामुळे त्यांच्या लिखाणांत आधुनिक ललितलेखकांचें तंत्रकौशल्य व त्यांची आकर्षक साफ-सफाई जरी कोठे आढळत नसली तरी वर निर्देशिलेल्या प्रकारच्या कौशल्य-युक्त लेखनपद्धतींचा त्यांनी ठिकठिकाणीं अवलंब केलेला असल्यामुळे त्यांत एक प्रकारचें गमतीदार आधुनिकत्व व नावीन्य आलेलें आहे, असें मात्र वाटतें; व हें आधुनिकत्व तुम्हा आम्हासारख्या लेखनकलाकुसरीला लाचावलेल्या आधुनिकांचें चित्तहि थोड्याबहुत प्रमाणांत स्वतःकडे वेधून घेतें यांत शंका नाहीं. वामनरावांच्या ह्या लेखनयोजनांत जी एक प्रकारची सहजता दिसून येते, जें पूर्वयोजनाराहित्य दिसून येतें, जो थोडासा निष्काळजीपणा दिसून येतो तोहि मोठा मनोवेधक वाटतो.

## नवपुष्पकरंडक : कल्पतेचाच विलास

ज्या कल्पकतेंतून ही ललितलेखनांतील गमतीदार कलाकुसर जन्माला आलेली आहे त्याच कल्पकतेच्या मनोहर विलासांतून 'नवपुष्पकरंडकां' तील

बहुतेक लिखाण निर्माण झालें आहे; ह्या सर्व लिखाणास लघुकथा, कथा किंवा गोष्ट ह्या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मयप्रकारांत ढकलतां येणार नाही; कारण त्यांतलें बरेंचसें लिखाण हें त्या वाङ्मयप्रकारांत मोडेल असें नाही व त्यांतील हेंच लिखाण अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'बायकांना उजव्या डोळ्याने दिसत नाही!', 'दुसरा एक शोध', 'अप्रकाश किरणांचा दिव्य प्रकाश', 'नाटकराव' ह्या सर्व लिखितांना कथा असें कसें म्हणतां येईल? त्यांना कथाशरीर नाही. व्यक्तिचित्रणात्मक वा प्रसंगचित्रणात्मक अशी कांही चित्राकृति साधण्याचा त्यांतून प्रयत्नहि झालेला दिसत नाही. त्यांत जी चमत्कृति साधण्याचा प्रयत्न केलेला आहे ती कल्पनाचमत्कृति आहे; व ती उत्तम साधली गेलेली असल्यामुळे त्यांचें वाचन कोठेहि कंटाळवाणें होत नाही. ह्यांतील 'नाटकराव' व 'अहंकार' ह्या दोन लिखितांतूनच थोडाफार व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न दिसून येत असल्यामुळे त्यांना कथा ह्या सदरांत टाकावयास हरकत नाही; परंतु ह्या सर्वच लिखाणांतून उपहासाचा सूर मुख्यत्वाने ऐकूं येत आहे व म्हणूनच त्यांचें स्वरूप मूलतःच उपहास-प्रधान लेखांसारखें दिसतें. 'बायकांना उजव्या डोळ्याने दिसत नाहीं!' ह्या लिखाणांतील केवळ कल्पनाविलासाने साधलेला उपहास हा फारसा बोचक नसून त्याचा हेतु हसतखेळत मिस्किलपणे कल्पनाविषय हास्यास्पद करणें हाच आहे; परंतु मौज कशी की सदर लेख वाचीत असतां कल्पनाविषयाची हास्यास्पदता लक्षांत येऊन जितकें हास्य निर्माण होतें, त्यापेक्षा अधिक आनंदयुक्त आश्चर्य लेखकाच्या कल्पनाविलासचातुर्याबद्दलच वाटतें. वामनरावांच्या अत्यंत सुसंस्कृत विनोदबुद्धीचेंहि स्वरूप ह्या लेखांत पहावयास मिळतें; ह्या लेखांतील विनोद पुष्कळसा शुद्ध स्वरूपाचा असला तरी 'मन मोठें नसलें तरी मान कसा मिळवावा? बुद्धि फारशी नसतांना बुद्धिमान् म्हणून कसें गणलें जावें?', ह्या 'मनाला तळमळ लावणाऱ्या' प्रश्नांचीं उत्तरें देणाऱ्या बावळटराव मानलोभे ह्यांचा 'दुसरा एक शोध' मात्र सुधारकावर टीका करणाऱ्या विशिष्ट सनातनी वर्गाचा उपहास करण्याच्या बुद्धीनेच लेखकाने येथें नमूद केला आहे. "'वर' यावयाचें असल्यास 'वरवर' पहावें, वरकान्ती वागावें, हें माझें मानसशास्त्रांतील तत्त्व तर्कशास्त्राने किंवा भाषाशास्त्राने स्पष्टपणे सिद्ध होत आहे" असें मानलोभे आपल्या मित्राला

कळवितात; "सुधारकांवर टीका करितांना त्यांचा वरचा पोषाख, त्यांचे डोकी-वरचे केस, ( केस हे शरिराच्या अगदी वर असल्यामुळे टीका करतांना त्यांचें नांव प्रत्येक पानांत निदान दहादा तरी आलें पाहिजे, असा आनुषंगिक नियम मीं काढला आहे ) त्यांचे वरचे स्वर्गातले वाडवडील, इत्यादिक 'वरच्या' गोष्टींचा निर्देश करून टीका करावी म्हणजे खचित मान वाढेल" असें ते पुढे बजावतात. एवढेंच नव्हे तर 'ज्याप्रमाणे लेखणी दौतींत फार खोल बुडविली तर लेखणी गुळगुळीत होते व आपल्याच हाताला डाग पडतात, त्याचप्रमाणे, सदद्विवेकबुद्धींत मनाने खोल प्रवेश करून टीका करूं लागल्यावर टीका बुळबुळीत होते व इतरत्र डाग जरी नसले तरी आपलें मनहि डागांनी परिपूर्ण आहे असें दिसून येतें, म्हणून टीका करतांना सदसद्विवेकबुद्धीचा खोल विचार टाकून टीका करण्यास आरंभ करावा, म्हणजे लेखणी जलद चालते, तिला थोडासा तिखटपणा येतो व लोकांत लवकर मानमान्यता येते,' असाहि उपदेश श्री. मानलोभे करतात. हीं मानलोभ्यांचीं—म्हणजे वामनरावांचीं वाक्यें वाचीत असतां आपण श्रीपाद कृष्णांच्या 'सुदाम्याच्या पोह्यां' तील एखादा खोंचक परिच्छेद वाचीत आहोंत की काय असा भास होतो. उपरोधपूर्ण लिखाणाला आवश्यक असलेली तीच शिवरामपंती व कोल्हटकरी कल्पकता वामनरावांच्या ह्या तुरळक लेखांतून प्रकर्षाने दिसून येते. वामनरावांच्या ह्या असल्याच शिवरामपंती कल्पकतेचा प्रत्यय 'अप्रकाश किरणांचा दिव्य-प्रकाश' ह्या लिखाणांतहि दिसून येतो. बाबू प्रफुल्लकुमुद ह्यांच्या ह्या अप्रकाश किरणांच्या शोधामुळे किती ब्रह्मघोटाळे उडतात याचें वर्णन करीत असतां वामनरावांच्या कल्पकतेने असे प्रसंग कल्पिले आहेत की तद्द्वारा, वेळी अवेळी सुधारकांवर घसरणाऱ्या तत्कालीन ढोंगी सनातन्यांवर उपरोधपूर्ण टीका करण्याचें त्यांचें उद्दिष्ट सहज सिद्धीला गेलें आहे. नाटकगृहांत, शाळांत, फराळाच्या दुकानांत, वेश्यागृहांत, राजकीय सभास्थानीं सगळीकडेच 'ह्या क्रांतिकारक' शोधाने गडबड उडवून दिली. फराळाच्या दुकानांत, वेश्यागृहांत 'अप्रकाश आंगठी' बोटांत घालून सोंवळ्या बायका, हरिदास, पुराणिक, वेदमार्तंड व छाटीधारी स्वामीहि घुसूं लागले. राजकीय सभांतून सरकारी नोकरांनीं गर्दी करण्यास प्रारंभ केला, जहाल मवाळ पक्षाभिमानी एकमेकांचीं डोकीं विनासायास फोडूं लागले; ह्या गोंधळाचें वर्णन

करितांना वामनरावांनी आपला सूर कायमचा उपरोधाचा न ठेवल्यामुळे ह्या कल्पनाविलासात्मक प्रसंगचित्रणांत कांही ठिकाणी अगदीं शुद्ध स्वरूपाचा विनोदहि निर्माण झाला आहे. विशेषतः नाटकगृहांतील व सभास्थानावरील गमती वर्णितांना ह्या शुद्ध विनोदाची निर्मिती सहजासहजी झाली आहे.

'अहंकार' ह्या कथेचा उपोद्घात अकारण तत्त्वचर्चात्मक केलेला असल्यामुळे तो मूळ कथेला दिलेल्या ठिगळासारखाच भासत असला तरी ही कथा तिच्यांतील कल्पनाविलासामुळे व मनुष्यस्वभावांतील कांही छटांच्या सूक्ष्मकोमल दर्शनामुळे लक्षांत राहते; मेघराज ह्या कवीचें चित्र रेखाटतांना वामनरावांना वऱ्याचशा तत्कालीन काव्यसंकेतांवर उपरोधात्मक टीका करावयाची होती, असें दिसून येतें. ह्यांतील कवितामिश्रित गद्य लेखासंबंधीचें मेघराजाचें व त्याच्या मित्राचें संभाषण वाचीत असतां आपणांस गडकऱ्यांच्या 'कवीच्या कारखान्यां'तील 'हरिणाला पाहुनि जसा चित्ता...' इत्यादि ओळींतील पद्यात्मक गद्याची वा गद्यात्मक पद्याची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. (गडकऱ्यांच्या 'लतिके'ला पाहतांच जशी वामनरावांच्या 'उत्तरे'ची थोडीफार आठवण होतेच, तसला हा थोडाबहुत प्रकार असावा.) तत्कालीन कवींप्रमाणे वामनरावांना कांहीं तत्कालीन संपादकांवरहि टीका करावयाची होती: 'चंपकतरू'चा संपादक मेघराजास सांगतो, "सुधारकी लेख आम्ही छापणें म्हणजे सुधारकांचेंच काम आम्ही करण्यासारखें आहे. तें करण्याइतकें आम्ही मूर्ख नाहीं." व सरकारी रोषास सदैव घाबरणारा 'तारांगणा'चा सुधारक संपादक 'तंबाखू नको' शब्दांत खून शब्द गर्भित असल्यामुळे मेघराजाकडून त्याच्या लेखांतील मजकूर बदलून मागतो. राजकीय सुधारणांच्या बाबतींत जहाल असलेल्या परंतु सामाजिक सुधारणांच्या बाबतींत पुराणमताभिमानी असलेल्या राजकीय जहालांवर व राजकीय सुधारणांच्या बाबतींत नेमस्त असलेल्या व सामाजिक सुधारणांच्या बाबतींत जहाल असणाऱ्या मवाळांवर वामनरावांनी येथे मिस्किलपणे मोठी गमतीदार टीका केली आहे; ती आज वाचतांनाहि मौज वाटते. ह्या संपादकांबरोबरच वामनरावांनी मानभावीपणे तोंडदेखलें बोलणाऱ्या कांहीं टीकाकारांचेंहि जातां जातां चित्र रेखाटलें आहे, परंतु तें चित्र तसल्या टीकाकारांवर उपहासगर्भ टीका करण्यासाठीच केवळ नसून मेघराजासारख्या चिकित्साशून्य कवीची हास्यास्पद स्थिति व्यक्त करण्यासाठीहि रेखाटलेलें आहे असें दिसून येतें. मेघराजाच्या स्तुतीस

भाळून त्याच्या काव्याचें वाड नाही नाही म्हणतां काखोटीस मारून घेऊन जाणाऱ्या त्याच्या मित्राचेंहि चित्र वामनरावांनी लक्षांत राहण्याजोगें रंगविलें आहे. ह्याच संग्रहांतील 'नाटकराव' ह्या, नाटकलेखनाचें वेड लागलेल्या व्यक्तीचें काल्पनिक चित्र रेखाटतांना तर तत्कालीन नाट्यवाङ्मयांतील अनेक अनिष्ट संकेतांवर उपरोधात्मक टीका करण्यापलीकडे वामनरावांचा दुसरा हेतूच नव्हता असें दिसतें; नाटकरावाला 'दृश्यवर्णनात्मक' ( Realistic )—वास्तवपूर्ण नाटकें रचावयाचीं असतात; परंतु मौज अशी की वास्तववादी नाटक म्हणजे काय ह्याचीच त्याला नीटशी कल्पना नसते, एवढेंच नव्हे तर 'कल्पनाप्रचुर' ( idealistic ) नाटकांनाच तो वास्तववादी समजत असतो. त्याने नाट्यलेखनाविषयीं कांहीं नियम ठरवून टाकलेले असतात. त्यांतला पहिला नियम म्हणजे नाटकांतील सगळे नोकरचाकर हे विनोदी असलेच पाहिजेत हा असतो. ह्यासंबंधी तो असें सांगतो, 'व्यवहारांत जरी आपण आपल्या चाकरांच्या बावळटपणाला व बेअकलीपणाला कंटाळलेले असलों तरी नाटककाराने चाकरनोकर विनोदी हे दाखविलेच पाहिजेत.' : 'त्राटिकें' तील पिल्याचें उदाहरण येथें अनुषंगानेच आलें आहे. नाटकरावाचा दुसरा नियम 'अतिशयोक्ति' शिवाय काव्य नाही, हा असल्यामुळे नायक हा शौर्याचा पुतळा व त्याचा प्रतिस्पर्धी हा 'तळ्' म्हणतांच लटलट कापणारा असेच रंगविले गेले पाहिजेत असें त्याचें मत असतें. नाटक हें केवळ मनोरंजनाकरितांच लिहिलें जातें असें त्याचें तिसरें मत असतें व मनोरंजक नाटकांत 'प्रेमबद्ध ( म्हणजे कामासक्त )' युवयुवतींचीं संभाषणें, एकान्तांतील प्रसंग इत्यादि गोष्टी आवश्यक आहेत असें तो समजत असतो. परंतु भोवतालच्या समाजांत तसले 'लोकप्रवादात्मक' प्रकार त्याला फारसे पाहावयाला मिळत नसतात आणि वास्तव-वादी नाटक लिहिण्याची तर दुर्दम्य इच्छा असते त्यामुळे तो नाट्यविषयासाठी अडून राहिलेला असतो. त्याच्या ह्या अडचणीवर भाष्य करितांना त्याचा मित्र काय म्हणतो तें पहा : "संकुचित बुद्धीचा कृपण दुर्धारक आणि त्याची काम-विव्हल झालेली सद्‌गुणी मुलगी; अथवा सुधारणेच्या वेडाने बहकलेला सुधारक व शिक्षणाने बिघडलेल्या त्याच्या मुली ह्या पात्रांशिवाय तुझ्यासारख्यांना नाटक रचतां यावयाचें नाहीं." 'मोर, एल्एल्. बी.', 'तरुणी–शिक्षण नाटिका', 'स्वैरसकेशा', 'सद्यः सुधारणार्थ', 'रूढि दिग्विजय उर्फ आधुनिक सुधारणांची

सोळा आणे फजिती ', ' संमतिकायद्याचें नाटक ', ' एज्युकेटेड छबकडी ', व ' प्रेमाभास ' ह्या सारख्या समाजसुधारणांना विरोध करणाऱ्या व त्यांचें विकृत स्वरूपांत चित्रण करून अज्ञ, हीनाभिरुचि समाजाचें घटकाभर मनरंजन करूं पाहणाऱ्या तत्कालीन व त्याच्या थोड्या अगोदरच्या काळांतील नाट्यवाङ्मयावर वामनरावांना खरमरीत टीका करावयाची होती व ती त्यांनी नाटकरावाबरोबर झालेल्या ह्या काल्पनिक संवादाच्या द्वारा उपरोधपूर्ण रीतीने केली आहे. समाजसुधारणांचें पाऊल पुढें पडलें होतें : स्त्रिया सुविद्य, सुशिक्षित व स्वतंत्र बनूं पहात होत्या, अशा वेळीं नाटकरावाला उद्देशून लिहिलेलीं पुढील वाक्यें वामनराव ह्या प्रतिगामी नाटककारांनाच उद्देशून बोलत होते असें वाटतें : " तुझ्या सारख्याला त्यांच्यावर नाही नाटक रचता यायचें. त्या सुशिक्षित आहेत, तरुण आहेत, परपुरुषांशीं बोलतात; परंतु त्यांचें मन त्यांच्या वडिलांना असंमत असलेल्या तरुणांवर बसलेलें नाहीं. शिक्षणामुळे त्या उद्धत व फाजीलहि झालेल्या नाहीत, तेव्हा त्यांच्यावर नाटक रचून सुधारकांची तुला चेष्टा करतां यावयाची नाही. " वामनरावांच्या असाधारण कल्पकतेंतून निर्माण झालेल्या ह्या लिखाणांतच मी 'रागिणीं'तील शास्त्रीबोवांच्या तोंडून वामनरावांनी वदविलेली ' अधिकारनगरी'ची रूपककथा घालतों. स्त्रियांच्या हक्कासाठी वेळीअवेळी भांडणाऱ्या उत्तरेला ही शास्त्रीबुवांनी स्वप्ननिवेदनाच्या नांवाखाली सांगितलेली रूपककथा बोचते हें स्वाभाविकच वाटतें; ती रूपककथा निर्मितांना वामनरावांना शास्त्रीबुवांइतकाच उपरोधपूर्ण कल्पनाविलास साधण्याचा आनंद लाभला असावा.

' नांव बदलीन ', ' चारित्र्यक्रांति ', ह्या आपल्या गोष्टींचा समावेश वामनरावांनी ह्या संग्रहांत व ' दोन स्वदेशीचा लढा ' हिचा समावेश ' विचार-विलासांत ' केलेला आहे. यांतील ' चारित्र्यक्रांति ' ह्या कथेंतील नायिका मेरी हिचें स्वभावदर्शन करितांना वामनरावांनी आपली नेहमीचीच स्त्रियासंबंधीची उदार व गुणग्राही दृष्टी ठेवलेली असली व कथेच्या अंतीं नासरखान ह्या बटलरच्या अतर्मनांत चाललेल्या द्वन्द्वाचें कौतुकास्पद चित्रण केलेलें असलें तरी ह्या तिन्हीहि कथांत वैशिष्ट्य असें कांही नाही. ' दोन स्वदेशींचा लढा ' ही कथा तर वामनरावांनी अनेक प्रकरणांतून निवेदिलेली असून तिचें वाचन—तिच्यांतील राजकारणात्मक तत्त्वज्ञान लक्षांत घेऊनहि—अत्यंत

कंटाळवाणें होतें. ' नांव बदलीन ' ह्या कथेसंबंधी इतरत्र थोडा उल्लेख आलेलाच आहे.

## वामनरावांचें नाट्यपर लिखाण : कल्पनाविलास :

वामनरावांच्या कल्पनाविलासात्मक लेखनांतच अन्तर्भूत होणाऱ्या त्यांच्या नाट्यपर लिखाणाचा परामर्श घेऊन हें त्यांच्या ललितलेखनाचें विवेचन संपवूं.

वामनरावांनी ' विस्तवाशीं खेळ ! ' हें एक ' स्वतंत्र सामाजिक नाटक ' लिहिलेलें असून कांही संवाद व नाटिका लिहिलेल्या आहेत. त्यांतील ' विस्तवाशीं खेळ ' ह्या नाटकाचें ओझरतें परीक्षण वर एके ठिकाणीं येऊन गेलेंच आहे : वामनरावांनी ज्या कथानकाचा ह्या नाटकांत उपयोग केलेला आहे त्यावरच जर कादंबरी लिहिली असती तर ती निश्चित चांगली उतरली असती असें मला वाटतें. त्यांचेजवळ नाट्यलेखनाचें कसब तितकेसें नसल्यामुळे ह्या नाटकांतील एकहि व्यक्तिचित्र जीवंतपणें डोळयांत भरत नाहीं; त्यामुळे व्यक्तिव्यक्तींच्या संघर्षणांतून जें नाट्य निर्माण व्हावयाला हवें तें कोठेंच निर्माण होत नाही. अमृतराव व विभाकर ही जोडी सगळया नाटकांत वावरते. परंतु नाट्यात्मक प्रसंगांतून त्यांचें व्यक्तिमत्व क्वचितच प्रत्ययास येतें : प्रेमापेक्षां जनसेवेला व देवसेवेलाच अमृतराव महत्त्व देतो असें दिसते, परंतु सगळया नाटकांत प्रेमाच्या तकलादी कपटनाटकालाच इतकें अवास्तव महत्त्व येतें की त्याची तीच ती चमत्कृतिशून्य पुनरुक्ति कंटाळवाणी वाटते. पात्रें हवीं तेव्हा, हवीं तशीं, हवीं तेथे, हव्या त्याच्या इच्छेनुसार प्रवेश करतात. हवा तितका वेळ रंगभूमीवर राहतात. नाटककाराच्या मनांत येतांच निघून जातात; नाट्यात्मक प्रसंगांच्या सुसंगत चित्रणांतून जें ' नाटक ' निर्माण व्हावयाला हवें असतें तें ह्यांत निर्माण होतांना दिसत नाहीं तेव्हा ह्याची कादंबरीच झालीच असती तर बरें झालें असतें असें मीं जें म्हटलें तें पटण्यासारखें आहे.

वामनरावांनी लिहिलेले नाट्यात्मक संवाद हे विद्यार्थि-विद्यार्थिनींच्या संमेलनप्रसंगीं उपयोगी पडावेत ह्या हेतूनेंच लिहिलेले असले व अर्थात् विशिष्ट नीतितत्त्वाची शिकवणूक हेंच त्यांचें उद्दिष्ट असलें तरी त्यांतून वामनरावांच्या लिखाणांतील बरींचशीं वैशिष्टयें व्यक्त झालीं आहेत. कोणत्याहि विषयाचीं सर्व अंगें अवलोकण्याची व दर्शविण्याची त्यांची संवय, कल्पनाविलास व शब्दविलास ह्यांवर आधारलेला प्रसंगोचित विनोद, नवनिर्मितिक्षम प्रतिभेचा अभिनव कल्पना-

विलास, स्त्रीमनाचें म्हणजेच स्त्रीस्वभावाचें अचूक परंतु सहानुभूतिपूर्ण दर्शन, सर्वच लिखाणाच्या बुडाशीं नेहमीच आढळणारी प्रबळ तत्त्वनिष्ठा इत्यादि त्यांच्या सगळयाच लिखाणांत आढळणारे गुणविशेष ह्याहि संवादांत दिसून येतात मात्र हे गुणविशेष जसे दिसून येतात तसेच त्यांच्या सर्वच लिखाणांत आढळून येणारे कांहीं दोषविशेषहि ह्या लिखाणांत दिसून येतात. अत्यंत शिथिल रचना, अत्यन्त साध्या सरळ अशा हरघडीच्या जीवनाचें चित्रण करतांनाहि मधूनच अकारण अत्यंत भडक व म्हणूनच विसंगत वाटणाऱ्या अशा अद्भुत, असंभाव्य घटनांचें दर्शन घडविण्याइतकी बेपर्वाई इत्यादि दोष ह्यांत विशेष आढळतात. 'स्वराज्यमेळा' हा संवाद राजकीय जहाल मवाळांच्या काळांत लिहिलेला असल्यामुळे व त्यांत दंडेलीबाई, राजकारणबाई, सोवळ्याबाई, सामाजिकबाई, गोरक्षबाई, दक्षिणी दुकानदारीणबाई, गुजराथीणबाई. पारशीणबाई, राष्ट्रीय शिक्षणाबाई, तालीमबाई, एकीकरणबाई, मुसलमानीणबाई, स्वदेशीबाई, व्यापारीबाई, शिक्षकीणबाई, सत्याग्रहीबाई इत्यादि पात्रें आलीं आहेत. तेव्हां त्यांच्यामध्ये कोणत्या प्रकारचा संवाद होत असेल ह्याची कल्पना सहजच येण्यासारखी आहे. ह्या संवादात्मक भांडणाचें पर्यवसान मारामारींत होऊन त्याचा सामरोप वामनरावांनी समंजसाबाईकडून पुढील शब्दांत केला आहे : "कार्य करतां करतां दुसऱ्यांना कधी कधी विरोध करावा लागेल; एखाद्या वेळेस भांडावें लागेल—पण हा विरोध आणि हें भांडण निरुद्योगी, गांवढळ, आपमतलबी, भांडकुदळ, हलकट माणसांच्या भांडणाप्रमाणे नसावें; त्यांत कुविचार. क्षुद्रत्व कपट, अहंकार, द्वेष, मत्सर इत्यादिकांचा अंशहि नसावा," हेंच समंजसबाइच्या उपदेशाचें सार आहे. 'लीलारहस्य' ह्या श्रीकृष्णाच्या म्हणजेच परमेश्वराच्या लीलांचें रहस्य सूचित करणाऱ्या शब्दविलासात्मक व कल्पनाविलासात्मक संवादांत श्रीकृष्ण, यशोदा व तक्रारी करणाऱ्या गोपी वगैरे पात्रें आहेत. श्रीकृष्णाच्या तोंडीं दिलेल्या सगळ्याच भाषणांतून शाब्दिक कोटिक्रमावर आधारलेला विनोद साधला असून एकंदर संवाद त्यामुळे मोठा चटकदार उतरला आहे. आपल्या लीलांचें रहस्य श्रीकृष्णाने—म्हणजेच वामनरावांनी बाल श्रीकृष्णाच्या तोंडून संवादाच्या शेवटीं आलेल्या भाषणांत स्पष्ट केलें असून तें खालीलप्रमाणे आहे : "ज्याला एका अर्थी सूक्ष्म आणि एका अर्थी विशाल अशी दृष्टी आली आहे, त्याला ईश्वरी योजना सात्त्विक

समंजसपणाची आणि एकंदरींत उच्चतम अशा आनंदाने परिपूर्ण अशी भासेल. ईश्वराची योजना काय, काव्य काय, गायन काय, किंवा सज्जनांचें मन काय, मर्मज्ञ असेल त्यालाच त्यांत मौज, इतरांना त्यांतलें रहस्य कळायचें नाहीं; आणि त्यामुळं ' इतरेजन ' कांहीं तरी त्यांत दोष काढीत राहायचेच. "

' ही काय रीत झाली ? ' ह्या संवादांत वामनरावांनी लहान बालिकांच्या क्रीडनांतील स्वाभाविक नाट्य एका विशिष्ट मर्यादेपर्यंत मोठ्या कौशल्याने व म्हणूनच परिणामकारकपणे व्यक्त केलें आहे; ( उत्तम बालचित्रें रेखाटणें हें वामवरावांच्या प्रतिभेचें एक वैशिष्टयच होतें, हें मागें सूचित केलेच आहे. ) परंतु संवादाचे अन्तीं एका विशिष्ट तत्त्वाचें प्रतिपादन त्यांना हेतुपुरस्पर करावयाचें होतें म्हणून म्हणा किंवा अत्यंत भडकपणाचा व आत्यंतिकतेचा अवलंब केल्याशिवाय एखाद्या प्रसंगाचें दर्शन हें परिणामकारक उतरतच नाही ह्या कल्पनेने म्हणा त्यांनी ह्या संवादाच्या शेवटीं शेवटीं एका मागून एक अशा कांहीं अत्यंत असंभाव्य प्रसंगांची इतकी हास्यास्पद गुंफण केली आहे की संवादाच्या पूर्वार्धातील अकृत्रिम, आकर्षक वास्तवदर्शनावर त्यामुळे साफ बोळा फिरला आहे. ' अहंमन्य व अविचारी माणसं दुसऱ्या तशाच माणसांना रीत शिकवूं लागलीं म्हणजे गाढवं डुकरांना स्वच्छतेचें शिक्षण देत आहेत असा देखावा डोळ्यांपुढे उभा राहतो. जगांत असे देखावेच फार. किंबहुना संसार म्हणजे या देखाव्यांची मालिकाच आहे ! ' हें ह्या संवादाचें सार आहे. ह्या नंतरच्या ' स्वप्नच नाही तर काय ? ' ह्या नाटिकेचा विचार करूं लागलों की मला मोल्नार ह्या नाटककाराच्या Mima नाटकाची मधूनच आठवण होते. ब्रह्मदेव व नारद ह्या दोघांपुढे ब्रह्मदेवाची कन्या सरस्वती हिने करून दाखविलेल्या नाट्याची कल्पना ह्या नाटिकेच्या बुडाशीं आहे. ' मिमा ' नाटकांत सैतानासमोर असेंच एक नाट्य करून दाखविण्यांत येतें : त्यांतील पात्रें निर्जीव कळसूत्री बाहुल्या असतात. त्यांचा निर्माता त्यांना यंत्राच्या साहाय्याने सजीव करून त्यांचेकडून नाट्य करवून घेतो: इकडे बाल सरस्वती आपल्या मैत्रिणी असलेल्या अप्सरांवर मंत्रमोहिनी टाकते व त्यांचें मानवांत रूपान्तर करते. दोन्हीकडेहि ह्या नाटकांतील नाटकांत मानवीजीवनावरील टीकाच अभिप्रेत असल्यामुळे हें दोहोंतील साम्य झटकन् लक्षांत येतें; परन्तु ह्याखेरीज इतर

बाबतींत त्यांच्यामध्ये साम्य नाही. एवढेंच नव्हे तर वामनरावांची ही नाटिका अनेक रचनादोषांनी परिपूर्ण असल्यामुळे तिच्याकडे पाहून झालेली मोल्ना-रच्या प्रमाणबद्ध नाट्यकृतीची आठवण तेवढ्यावरच राहते; मात्र ही नाटिका वामनरावांच्या ठिकाणीं जी असाधारण कल्पकता होती—जिचें त्यांच्या 'नवपुष्पकरंडकांतील' छोट्या छोट्या कलाकृतींतील आकर्षक रूप आपण नुकतेंच न्याहाळलें—तिच्या मनोहर विलासाचें एक अत्युत्कृष्ट उदाहरण आहे. वामनरावांच्या ह्या कल्पकतेचा दर्जा किती वरचा होता हें ह्या नाटिके-वरून सहज लक्षांत येतें; वर्णद्वेषादि दोषांनी डागाळलेल्या ब्रह्मदेवाच्या ह्या मानवसृष्टिनाट्याचा उपहास करण्यासाठी बालसरस्वतीने त्यांच्या अवलोकनार्थ केलेलें तिचें नाट्यदर्शन मोठें मनोवेधक व मार्मिक आहे. हें नाटकांतील नाटक रचण्यांत वामनरावांनी बरेंच कौशल्य व्यक्त केलें आहे. प्रेक्षक व श्रोते ह्या भूमिकेंत असलेले ब्रह्मदेव व नारद ह्या नाटकाचा प्रयोग चालू असतांना उतावीळपणाने त्यांत ढवळाढवळ करूं लागतांच नाट्यनिर्मात्या बालसरस्वतीला आलेल्या रागाचें दर्शन घडविण्यांत वामनरावांनी विलक्षण सत्याभास निर्माण केला आहे. दुर्विलासराव, विद्यानंद, चारुशीला, डंफिस-साहेब, गुडमनसाहेब ह्या पात्रांकरवी वामनरावांनी जे कांही अत्यद्भुत, असंभाव्य व हास्यास्पद प्रसंग घडवून आणले आहेत, ते वगळल्यास ह्या नाटिकेंतील इतर भागांची रचना बरीच निर्दोष झाली आहे, असें म्हणतां येईल. आर्यावर्तांतील हे वर्ण केव्हां तरी नष्ट होणार आहेत का? ह्या सुनंदाने (एकट्या सुनंदांतच 'कली'ने प्रवेश केलेला नसतो) केलेल्या प्रश्नास सरस्वतीने दिलेलें उत्तर कल्पकतेच्या दृष्टीने स्मरणीय आहे. सरस्वती म्हणते, "अरे वर्णांना कां दोष देतोस? हे वर्णच एकमेकांजवळ व्यवस्थेने व सुसंगत रीतीने राहिले तर त्यांपासून सुंदर चित्रें उत्पन्न होतील! इंद्रधनुष्याकडे पहा, त्यांत वर्णांशिवाय काय आहे? पण त्याची शोभा किती आहे! अरे, आर्या-वर्तांतील वर्णांचा काय दोष आहे? भाषेंतले वर्ण व शब्द जे असतात त्यांपासूनच, एखादा कालिदास कर्णमधुर व रसपूर्ण काव्यें निर्माण करूं शकतो. तशीच गोष्ट आर्यावर्तांतील वर्णांची व जातींची आहे." असलीं वामनरावांच्या कल्पकतेचा प्रत्यय घडविणारीं स्थळें ह्या नाटिकेंत बरींच आहेत. मानवी सृष्टींतील—विशेषतः आर्यावर्तांतील वर्णद्वेषमूलक समाज-

जीवनाचें आपण ह्या नाटिकेंत रंगविलेलें दुःखद चित्र फारच एकांगी झालेलें असावें ह्या जाणिवेने समतोलवृत्तीचे वामनराव ब्रह्मदेवाच्या तोंडून वदवतात, "नारदा, माझ्या सृष्टीच्या एका अंशाचा अंश हिला आजच्या स्थितींत कळला आहे, म्हणून तिला माझी सृष्टि इतकी सदोष वाटते. पण कालान्तराने तिलाच कळेल की मी कांही तेवढा दोषी नाही. माझी सृष्टीहि अशीच नेहमी राहणार नाही. हळुहळू सुधारणा होत जाणार आहे." वामनरावांची विनोदवृत्तीहि ह्या नाटिकेंत ठिकठिकाणीं प्रगट होत आहे; सरस्वती व तिच्या मित्रमैत्रिणी ह्या 'देवदेव' खेळण्यासाठीं पहिल्याच प्रवेशांत एकत्र जमतात; तेथे वामनरावांनी आपल्या शब्दविलासात्मक व कल्पनाविलासात्मक विनोदाने सगळेंच वातावरण प्रसन्न करून सोडलें आहे. सुनंद हें पात्र सगळयाच नाटिकेवर प्रसन्नतेची पखरण करीत आहे. एकंदरींत ही नाटिका वामनरावांच्या उत्तम लिखाणांत शोभेल अशीच आहे.

### वामनरावांची विनोदबुद्धि :

वामनरावांच्या ललितलेखनाचा परिचय करून घेतांना ह्या सगळ्याच लिखाणांतून प्रगट होणाऱ्या त्यांच्या विनोदबुद्धीबद्दल चार शब्द लिहिल्याशिवाय राहवत नाही. वामनरावांच्या तत्त्वगंभीर लिखाणाला त्यांच्या प्रसन्न विनोदबुद्धीने विलक्षण उजळा दिलेला आहे; त्यांत कोठेंहि रुक्षपणा येऊं न देतां त्याचें वातावरण सर्वत्र प्रसन्न राखिलें आहे. वामनरावांची अर्थवाही, भाववाही, यथोचित उपमादृष्टान्तांनी फुललेली भाषाशैली ही ज्याप्रमाणे त्यांच्या लिखाणांत प्रसाद हा गुण आणावयाला कारण झाली आहे, त्याचप्रमाणे त्यांच्या जन्मजात खेळाडूवृत्तींतून व समतोल विचारांतून निर्माण झालेली त्यांची विनोदबुद्धीहि त्यांच्या लिखाणाची वाचनीयता, आकर्षकता, परिणामकारकता, व दर्शनीयता वाढवावयास कारण झाली आहे. वामनरावांच्या लिखाणांत एकहि पान असें नाही की ज्यांतील मजकुरांत यथोचित दाखले आढळणार नाहीत; लेखकाच्या प्रसन्न, निर्विकल्प मनाचें ज्यांत प्रतिबिंब उमटलेलें नाही; आपल्या भोवतालचें वातावरण नेहमी आनंदमय ठेविलें जावें, ह्या वृत्तीच्या छटा ज्यांत व्यक्त झालेल्या नाहीत. त्यांच्या लिखाणांत सगळीकडे आनंदाचें, प्रसन्नतेचें, सहानुभूतीचें, विवेकाचें साम्राज्य

पसरलें आहे. वामनरावांनी केवळ विनोद साधावा ह्या इच्छेने कांही ठिकाणी विनोद साधलेला आहे; नाही असें नाही; परंतु अशीं स्थळें थोडीं आहेत. ' विस्तवाशीं खेळ ' हें त्यांचें नाटक वाचीत असतां किंवा त्यांच्या कादंबऱ्यांतील कांही संवाद वाचीत असतां अशा प्रकारचा थोडासा अप्रस्तुत असा केवळ शब्दविलासात्मक विनोद त्यांत आढळतो, नाही असें नाही; परंतु मागेच सूचित केल्याप्रमाणे नाट्यात्मक संवादलेखनाची कला त्यांना फारशी साधत नसे हें लक्षांत घेतलें तर ह्या व्यंगाची कारणमीमांसा करितां येते व असेंहि मनांत येतें की थोड्याफार अप्रस्तुत भासणाऱ्या ह्या शब्दविलासात्मक विनोदाने तर ह्या संवादाची वाचनीयता कांही प्रमाणांत वाढविलेली नाही ना ? कांहीहि असलें तरी एवढें खरें की वामनरावांच्या लिखाणांत विनोदाच्या बाबतींत असलीं दोषस्वरूप स्थळें फार थोडीं आहेत. त्यांच्या विनोदबुद्धीचा खराखुरा विलास, त्यांच्या प्रतिभेच्या ठिकाणीं असलेल्या इतर शक्तींच्या विलासाप्रमाणेच त्यांच्या आत्मपर, निवेदनपर, स्मृतिचिंतनपर, लिखाणांतच प्रगट होतो. थोड्याशा इतस्ततः विखुरलेल्या अभ्रखंडांतून सूर्यकिरणं जमिनीवर पडावेत : त्यांच्यांतील दाहकता कमी व्हावी : जमिनीवर छायाप्रकाशांच्या लाटा रेंगाळत जाव्यात; मधूनच थंडगार वाऱ्याच्या झुळुका अंगाला स्पर्श करून जाव्यात; प्रवासाचा शीण न वाटतां मार्गस्थांना पुढे पाऊल टाकण्यास हुषारी यावी, अशा प्रकारचा सुखद प्रत्यय वामनरावांचें हें लिखाण वाचतांना येतो. " माझ्या लिखाणांत कोठे कोठे सूक्ष्म आणि सौम्य विनोद आहे असं मला वाटतं. पण पुष्कळांना तसं वाटत नाही. विनोदाची चर्चा चालली म्हणजे माझें नांव कोणीच घेत नाही, हें पाहून मी मनांत थोडासा हसतों व थोडासा दुःखी होतों ", असें वामनराव म्हणत असत; परंतु विनोदाची चर्चा चालली असतां तिच्यांत वामनरावांचें नांव न येणें स्वाभाविकच होतें. आपल्या ' नवपुष्पकरंडकां 'तील ' बायकांना उजव्या डोळ्याने दिसत नाही ! ', दुसरा एक शोध ', ' अहंकार ', ' नाटकराव ' ह्या सारखें केवळ उपहासप्रधान लिखाण जर त्यांनी बरेंच केलें असतें तर कदाचित् विनोदी वाङ्मयाची चर्चा चालू असतां त्यांचें नांव तेथे निघण्याचा संभव होता. वामनरावांनी स्वतंत्र असें ' विनोदी वाङ्मय ' निर्माण केलेलें नाही; तसेंच ज्यांत विनोद नाही असेंहि कांही लिहिलें नाही. विनोद हा त्यांच्या प्रतिभेचा

एक वेगळा विलास नव्हता, तर तो तिचा प्रकृतिधर्मच होता. त्यांची विनोद-बुद्धि ही त्यांच्या तत्त्वनिष्ठेप्रमाणेच त्यांच्या सर्वच लिखाणांतून डोकावत आहे; तिचाच केवळ विलास असा ज्याप्रमाणे त्यांच्या वर निर्देशिलेल्या कांही लेखां-खेरीज इतरत्र दिसत नाही, त्याचप्रमाणे तिचा संपूर्ण अभावहि त्यांच्या एकहि लेखांतून जाणवत नाही. चांदण्या रात्रीं ज्याप्रमाणे छायेंतहि प्रकाशाचा प्रत्यय येतो त्याचप्रमाणे त्यांचा सूक्ष्म व सौम्य विनोद त्यांच्या सर्व वाङ्मयां-तील गंभीर तत्त्वचिंतनांतूनहि जागोजाग प्रत्ययास येतो.

आपल्या वाङ्मयांतील विनोदाची उपेक्षा कां झाली हें स्पष्ट करितांना वामनराव म्हणतात की ' अगदी खरी गोष्ट अशी आहे की मराठींत धंदे-वाईक विदूषकाचं सोंग घेतलं तरच सामान्यतः विनोद ओळखूं येतो असं दिसतं. मराठींतील विनोद अजून अतिशयोक्तीच्या उलट्या सुलट्या कोलांट्या उड्या मारण्यांतच धन्यता मानीत आहे. ' वामनरावांच्या ह्या विधानाची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु एवढें खरें की त्यांच्या लिखाणांतील प्रसन्न विनोदाची आमच्या टीकाकारांनीं फारशी दखल घेतली नाहीः त्या लिखाणांतील इतर गुणविशेषांनी—विशेषतः त्यांतील तत्त्वनिष्ठेने व तत्त्वशोधकवृत्तीने त्यांचें मन इतकें आकर्षून घेतलें की ज्यामुळें तें कलात्मक तत्त्वशोधन इतकें हृदयंगम व वाचनीय झालेलें होतें त्या त्यांचे ठिकाणीं असलेल्या अंगभूत विनोदबुद्धीकडे त्यांचें साहजीकच दुर्लक्ष झालेंः तत्त्व-जिज्ञासुवृत्ति व विनोदबुद्धि ह्यांचा इतका सुंदर मिलाफ दिसत असतांनाहि केवळ ह्या दोन बाह्यतः विरोधी भासणाऱ्या गुणांची सांगड अपरिचित असल्या-मुळे वाचकांच्या लक्षांत वामनरावांची तत्त्वजिज्ञासा तेवढी आली, परंतु तिला पूरक ठरलेली त्यांची विनोदबुद्धि मात्र आली नाही; वामनरावांच्या विनोदवृत्तीचा अखंड झरा त्यांच्या सगळ्याच लिखाणांतून झिरपत असला तरी त्याचें कार्य भोंव-तालच्या तत्त्वशोधनाच्या वनश्रीला निरलसपणे, गाजावाजा न करितां, स्वतःला कोणाच्या दृष्टीस फारसें पडूंहि न देतां, जीवन देण्याचें असल्यामुळे वरवर पाहणाऱ्यांच्या दृष्टीला ती वनश्रीच तेवढी दिसली व तिच्या पायाशीच झुळ-झुळपणे वाहणारा तो झरा दिसला नाही ह्यांत काय नवल ? मी मराठींतील कोल्हटकर, गडकरी, चिं. वि. जोशी, कॅप्टन लिमये, अत्रे, ताम्हणकर ह्यांचें विनोदी वाङ्मय वाचून आनंदतों, परंतु " भडक अतिशयोक्तीचे उंच लाकडी

'घोडे' अलीकडे मला आवडत नाहीसे झाले आहेत" असें वामनराव आपल्या रेडियोवरील एका भाषणांत म्हणतात. बरोबरच आहे: त्यांच्या विनोदाच्या झऱ्याला खळखळाट कसा तो ठाऊक नाही. त्यांचा विनोद हा वाचकांना खदखदून हसवीत नाहीं. त्यांच्या लिखाणाचें सुसंस्कृत वाचकांकडून परिशीलन होत असतांना त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता तो अथपासून इतिपर्यंत कायम राखतो एवढेंच. वाचक जोपर्यंत त्यांचें लिखाण वाचील तोपर्यंत ह्या सुखद विनोदवृत्तीच्या प्रत्ययाने त्याच्या मुद्रेवर झळकणारें सौम्य स्मित कधींहि कमी होणार नाही; एवढें कार्य तो विनोद साधतो. सुशिक्षित वाचकांसच तो विनोद जाणवतो व अर्थात् आनंद देतो. ह्या विनोदांत कल्पकतेचा अंश बराच आहे यांत संशय नाहीं; परंतु तेथे कल्पकतेला स्वैर सोडलेलें नाही: तिला औचित्याचें, विवेकाचें, सुसंगतीचें बंधन आहे: तें तिला पाळावें लागतें: व तें ती आनंदाने पाळतेहि. शिवाय तिला सहानुभूतीची मदत आहे. विनोदाचें आवाहन माणसाच्या बुद्धीलाच विशेषेकरून असतें. वामनरावांच्या कल्पनाजन्य विनोदाचें आवाहनहि बरेंचसें बुद्धीलाच आहे: परंतु त्याला सहानुभवाची जोड असल्यामुळे हें आवाहन बुद्धीइतकेंच वाचकांच्या भावनांनाहि आहे असा सुखद आभासहि निर्माण झाल्याखेरीज राहत नाही.

आंग्ल लघुनिबंधलेखक लँब ह्याच्या संबंधी एका टीकाकाराने केलेलें विधान मला येथें आठवतें: हा रसिक टीकाकार म्हणतो की लॅम्बच्या लिखाणांत हास्य व शोक ह्यांचीं क्षेत्रें एकमेकांत कांही ठिकाणीं इतकीं मिसळून गेल्यासारखीं वाटतात की त्याचें लिखाण वाचीत असतां जणू त्याच्या डोळ्यांतून ठिपकणाऱ्या अश्रुबिंदूतून निर्माण झालेलें सप्तरंगी इंद्रधनुष्यच आपण पाहत आहोंत की काय असा आपणास भास होतो. वामनरावांच्या 'स्मृति-लहरीं'-तील 'कांही तक्रारी', 'हें प्रेम, वेडं का शहाणं?' ह्यासारखीं प्रकरणें वाचीत असतां मला त्यांच्या विनोदाचा हांच प्रत्यय वेळोवेळी येतो. माझ्या चेहऱ्यावर स्मित व नेत्रांत अश्रू एकाच वेळी उभे राहतात. जीवनांतल्या अगदीं लहानसहान प्रसंगांतील सुखदुःखांच्या छटा जेव्हां एखादा उदारधी लेखक मनुष्यमात्रासंबंधीच्या निःस्वार्थ अगाध प्रेमभावनेने व्यक्त करूं लागतो त्या वेळीं त्याचे लिखाणांत अशा प्रकारचा सौम्य, निर्मल, पुष्कळसा सुखद, थोडासा दुःखद विनोद निर्माण व्हावा हें स्वाभाविकच नाही काय? वामन-

रावांच्या ' सुशीलेचा देव, ' ' स्मृति-लहरी, ' ' इंदु काळे आणि सरला भोळे ' ह्या तिन्हीहि ग्रंथांत असल्या विनोदाची नयनरम्य स्थळें अनेक आहेत. बालांचे बोबडे बोल ऐकून आनंदणाऱ्या व ते बोल बोलूं शकणाऱ्या ह्या बालसुलभ वृतीच्या लेखकाला बालजीवनांत विनोदाचे अखंड झरे दिसले व ते आपल्या 'आश्रमहरिणी', ' सुशीलेचा देव ', ' नाट्यसंवाद ' ह्यासारख्या कृतींतून सहजतया व्यक्त करतां आले यांत नवल नाही. हीं वामनरावांच्या विनोदबुद्धीच्या विलासाचीं मोठीं आल्हाददायक स्थळें आहेत. वामनरावांच्या ठिकाणच्या ह्याच सहज कोमल वृत्तीमुळे त्यांना आबालवृद्धांच्या जीवनांतील विनोदस्थळें आस्वादितां आलीं, जाणतां आलीं, व व्यक्त करितां आलीं. त्यांनी निर्माण केलेल्या जवळजवळ सगळ्याच स्त्रीपुरुषांची वृत्ति प्रसन्न आहे, त्यांची विनोदबुद्धि शाबूत आहे, जीवनांतील आनंद उपभोगण्याची व वाढविण्याची त्याचे ठिकाणीं असणारी शक्ति कमी झालेली नाही. वामनरावांनी बालांचीं चित्रें रेखाटलीं, तरुणांचीं रेखाटलीं व प्रौढांचीं आणि वृद्धांचींहि रेखाटलीं; ह्याचें कारण त्यांची वृत्तिच तशी होती. ' रागिणीं ' तील नानासाहेब व त्यांच्या पत्नी आणि ' सुशीलेच्या देवां ' तील विनायकराव व लक्ष्मीबाई यांजमधील संवाद, ' इदु काळे व सरला भोळे ' मधील विनायकराव भोळे व सरला यांजमधील पत्रव्यवहार व ' स्मृतिलहरीं' तील धोंडोपंत व त्यांच्या पत्नी यांजमधील प्रेमकलह डोळयांपुढें येतांच प्रौढ पतिपत्नींच्या दैनंदिन जीवनांतील सौंदर्यस्थानें वामनरावांनी किती नाजुकपणे प्रगट केलीं आहेत याची कल्पना येते. जीवनांतील सुख व दुःख, अश्रू व हास्य ह्यांची एकाच वेळीं जाणीव हीं स्थळें मनःचक्षूनीं अवलोकित असतां झाल्याशिवाय राहत नाही. संसारांतील ऊन पावसाचीं चित्रें हीं नेहमीच मोठीं भावोद्दीपक असतात. वामनरावांना हीं चांगलीं साधत. मला वाटतें, मराठींत प्रौढ पतिपत्नींच्या संभाषणांतील विनोदाचें चित्रण वामनरावांइतकें नाजुकपणें कोणीहि केलेलें नाहीं. तरुणांचें निष्कपट हास्य जसें वामनरावांच्या लिखाणांतून जागोजाग ऐकूं येतें त्याचप्रमाणे प्रौढांनी केलेला उच्च काव्यशास्त्रविनोदहि त्यांत ठिकठिकाणीं प्रगट झालेला दिसतो. धोंडोपंत व त्यांची तरुण मित्रमंडळी जेव्हा एकत्र जमतात, ' रागिणीं ' तील विजयगांवकर सन्मित्रांचें त्रिकुट जेव्हां रागिणी, उत्तरा, आनंदराव यांचेसह वादांत रंगून जातें, सुशीलेची मित्रमंडळी जेव्हां बाल-

पणांतील भांडणाच्या व मोठेपणांतील वादाच्या ऐन भरांत येतात किंवा विनायकराव भोळे जेव्हा आपल्या अनेक सुहृदांबरोबर मनमोकळेपणे पत्रात्मक आत्मनिवेदन करतात त्या वेळीं त्यांतून प्रगट होणारे बाल्य, तारुण्य व प्रौढावस्थेंतील विनोदप्रसंगांचे, विनोदवचनांचे नानाविध रंग आपल्या मनःचक्षूंना निरतिशय आल्हाद देतात. शब्दार्थाचे श्लेष साधून, मनोवेधक चमत्कृतिजनक कल्पना लढवून, अर्थचमत्कृति साधून, मनुष्याच्या अन्तः-करणांतील सूक्ष्मकोमल भावनांचा मधुर विलास दर्शवून हा विनोद प्रगट होत असल्यामुळे त्याचें स्वरूप उच्च दर्जाचें व म्हणून बरेचसें अस्फुट राहावें, हें उघडच आहे. सरला भोळेनें विनायकरावांना लिहिलेल्या पहिल्याच पत्रांत त्यांच्यामधील वाङ्‌निश्चयाबाबत जो शब्दविलासात्मक विनोद साधलेला आहे त्याच्या मागे असलेली कल्पकता आणि रसिकता लक्षणीय आहे. ती साधी वरवरचीं साम्यविरोधांचीं द्वंद्वें ओळखणारी कल्पकता आहे व म्हणून तिचा उपयोग वरील थाटाचा विनोद आपल्या तत्त्वचिंतनांत मधूनमधून औचित्यपूर्ण रीतीने व प्रसन्नपणे पेरण्यांत लेखकाला फार होत आहे. ‘ स्मृतिलहरीं ’ तील ‘ त्याने काळी मुलगी कां पसंत केली ’, ‘ घातवार ’, ‘ कोणी जिंकलें ?’ इत्यादि स्मृति-चित्रांतील विनोद हा केवळ कल्पकतेवर आधारलेला नसून भोवतालच्या जीवनव्यवहारांचें व त्यांतील विसंगतींचें अत्यंत समंजसपणें आणि प्रसन्न मनाने केलेलें अवलोकन व चिंतन हेंच त्याच्या बुडाशीं आहे. त्यांतील जीवनचित्रें हीं साधीं, अगदी नेहमींच्या परिचयांतीलच आहेत व म्हणूनच तीं अत्यंत हृद्य उतरलीं आहेत. वामनरावांना ( एके काळीं ) उपहास साधत असला, तरी शुद्ध विमल अन्तःकरण, व्यापक सहानुभूति व मनाची प्रसन्नता हेच त्यांच्या विनोदवृत्तीचे स्थायीभाव होते : सत्य, सौजन्य व सौंदर्य यांच्या शोधार्थ, उपासनार्थ व दर्शनार्थ वाङ्मयसेवा करणारा हा कलावन्त मानवी स्वभावांतील अनेक सूक्ष्म विसंगतींकडे, मानवी व्यवहारांतील नानाविध सुखदुःखात्मक घटनांकडे, मानवी भावनांच्या छायाप्रकाशाप्रमाणे बदलणाऱ्या खेळांकडे ज्या समंजस वृत्तीने, सहानुभूतिपूर्ण नजरेंने, सौंदर्यशोधक दृष्टींने पाहत होता त्याच वृत्तींतून व दृष्टींतून ह्या प्रसन्न विनोदाची पखरण त्याच्या समग्र लेखनावर झाली आहे. तिचें स्वरूप डोळ्यांत भरण्यासारखें भडक नसलें तरी तिच्यामुळे त्या लिखाणांतील इतर लेखनगुण मात्र विशेषत्वाने रसिकाला प्रतीत होत आहेत.

व हेंच तिचें खरेंखुरें कार्य आहे. वामनरावांचा विनोद साधनरूप आहे, साध्यरूप नव्हे. प्रत्यक्ष जीवनांतील विनोदस्थळांचें अस्तित्व जसें जाणत्याला तेवढें जाणवतें तसेंच वामनरावांच्या लिखाणांतील त्यांचें वास्तव्य रसिकाला तेवढें सुखावल्याशिवाय राहत नाही.

## वामन मल्हारांच्या लेखनाचे दोन कालखंड :

वामनरावांच्या ललितलेखनाचें स्वरूप हें असें आहे : त्यांनी ललित-लेखनाच्या वेगवेगळ्या प्रांतांत कामगिरी केलेली असली तरी निवेदनपर--शक्य तों आत्मनिवेदनपर स्वरूपाचें लेखन त्यांच्या लेखनप्रकृतीला विशेष मानवत असे, असें वर दाखविलें आहे. ' स्मृतिलहरी ' च्या प्रास्ताविकेंत धोंडोपंत जें म्हणतात की ' मी कालक्रम पाहणार नाही किंवा ' कलाविलास 'का कायसं निघालं आहे ना, तें पाहणार नाहीं. आठवणींचं ' तंत्र ' कांहीं असलं तर तें माझ्या ऐकिवांत नाहीं....माझं वर्तन बरं असो किंवा बुरं असो, माझं हें लेखन खरं असावं ही माझी इच्छा आहे. हीच माझी कला, हेंच माझं सामर्थ्य आणि हीच माझी ( ईश्वर असला तर त्याचे जवळ ) विनंती ', तेंच वामनरावाचें त्यांच्या एकंदर लेखनासंबंधी रसिकांजवळ मागणें असावें असेंच मला वाटतें. वामनरावांनी १९११ पासून १९४२ पर्यंत हें लिखाण केलें. त्यांच्या जीवनांतील सुखाचा, दारुण दुःखाचा, आपत्तींचा, अडचणींचा, मनस्तापांचा व थोड्याफार मनःस्वास्थ्याचा काळ ह्यांतच येऊन गेला; त्यांच्या लौकिक जीवनांतील स्थित्यंतरें ह्याच काळाने बघितलीं. तुरुंगवास, राजकारण, समाज-कारण, वर्तमानपत्री लेखन, अध्यापन—हे त्यांच्या लौकिक जीवनांतील टप्पे ह्याच काळांत अनुक्रमाने आले व गेले. ज्या काळांत १९०६ सालच्या कॉंग्रेसच्या संदेशाने त्यांना विजापूरकरांच्या राष्ट्रीयशिक्षणाच्या कार्यातील मदतनीस बनविलें--' विश्वावृत्ता ' चें संपादकत्व व त्याबरोबरच आलेला तुरुंगवास पत्करावयास लावलें, त्या काळांतील त्यांचें व्यक्तिमत्व जोरकस होतें; त्यांत बाणेदारपणा, कर्तव्यनिष्ठा, निश्चयात्मकता, उत्साह इत्यादि गोष्टींचें त्यांच्या उत्तरकालीन व्यक्तिमत्वापेक्षा आधिक्य होतें : त्यांच्या ' रागिणी 'त, ' आश्रम-हरिणी ' त, ' नलिनी ' त, व ' नवपुष्पकरंडकांत ', त्याचप्रमाणे त्यांच्या नाट्यसंवादांत हा जोमदारपणा, हा बेडरपणा, ही बरीचशी निःसंदेहवृत्ति,

ही अभिजात रसिकता प्रत्ययास येते. हें स्वाभाविकच आहे. वामनरावांच्या राजकीय व सामाजिक दोन्हीहि दृष्ट्या जहाल असणाऱ्या मतांचें दर्शन ह्याच काळांतील वरील वाङ्मयांत विशेष उत्कटत्वाने व भावनावशतेने झालेलें दिसून येतें. मी येथे त्यांच्या निबंधलेखनासंबंधी कांही लिहित नाहीं, परंतु त्यांच्या व्यक्तिमत्वाचें हें पूर्वस्वरूप त्यांच्या ह्या काळांतील निबंधलेखनांतून तर अधिकच ठळकपणे व्यक्त होतें असें दिसेल. 'नलिनीं' तील संवाद वाचीत असतां व 'आश्रमहरिणीं'-तील धौम्याचें पूर्णप्रज्ञ ऋषींबरोबर झालेलें संभाषण ऐकत असतां, त्याचप्रमाणे 'रागिणीं' तील शेवटचे प्रियब्रह्मस्वामींचें समारोपाचें भाषण श्रवण करीत असतां वामनरावांच्या ह्या विशिष्ट मतांचा अभिनिवेश बाळगणाऱ्या उत्साह-पूर्ण वृत्तीचें चित्र आपल्या अन्तःकरणावर उमटल्याखेरीज राहत नाहीं. वामनरावांच्या जीवनांत जीं १९११ ते १९२० पर्यंत लहानमोठीं वादळें उठलीं व ज्यांतून बाहेर पडतां पडतां त्यांना अनेक मनस्ताप सोसावे लागले, त्यांनी त्यांच्या त्या कालांतील लेखनावर यत्किंचितृहि विकृत परिणाम झालेला नसला तरी त्यांच्या ठिकाणचा जोम, त्यांच्या ठिकाणचा उत्साह, त्यांची निश्चया-त्मकता, त्यांचा अभिनिवेश व कणखरपणा ह्या गोष्टी थोड्या फार कमी केल्या ह्यांत संशय नाही. 'नवपुष्पकरंडकां' तील 'बायकांना उजव्या डोळ्याने दिसत नाही', 'दुसरा एक शोध', 'अहंकार' ह्या सारखे लेख लिहिण्याच्या मागे असलेलें वामनरावांचें उत्साहपूर्ण व्यक्तिमत्व आता ह्यापुढे नाहींसें झालें : त्यांतील उत्साहाची जागा आतां विवेकाने, सहानुभूतीने, संदेहाने, निरभिमानतेने अधिक व्यापिली : त्यांच्या तारुण्यामधील लिखाणांत आढळणारा विचारांतील व भाषेंतील अवखळ जोम ह्यापुढें राहिला नाहीं; त्याऐवजी त्याला आतां एक वेग-ळेंच सौंदर्य प्राप्त झालें. हें सौंदर्य प्रौढत्वाचें, पक्वतेचें, अन्तर्मुखतेचें द्योतक होतें; त्यांत विवेकाला, समंजसपणाला प्राधान्य मिळालें. भाषेंत, विवेचनांत आणि निवेदनांत पूर्वी जें सामर्थ्य दिसत होतें तें गेलें, परंतु त्याबरोबरच संयम आला, सहजता आली, प्रांजलपणा आला, सरलत्व आलें, विविध अंगांचें दर्शन घडविण्याचें सामर्थ्य आधिक्याने आलें व अन्तःसौंदर्याची एक वेगळीच जाणीवहि आली. वामनरावांचें उत्तरकालीन वाङ्मयीन व्यक्तिमत्व ह्या स्वरूपाचें होतें असें वाटतें. त्याच्याशींच तुम्ही आम्ही अधिक परिचित आहोंत. त्यांत त्यांच्या पूर्वायुष्यांतील—कलकत्ता व सुरतेची कॉंग्रेस, 'विश्ववृत्त',

कचेरींतील दिवस, तुरुंगवास ह्या काळांतील धमक व करारी नसली तरी अनेक विषय, अनेक व्यक्ति, अनेक अनुभव, अनेक ग्रंथ ह्यांच्याशी दरम्यान झालेल्या परिचयामुळे विलक्षण समंजसपणा, विवेक, व सौजन्य आलेलें होतें; म्हणूनच त्यांतून प्रगट झालेल्या वाङ्मयांत केवळ चिरंतन तत्त्वांवर आधारलेल्या सत्यांचेंच प्रगटन, चिंतन व विवेचन आलें; ह्या काळांत अनेक वाद उठले; अनेक मतांचे वारे जोराने वाहूं लागले; राजकारणांत अनेक पक्ष आले, गेले व राहिलेः परंतु वामनराव—एके काळीं राजकारणांत हिरीरीने भाग घेऊं इच्छिणारे व आपल्या लेखणीने व वाणीने त्या इच्छेला कृतिस्वरूप देणारे वामनराव, ह्यांपैकी कोणत्याहि वादाच्या आहारीं गेले नाहीत; कोणत्याहि पक्षाबाबत साभिनिवेश राहिले नाहीत; सगळ्यांतील गुण त्यांनी ओळखले, तसे दोषहि डोळ्याआड केले नाहीतः 'सुशीलेच्या देवां' त सुशीला, बाळू व सुनंदा यांचेकडून त्यांनी एक 'नवयुगीन विश्वकुटुंब संस्था' स्थापविली, परंतु ह्याचा अर्थ ते कम्युनिझमच्या आहारीं गेले असा नाहीः त्यांच्या विश्वकुटुंबवादाचीं तत्त्वें काय होतीं तीं आपण त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून घेतांना पाहूं; येथे एवढाच खुलासा करणें भाग आहे की कम्युनिझमसारख्या नवमतांतील ग्राह्यांश त्यांनी स्वीकारला असला—कोणत्याहि मतांतील ग्राह्यांश काय आहे हें शोधून त्याचा स्वीकार करण्याची वामनरावांची प्रकृति आपणांस पूर्ण परिचितच आहे—तरी कम्युनिस्टांच्या विचारसरणींतील कांही विसंगति त्यांनी आपल्या 'स्मृतिलहरीं' तील 'मनुष्य इन्द्रियपूजक का ध्येयपूजक ?' * ह्या स्मृतिचित्रांत मोठ्या कौशल्याने सूचित केल्या आहेत : वामनरावांना गांधीवाद फारसा मान्य नसला ( अहमदाबादेस महात्मा गांधींच्या आश्रमांत राहून आल्यावर त्याचें त्यांनी केलेलें वर्णन पहा : 'विचारविलास' ) तरी राजकारणाच्या क्षेत्रांतील महात्मा गांधींच्या अनन्य साधारण कर्तृत्वाबद्दल त्यांना कमालीचा आदर होता असें आपणांस त्यांच्या विनायकराव मोळे, सुनंदराव, इत्यादि

---

* "मनुष्याला स्वार्थी मानावयाचें, का निःस्वार्थी का अर्धवट स्वार्थी आणि अर्धवट निःस्वार्थी याबद्दल कम्युनिस्टांमध्ये एकवाक्यता नसते हा क्वचित्प्रसंगीं दिसून येणारा दोष मीं घडवून आणलेल्या वादावादीमुळे त्यांच्या नजरेस आला म्हणून मात्र आनंद झाला." पान ४४, स्मृति-लहरी

व्यक्तिचित्रांवरून वाटतें. नवमतवाद व तदंतर्गत कला व नीति, विवाहसंस्थेची इष्टानिष्टता इत्यादि प्रश्न ह्यांजबद्दल विचार करितांना वामनरावांनी आपल्या मनाची समतोल व तत्त्वग्राही वृत्ति कधींच बिघडूं दिलेली नाही असें दिसून येतें; त्यांच्या ह्या कालांतील ललितलेखनांत ह्या वादांचे पडसाद उमटावेत ह्यांत कांहीच नवल नाही: परंतु त्यांचें दर्शन घडवितांना वामनरावांनी जी कलात्मक अलिप्तता स्वीकारलेली दिसते ती त्यांच्या उत्तरकालीन व्यक्तिमत्वाची द्योतक आहे. 'इंदु काळे आणि सरला भोळे' व 'विस्तवाशीं खेळ' ह्या दोन लिखाणांतून त्यांनी ज्या व्यक्तींच्या जीवनांत आज हे प्रश्न डोकावूं लागले आहेत त्या व्यक्तींच्या जीवनाचें चित्रण करण्याचा प्रयत्न केला व ह्या सर्व मतामतांतील सत्तत्त्वांचा बोध महाराष्ट्रांतील सुबुद्ध रसिक वाचकांस कलात्मकतेने करून दिला. हीं सत्तत्वें कोणतीं तीं आपण त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून घेतांना जरा विस्ताराने पाहूं.

**ग्रंथकारांचे ग्रंथकार :**

वामनरावांच्या एकंदर ललितलेखनाचें हें धावतें निरीक्षण संपवितांना मराठी कादंबरीच्या क्षेत्रांत वामनरावांनी जी एक वेगळ्याच प्रकारच्या कथात्मक वाङ्मयाची छोटीशी फुलबाग फुलविली तिने आकृष्ट होऊन इतर कोणी तिचें संवर्धन करण्याचा थोडाफार प्रयत्न चालविला की काय ह्याकडे दृष्टिक्षेप करूं. आपण वामनरावांच्या लेखनकार्याच्या अगदीच समीप असल्यामुळे त्यांचें आधुनिक मराठी ललितवाङ्मयांतील स्थान आज आपणांस नीटसें निश्चित करतां येणार नाही. त्याचें सम्यक् रूप ध्यानांत यावयाला अजून कांही कलावधि जाणें आवश्यक आहे; परंतु वामनरावांच्या बाबतींत जी एक गोष्ट विशेष आहे, ती अशी की त्यांचें महत्त्वाचें ललितलेखन हें १९१५ ते १९४२ ह्या पंचवीस वर्षांच्या कालखंडांत झालेलें असलें तरी तें खरें १९१५ ते १९२० व १९३० ते १९३७ ह्या दोन कालांत विभागलें गेलेलें आहे. त्यामुळे त्याच्यांत व प्रो. फडके, ना. ह. आपटे, वरेरकर ह्यांच्या आज कित्येक वर्षें अखंडितपणे चालू असलेल्या लिखाणांत फरक आहे. वामनरावांच्या पहिल्या कालखंडांतील कादंबऱ्यांनंतरचा जवळजवळ दहा वर्षांचा काळ हा विनालेखन गेल्यामुळे त्या कादंबऱ्यांचा एकंदर कथात्मक वाङ्मयावर झालेला परिणाम अजमाविणें बरेंचसें सोपें झालें. श्रीपाद कृष्णांनी वामनरावांना तत्त्वज्ञानात्मक कथावाङ्मयाचे प्रणेते असें जें ठरविलें तें त्यांच्या ह्या पहिल्या कादंबऱ्यांवरूनच ना ! हरिभाऊंच्या नंतर मराठी कादंबरीच्या इतिहासांत वामनरावांचेंच नांव झटकन् गौरवाने घेतलें गेलें

ह्याचें कारण त्यांच्या ह्या पहिल्या लेखनखंडांतील वर उल्लेखलेल्या कृतीच होत ना ? ह्या कृतींनी वामनरावांना असंख्य रसिक वाचक मिळवून दिले असतील कीं नाही याची शंकाच आहे. हरिभाऊंच्या कथावाङ्मयाचा सगळा वाचकवर्ग वामनरावांच्या वाट्याला आला असेल की नाही ह्याचीहि शंका आहे. महाराष्ट्रांतील सुसंस्कृत व सुशिक्षित असा वेचक वाचकवर्ग ह्या कादंबऱ्यांनी त्यांना मिळवून दिला असेल; परंतु एवढ्यानेच त्यांचें वाङ्मयकार्य संपलें, असें नाही; ह्या त्यांच्या पहिल्याच कादंबऱ्यांनी जर आणखी कांही विशेष साधलें असेल तर तें हें की त्यांनी वामनरावांना प्रत्यक्ष कथालेखकांनीं ज्यांच्या लेखनाचा अधिक विचार करावयाला हवा असे कथालेखक, ह्या पदवीला नेऊन बसविलें. वामनराव हे अनेक वाचकांचे आवडते कादंबरीकार जरी त्यांच्या मरणकालापर्यंत कधींच झाले नाहींत, तरी ते कादंबरीकारांचे मार्गदर्शक कादंबरीकार मात्र आपल्या पहिल्याच दोन ललितकृतींनीं झाले. कांही लेखक हे लेखकांचे लेखक असतात, कांही वाचकांचेंच केवळ आवडते लेखक असतात. (तर कांहीं हरिभाऊ आपट्यांप्रमाणें लेखक आणि वाचक ह्या दोघांचेहि आवडते कथालेखक असतात.) पहिल्यांच्या अंगीं अनेक वाचकांचीं अन्तःकरणें एकाच वेळी स्वतःकडे वेधून घेण्याची शक्ती नसते, परंतु सुसंस्कृत व चोखंद रसिकांची दृष्टी आकर्षून घेण्याची मात्र अपरिमित शक्ति असते; त्यामुळे त्यांचा परिणाम नवीन निर्माण होणाऱ्या लेखकांच्या पिढीवर होऊन वाङ्मयाला इष्ट तें वळण लागतें. ह्या दृष्टीने वामनराव हे आपल्या पहिल्याच ललितकृतींनी लेखकांचे कादंबरीकार ठरलें असें मला म्हणावयाचें आहे. त्यांच्या वेळचे नाथमाधव, वि. सी. गुर्जर, ना. ह. आपटे व इतर कथालेखक हे वाचकांचे आवडते कथालेखक ठरले, परंतु ते कथालेखकांचे मार्गदर्शक बनू शकले नाहीत. वामनराव आपल्या पहिल्याच कृतींनी ह्या पदवीला चढले. ह्या त्यांच्या पहिल्या कृतींच्या प्रकाशनानंतर ९।१० वर्षांनी, म्हणजे त्यांच्या उत्तरकालीन ललितकृति बाहेर पडण्याच्या दरम्यानच्या काळांत प्रो. ना. सी. फडके ह्यांच्या पहिल्यावहिल्या कृति मराठी वाचकांच्या हातांत पडल्या. प्रो. ना. सी. फडके ह्यांनी मराठी कादंबरीच्या सौंदर्यांत, विशेषतः तिच्या बांधणींत व मांडणींत स्वतःची अशी अत्यंत अमोल भर घातलेली असली तरी ह्या त्यांच्या पहिल्या कादंबऱ्यांतील कांही भागांवर वामनरावांच्या लेखनाची, अति सूक्ष्म का होईना परंतु छाया पसरली आहे

असें मला वाटतें: ' जादूगार ' मधील इन्दुमती ही उत्तरा किंवा रागिणी ह्यांची पाठची पहिण नसेल कदाचित्: परंतु तिची निर्मिति होत असतां मराठी कादंबरीवाङ्मयाचें वातावरण उत्तरा, रागिणी व नलिनीने बरेंचसें भारलेलें होतें यांत संशय नाही. हरिभाऊंनी स्वयंपाकघरांतील व माजघरांतील स्त्रियांचीं चित्रें रेखाटलीं, वामनरावांनी हळुहळू दिवाणखान्यांत प्रवेशूं लागलेल्या सुशिक्षित व सुखवस्तु पांढरपेशा कुटुंबांतील स्त्रियांचीं चित्रें प्रथम अधिकृत स्वरूपांत मराठी कादंबरींत रंगविलीं. प्रो. फडके ह्यांनी वामनरावांनी घालून दिलेल्या ह्या नव्या वळणाचाच अवलंब केला: त्यांचीं स्त्रीचित्रें ह्या नव्या स्त्रीच्याच जीवनाचीं कांही वेगळीं आकर्षक अंगें कलात्मकतेने प्रगट करूं लागलीं. फडक्यांनी आपल्या कथावाङ्मयाचें वेगळेंच सुबक मंदिर पुढें कालान्तराने हळुहळू रचलें, ही गोष्ट वेगळी; परंतु त्याच्या रचनाकालाचे आरंभीं त्याच्या पायांतील चारदोन शिला ह्या वामनरावांकडून व हरिभाऊंकडून भरून घेतल्या असेंच म्हणणें सयुक्तिक होईल. 'सुशीलेच्या देवा'नंतर मात्र वामनराव हे खरोखरच कादंबरीकारांचे मार्गदर्शक कादंबरीकार झाले. मराठींतील आजचे नामवन्त कादंबरीलेखक खांडेकर, माडखोलकर व पु. य. देशपांडे हे वामनरावांचें लेखनऋण कबूल करितात की नाही हें माहीत नाही; परंतु त्यांच्या मनाची बैठक ही वामनरावांच्या ललितलेखनाच्या परिशीलनाने थोडीबहुत तयार झालेली आहे असेंच म्हणावें लागेल. खांडेकरांची ध्येयप्रीति, माडखोलकरांची तत्त्वचर्चेची आवड व पु. य. देशपांडे यांची विचारवशता—विकारवशता नव्हे—ह्या गोष्टी वामनरावांच्या वाङ्मयांतूनच उत्क्रान्त झालेल्या आहेत, असेंच जरी निःसंदिग्धपणे म्हणतां न आलें तरी त्यांचीं कांहीं स्फूर्तिस्थानें हीं वामनरावांच्या कादंबऱ्यांत असावींत असें मला वाटतें. वामनरावांनी ललितलेखकांसाठी एखादा लेखनादर्श आपल्या वाङ्मयांत निर्माण केला, असें नाही. तसा आदर्श निर्माण करण्याइतकें लेखन एकतर त्यांचेकडून झालेंच नाही; तसेंच तें निर्माण होऊनहि ललितलेखनांतील सर्वांगसुंदरता त्यांच्या लिखाणांत कितपत उतरली असती ह्याहीबद्दल संशयच आहे; त्या दृष्टीने कलेच्या तंत्राचा आदर्श निर्माण करण्यास ते असमर्थ होते; तो आदर्श त्यांना क्वचितच निर्माण करतां आला असता. तो आदर्श निर्माण करण्याचें कार्य आपापल्या परीने महाराष्ट्रांतील फडक्यांसारखे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३६५५ दि. १-७-५८

तंत्रकुशल लेखक करीत आहेत; परंतु कलेच्या तंत्राचा आदर्श निर्माण करण्याचें कार्य वामनरावांच्या ललितकृतींकडून घडलेलें नसलें तरी **कलेच्या मंत्राचा आदर्श** मात्र त्यांनी आमच्या ललितलेखकांसाठी खात्रीनें निर्मिलेला आहे. त्यांचें ललितलेखन संख्येने कितीहि अत्यल्प असलें तरी त्यांतून बाहेर प्रकटणारा हा कलेच्या मंत्राचा आदर्श अत्यंत निःसंदिग्ध, सुरूप व वाङ्मयाला महनीयता प्राप्त करून देणारा असा आहे; ललितलेखकाने जीवनाचें चित्रण करीत असतां कोणकोणत्या परिणामकारक पद्धतींचा अवलंब करावा हें त्यांनी दाखविलें नसेल कदाचित्, परंतु हें जीवनदर्शन करितांना लेखकाने आपली वृत्ति कशी ठेवावी, जीवनाच्या कोणकोणत्या अंगांचें दर्शन त्याने घडवावें, ह्या जीवन चित्रणाच्या बुडाशीं लेखकाचा कोणता हेतु असावा, कोणत्या प्रकारचा परिणाम साधण्याचा त्याने सतत प्रयत्न करावा, हें चित्रण करीत असतां त्याने जीवनांतील कोणत्या अंगांना किती महत्त्व द्यावें, सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्यांच्या उपासनार्थ त्याने काय काय करावें इत्यादि ललितलेखकाच्या लेखन-प्रवृत्तीच्या बुडाशी असलेल्या मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नांचीं उत्तरें त्यांनी कृतिरूपानें दिलीं; हीं उत्तरें महाराष्ट्रांतील सुसंस्कृत लेखकांना व वाचकांना पटलीं: 'सुशीलेच्या देवा'च्या प्रकाशनकाळींच हजारों वाङ्मयोपासकांनी, ह्या ललितलेखकाच्या वृत्तीचा आदर्श निर्मू पाहणाऱ्या कलावन्ताचा, महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं त्याची स्थापना करून गौरव केला. वामनरावांनी आपल्या ललितकृतींच्या द्वारां दिलेल्या कलेच्या ह्या महान् मंत्राचा परिणाम महाराष्ट्रांतील अनेक होतकरू लेखकांवर गेल्या वीस वर्षांत झालेला आहे; त्याचीं भलींबुरीं फळें मराठी कथावाङ्मयाच्या वृक्षावर आज दिसत आहेत, व उद्यां तीं अधिक सुरस व सुरूप झालेलीं पहावयास मिळतील, अशी आशा आहे.

वामनरावांनी जो हा कलेचा मंत्र आपल्या कृतींतून मराठी वाङ्मयोपासकांना दिला त्याचेंच विवरण, विवेचन व उद्बोधन त्यांनी आपल्या टीका-लेखांतून, व वाङ्मयविषयक प्रश्नांची चर्चा करणाऱ्या इतर लिखाणांतून व भाषणांतून केलेलें आहे. तेव्हां प्रत्यक्ष कृतिरूपाने सूचित केलेल्या ह्या कलेच्या मंत्राचें स्वरूप अधिक विस्ताराने, अधिक चिकित्सेने व अधिक निःसंदिग्धपणे समजावून घेण्यासाठी त्यांच्या ह्या वाङ्मयविवेचनात्मक लिखाणाचा आपण जमल्यास परामर्श घेऊं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३८०

# वामनरावांचें वाङ्मयविवेचन

## वाङ्मयविवेचनात्मक लिखाण :

१९३० सालीं महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाचे अध्यक्ष ह्या दृष्टीनें वामन मल्हारांनी गोवें येथें जें भाषण केलें, तें त्यांचें पहिलेंच वाङ्मयविवेचन नसलें तरी त्या भाषणांत त्यांनी केलेल्या साहित्यविषयक प्रश्नांच्या चर्चेपासून त्यांच्या खऱ्याखुऱ्या वाङ्मयविवेचनात्मक लिखाणाला प्रारंभ झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. १९२७ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'विचारविलासां'त त्यांचीं 'प्रेम की लौकिक ?' व 'दुटप्पी की दुहेरी ?' ह्यांवरील सुदीर्घ परीक्षणें छापलेलीं आहेत; ह्या परीक्षणांमधून अनेक साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा अनुषंगानें झालेली असली तरी स्वतंत्रपणें साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा अशी वामनरावांकडून वरील भाषणांपासूनच होऊं लागली असें दिसतें. १९४० सालीं प्रसिद्ध झालेल्या 'विचारसौंदर्या'त त्यांच्या अशा प्रकारच्याच लेखांचा व भाषणांचा संग्रह करण्यांत आलेला असून तो त्यांच्या साहित्यविषयक लिखाणाचा आज उपलब्ध असलेला प्रातिनिधिक संग्रह आहे असें समजावयास हरकत नाही. दरम्यानच्या काळांत त्यांनी महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, मनोहर, विहंगम, लोकशिक्षण इत्यादि मासिक पुस्तकांतून लिहिलेले सर्व परीक्षण-लेख अद्याप एकत्र झालेले नाहीत : १९४१ सालीं प्रसिद्ध झालेल्या श्री. बा. सी. मर्ढेकर यांच्या 'वाङ्मयीन महात्मता' ह्या ग्रंथाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना ही त्यांच्या-कडून झालेल्या साहित्यचर्चेची अखेरची नांव घेण्याजोगी कामगिरी असून तिचाहि अन्तर्भाव त्या कालानंतर प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या निबन्धसंग्रहांत प्रकाशकांनीं केलेला दिसत नाही.

## वाङ्मयबोध नव्हे, वाङ्मयशोध :

वामनरावांच्या ललितलेखनाप्रमाणेच त्यांचें वाङ्मयविवेचनात्मक लिखाण हेंहि अत्यल्प असलें तरी त्याच्याप्रमाणेंच तें बहुमोल आहे यांत संशय नाहीं. त्यांनी साहित्यचर्चात्मक मजकूर थोडाच लिहिला, परंतु जो लिहिला तो साहित्य निर्मितीचा हेतु, तिचें कार्य, साहित्याच्या परिशीलनापासून होणाऱ्या आनंदाचें

स्वरूप, साहित्याचें जीवनांतील स्थान, साहित्याच्या निर्मितीची प्रक्रिया, साहित्याचे विषय व त्यांच्या मर्यादा, साहित्यसेवकांची वृत्ति, त्यांचा पेशा, त्यांचें अंतिम उद्दिष्ट व कार्य इत्यादि प्रश्नांसंबंधी सखोल व तत्त्वग्राही बुद्धीने निर्णय घेऊन लिहिलेला असल्यामुळे त्यामध्ये एक प्रकारचें प्रत्ययकारी सामर्थ्य आलेलें आहे. अमुक एका साहित्यविषयक प्रश्नासंबंधी वामन मल्हारांचें मत काय आहे, असें महाराष्ट्रांतील रसिक वाङ्मयोपासकांस त्यांनी आपल्या ह्या संयमित परंतु अत्यंत सामर्थ्यसंपन्न साहित्यचर्चेनें वेळोवेळीं विचारावयास लाविलें आहे. साहित्य, जीवन व कला ह्यांच्या संबंधीच्या कोणत्याही वरवर पाहतां कूट भासणाऱ्या प्रश्नावर त्यांनीं आपल्या ह्या, व्याप्तीने अल्प भासणाऱ्या साहित्य चर्चेंतून ह्या नाही त्या स्वरूपांत प्रकाशदायी मार्गदर्शन केलेलें आहे असें आढळून येतें; त्यामुळेच त्यांचें हें लिखाण काळजीपूर्वक वाचल्यावर थोडा वेळ असेंच वाटतें की नित्य नव्या सौंदर्याप्रमाणेच नित्य नव्या कूट प्रश्नांना जन्म देणारा साहित्याचा अभिनव अन्तःप्रदेश वामनरावांना आम्हा इतका गूढ वाटत नसावा; त्यांतील अनेक तुमच्या आमच्या दृष्टीला गूढ भासणारे प्रश्न वामनरावांना बरेचसे उलगडल्यासारखे वाटत आहेत. तुमच्या आमच्या दृष्टीच्या टापूंत अद्याप न आलेलीं अशींहि कांहीं मनोरम स्थळें त्यांच्या दृष्टीस पडलेलीं आहेत व त्यांचाहि त्यांना थोडाबहुत उलगडा झाला आहे; निदान सुजाणपणे त्यांचा उलगडा कसा करून घेतां येण्यासारखा आहे हें त्यांनी दर्शविलें आहे. कोणत्याहि सिद्धान्ताची, व्याख्येची अव्याप्ति किंवा अतिव्याप्ति अचूकपणे लक्षांत घेणारी तर्ककुशल बुद्धि, परंतु त्याचबरोबर मानवी तर्ककुशल बुद्धीला अनाकलनीय अशा ज्ञानप्रदेशांची समंजस जाणीव, सौंदर्यसिद्धीचे, साहित्यसिद्धीचे, वा कलोपासनेचे नियम शोधून काढतांना प्रसंगीं हतबल व मूक बनणाऱ्या ह्या मानवी बुद्धीला चेतना देणारी, कार्योत्सुक करणारी व पूरक ठरणारी अतीन्द्रिय सौंदर्यदृष्टि, व्यापक सहानुभूति, नवनिर्मितिक्षम, संबद्धकल्पनासूचक आणि निरूपणात्मक अशी त्रिविधा कल्पनाशक्ति, उत्तम वाङ्मयकृतींची सुजाणपणे करून घेतलेली ओळख व तिजमुळे वाङ्मयाच्या अंतिम मूल्यांबद्दल मनाची झालेली निःसंदेहवृत्ति, सत्याच्या आस्वादासाठी व अभिव्यक्तीसाठी सोत्कंठ असलेली मनोवृत्ति, व अत्यंत सूक्ष्म विचारांना व भावनांना अभिव्यक्ति देण्याचें सामर्थ्य असलेली अकृत्रिम

भाषाशैली ह्या सर्व गुणांचा वामनरावांचे ठिकाणीं एकत्र आढळ झालेला असल्यामुळे त्यांजकडून झालेलें हें अत्यल्प वाङ्मयविवेचनहि इतकें उद्‌बोधक व मार्गदर्शी ठरावें यांत नवल नाही.

प्रो. ना. सी. फडके ह्यांनीहि साहित्यविषयक प्रश्नांची अत्यंत सुबोधपणे बरीच चर्चा केली आहे; परंतु वामनरावांचें वाङ्मयविवेचन हें प्रो. फडक्यांच्या प्रमाणे उपदेशकाच्या भूमिकेवरून वाङ्मयाचें तंत्र व त्याचा मंत्र समजावून देण्यासाठी झालेलें नसून तें शोधकाच्या भूमिकेवरून वाङ्मयाचें अन्तःस्वरूप स्वतः समजावून घेण्यासाठी झालेलें आहे; त्यामुळे त्यांत खरीखुरी सत्य-जिज्ञासूची तळमळ आहे, अभिनिवेशाचा अभाव आहे, सत्यशोधनाची धडपड आहे, प्रत्येक लहानमोठा शोध हरकून पारखून घेण्याची स्वाभाविक इच्छा आहे, प्रत्येक संशोधित सत्याच्या व्याप्तीची यथोचित कल्पना आहे, हेंच तेवढें सत्य नाही, ह्या खेरीजहि इतर सत्यें आहेत ह्याची सुबुद्ध जाणीव आहे, कोणत्याहि वाङ्मयविषयक वा कलाविषयक कूटप्रश्नाचें निर्णायक असें एकमेवाद्वितीय उत्तर देणें अशक्य आहे, वाङ्मय हें जीवनाप्रमाणेच अनेक रंगी, अनेक अंगी, अनाद्यवंत, चिरविकासी असल्यामुळे त्याच्या कार्यक्षेत्रांतील एखाद्या स्थळीं थांबून तेथें आढळणाऱ्या कांही गोष्टींची कारणमीमांसा करूं जातां किती तरी नानाविध कारणें कशीं डोळ्यापुढें येतात व त्यामुळे त्यांतील एकाचबद्दल अभिनिवेश बाळगणें हें कसें अनुचित ठरतें, प्रतिभेचें कार्य कोणत्या पद्धतीनें घडते, हें सांगणें कसें गूढ व दुर्ज्ञेय आहे, ह्या सर्व गोष्टींची त्यांत यथोचित जाणीव आहे. म्हणूनच वामनरावांच्या ह्या वाङ्मयविवेचनाला वाङ्मयाचें अन्तःसंशोधन असेंच म्हणणें उचित आहे : तें वाङ्मयाच्या अन्तःप्रदेशांतील संशोधन आहे : सत्य, सौजन्य व सौंदर्य यांचा शोध घेणें हेंच वामनरावांच्या लेखणीचें जीवनकार्य; मग हें संशोधन जीवनाच्या—मानवी व्यवहारांच्या प्रांतांतील असो किंवा त्या व्यवहारांच्या अवलोकनांतून, चिंतनांतून व कलात्मक मांडणींतून निर्माण झालेल्या वाङ्मयव्यवहाराच्या क्षेत्रांतील असो; त्याच्या मागचा हेतु तोच, त्याने मिळणारें समाधान तसलेंच; तेंहि तितक्याच—किंबहुना थोड्या अधिकच—तन्मयतेने केलेलें; ही अधिक तन्मयता कार्यपद्धतीवर तंत्राचीं बंधनें नसल्यामुळे आपोआप आलेली. मग ह्या संशोधन-कार्यांत तुम्हाआम्हा रसिक वाचकांची भूमिका ही श्रोत्यांची किंवा भाविकपणें

श्रवण केलेलें ग्रहण करणाऱ्या अजाणांची न राहतां, त्या कार्यांत संशोधका-बरोबरच समरस होणाऱ्या व ह्या संशोधनांतून सांपडलेल्या सत्यांशांनी संशोधका-बरोबरच प्रमुदित होणाऱ्या सुजाण शोधक विद्यार्थ्यांची राहील यांत काय नवल ? वामनरावांचें हें वाङ्मयविवेचन वाचीत असतां आपणहि त्यांच्याबरोबर विचार करूं लागतों, आपणहि त्यांजबरोबर तें संशोधनकार्य चालू असतां मध्येच आलेल्या कूटस्थळांवर विसावतों, मागेपुढे आवती भोवती पाहतों, झाल्या गोष्टींची, केलेल्या कार्याची फिरून एकदां दखल घेतों, त्यांचा आढावा घेतों, भोंवतालच्या अंधारांत पुढचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतों, तेवढ्यांत त्यांच्या समवेत आपणांसहि पुढील मार्गाचें, अंधुक अंधुक का होईना, परंतु दर्शन घडविणारे प्रकाशकिरण दिसूं लागतात, त्यांच्या अनुरोधानें आपल्या वाटाड्याबरोबर आपण आपलें संशोधनकार्य परत सुरू करितों; वाटेंत कांही सत्यें आढळतात, परंतु तीं अंतिम नाहीत, एकमेव नाहीत, निर्णायक नाहीत, अव्याप्त आहेत ह्याची जाणीव आपल्याला होते. आणिकांचा शोध लावण्यासाठी आपण धडपडतों; क्वचित् आपलें संशोधनकार्य तेवढ्यावरच राहतें. परंतु तें पुढे तसेंच चालू ठेवलें पाहिजे, झालें तेवढें अपुरें आहे, हीहि कल्पना मनांत रुजलेली असते; मग सापडलीं आहेत तेवढींच सत्यें, त्यांच्या व्याप्तीची यथोचित समज घेऊन आपण लक्षांत बाळगतों व आपल्या वाटाड्याची, आपल्या कार्यनिष्ठ संशोधकाची तेवढ्यापुरती रजा घेऊन आपण अन्तर्मुख बनतों. वामनरावांचें टीकालेखन वाचीत असतां वरील स्वरूपाचा प्रत्यय मला येतो; त्यांतील सत्यसंशोधन हें मला केवळ हवें तें ज्ञान तिऱ्हाइताकडून मिळाल्याचा आनंद देत नाही, तर आत्मप्रत्ययाचा, आपण स्वतःच हवें तें शोधून काढल्याचा आनंद देतें. वाङ्मयीन व कलाविषयक सत्यें शोधून काढतांना दिसून येणारी त्यांची ती तत्त्वग्राही, जिज्ञासु, रसज्ञ परंतु विनीत वृत्ति खऱ्या-खुऱ्या सत्यसंशोधकाची आहे ह्याची जाणीव होते व म्हणूनच तिच्याशीं समरस व्हावयाला आपलें मन तात्काळ तयार होतें. ह्या संशोधनकार्याला आवश्यक तेवढी संदेहवृत्ति आपणामध्येहि त्या संशोधकाबरोबर वाणूं लागते; व केवळ सत्याचीच चाड असल्यामुळे अंतिम सत्यें सापडतांच तीं हरीरीने, अभिनिवेशाने, निश्चयाने पुढे मांडतांना आपणहि त्याच्याबरोबर सावेश होतों.

## पुस्तक-परीक्षणात्मक लिखाण : स्वरूप :

वरील स्वरूपाचा अनुभव आपणांस त्यांचें स्वतंत्र वाङ्मयचर्चात्मक लिखाण वाचतांना येतो ह्यांत नवल नाही, कारण तें लिखाण मूलतःच वाङ्मय व कला ह्यांतील कांही कूटप्रश्नांची चिकित्सा करण्यासाठी लिहिलेलें आहे : पण वामनरावांचे साधे पुस्तक-परीक्षणात्मक लेख वाचीत असतांहि आपणांस असलाच अनुभव येतो. वामनरावांनीं केलेलीं पुस्तकपरीक्षणें संख्येनें थोडीं आहेत. 'विचारविलासांत' भास्यांच्या 'प्रेम की लौकिक ?' आणि श्रीपाद कृष्णांच्या 'दुटप्पी की दुहेरी ?' ह्या दोन कादंबऱ्यांचीं परीक्षणें ग्रथित केलीं आहेत. 'विचारसौंदर्यांत', 'अनिरुद्ध प्रवाह', ह्या कथासंग्रहाचें आणि 'गतगोष्टी अर्थात् माझी जीवनयात्रा' ह्या केळकरांच्या आत्मचरित्राचें अशीं दोन परीक्षणें समाविष्ट केलीं आहेत. ह्याशिवाय माडखोलकरांच्या कांही कादंबऱ्यांचीं त्यांनीं 'लोकशिक्षणां'तून, 'मनोहरां'तून केलेलीं परीक्षणें व प्रो. फडके ह्यांच्या एक-दोन कादंबऱ्यांचीं केलेलीं परीक्षणें प्रसिद्ध आहेत. (त्यांतील कांहीं आतां संग्रहित झालीं आहेत.) त्यांच्या ह्या आणि इतर परीक्षणलेखांचा विशेष हा आहे की तीं केवळ त्या त्या पुस्तकांचीं परीक्षणें नाहीत तर तीं तीं पुस्तकें वाचीत असतां जे जे वेगवेगळे वाङ्मयीन प्रश्न वामनरावांच्या डोक्यांत घोळूं लागले त्या त्या प्रश्नांचींहि तीं 'परीक्षणें' आहेत : पुस्तक-परीक्षणाच्या अनुषंगानें तत्संबद्ध वाङ्मयीन प्रश्नांचीं तीं निरीक्षणें व परीक्षणें झालेलीं आहेत, त्यामुळे त्यांची वाङ्मयीनता अनेक पटींनी वाढलेली आहे. पुस्तक-परीक्षणांच्या द्वारां अनेक वाङ्मयीन प्रश्नांची चर्चा करावयाची, ही श्रीपाद कृष्णांची पद्धत : परंतु श्रीपाद कृष्णांच्या परीक्षण-लेखांत पुष्कळ वेळां 'मिया मूठभर व दाढी हातभर' अशी स्थिति झालेली आढळते व संबद्धाबरोबर बऱ्याचशा असंबद्ध बाबींचीहि वाजवीपेक्षां अधिक चर्चा झालेली आढळते. (अर्थात् ही वाङ्मयचर्चेच्या दृष्टीने अंतीं हितकारकच ठरते, ही गोष्ट वेगळी.) परंतु वामनरावांच्या बाबतींत तसें क्वचित्‌च घडलेलें दिसतें. त्यांच्या अगदीं पहिल्या पहिल्या परीक्षणलेखांत तसें घडलेलें आहे : परंतु तें सुद्धां श्रीपाद कृष्णांच्या प्रमाणांत घडलेलें नसून बरेंचसें संयमित आहे; त्यांच्याकडून बहुतेक सगळ्याच ठिकाणीं परीक्षित ग्रंथाच्या अंतरंगाशीं अत्यंत संबद्ध अशा वाङ्मयीन प्रश्नांचीच थोडक्या, समर्पक व वेचक शब्दांत परंतु तितकीच

असंदिग्ध, मार्मिक व सत्यदर्शी अशी चर्चा झाली आहे व त्या चर्चेच्या शेवटीं तिच्यांतून निघालेल्या निष्कर्षांच्या अनुरोधाने योग्य तें मार्गदर्शनहि झालें आहे.

## कादंबरींतील तत्त्वचर्चा : वामनरावांचें मत :

कोल्हटकरांच्या 'दुटप्पी की दुहेरी' ह्या कादंबरीचें परीक्षण करितांना वामनरावांनी त्याच्या अनुषंगाने 'कादंबरींतील तत्त्वचर्चा ह्या तिला केव्हा परिपोषक ठरतात?', 'कादंबरींतील कृति व गति ह्यांचीं स्वरूपें काय?', 'कादंबरींतील प्रसंगांचें चमत्कृतिजनकत्व कशांत असतें?', 'कादंबऱ्यांचे प्रकार किती?' इत्यादि प्रश्नांची चर्चा केली आहे. ह्यांतील पहिला प्रश्न हा कोल्हटकरांच्या मूळ कादंबरींत बऱ्याच तात्त्विक स्वरूपाच्या चर्चा आलेल्या असल्यामुळे व वामनरावांनीं आपल्या कृतींतहि त्या आणलेल्या असल्यामुळे अर्थात् उद्भवला आहे; तेव्हां त्याची चर्चा करीत असतां त्यांना आपल्या 'रागिणी' ची आठवण व्हावी, हें स्वाभाविकच आहे. कोल्हटकरांच्या कादंबरींतील बरीचशी तत्त्वचर्चा ही त्या कादंबरीला अलंकारभूत आहे हें सिद्ध करितांना वामनराव लिहितात, "सरी नाकांत अडकविली तर जड वाटेल, पण गळ्याला वाटणार नाही. पाटल्या किंवा बांगड्या कानांत वेढब दिसतील, पण हातांत तशा दिसत नाहीत. शिवाय हेंहि ध्यानांत धरलें पाहिजे की एकीच्या शरीराच्या किंवा स्वरूपाच्या किंवा अंगकांतीच्या दृष्टीने जो दागीना शोभादायक होणार नाही तो दुसरीला कदाचित् शोभादायक होईल. आणखी असें की एकीच्या दारिद्र्यामुळे जो अलंकार 'उसना आणलेला' अशी लोकांची समजूत करील तोच अलंकार एखाद्या गर्भश्रीमन्तिणीला शोभून जाईल. काळ, वेळ, स्थळ, कार्य इत्यादिकांचाहि अशा बाबतींत विचार करावा लागतो. सणावारीं किंवा विवाहादि मंगल प्रसंगीं जे अलंकार शोभतील ते इतर प्रसंगीं शोभणार नाहीत. या सर्व गोष्टींचा प्रस्तुत प्रसंगीं निष्कर्ष असा की ह्या कादंबरीचें स्वरूप, तिची ठेवण, तिचें कार्य, इत्यादि गोष्टींचा विचार करतां तिच्यांतील बहुविध विदग्ध चर्चात्मक भाग तिची शोभा किती पुष्ट करतो हें सूचित व्हावें. ह्या कादंबरीचा नायक विद्वान् आहे, नायिका जिज्ञासु आहे; ती त्याच्याकडे लेखनकला, वादकुशलता शिकण्याकरितां आली आहे" इत्यादि गोष्टी स्पष्ट

करून वामनराव म्हणतात, " या व अशा इतर गोष्टींचा विचार करतां या कादंबरींत हरएक ठिकाणी हरएक प्रकारची चर्चा आली तर ती अप्रस्तुत आहे असें मला वाटत नाही. इतकेंच नव्हे तर ती साहजिक, किंबहुना आवश्यक वाटते."*

डॉ. केतकऱ्यांच्या कादंबऱ्यांतील नीतिशास्त्रविषयक व समाजशास्त्रविषयक वादविवाद व निबंधवजा विस्तृत विवेचन हें आपणांस कां आवडतें ह्याची चर्चा करीत असतां वामनरावांनी तसल्याच प्रकारच्या आपल्या ललितकथांतील वादविवादांवर अप्रत्यक्षपणें मत दिलें आहे : ते म्हणतात, " प्रथम हें लक्षांत धरलें पाहिजे की, केतकरांचीं प्रमुख पात्रें सुशिक्षित, विचारप्रवण, मननशील आत्मनिरीक्षणपर व विवादप्रिय आहेत. परिस्थितींतील भौतिक स्वरूपाच्या मोठ्या घडामोडींपेक्षांहि विचारांच्या व भावनांच्या क्षेत्रांतील सूक्ष्म छटांनीहि त्यांच्या स्वभावांत व वर्तनांत फरक घडून येतो. आणि तीं पात्रें त्या विषयी स्वतःशीं विचार करीत राहतात व इतरांशीं तद्विषयक चर्चाहि करतात. कादंबऱ्यांमध्ये प्रसंग व कृति यांमुळें कथानकाला चालना व गति मिळावी असें म्हणतात; पण केतकरांच्या कादंबऱ्यांतील पात्रांविषयींचे ' प्रसंग ' व त्यांच्या ' कृति ' वाचनाच्या, वादविवादाच्या आणि आत्मनिरीक्षणाच्या

---

* पुढच्याच परिच्छेदांत ' रागिणी ' विषयी वामनराव काय लिहितात तें पहा : " गोळ्यांचें ' हिंदुधर्म आणि सुधारणा, ' प्रस्तुत परीक्षण-लेखकाची ' रागिणी ', जॉनसनचें ' रासेलस ', सर आर्थर हेल्पस् यांचें ' Friends in Council ' इत्यादि पुस्तकांत हरतऱ्हेच्या विषयांवर संभाषणद्वारां चर्चा केली आहे व या चर्चेच्या द्वारें स्वभावविशेष दाखविण्याचा व थोडा बहुत कथानकाचा परिपोष करण्याचाहि प्रयत्न केलेला आहे. परंतु ' दुटप्पी की दुहेरी ' या कादंबरींत कथानक, स्वभावविशेष व वादविवाद जसा व जितका एकजीव झाला आहे तसा इतरत्र दिसत नाही, हें कबूल केलें पाहिजे. वरील पुस्तकांपैकी ' रागिणीं'त कांहीं ठिकाणीं व इतरांत त्याहून अधिक ठिकाणीं तात्त्विक वादविवाद बुद्ध्या घुसडून दिले आहेत. निदान ते घालण्याचा मोह त्या लेखकांना आवरला नाही व कथानकाला अनावश्यक असे भाग त्या पुस्तकांत आले आहेत."

निमित्ताने बरींचशीं निर्माण झालेलीं आहेत. अशा व्यक्तीचें स्वभावदिग्दर्शन व त्यांच्या कृतींचें वर्णन करतांना वादविवाद व तत्त्वचर्चा आल्याशिवाय कशी राहील ? " वामनरावांनी केलेली ही डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांतील वादविवादांच्या ग्राह्याग्राह्यतेची चर्चा डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांना लागू पडण्याऐवजीं त्यांच्याच स्वतःच्या कृतींना अधिक लागू पडते असें दिसतें. वामनरावांच्या ह्या सगळ्याच विवेचनांत थोडासा आत्मसमर्थनाचा भाग असला तरी त्याचा एकंदर रोख तत्त्वचर्चा ह्या कथावाङ्मयाला उपकारक केव्हा ठरतात ह्या प्रश्नाचा तलास लावण्याकडेच असल्यामुळे तें विवेचन मोठें उद्बोधक झालें आहे; व शिवाय त्यांतून निष्कर्षिलेला सिद्धान्त आपल्या स्वतःच्या कादंबरीस--' रागिणी ' स—लावून तिचें त्या बाबीपुरतें का होईना परंतु मूल्यमापन करण्याचा पुढे जो प्रयत्न केलेला आहे त्यामुळे त्यांत उद्बोधनाबरोबर प्रत्ययकारी सामर्थ्य आलें आहे.

## कादंबरींतील ' कृति ' व ' गति ' :

ह्यानंतर वामनरावांनी चर्चेसाठीं पुढे घेतलेला प्रश्न वरील प्रश्नांशीं संबद्ध असाच आहे : कादंबरींतील कथानकाला आवश्यक ठरणारी ' कृति ' ( incident ) व ' गति ' ( movement ) ह्यांचें स्वरूप काय ' हा तो प्रश्न आहे. प्रश्नाची चर्चा करण्याचें प्रयोजन काय हें सांगतांना वामनराव म्हणतात की तात्त्विक चर्चेच्या अलंकाराचें ओझें किंवा लोढणें गळ्यांत बांधल्यामुळे आधीच कृति व गति या बाबतींत वैगुण्य असलेल्या ( ' दुटप्पी की दुहेरी'च्या ) कथानकांत कथानक ह्या दृष्टीने अधिक वैगुण्य आलें आहे, म्हणजे इतर दृष्टींनी त्यामुळे मंदत्व, जडत्व व नीरसत्व आलेलें आहे असें कांही लोकांचें म्हणणें आहे. तेव्हां वरील आरोपाचें निराकरण करण्याच्या हेतूने वामनरावांनी तत्कालीन लेखकवर्गांत व वाचकवर्गांत कादंबरींतील कृति-गतींसंबंधी ज्या गैरसमजुती पसरलेल्या होत्या त्या दूर करण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला आहे : " हाणाहाणी, मारामाऱ्या, ' सूड, सूड, सूड ' असा जोराचा उच्चार, रक्तपात, खून इत्यादिकांशिवाय कथानकांतील कृतिगतींना संभवच नाही काय ? कथानकामध्ये भांडण, बोलाचाली, गैरसमज, राग, वैर, अप-शब्द, प्रेमांत बिघाड, विघ्नें, ' विलक्षण स्वार्थत्याग ', ' दिव्य आत्मयज्ञ, '

' अलौकिक पराक्रम ' इत्यादि गोष्टी कमी अधिक प्रमाणांत व कमी अधिक सौम्य स्वरूपांत दिसल्या तरच तेथे ' चमत्कृति ' दिसते काय ? " असल्या प्रकारचे ह्या लेखकवाचकांना प्रश्न टाकून वामनराव म्हणतात की " ' कर्म ' म्हटलें म्हणजे वाङ्मयकलेच्या क्षेत्रांत तरी तें होतां होई तोंपर्यंत आकस्मिक असूं नये. तर एखाद्या व्यक्तीने विशिष्ट हेतु साध्य करण्याकरितां बुद्धिपुरस्पर केलेलें असावें. त्यामुळे कथानकांतील पात्रांच्या पूर्वपरिचित स्वभावाला व वृत्तीला होतां होई तोंपर्यंत तें अनुरूप असलें पाहिजे, इतकेंच नव्हे, तर त्या-वरून तें अनुमति करतां येण्यासारखें असलें पाहिजे व शिवाय तें चमत्कृति-जनक परिस्थितींत झालें असावें किंवा चमत्कृतिजनक परिस्थिति अथवा परिणाम तिच्यापासून निर्माण झाले पाहिजेत किंवा होण्यासारखे असले पाहिजेत. ' गती ' चें सुद्धां याच धोरणाने लक्षण करतां येईल. " प्रो. ना. सी. फडके ह्यांनी कादंबरीच्या अन्तःस्वरूपाची चर्चा करण्याच्या किती तरी अगोदर वरील लेख वामनरावांच्या लेखणींतून उतरलेला आहे; त्यांतील कादंबरींतील कृतिगतीच्या स्वरूपासंबंधीची वर आलेली चर्चा किती * अचूक आहे ह्याची आजच्या चोखंदळ वाचकास सहज कल्पना येऊं शकेल.

* वाङ्मयीन कृतिगतींचें हें सूक्ष्मस्वरूप ओळखणाऱ्या खुद्द वामनरावांच्या त्याच काळांतील ललितकृतींतून कांही स्थळीं जें ' चमत्कृतिजनकत्व ' साधलेलें आढळतें तें लक्षांत घेतां साश्चर्य हसूंच येतें. ' विचारविलास ' ह्याच संग्रहांत ' दोन स्वदेशींचा लढा ' ह्या नांवाची जी एक षट्प्रकरणात्मक दीर्घ कथा छापलेली आहेत तिच्यांत वामनरावांनी अद्भुत व असंभाव्य घटनांची रेलचेल केली आहे. तीन चार खून पाडलेले आहेत, स्त्री पुरुषांची प्राणांतिक मारामारी वर्णिली आहे, विलक्षण योगायोग साधलेले आहेत. ' रागिणीं ' तील उत्तरार्ध तर सर्वपरिचितच आहे. वामनरावांनी जें थोडेसें नाट्यात्मक लिखाण केलेलें आहे त्यांतहि ही त्यांना अप्रिय असलेली भडक ' चमत्कृतिजनकता ' भरपूर पहावयास सापडते. वामनरावांच्या ' नलिनीं ' त जशी ती विशेषत्वाने आढ-ळते तशी व तितक्या प्रमाणांत जरी ती त्यांच्या पुढील कादंबऱ्यांतून आढळत नसली तरी ती त्यांतहि अधूनमधून डोकें वर काढल्याशिवाय राहत नाही.

**सूक्ष्मलक्षी दृष्टी :**

कादंबरींतील कथानकाच्या दृष्टीनें आवश्यक ठरणाऱ्या कृतिगतींसंबंधी वामनरावांनी ज्याप्रमाणे आपले विचार वीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या ह्या प्रस्तुत परीक्षणलेखांत व्यक्त केले आहेत त्याचप्रमाणे प्रसंगनिष्ठ, स्वभावदर्शनात्मक व मनोविश्लेषणात्मक ह्या संज्ञानीं ज्या कादंबऱ्या आज संबोधिल्या जातात त्यांच्या स्वरूपासंबंधीहि स्थूल मानाने चर्चा केली आहे. वामनरावांनी ह्या कादंबऱ्यांना अनुक्रमें ' कृतिप्रधान ' ( novel of incident ), मतिप्रधान ( novel of character ) व मानस-पृथक्करणप्रधान ( psychological ) अशीं नांवें दिलेलीं आहेत. हीं नांवें किती योग्य आहेत ह्याची जाणत्याला कल्पना येईल. सदर चर्चेत त्यांनी जे इतर साहित्यचर्चात्मक मुद्दे उपस्थित

'आश्रमहरिणीं'त धौम्याला मारेकरी न मारतांच ( तसा संकेत असल्यामुळे) सोडून देतात तो प्रसंग ' पौराणिक ' (?) म्हणूनच आपण सोडून देऊं; पण 'सुशीलेचा देव ' मधील मिसेस स्वीट, तिचे यजमान व सुशीला यांजवर भररस्त्यांत दरवडे-खोरांनी केलेल्या सशस्त्र हल्ल्याचा प्रसंग किंवा ' इंदु काळे व सरला भोळे ' ह्या शांतपणे वाहणाऱ्या कथासरितेंतील विनायकराव व त्यांचे इतिहाससंशोधक स्नेही नारायणराव पाठक यांजवर जखीण खिंडींत गुदरलेला प्राणांतिक प्रसंग व त्यांतून त्यांची झालेली अचानक सुटका ह्यांची आठवण वाचकांच्या मनांत वरील विवेचन वाचीत असतां आल्याशिवाय राहत नाही. या संबंधी अधिक विचार करतां असें वाटतें की वामनरावांचें लक्ष विशिष्ट प्रसंगाच्या वास्तव-अवास्तवतेपेक्षा त्यांतून आपण काय सुचविणार आहोंत ह्यावरच अधिक असल्या-मुळे ते त्यांच्या संभाव्यासंभाव्यतेविषयी फारसा विचार करीत नसावेत; कदाचित् वामनरावांच्या ठिकाणीं मुळांतच असलेली असल्या आकस्मिक, लोकविलक्षण प्रसंगांची आवड किंवा सुप्त इच्छा त्यांच्या ह्या विसंगत व जवळ जवळ सर्वच स्थळीं रसापकर्षक ठरणाऱ्या प्रसंगयोजनेला कारण झालेली असावी. कदाचित् ह्यापैकी एकहि कारण खरें नसून त्यांची कथारचनेबाबतची बेफिकीर वृत्ति व प्रसंगचित्रणाला व्यक्तिदर्शनापेक्षा गौणत्व देण्याची वृत्तीच ह्याला कारण असावी. कारणें कांहीहि असोत, परंतु वरील स्वरूपाची थोडीशी लोकविलक्षण प्रसंगांची कलाहीन आवड त्यांच्या लिखाणांत मधूनच डोकावते हें नक्की.

केले आहेत त्यांत, 'संभाषण ही देखील एक कृतिच आहे', 'मति (character) ही कृतिजन्य आहे, ती कृतींत परिणत होते व कृतीपासून अनुमित होते आणि कृति ही देखील मतिनिरपेक्षतेने विचारांत घेतां येत नाही', 'कथानक व कृति या शब्दांच्या अर्थाचा आनुषंगिक परिवेष जरा बाजूला सारून त्यांतील आन्तर तत्त्वाकडे नजर फेकली व सूक्ष्म दृष्टीने विचार केला तर पात्रांच्या वृत्यंतरामध्ये व वर्तनामध्ये कथानक आहे व ह्या वृत्यंतराची कारणें सुचविणाऱ्या संभाषणांतहि कांही ठिकाणीं कृति व प्रसंग दृग्गोचर होतात,' हे मुद्दे त्यांच्या सहित्यविषयक अत्यंत चोखंदळ व अत्यंत सूक्ष्म लक्षी अशा सत्यान्वेषी दृष्टीची साक्ष पटविणारे आहेत. ह्या शेवटल्या वाक्यांत वामनरावांनी कादंबरींतील कृति, प्रसंग, संभाषण, कथानक ह्यांच्या अन्योन्य-संबंधाविषयी व खऱ्याखुऱ्या स्वरूपाविषयी सूचित केलेलीं तत्त्वें कादंबरी-वाङ्मयाच्या आधुनिक तंत्रविशारदालाहि मान्य होतील अशीं आहेत. त्यांत त्या वाङ्मयप्रकाराच्या अंतरंगाविषयीचें सम्यक ज्ञान यथार्थत्वाने व्यक्त झालें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## कादंबरी की आत्मचरित्र ? :

प्रि. गो. चि भाटे ह्यांच्या 'प्रेम की लौकिक ?' ह्या कादंबरीवजा आत्म-चरित्रपर ग्रंथावर आपली चाळीस पानी टीका लिहितांना वामन मल्हारांनी कमालीची रसिकता दाखविली आहे. आपल्या नेहमीच्या संवयीप्रमाणे अनेक वाङ्मयविषयक प्रश्न त्यांनी सदर टीकेंत उपस्थित केले असून त्यांची साधक-बाधकपणे चर्चा केली आहे. प्रस्तुत ग्रंथाला कादंबरी म्हणावें कीं आत्मचरित्र म्हणावें हा प्रश्न प्रथम उपस्थित करून 'या ग्रंथांत आत्मवृत्ताची छाया आहे त्यापेक्षा पुष्कळ कमी असती तर उत्तम कादंबरी म्हणून हिची सर्वांनी एकमुखाने गणना केली असती; आत्मवृत्तांत आहे त्यापेक्षा पुष्कळ अधिक असता—म्हणजे कादंबरीचें स्वारस्य नष्ट होईल इतका तो असता, तरी देखील तें उत्तम आत्मचरित्र म्हणून गणलें गेलें असतें, पण आहे त्या स्थितींत तें धड कादंबरी म्हणून वाचतां येत नाही व धड आत्मचरित्र म्हणून त्याच्यावर पूर्ण विश्वासहि ठेवतां येत नाही' असा आपला निर्णय सप्रमाण दिलेला आहे. वामनरावांचें हें विवरण वाचीत असतां व्हर्जिनिया वुल्फने

लिटन स्ट्रॅचीच्या Elizabeth and Essex ह्या ग्रंथावर अभिप्राय देतांना सदर ग्रंथ कादंबरीसारखा भासत असल्यामुळे चरित्र म्हणून वाचतांना कसा सदोष वाटतो व तो मूलतःच चरित्रात्मक असल्यामुळे त्याला कादंबरीची गोडी कशी येऊं शकत नाही, ही जी आपली अडचण मोठ्या कुशलतेने नमूद केली आहे त्याची सहज आठवण होते. ह्यासंबंधी अधिक विवेचन करितांना वामनरावांनी केलेलीं खालील विधानें विचारार्ह वाटतात : ' आतां उघडपणे हें कादंबरीवजा आत्मवृत्त आहे असें बजावलें गेलें असल्यामुळे त्यांतील प्रत्येक प्रसंग अक्षरक्षः आत्मचरित्रपर आहे की काय, व नसल्यास अशी खोटी हकीगत लिहिणें योग्य आहे की काय, अशा प्रकारची चिकित्सा करण्याचा वाचकाला पदोपदीं मोह होतो; व ग्रंथाच्या वाङ्मयात्मक रसोपभोगांत थोडासा गौणपणा त्यायोगें आल्याशिवाय रहात नाही. ' केवळ कादंबरी म्हणून सदर ग्रंथ रसिकांच्या हातांत दिला असता तर त्याच्या रसोपभोगांत यत्किंचित्‌हि गौणपणा न येतां उलट जाणत्या वाचकाला लेखकाच्या जीवन-चित्राच्या मधूनच झालेल्या जाणिवेने त्या ग्रंथाच्या परिशीलनांत एक वेगळाच आनंद चाखावयास मिळाला असता असें ते सुचवितात. ह्या नंतर, आत्मपर लिखाणाच्या परिशीलनाने वाचकांच्या स्वाभिमानपोषक भावनांचें समाधान होतें व त्यामुळे त्यांना एक विशिष्ट प्रकारचा आनंद होतो असें वामनराव पुढें म्हणतात व असल्या प्रकारच्या लिखाणाचीं अनेक उदाहरणें देतात. येथील त्यांचें विवेचन हें बरेंचसें अप्रस्तुत भासतें व तें कोल्हटकरी वळणावर चाललें आहे असा संशय येतो. परीक्षणलेखांतील वाङ्मयविवेचन हें साध्य नसून साधनस्वरूप असतें हें कोल्हटकर पुष्कळ वेळा विसरत असत. तसाच प्रकार वामनरावांकडून ह्या ठिकाणी झाला आहे असें वाटतें. कारण ह्यापुढे ते जो प्रश्न चर्चेसाठी घेतात तो म्हणजे कादंबरी व नाटक ह्यांपैकी ' नाटक हें मनुष्य-मात्रास अधिक प्रिय कां होतें ' ? हा असल्यामुळे त्याचा प्रस्तुत कादंबरीशी जोडलेला सम्बन्ध बादरायणापेक्षा अधिक जवळचा आहे असें वाटत नाही. परंतु ह्या अप्रस्तुत का होईना परन्तु महत्त्वाच्या अशा वाङ्मयीन प्रश्नावर वामनरावांनीं आपल्या टीकावाङ्मयाच्या उषःकालींच काय उत्तर दिलें आहे तें पाहूं. वामनराव म्हणतातः " कादंबऱ्यापेक्षा नाटकें मनुष्यमात्रांस अधिक प्रिय होतात याचेंहि अनेकांपैकी एक कारण असें कीं, कादंबऱ्यांतलें वर्णन

सर्व इंद्रियांशीं व मनाच्या सर्व अंगांशीं बोलत नाही, पण नाटकांतील प्रत्यक्ष देखावे बऱ्याच अंशीं तसे बोलतात. कादंबऱ्यांत देखील वर्णनापेक्षा संवाद अधिक आवडतात याचेंहि कारण अशाच प्रकारचें आहे. संवाद वाचतांना तीं तीं माणसें बोलतांना जणू आपण ऐकत आहोंत व खरा प्रकार झाला तसा आपण पहात आहोंत असें क्षणभर वाटतें; पण वर्णन वाचीत असतां असा भास होणें कठीण असतें." वामनरावांची ही उपपत्ति ते म्हणतात त्याप्रमाणेच अनेकांपैकी एक असल्यामुळे तिच्या एकांगीपणांबद्दल व अनिर्णायक स्वरूपाबद्दल आपणांस त्यांना फारसा दोष देतां येत नाही.

**पहिल्या परीक्षणलेखांचें स्वरूप :**

वामनरावांचे हे दोन्हीहि परीक्षणलेख १९२५ च्या आंत लिहिले गेलेले आहेत : कादंबरी किंवा नाटक किंवा आत्मकथनपर स्वरूपाचें लिखाण ह्यांच्या अन्तःस्वरूपाविषयी वामनरावांनी त्यांत व्यक्त केलेले विचार, त्या काळांतील एकंदर मराठी टीकालेखनाचा विचार करितां अत्यंत मार्मिक आहेत असेंच दिसून येतें. वाङ्मयीन प्रश्नांवर निर्णायक मत देतां येणें कठीण आहे ह्या गोष्टीची सुबुद्ध जाणीव आपणांस त्यांच्या पहिल्या पहिल्या परीक्षणलेखांतूनहि दिसून येतें; त्याचप्रमाणे त्यांची त्यांत प्रगट झालेली वृत्ति ही केवळ दोष-दिग्दर्शकाची नसून मूळ ग्रंथकारांची वाङ्मयीन भूमिका प्रथम यथार्थपणे समजावून घेऊन नंतर त्या भूमिकेच्या अनुरोधाने त्यांच्या कृतींचें निरीक्षण करूं पाहणाऱ्या सहृदयाची आहे. लेखक, वाचक आणि वाङ्मय ह्या वाङ्मयव्यवहारांतील तिन्हीहि घटकांना आपल्या परीक्षणलेखांत अन्याय न होऊं देण्याची खबरदारी त्यांत जागोजाग घेतलेली आपणांस आढळते. हीं त्यांचीं वाङ्मयपरीक्षणें म्हणजे ग्रंथकारांची भूमिका नीटपणे, समंजसपणे ध्यानांत बाळगून अभिजात वाङ्मयाच्या अंतिम मूल्यांविषयी निःसंदेह असलेल्या एखाद्या सहृदयाने त्या ग्रंथकारांचे ग्रंथ वाचीत असतां आपणांस आलेल्या अडचणी, आपल्या डोक्यांत उद्भवलेले वाङ्मयीन प्रश्न, त्यांतील सौंदर्यस्थळांच्या दर्शनाने आपणांस झालेला आनंद व त्यांतील दोषस्थळांची आपणास सुचलेली कारणमीमांसा ह्यांच्या तयार करून ठेवलेल्या सुसंबद्ध नोंदींसारखीं आहेत. त्यांत ग्रंथकाराच्या भूमिकेचा सहानुभूतीने विचार केलेला आहे, सुबुद्ध व रसिक

वाचकांच्या अडचणी व आवडीनिवडी व्यक्त झाल्या आहेत, व ह्या आवडीनिवडी व्यक्त होत असतांनाच उत्तम वाङ्मयाच्या स्वरूपाचा धावता विचारहि झालेला आहे.

परंतु असें असूनहि त्यांचे हे पूर्ववयांतील परीक्षणलेख त्यांच्या उत्तरवयांतील परीक्षणलेखांची बरोबरी करूं शकत नाहीत. ' दुटप्पी की दुहेरी ? ' ह्या कादंबरीवरील परीक्षण लिहीत असतां वामनरावांची दृष्टी ही अत्यंत मार्मिक व वाङ्मयव्यवहाराची अचूक समज करून घ्यावयास उत्सुक असलेली अशी जरी दिसते तरी ती त्यांच्या उत्तरकालीन वाङ्मयीन दृष्टीपेक्षा कमी चोखंदळ व किंचित् अनुदार आहे असें वाटल्यावाचून राहत नाही. प्रस्तुत लेखांत वामनराव हे ' चंद्रिका हरिहररावाजवळ रात्रीं चार चार घटका बोलत बसते ही गोष्ट जनांत तरी वाईट दिसणारच ' असें सुचवून चंद्रिकेला अशा प्रकारचें अनुचित वर्तन कादंबरींत ) करावयास लावल्याबद्दल लेखकाला दोष देतांना आढळतात. त्याचप्रमाणे प्रस्तुत कादंबरींत नायिका आपलें प्रेम ' कौंतेय ' ह्या टोपण नांवाच्या लेखकावर आहे हें सुचविण्यासाठी एक लघुकथा लिहून ती कथा नायकास वाचावयास देते असा प्रसंग आहे. ह्या प्रसंगासंबंधी लिहितांना वामनराव म्हणतात, " तरुणींनी विधुरांना असल्या गोष्टी लिहून त्या वाचावयास देणें हें कांही म्हटलें तरी अनुचितच आहे; त्यांत पुनः तो विधुर आपल्यावर प्रेम करतो आहे असें ठाऊक असतांना देखील अशा गोष्टी लिहून त्याला वाचावयास देणें हें तर अत्यंत अनुचित होय. " कादंबरीच्या शेवटीं नायक नायिका परस्परांचें चुंबन घेतात असें जें कोल्हटकरांनीं सुचविलें आहे तेंहि वामनरावांना पसंत पडलेलें दिसत नाही.

### वाङ्मय व नीति : अन्योन्यसंबंध :

वरील आक्षेपांतून सूचित झालेलीं मतें हीं आजच्या काळांत फारच अनुदारपणाचीं व संकुचितपणाचीं भासतील यांत संशय नाहीं; व वामनरावांचींहि उत्तरकालांतलीं पुढारलेलीं मतें लक्षांत घेतां त्यांच्याशीं हीं बरींच विसंगत वाटतात हेंहि खरें; अशा प्रकारचे आक्षेप वामनरावांनी आपल्या उत्तरकालीन परीक्षणलेखांतून घेतलेले नाहींत. वाङ्मय व नीति यांचे अन्योन्य संबंध कोणत्या प्रकारचे आहेत, जीवनाचें वाङ्मयांतर्गत चित्रण हें कोणत्या स्वरूपाचें असावें

ह्यासंबंधीची त्यांची विचारसरणी ही बरीचशी निश्चित स्वरूपाची होती, व ती त्यांनी प्रो. फडके यांच्या 'काश्मिरी गुलाब' ह्या कादंबरीवरील आपल्या दोन परीक्षण-लेखांतून (विहंगम १९३७) किंवा माडखोलकरांच्या 'शाप' व 'दुहेरी जीवन' ह्यांच्या समीक्षणांतून (लोकशिक्षण १९३७, मनोहर १९४०) आणि इतर भाषणांतून व लेखांतून व्यक्त केलेली आहे. ती विचारांत घेतली असतां त्यांचे कोल्हटकरांच्या कथेवरील वर उद्धृत केलेले आक्षेप समर्थनीय भासत नाहीत; एवढेंच नव्हे तर ते वामनरावांनाहि आज फारसे मान्य झाले असते असें वाटत नाही. 'शाप' ह्या कादंबरींत निशिकान्ताला मोह होण्याच्या स्थितीचें माडखोलकरांनी जें वर्णन केलें आहे त्याजवरील आपला आक्षेप नमूद करितांना, 'काश्मिरी गुलाब'मधील अमलकान्त व गुलाब हे विवाहापूर्वी एका खोलींत एक रात्र घालवितात व गुलाब आपल्या शरीराच्या वेगवेगळ्या 'ठेवणी'चीं छायाचित्रें एका फोटोग्राफरला पैशाकरिता घेऊं देते ह्या घटनाचित्रणावरील आपलें मत व्यक्त करितांना, किंवा 'दुहेरी जीवनां'त एका स्त्रीने आपल्या पतीच्या चारित्र्य-कथेचें जें निवेदन केलें आहे त्या निवेदन-पद्धतीवरील आपला अभिप्राय देतांना वामनरावांनी जीं मतें निःसंदिग्धपणे मांडलेलीं आहेत त्यांत विलक्षण एकवाक्यता आहे. निशिकान्ताला पडलेला मोह स्वाभाविक होता हें दाखवितांना त्या मोहाचें निंद्यत्व स्पष्टपणे प्रतीत होईल असें वर्णन माडखोलकरांकडून झालेलें नाही, किंवा आपल्या पतीची चारित्र्य-कथा वर्णित असतां त्याचें वर्तन निंदार्ह आहे हें सूचित होईल अशा पद्धतीने तें वर्णन 'दुहेरी जीवन'मध्यें झालेलें नाही, किंवा अमलकान्त व गुलाब यांच्याकडून घडलेल्या कृतीचें निंद्यत्व त्यांच्या निवेदनांतून सूचित झालेलें नाही, तें तसें त्या त्या ठिकाणी व्हावयाला हवें होतें असेंच ह्या तिन्हीहि कथांच्या बाबतींत वामनरावांना म्हणावयाचें आहे. जें 'स्वाभाविक' तें 'चांगलें' असा वाचकांचा समज होण्याचा संभव असतो, तेव्हा असले प्रकार हे अनुकरणीय नाहीत असा संस्कार वाचकांच्या मनावर त्यांच्या परिशीलनाने झाला पाहिजे असें त्यांना नेहमी म्हणावयाचें असे : 'जगांत वाईट प्रकार पुष्कळ आहेत आणि कादंबरीकारांनी त्यांचें वर्णन करण्यास हरकत नाही, पण वाईट प्रकारांचा वाईटपणा वाचकांच्या नजरेआड होऊन तसे प्रकार ह्या त्रिगुणात्मक संसारांत असावयाचेच, इतकेंच नव्हे तर ते

होण्यांत विशेष अस्वाभाविक किंवा गैर किंवा अनिष्ट असें कांही नाही, असा संस्कार वाचकांच्या मनावर होणें अनुचित आहे ' असें आपलें मत त्यांनी ' काश्मिरी गुलाब 'वरील आपल्या समालोचनांत स्पष्ट शब्दांत मांडलेलें आहे. आपलीं हीं वर्णनें विषयनिष्ठ ( objective ) आहेत, तीं तटस्थाच्या भूमिकेवरून केलेलीं आहेत अशा प्रकारचें समर्थन वरील लेखकांकडून होण्याचा संभव असल्यामुळे त्याला वामनरावांनी दिलेलें उत्तर ह्याच संदर्भात लक्षांत घेण्याजोगें आहे. ' दुहेरी जीवन ' वरील आपल्या समीक्षणांत ते लिहितात :
" या कादंबरीसंबंधाने बोलतांना मला असें दिसतें की लेखकाची दृष्टी जेवढी विषयनिष्ठ असावयास पाहिजे होती तेवढी नाही. लेखकाला प्रेमाविषयक गोष्टींचें वर्णन करतांना—विकृत म्हणा किंवा नका म्हणूं—पण विशेष हौस वाटते असें मला तरी वाटतें. कलादृष्ट्या ज्या वर्णनांची आवश्यकता नाही, पण ज्या गोष्टी विकृत जिज्ञासेला किंवा कामुकतेला प्रिय वाटतात, अशा गोष्टींचें वर्णन ह्या कादंबरींत बऱ्याच ठिकाणीं आलेलें आहे. एखाद्या लेखकानें प्रेमविषयक वाईट गोष्टींचेंहि विषयनिष्ठ दृष्टीने वर्णन केलें तर त्यांत मला कांही गैर वाटणार नाही. पण येथे लेखकाची वृत्ति आणि दृष्टी पाहिजे तशी मला दिसत नाही, पण तटस्थेचा आव आणलेला दिसतो; अमुक अमुक प्रकार मला संसारांत दिसतात ते मी केवळ सांगतों आहें असा अविर्भाव दिसतो; परंतु ह्या वाईट प्रकारांचें वर्णन लेखक मिटक्या मारीत करीत आहे असा भास झाल्याशिवाय राहत नाही...खरी शंभर नंबरी तटस्थता किंवा अलिप्तता मला आवडेल. पण येथे या वृत्तीचा केवळ आभास दिसतो आणि म्हणून प्रेमविषयक वाईट गोष्टींचें वर्णन जें या कादंबरींत आलेलें आहे तें मला कलात्मक वाटत नाही."[१]

### सहानुभूति व सहानुभावः भेद :

लेखकाची वृत्ति ही केवळ तटस्थाची नसते तर आपल्या ललितकथेंतील पात्रांशीं ' सहानुभूत ' असलेल्या कलावन्ताची असते असा आक्षेप वामनरावांच्या वरील विवेचनावर कोणी घेऊं शकेलः वामनरावांनी ह्याहि आक्षेपाला यथोचित उत्तर दिलेलें आहेः ' काश्मिरी गुलाब ' वरील आपल्या परीक्षणांत ते म्हणतात, " कादंबरीकाराची सहानुभूति कोणीकडे झुकते हें वाचकांना थोडेंबहुत कळतें आणि त्या आधारावरच ते टीका करतात. ललितकथा

लेखकाला परसनःप्रवेश करून त्या त्या पात्राच्या मनोवस्थेचा काल्पनिक ‘ सहानुभाव ’ घेणें आवश्यकच आहे; पण हा काल्पनिक सहानुभाव निराळा आणि ‘ सहानुभूति ’ निराळी. प्रस्तुत कलावन्त कथालेखकाची सहानुभूति काश्मिरी गुलाबकडे झुकते आहे असें मला तरी वाटतें ” कलानिर्मितीच्या दृष्टीनें आवश्यक ठरत असलेला ‘ सहानुभाव ’ व ‘ सहानुभूति ’ ह्यांतील हा फरक वामनरावांनी वरील विवेचनांत जो सूचित केला आहे तो त्यांच्या मार्मिकपणाची साक्ष पटवितो. माडखोलकरांच्या ‘ भंगलेलें देऊळ ’ ह्या कादंबरींत युवतींच्या प्रेमानुनयांचीं, प्रेमविलासांचीं व प्रेमभंगांचीं वर्णनें असलीं तरी “ तीं अशा वातावरणांत, अशा संदर्भांत व अशा शुद्ध भावनेने व असा संयम ठेवून वर्णिलेलीं आहेत की त्यांचा आस्वाद घेतांना सदभिरुचीच्या मनुष्याला केव्हांहि लज्जा किंवा जुगुप्सा वाटणार नाही ” असें ते लिहितात; ह्यावरून फडके-माडखोलकरांच्या वर निर्देशिलेल्या कादंबऱ्यांवर टीका करितांना वाङ्मयांतून साधल्या जाणाऱ्या विशिष्ट जीवनांगांच्या चित्रणाबद्दल त्यांचें म्हणणें काय होतें हें स्पष्टपणें कळण्यासारखें आहे. त्यांचें म्हणणें हेंच की अशा प्रकारचें जीवनाचें चित्रण करीत असतां कलावन्ताने विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट व्यक्ति अशा पद्धतीने “ बोलणें किंवा वागणें साहजिक आहे असें दाखवावें, तें समर्थनीय आहे असें भासवूं नये; तें क्षम्य आहे अशी भावना उत्पन्न करावी, पण तें रम्य आहे असा संस्कार मनावर करूं नये; त्याच्याकडे उदारबुद्धीने लोकांनी पहावें असा ध्वनि असावा, पण त्यांत कांही वाईट नाही अशी सूचना नसावी ”.

### ललित-वाङ्मयाचा विषय :

याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की त्यांनी ‘ दुहेरी जीवन ’ वरील आपल्या परीक्षणांत व आपल्या इतर कांही लेखांत जीवनांतील अमुक एक प्रसंग किंवा घटना ही ललितवाङ्मयाचा व विशेषतः ललितकथेचा विषय केव्हा होऊं शकते ह्यासंबंधी जी विचारसरणी पुढे मांडलेली आहे ती वरील प्रश्नावर अधिकच प्रकाश पाडणारी अशी आहे. संसारांत ज्या बऱ्यावाईट गोष्टी घडत आहेत त्यांचें कलात्मक कथन करणें हेंच कादंबरीकाराचें काम आहे हें ते कबूल करतात. पण त्यावर निर्बंध घालतात तो एवढाच की ‘ तें वर्णन कलात्मक पाहिजे. ’ वामनरावांनी यांत विशेष तें काय सांगितलें असेंच वाचणारांना वाटेल;

परंतु ' तें कलात्मक पाहिजे ' म्हणजे काय ह्याची फोड करितांना वामनरावांनी जें पुढे विवेचन केलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांच्या ह्या अल्पशा साध्या सिद्धान्तांत कलेच्या स्वरूपासंबंधीचें केवढें सम्यक्ज्ञान प्रगट झालेलें आहे तें लक्षांत येईल. ते म्हणतात : ' वर्णन कलात्मक व्हावयाचें असेल तर तें वर्णन करण्यासारख्या-( कलादृष्ट्या वर्णन करण्यासारख्या )-गोष्टींचें वर्णन असलें पाहिजे ही अगदी साधी व सर्वमान्य होण्यासारखी गोष्ट आहे. वर्णन करितांना लेखकाला सांगण्यासारखें कांही तरी सांगावयाचें आहे असें दिसलें पाहिजे व वाचकांना तें सांगण्यासारखें होतें असें वाटलें पाहिजे.' आजच्या कादंबऱ्यांतील प्रेमप्रसंगांच्या वर्णनांचेंच उदाहरण घेऊन वामनराव पुढें म्हणतात, " कांहीं तरुण तरुणींच्या प्रेमपाशांत सांपडतात ही गोष्ट सर्वांना विदित आहे. त्यामुळे ती सांगण्यासारखी केव्हा होईल, तर हे प्रेमसंबंध कां व कसे उत्पन्न होतात यांचें मार्मिक दिग्दर्शन असेल तर! किंवा हे प्रेमसंबंध पाहून सांगणाऱ्यांच्या मनांत ज्या विशिष्ट भावना उत्पन्न होतात त्यांचें दिग्दर्शन करावयाचें असेल तेव्हा! सांगितलेल्या गोष्टी सुंदर भाषेंत सांगितल्या म्हणजे त्या सांगण्यासारख्या होतात असें मला वाटत नाहीं " ' आनंद ' हेंच ललित-वाङ्मयाचें ध्येय आहे असें घटकाभर मान्य करून त्यांनी प्राध्यापक फडके यांना एके ठिकाणीं जे दोनतीन प्रश्न विचारले आहेत ते ह्याच संदर्भात लक्षांत घेण्याजोगे आहेत; ते विचारतात : ' अपक्व किंवा अयथार्थ विचारांची मांडणी कितीहि सुंदर केली तरी तिने ललित-वाङ्मयाचें ' आनंद ' हें जें ध्येय तें परिपूर्णतेने साध्य होईल काय ? आणि दोन ललित कृतींत मांडणी सारखीच सुंदर आहे आणि विचारांच्या गहनतेंत मात्र मूल्यभेद आहे, तर या ललितकृतीच्या मूल्यमीमांसेंत अधिक गुण गहन विचारात्मक कृतीला प्रो. फडके देणार नाहीत काय ? तसेंच कलेचें ध्येय ' आनंद ' हें ठरल्यावर या आनंदामध्ये माती किंवा विष कालविणारा भाग ललितवाङ्मयांत येणें अप्रशस्त; अर्थात् नैतिक दृष्ट्या आनंदाला कलुषित करणारा किंवा शबलित करणारा भाग ललितकृतीला गोणत्व आणणारा आहे हें देखील प्रो. फडके यांना मान्य करावयास हरकत नसावी. " आजच्या मराठी ललितकथांतून जो निःसत्त्वतेचा दोष सर्वसामान्यपणे दिसून येतो त्यावर वामनरावांनी येथें आपल्या वरील अर्थगर्भ कलासिद्धांतांतून नेमकें बोट ठेवलें आहे असें मला वाटतें. एखादी

पंडुरोगाने पछाडलेली निःसत्त्व स्त्री ही सौंदर्यप्रसाधनाच्या कृत्रिम साधनांनी ज्याप्रमाणे आपल्या चेहऱ्यावर खोटी कांति आणूं पाहते व त्यामुळेच खऱ्या निकोप प्रकृतीच्या रसिकाला ती अधिकच भेसूर भासते तशी स्थिति आजच्या मराठींतील कथालेखनाची झालेली हरघडीं प्रत्ययाला येत आहे. 'सांगण्यासारखें आहे' म्हणून सांगितलें जाण्याऐवजी सांगण्याची बाह्य ऐट साधली गेली आहे असें पाहून हवे तें सांगण्याचा प्रयत्न होत आहे. आपण जीवनाचें वास्तवदर्शन घडवीत आहोंत ह्या भ्रमाने नको तीं वर्णनें, नको त्या पाल्हाळाने लघुकथांतून व कादंबऱ्यांतून मराठी लेखक करितांना दिसत आहेत; त्यामुळे साधनांना साध्याचें महत्त्व आलें आहे, तंत्र हेंच मंत्रांपेक्षा अधिक श्रेष्ठ मानलें जात आहे, कला बाजूला राहून कामगिरीलाच कला समजण्यांत येत आहे : वाङ्मयाचा विषय, वाङ्मयनिर्मितीचा हेतु, वाङ्मयलेखनाची प्रवृत्ति, वाङ्मय-परिशीलनाचा वाचकांवर होणारा परिणाम ह्यासंबंधीच्या कल्पनांत चुकीच्या मूल्यांना थारा मिळत आहे व ह्या सर्वांचा अनिष्ट परिणाम होतकरू लेखकांवर होत असल्यामुळे त्यांच्या लिखाणाचें स्वरूप अधिकच भीषण दिसत आहे. अशा वेळीं वामन मल्हारांचीं वर निर्देशिलेलीं मतें लेखकांकडून जेवढीं लक्षांत घेतलीं जातील तेवढीं थोडींच आहेत.

## कला, नीति व सत्य : परस्परसंबध :

कला, वाङ्मय व नीति ह्यांच्या अन्योन्य संबंधाबाबतचीं वामनरावांचीं मतें अत्यंत समंजसपणाचीं होतीं. हीं मतें त्यांनी आपल्या सगळ्याच टीकालेखांतून व वाङ्मयीन प्रश्नांच्या विवेचनांतून मांडलेलीं व सुचविलेलीं आहेत. त्यांच्या सगळ्याच लिखाणांतून प्रगट होणारी त्यांची भूमिका ही 'सद्भावनांचें मूल्य ओळखणाऱ्या अस्सल विवेकवाद्याची' असल्यामुळे कला व नीति ह्यांच्या अन्योन्य-संबंधांविषयीं त्यांनी स्वीकारलेलें, आचरिलेलें, व प्रतिपादिलेलें धोरण कोणाहि सुजाण रसिकाला पटेल असेंच आहे. "कलेच्या पाठीमागे बोधाचा गुप्त हेर लावूं नये, हें नरसिंह चिंतामण केळकर यांचें म्हणणें 'सामान्यतः' बरोबर आहे; म्हणजे ती कुलशीलवती असेल तर आहे; पण कलावन्तिणीच्या पाठीमागे गुप्त हेर असला तर तो योग्यच होणार नाही का ?" असें तें आपल्या एका परीक्षणलेखांत मोठ्या मार्मिकपणे विचारतात; त्यांनी अनेक ठिकाणीं साधलेला

वरील थाटाचा शब्दविलास बाजूला ठेवला तरी उज्जयिनी येथील साहित्य-संमेलन प्रसंगीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनी ह्याच प्रश्नाची जी जातां जातां एका परिच्छेदांतून अनुषंगिक रीत्या चर्चा केली आहे ती मला अत्यंत उद्‌बोधक वाटते. ज्ञानप्रिय, नीतिप्रिय व कलाप्रिय असे जे आपल्या मनाचे तीन विभाग आपण सोयीसाठी मानतों 'ते विभाग विभिन्न नाहीत तर अन्योन्य-साक्षेप, अन्योन्याश्रयी व अन्योन्यसंस्कारक आहेत. अर्थात् एका विभागाचा किंवा अंगाचा विचार करतांना इतर अंगांकडे सोयीसाठी दुर्लक्ष करणें वेगळें, आणि दुसऱ्या अंगांना दुखापत झाली व हाय हाय असे उद्गार तोंडांतून बाहेर पडूं लागले तरी त्या अंगावर बेफिकीर वृत्तीनें आणि जाणून उमजून प्रहार करीत राहणें निराळें', ही गोष्ट ते प्रथम स्पष्ट करितात व पुढे म्हणतात, "आता एवढी मात्र गोष्ट खरी की मनाच्या संसारांत कलेला, नीतीला आणि सत्याला एकत्र नांदावयाचें आहे, आणि त्यांचीं पूर्णावस्थेंतील ध्येयें सुसंवादी असलीं तरी अपूर्णावस्थेंतील ध्येयें विशिष्ट मर्यादेनंतर विसंवादी होऊं लागतात. तेव्हा होतां होई तों त्यांनी आपापल्या क्षेत्राबाहेर फारसें पाहूं नये आणि आपण बरे आणि आपला मार्ग बरा अशी वृत्ति स्वीकारावी. तसेच शेजारधर्म म्हणून होतां होई तों दुसऱ्यांशीं जुळवून घ्यावयाचें: निदान जाणून उमजून त्याला दुखवावयाचें नाही, यदाकदाचित् दुखवावें लागलेंच तर अगतिक स्थितींतच, कष्टाने, दुःखी अन्तःकरणाने, क्षमायाचनापूर्वक आणि शक्य तेवढ्या अल्प प्रमाणांत दुखवावयाचें अशी वृत्ति स्वीकारल्यांस कला-लालसेला, नीतिप्रियतेला, आणि सत्यजिज्ञासेला–सर्वांनाच हें धोरण हितावह व भूषणावह होईल."* हें विवरण करीत असतां वामनरावांना आजच्या या अपूर्ण व त्रिगुणात्मक जगांत अशी सात्त्विक वृत्ति सांभाळणें किती कठीण आहे याची जाणीव आहे व म्हणूनच ते आज ज्ञान, नीति व कला यांच्या कलागती कशा लागत आहेत याचें पुढे मोठ्या कौशल्याने वर्णन करितात: परंतु ह्या वास्तवदर्शनांतून सूचित होतें तें हेंच की वरील धोरण प्रत्यक्षपणे अमलांत

---

* ह्याच संदर्भांत जिज्ञासूंनी वामनरावांनी फडके–जावडेकर वादाचा महाराष्ट्रसाहित्य पत्रिकेच्या ६१ व्या अंकांत जो समारोप केला आहे तो अवश्य वाचावा.

आणणें हें जरी बरेंचसें कठीण असलें तरी त्याची सदोदित जाणीव ठेवून तदनुसार वर्तण्याचा प्रयत्न करणें ह्यांतच मानवाचें अंतिम हित आहे.

## कलानिर्मिति : आत्म्याचें कलात्मक अंग :

आपल्या ' काश्मिरी गुलाब ' वरील परीक्षणांत वामनरावांनी हाच विचार परंतु अधिक विस्ताराने मांडलेला आहे. वामनरावांचा हा परीक्षणलेख अद्याप संग्रहित झालेला नसल्यामुळे त्यांतील पुढील परिच्छेद आहे तसाच आपल्यापुढे ठेवतों: वामनराव म्हणतात, " कला हें जीवनाचें एक अंग आहे. नुसतेंच जर जगावयाचें असेल, तर कलेचा कांही एक उपयोग नाही. श्वासोच्छ्वास करणें, खाणें, पिणें, याशिवाय मनुष्य जगणार नाही, परंतु कलाकृति केल्याशिवाय किंवा तिचा आस्वाद घेतल्याशिवाय जगूं शकेल. परंतु केवळ जगणें हें मनुष्याचें ध्येय किंवा अवतारकार्य नाही...शुद्धतम, सात्त्विकतम, उच्चतम, उदारतम, सर्वांगपूर्ण, सर्वानुभूतिगर्भ, सर्वप्रेरणातृप्तिगर्भ जीवन हें मनुष्याचें ध्येय आहे; आणि अशा जीवनाकरिता त्याची धडपड आहे. अशा जीवनाला कलाकृतींची शक्य तेवढी निर्मिति व निदान त्यांची रसानुभूति आवश्यक आहे. पण ही निर्मिति किंवा अनुभूति आत्म्याच्या इतर अंगांशी व आकांक्षांशी सलग्न आहे, त्यांच्याशी तिचा जिव्हाळ्याचा संबंध आहे, खरें म्हणजे आत्म्याचीं सर्व अंगें अन्योन्याश्रयी आहेत. कलात्मक अंग काय किंवा कोणतेंहि दुसरें अंग काय ' सर्वतंत्र-स्वतंत्र ' नाही , अन्यतंत्रसापेक्ष आहे. आत्मा हा शरीररक्षणाच्या दृष्टीने परिस्थितींतील ग्राह्यांश जो आहे तो घेतो, त्या त्या प्रेरणेच्या दृष्टीने परिस्थितींतील विशिष्ट अंश आत्मसात् करतो किंवा त्याचें विचारात्मक परिशीलन करतो किंवा तत्संबंधी भावनात्मक प्रत्युत्तर देतो किंवा तत्संबंधी कलात्मक आनंद उपभोगतो किंवा त्याचा कलानिर्मितीच्या दृष्टीने उपयोग करून घेतो. कलानिर्मिति व कलास्वाद हे आत्म्याच्या अनेक व्यापारांपैकी दोन व्यापार आहेत. ते इतर व्यापारांहून भिन्न आहेत, पण अलग नाहीत. त्यांचें कार्य निराळें आहे, पण तें इतरांशी संलग्न व संबद्ध आहे. सोईसाठी कलात्मक अंग व त्याचा व्यापार यांचें पृथक्त्व मानावें लागतें. पण आत्मा हा अनेक अंगांचें केवळ मिश्रण नसून तो अखंड, अन्योन्याश्रयी, सुसंबद्ध

अशा अंगांचा एकजीव झालेला जीवंत ' पदार्थ ' आहे. अर्थात् कलेचे व्यापार विशिष्ट मर्यादेपर्यंतच इतर व्यापारांहून भिन्न व स्वतंत्र मानतां येतील. इतर अंगांशी आमचा संबंध काय असें कलेने विचारणें म्हणजे डोळ्याने किंवा जिव्हेने पोटाशी, किंवा मेंदूशी किंवा मनाशी काय कर्तव्य आहे असें म्हणण्यासारखेंच वेडेपणाचें आहे. " वरील स्वरूपाचें विवेचन करून वामनराव शेवटीं बजावतात तें हेंच की ' विचाराच्या, विवेचनाच्या किंवा अनुभवाच्या **सोयीच्या दृष्टीने** फार झालें तर ' कलेसाठीं कला ' असें म्हणावें आणि त्याप्रमाणे त्यांचीं क्षेत्रें, त्यांचे व्यापार, त्यांची अनुभूति वगैरेंचें पृथक्त्व मानावें, परंतु एकांतिक पृथक्त्व शक्य नाही आणि इष्ट नाही हें विसरूं नये म्हणजे झालें.'

## कलावंत आणि विचारस्वातंत्र्य :

श्री. पु. य. देशपांडे, भाई डांगे, भाई फडके यांच्या विचारसरणींची चिकित्सा करितांना ' कला काय, नीति काय किंवा सत्यप्रीति काय, पूर्ण स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेंतच फोफावते, फुलते आणि सुफलदायी होते ' असें स्पष्ट करून ' सामान्यतः जिचा तिचा स्वधर्म तिला मोक्षदायक; परधर्म हा केव्हांहि अधःपाताला कारणीभूत; मग तो नीतीचा असो, किंवा सत्यदेवतेचा असो ' असें वामनराव निःसंदिग्धपणे प्रतिपादतात; परंतु तेच वामनराव डॉ. केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांमधून जो मतप्रचार केला आहे त्याला आनंदाने मान्यता देतांना आढळतात. वरवर पाहतां विसंगत वाटणाऱ्या ह्या दोन मतांमध्ये पूर्णपणे सुसंगति आहे : कला ही पूर्ण स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेंत फुलते असें जेव्हा वामनराव म्हणतात, तेव्हां त्यांना कलावन्ताचें विचारस्वातंत्र्य, उक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्यच कलेच्या परिपोषाला किती आवश्यक असतें हें दाखवावयाचें असतें व म्हणूनच आपल्याला जीं मतें सत्य वाटतात तीं मतें डॉ. केतकरांसारखा आस्थेवाईक लेखक प्रतिपादूं लागला तर त्यांत वामनरावांना स्वाभाविकच वावगें असें कांही दिसत नाही. ' प्रचलित नीतीपेक्षा भिन्न आणि उच्चतर नीति ज्याला अभिमत असेल तिचा पुरस्कार करण्यास त्याला प्रतिबंध नसावा; या तत्त्वाची कसोटी केतकरांच्या कादंबऱ्यांना लावली असतां त्या कितीहि लोकविलक्षण मतांचा पुरस्कार कर-

णाऱ्या असल्या तरी निर्दोषच नव्हे तर अभिनंदनीयहि वाटतात', असें आपलें निश्चित मत आहे, असेंच ते स्पष्टपणे म्हणतात. कलावन्त हा समाजाचा एक घटक असल्यामुळे त्याने व्यक्तिसुखापेक्षा समाजहिताकडे अधिक लक्ष द्यावें हें तत्त्व वामनराव मान्य करितात, परंतु त्याच वेळीं ह्या तत्त्वाच्या अधिकारमर्यादेची जाणीव ठेवण्याविषयी व 'औचित्य' विचार न सोडण्याविषयीं बजावतात. घराला आग लागली असतां लेखकाने लेखणी टाकून हातांत पाण्याची बादली घ्यावी ह्या म्हणण्याला ते मान्यता देतात, परंतु त्याचबरोबर असले आत्यंतिक प्रसंग अपवादात्मक होत, हें स्पष्ट करतात. कलावन्ताने स्वतंत्रपणे आपला 'स्वधर्म' आचरीत राहण्यांतच त्याच्या जीवनाची सुफलता आहे, ह्याच मताचा ते सर्वत्र पुरस्कार करितांना आढळतात.

**मतप्रचार व कलासौंदर्य :**

डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांतून झालेल्या मतप्रचाराला जेव्हा वामनराव मान्यता देतात तेव्हां त्या मतप्रचाराच्या हव्यासामुळे व इतर अनेक गोष्टींमुळे डॉक्टरसाहेबांच्या कथांतून जे अनेक कलादोष उत्पन्न झालेले आहेत त्यांजकडे ते डोळेझाक करितात असें नव्हे. तेहि कलादोष मोठ्या मार्मिकपणे त्यांनी नमूद केलेले आहेत. येथेच शास्त्रीय सत्यें 'अज्ञानपटलामुळे म्हणा किंवा इतर कशामुळे म्हणा, जाणत्यांना जरी जात्याच सुंदर भासलीं तरी तीं सर्वांना तशीं भासतील असें नसतें,' असें सांगून वामनराव शास्त्रीय सत्य व कलात्मक सत्य ह्यांच्या अभिव्यक्तीमधील एक फरक सूचित करतात. ते म्हणतात की "कलावन्ताला कांही सत्यें दिसलीं म्हणजे आनंद होतो, पण त्याचें कार्य तेवढ्याने संपत नाही; त्याच्या कार्याला ह्या आनंदापासून केवळ आरंभ होतो व हा आनंद दुसऱ्याच्या अनुभवाला येईल अशी कृति निर्माण करणें हें त्याचें खरें कार्य असतें." कलावन्ताने केलेलें सत्यदर्शन हें आनंददायक असलें पाहिजे; एवढ्यासाठीं तें आनंददायक होईल अशा रीतीची दक्षता बाळगून केलेलें असलें पाहिजे; एवढेंच नव्हे तर जो कलावन्त हें जाणतो तोच उत्तम कलावन्त गणला जातो, असें आपलें मत स्पष्टपणे वामनरावांनी या ठिकाणी पुढे मांडलेलें आहे; ह्या सर्व विवेचनावरून

कलेच्या प्रांतांत सत्याइतकीच सौंदर्याची चाड कलावन्ताला असणें किती आवश्यक असतें हें वामनरावांनी दाखवून दिलें आहे.

## व्यक्तिदर्शन : वास्तविक का काल्पनिक ?

डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांवरील आपल्या समालोचनात्मक लेखांत वामनरावांनी जे आणखी कांही महत्त्वाचे असे वाङ्मयीन प्रश्न चर्चेला घेतलेले आहेत, त्यांत कोणाही कादंबरीकाराने आपल्या कादंबऱ्यांतील पात्रें हीं समाजांतील कांही विशिष्ट व्यक्तींवरून रंगविणें वाङ्मयदृष्ट्या इष्ट की अनिष्ट हा प्रश्न अत्यंत चिंतनीय आहे. कोणताहि ललित कथालेखक हा आपलीं पात्रें केवळ कल्पनेंतून न निर्मितां प्रत्यक्ष मनुष्यसृष्टींत त्याला आलेल्या अनुभवांवर आधारतो हें जरी खरें असलें तरी त्याने आपल्या कृतींतील कांही पात्रांचे तोंडवळे हे प्रत्यक्ष सृष्टींतील कांहीं विशिष्ट समाजांत, शाखांत वा प्रांतांत बहुपरिचित असलेल्या व्यक्तींच्या तोंडावळ्याशीं तंतोतंत जुळतील असे रंगवावेत की नाही हा प्रश्नच आहे. बहुजनांना परिचित नसलेल्या अशा एखाद्या व्यक्तीचें तंतोतंत्र चित्र जेव्हां एखादा कथालेखक आपल्या कथेंत रंगवितो, तेव्हां हा प्रश्न चर्चेला येऊं शकत नाही; कारण त्या कथेच्या वाचकांपैकी बहुतेकांना मूळ व्यक्ति परिचित नसल्यामुळे हें साम्य लक्षांत येत नाही, परंतु अशा परिस्थितींतहि कथालेखकाची नैतिक जबाबदारी काय असावी, हा प्रश्न सोडविला जाणें अगत्याचें आहे; परंतु ज्या वेळी कथेंतील कांही पात्रांचे चेहरे हे बहुसंख्य वाचकांच्या परिचयाचे असतात, त्याच वेळी हा प्रश्न विशेष जोराने चर्चेला निघतो. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांतील वैजनाथशास्त्री, लाला गजपतराय हीं व्यक्तिचित्रें अशा प्रकारचीं असल्यामुळे त्यांच्याबाबत हा प्रश्न वामनरावांनी उपस्थित केलेला आहे; परंतु त्याची साधक बाधक चर्चा करून त्यावरील आपला निर्णय देतांना त्यांनी आपल्या डोळ्यापुढे ह्या प्रश्नाचें संकुचित स्वरूप ठेवलेलें नसून त्याचें अत्यंत व्यापक असें स्वरूपच ठेवलेलें आहे असें दिसतें; त्याप्रमाणें त्यांनी कोठें स्पष्ट केलेलें नसलें तरी तेंच त्यांना अभिप्रेत असावें असें वाटतें. जेथे अमुक एक पात्र म्हणजे अमुक एक व्यक्ति असा भास उत्पन्न होईल असेंच नव्हे तर असा भास उत्पन्न व्हावा असा हेतु स्पष्ट दिसतो, तेथे पात्रवर्णन हें वाङ्मयदृष्ट्या क्वचित् अपवादात्मक प्रसंगीं

समर्थनीय असलें—हे अपवादात्मक प्रसंग कोणते हे मात्र वामन मल्हारांनी स्पष्ट केलेलें नाही; तें स्पष्ट करावयाला हवें होतें—तरी तें एकंदरींत अप्रशस्त आहे असें आपलें मत वामनरावांनी दिलेलें आहे. अशा प्रकारचें व्यक्तिचित्रण झालें असतां मूळ व्यक्तीला कसा अन्याय होण्याचा संभव असतो हें विस्तारशः स्पष्ट करितांना ती व्यक्ती जर सर्वसामान्य असेल, बहुजनांना अपरिचित अशी असेल तर ह्या अन्यायाची दूषणीयता कशी वाढते हें त्यांनी दाखवून द्यावयास हवें होतें : तें दाखवून दिलेलें नाही. परंतु तें दर्शित झालेलें नसलें तरी ह्या प्रश्नाबाबत त्यांनी केलेलें संपूर्ण विवेचन त्यावर निर्णायक स्वरूपाचें मत बनविण्यास उपयुक्त आहे असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

## चिकित्सक ऐतिहासिक दृष्टि :

डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांवरील वामनरावांच्या ह्या लेखांत ऐतिहासिक दृष्ट्या, वाङ्मयीन दृष्ट्या, व चरित्रात्मक दृष्ट्या कोणत्याहि वाङ्मयकृतींचें मूल्यमापन करण्याची त्यांची त्रिविधा शक्ति दिसून येते. डॉ. केतकरांचें मराठी कादंबरीकारांतील स्थान निश्चित करितांना, व त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीवाङ्मयांत जी स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण भर टाकलेली आहे तिचें स्वरूप स्पष्ट करितांना त्यांनी मराठी कादंबरीवाङ्मयाचा जो धावता आढावा घेतला आहे, तो त्यांच्या मर्मग्राही वाङ्मयीन ऐतिहासिक दृष्टीचा पुरावा आहे. त्याच्याकडे पाहिलें असतां वामनरावांनी आधुनिक मराठी वाङ्मयाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील कामगिरीचा केव्हा तरी विस्तारशः आढावा घ्यावयास हवा होता असेंच वाटतें. त्यांच्या गोवे येथील अध्यक्षीय भाषणांतहि ऐतिहासिक दृष्ट्या वाङ्मयाकडे पाहून त्यांतील वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींचा नेमका उल्लेख करण्याबाबतच्या त्यांच्या ह्या चिकित्सक शक्तीचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. वामनरावांचें हें भाषण अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. आमच्या समजुतीप्रमाणें वामनरावांच्या ह्या भाषणासारखें भाषण अद्याप महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या एकाहि अध्यक्षाकडून झालेलें नाही; वाङ्मयाची प्रवृत्ति व त्यांचीं ध्येयें हीं स्पष्ट करून व अनेक वाङ्मयीन प्रश्नांची चर्चा करून वामनरावांनी ह्या आपल्या भाषणांत तत्त्वज्ञान, धर्म, समाजशास्त्र, राजकारण, इतिहास, परलोकशास्त्र, ऐतिहासिक संशोधन, गणितशास्त्र, चरित्र, साहित्य-

शास्त्र, व्याकरण, भाषाशास्त्र, वाङ्मयसंशोधन, नीतिशास्त्र, अध्यापनशास्त्र, मराठी मासिकें, वर्तमानपत्रें, छंदःशास्त्र, कोशवाङ्मय, कादंबरी, काव्य, पोवाडे, नाटकें इत्यादि प्रांतांत मराठी लेखकांनी गेल्या चाळीस पन्नास वर्षांत केलेल्या कामगिरीचें अत्यंत चिकित्सक दृष्टीने समालोचन केलेलें असून तें जसें त्यांच्या सर्वव्यापी वाङ्मय-प्रज्ञेचें द्योतक आहे, तसेंच वाङ्मयाच्या वेगवेगळ्या प्रकारांच्या अन्तःस्वरूपाबाबत असलेल्या सम्यक ज्ञानाचेंहि द्योतक आहे. वाङ्मयाच्या ह्या वेगवेगळ्या प्रांतांत झालेल्या कामगिरीचा आढावा घेतांना वामनरावांनी त्या त्या वाङ्मयप्रकाराचा विकास होत आहे की संकोच होत आहे हेंहि अत्यंत मार्मिकपणे दाखविलें आहे. नाटकांतील रसाचें अधिष्ठान रंगभूमीवरील पात्र नसून प्रेक्षकाचें किंवा वाचकाचें हृदय आहे हें तत्त्व स्पष्ट करून आधुनिक मराठी नाट्यवाङ्मयाची सदोषता, ह्या तत्त्वाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे मूलतः कशी उत्पन्न झाली आहे हें मोठ्या कौशल्याने विस्तारशः स्पष्ट केलें आहे. पहिल्या महायुद्धोत्तर कालांतील मराठी काव्याचें समालोचन करितांना आधुनिक कवि हे अल्पविचार-जन्य भावना-क्षोभावर किंवा आर्तत्वावर अवलंबून काव्यरचना करीत असल्यामुळे त्यांजकडून उच्चतच काव्य कसें निर्माण होत नाही हें त्यांनी दाखविलें असून तत्कालीन कवींना जातां जातां जी एक सूचना केली आहे ती त्यांच्या वाङ्मय-व्यवहाराबाबतच्या यथार्थ ज्ञानाची पूर्ण कल्पना आणून देते. कोणत्याहि वाङ्मयप्रकाराची जीवनाशय व्यक्त करण्याची शक्ति संकुचित केली असतां त्याचा स्वाभाविक कसा विकास थांबतो व तो वाङ्मयप्रकार नित्यनवीन सौंदर्य प्रगट करण्याचें आपलें नेहमीचें कार्य करण्यास कांही कालानंतर कसा असमर्थ बनतो ह्याची वामनरावांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी मराठी सुनीतकारांना आपल्या भाषणांतून अशी सूचना केलेली आहे की त्यांनी चरणसंख्येचीं व यमकांचीं नसतीं बंधनें स्वतःवर लादून घेऊं नयेत. असलीं बंधनें काव्याच्या एका प्रकारावर लादण्यांत हे कवि 'बऱ्याच अंशीं' केवळ ' अविचारपूर्वक अनुकरणच ' करीत आहेत. ' एखादा स्वतंत्र बुद्धीचा साहसी कविवीर कांही अंशीं तरी दासोचित अनुकरण-प्रियतेमुळे लावून घेतलेलीं हीं नसतीं बंधनें सोडून देईल व मराठी सुनीतांचें स्वतंत्रत्व पूर्णपणें स्थापित करील ' तर फार बरें होईल, अशी आशा त्यांनी ह्या समालोचनाचे शेवटीं व्यक्त केली आहे. मराठी विडंबनकाव्याचें त्यांनीं केलेलें मूल्यमापन देखील अत्यंत

वाचनीय झालें आहे; परंतु त्यापेक्षाहि लक्षांत घेण्याजोगी गोष्ट अशी कीं नाट्य-छटेसारख्या छोट्याशा व नवोदित वाङ्मयप्रकारांबाबत वामनरावांनी ह्याच भाषणांत जें मतदर्शन केलेलें आहे तें त्याच्या भविष्यकालीन ( म्हणजे आज दिसून येत असलेल्या ) स्थितीची यथायोग्य जाणीव करून देणारें ठरलें आहे; हें वामनरावांचें मत वाचीत असतां त्यांत वामनरावांना ह्या सुंदर वाङ्मय-प्रकाराच्या अन्तःस्वरूपाचा संकोच होत चालल्यामुळें त्याच्या होऊं घातलेल्या अन्ताचें चित्र किती स्पष्टपणे दिसूं लागलें होतें तें दिसून येतें. ' या नाट्यछटा अलीकडे एकाच साच्याच्या होऊं लागल्या आहेत; हें इष्ट नव्हे. बहुतेक सर्व नाट्यछटांचा भर भाषण व कृति, तसेंच कल्पना व वस्तुस्थिति इत्यादिकांची हास्यास्पद विसंगति दाखविण्याकडे आहे. यामुळे या वाङ्मयप्रकाराच्या विषयांचें क्षेत्र उगीच आकुंचित होऊं पहात आहे. तर असें होऊं नये. ' अशा प्रकारची निःसंदिग्ध सूचना त्यांनी आपल्या ह्या भाषणांत नाट्यछट्या-लेखकांस दिलेली आहे. वामनरावांनी वेळींच दिलेल्या ह्या सूचनेची आमच्या लेखक आणि टीकाकारांनी योग्य ती दखल न घेतल्यामुळे नाट्यछटेच्या स्वरूपाचा झपाट्याने सतत संकोच होत गेला व अंतीं तो वाङ्मयप्रकार आज जवळजवळ नामशेष झाला आहे हें आपणांस दिसतच आहे.

## वाङ्मयाची निर्मिति :

वामनरावांच्या ह्या गोवें येथील भाषणांतून, श्री. मर्ढेकर यांच्या निबंध-संग्रहाला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेंतून व केळकरांच्या साहित्यचर्चेवरील त्यांच्या लेखांतून जे कांहीं वाङ्मयीन प्रश्न त्यांजकडून वारंवार चर्चिले गेले आहेत, त्यांत वाङ्मयाची प्रवृत्ति, काव्यानंदाचें स्वरूप, कलानिर्मिति हीं स्वार्थ की परार्थ, हे प्रश्न फार महत्त्वाचे आहेत. ह्यांतील वाङ्मयाची प्रवृत्ति व त्याचीं ध्येयें ह्या व्यापक प्रश्नावरील आपलीं मतें वामनरावांनी आपल्या इतर लेखांतूनहि व्यक्त केलेलीं आहेत. ह्या संबंधांत प्रथम त्यांना असें म्हणावयाचें होतें की मूलस्वरूपांतल्या भावना किंवा मनोविकार यामुळे वाङ्मयनिर्मिति होते हा जो सर्वसामान्य समज आहे तो चुकीचा आहे. ' मनोविकारांचा क्षोभ ओसरला, स्मृतिक्षेत्रांत गेला, त्यांतील व्यक्तिनिष्ठ व दूषित भाग नष्ट होऊन भावना सुसंस्कृत झाल्या, अंतःकरणामध्ये एक प्रकारची प्रसन्नता उत्पन्न

झाली व आपल्या भावनांच्या व मनोविकारांच्या पोटीं जें एक प्रकारचें सौंदर्य असतें तें प्रतीत झालें म्हणजे मग कलाविलासप्रिय कल्पनाशक्ति वाङ्मय-निर्मितीला प्रवृत्त होते.' असें ते म्हणतात; मर्ढेकरांच्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेंतहि वामनराव हीच गोष्ट विस्तारशः स्पष्ट करितांना आढळतात: 'कलाकृतींतील स्वानुभव प्राथमिक नसून रूपान्तरित, स्मरणोजीवित, छायात्मक, मननात्मक असतो व या अर्थाने तो सहजस्फूर्त नसून संस्कारजन्य असतो;' एवढेंच नव्हे तर एखाद्या उत्कृष्ट वक्त्याच्या 'सहजस्फूर्त' भासणाऱ्या भाषणांत, जिव्हाळ्याच्या माणसांनी एकमेकांना लिहिलेल्या खाजगी पत्रांत, किंवा तात्कालस्फूर्त वाटणाऱ्या एकाद्या मर्मभेदक कोटींत उतरणाऱ्या सौंदर्याला देखील 'तात्कालिक स्फूर्ति' कारण होते असें जें आपण केव्हा केव्हा म्हणतों तें चुकीचें असतें; तेथेहि 'मननाचा अत्यंताभाव' नसतो; तेथेहि अल्पमत कां होईना विचार झालेला असतो; ह्या सर्व गोष्टी 'बुद्धि-पुरस्सर' घडलेल्या असतात, असें बजावतांना ते आढळतात. वामनरावांची वरील अचूक विचारसरणी लक्षांत घेतां 'बुद्धिःपरस्सर वाङ्मयनिर्मितीला अभ्यास लागतो, परिश्रम लागतात, अनुभव लागतो, अन्तःकरण व भावना शुद्ध व सुसंस्कृत करणें भाग असतें; वृत्ति स्थिर, सुसंबद्ध व प्रसन्न व्हाव्या लागतात, नीतिविषयक व सौंदर्यविषयक कांहीं तरी ध्येयें असावीं लागतात व तीं अंगीं बाणांवींहि लागतात. शिवाय नवनिर्मितिसमर्थ अशी कल्पकता किंवा प्रतिभाहि तेथें आवश्यक असते. केवळ मूळ स्वरूपांतल्या तात्कालिक भावनांच्या उद्रेकावर, क्षोभावर, कंपावर, उर्मीवर, उसळीवर, खळबळीवर किंवा तळमळीवर विसंबून चालत नाही' हा त्यांनी केलेला व पुनः पुनः मुद्रित झालेला उपदेश किती साधार आहे याची कल्पना येते.

## कलानंदाची मीमांसा

वामनरावांच्या ह्याच विचारसरणीवर त्यांची कलानंदाची उपपत्ति आधारलेली असल्यामुळे त्यांचें तत्संबंधीचें विवेचन मोठें उद्‌बोधक झालें आहे: 'संसारांतले प्राथमिक विचार व भावना या कृतिप्रवण असतात. लौकिक किंवा व्यावहारिक आनंद बहुधा केवळ इन्द्रियतृप्तीपर असतात किंवा ते दुसऱ्या कोणत्या तरी इष्टसिद्धीच्या अपेक्षेने उत्पन्न झालेले असतात; कलात्मक

रसास्वाद वा आनंद हा अलौकिक म्हणतात, ' ब्रह्मास्वादसहोदर ' म्हणतात याचें एक कारण असें की ब्रह्मास्वादाप्रमाणेच तो अनन्यसापेक्ष निरुपाधिक असतो, ' असें वामनराव म्हणतात तें त्यांच्या वाङ्मयाच्या प्रवृत्तीविषयीच्या उपपत्तीशीं पूर्णपणें सुसंगत आहे असें दिसून येतें. ' शुद्ध ज्ञानानंद आणि शुद्ध कलानंद हे दोन्हीहि अनन्यसापेक्ष, निरुपाधिक स्वतःसिद्ध असतात ' व म्हणूनच वामनरावांच्या दृष्टीनें ज्ञानयोगी व कलायोगी हे दोघेहि ' आत्मक्रीडः आत्मरतिः ' ठरतात. कलानंदाचें हें निरुपाधिक, स्वतःसिद्ध स्वरूप निश्चित झाल्यानंतर तो कां व कसा उत्पन्न होतो ह्याची चर्चा ओघानेच येते. श्री. नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनी आपल्या बडोदें येथील अध्यक्षीय भाषणांत काव्यानंदाबाबत जी ' सविकल्प समाधी ' ची उपपत्ति मांडली तिची गुणदोषमीमांसा वामनरावांनी आपल्या गोवे येथील भाषणांत व ' केळकर ' ग्रंथांतील लेखांत विस्ताराने केलेली आहे: वामनरावांनी केलेल्या ह्या चर्चेतून कलानंद कोणकोणत्या रीतींनी होतो ह्यासंबंधींची त्यांची विचारसरणी कळून येते. केळकरांच्या उपपत्तीमुळे, वाङ्मयांतील तादात्म्य अथवा समाधि पूर्ण नसते तर सविकल्प असते हें मराठींत प्रथमच स्पष्टपणें दाखविलें गेलें व त्यामुळे वाङ्मयात्मक टीकेची विचारपद्धति आणि भाषा यांमध्यें जें शैथिल्य होतें तें कमी झालें ह्याबद्दल ' टीकाशास्त्र केळकरांचें ऋणी राहील ' असें वामनरावांनी प्रथमच कबूल केलें आहे. वामनरावांनी ह्या प्रश्नाची जी विस्तारशः चर्चा केली आहे तिच्यांतील मुख्य सूत्र हें आहे कीं कलानंदाच्या निर्मितीचें संशोधन करितांना सांपडलेल्या कोणत्या तरी एकाच कारणाला चिकटून बसणें हें योग्य ठरत नाही. काव्यानंदांत आपण सविकल्प असें का होईना जें तादात्म पावतों तें ' ग्रंथकारानें वर्णिलेल्या एका विशिष्ट पात्राशीं का अनेक पात्रांशीं का ग्रंथकाराशीं ' हें प्रथम नीटसें निश्चित ठरवितां येत नाही असें ते म्हणतात. ' कारणानामनेकता ' हें तत्त्व वामनरावांना पूर्णपणें पटलेलें असल्यामुळे काव्यानंद किंवा कोणताहि ' कलात्मक सहजसौंदर्यजन्य आनंद ' हा अनेक कारणांनी उत्पन्न होत असतो असें प्रतिपादून विशिष्ट वेळीं विशिष्ट व्यक्तींच्या बाबतींत त्यांतील निरनिराळीं कारणें प्रधानत्वेकरून प्रभावशाली होत असतात असें ते सुचवितात. हें सुचवितांना वामनरावांनी काव्यानंदाच्या निर्मितीचीं जीं पांचसहा कारणें दिलीं आहेत तीं चिंतनीय आहेत : " इंद्रिय-

सुखास्वाद, आत्मभिमानाचा उत्कर्ष, आत्मसामर्थ्यप्रतीति, परसामर्थ्य-प्रतीतीमुळें उत्पन्न होणारें आदरयुक्त कौतुक, साहचर्यनियमांमुळे उत्पन्न होणाऱ्या बोधपूर्व व अबोधपूर्व सुखकर आठवणी, सामान्यतः ध्यानांत न येणाऱ्या अशा वस्तुनिष्ठ किंवा प्रसंगनिष्ठ गूढ किंवा गहन सत्याचें, श्रीमत्वाचें, सौंदर्याचें, उर्जितत्वाचें, उदात्तत्वाचें वगैरे ज्ञान होऊन तें पटल्यामुळे मनाला येणारी सात्त्विक प्रसन्नता " इत्यादि अनेक गुंतागुंतीचे धागे म्हणा, पापुद्रे म्हणा, किंवा अंगें म्हणा काव्यानंदानुभवांत असून केवळ स्वप्रतीतिपूर्वक परव्यक्तीशीं तादात्म्य एवढ्यासच त्या बाबतींत महत्त्व देणें हें गैरसमज उत्पन्न करणारें असल्यामुळे आपण त्याला विरोध करीत आहोंत असें ते म्हणतात. वामनरावांच्या म्हणण्याचा एकंदर रोख असा आहे की " वस्तुगत रम्यत्व, उदात्तत्वादि गुणांमध्ये किंवा काटेकोरपणे बोलावयाचें म्हणजे त्यांच्या प्रतीती-मध्ये आनंददायिकत्व आहे व हें आनंददायिकत्व वर सांगितलेल्या अनेक रीतींनी होत असतें. या आनंदांत सविकल्प समरसत्व असतेंच; पण त्याला भलतेंच महत्त्व न देतां वस्तुगत किंवा वर्णनगत रम्यत्वास व इतर कारणांस योग्य महत्त्व दिलें जाईल अशी काव्यानंदाची उपपत्ति असेल तरच ती पूर्णपणे मान्य होईल, नाही तर ती एकांगी, अतएव अमान्य होईल. "

## काव्यानंदाची एक उपपत्तिः

काव्यानंदासंबंधींच्या महाराष्ट्रांतील इतर विद्वानांच्या उपपत्तींशीं आपणांस येथे कर्तव्य नाही; परंतु वामनरावांच्या विवेचनांतील '**वस्तुगत किंवा वर्णनगत रम्यत्वास व इतर कारणांस योग्य महत्त्व दिलें जाईल अशी काव्यानंदाची उपपत्ति पाहिजे**' हें जें मत आहे, त्यामध्येच ह्या प्रश्नाचें योग्य तें उत्तर शोधून काढण्याबाबत मार्गदर्शन झालेलें आहे असें मला वाटतें. ह्या प्रश्नासंबंधीं विचार करीत असतां जे विचार डोळ्यापुढे येतात ते माझ्या बाबतींत पुढील स्वरूपाचे असतातः समजा कोणत्याशा मैदानावर दोन पक्षांमध्ये क्रिकेटचा सामना चालू आहे, मैदानाभोवती खूपसा प्रेक्षकसमुदाय जमला आहे. त्यांतील कांहींना एका पक्षाबद्दल सहानुभूति आहे, कांहींना दुसऱ्या पक्षाबद्दल सहानुभूति आहे व कांही तटस्थ आहेत; कोणा तरी खेळाडूने चेंडू टोलवला आहे; खूप उंच अंतराळांत जाऊन

तो सीमेपार पडला आहे. ज्या पक्षाचा तो खेळाडू आहे त्या पक्षाबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या सर्व प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला आहे; त्यांना खरोखरच आनंद झाला आहे, परंतु हा क्रीडानंद आहे काय ? नाही. त्यांत स्वार्थाची भावना आहे. त्या खेळाडूच्या क्रीडापाटवाच्या जाणिवेने तो आनंद झालेला नसून तो खेळाडू आपल्या पक्षाचा आहे ह्या जाणिवेंतून तो आनंद स्फुरलेला आहे. तद्विरुद्धपक्षियांना दुःख झालें आहे; त्यांनाहि तें क्रीडाकौशल्य आनंदवीत नाहीं. कारण त्या खेळाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि हीहि स्वार्थपरच आहे; परंतु तेथेंच त्या प्रेक्षक समुदायांत कांहीं तटस्थ आहेत, ते कोणत्याहि एका पक्षाशीं किंवा व्यक्तीशीं सहानुभूत नाहीत, **तर त्या खेळाशी सहानुभूत आहेत.** त्या खेळाडूने तो चेंडू वर टोलवितां क्षणींच त्यांनीहि अत्यानंदाने टाळ्या वाजविल्या आहेत; त्या कोणत्याहि स्वार्थपर वृत्ति चाळविल्या गेल्यामुळें नव्हे तर उत्तम क्रीडाकौशल्य आपणांस पाहावयास मिळालें या जाणिवेने; हा आनंद खरा कलानंद आहे; कारण असें पहा कीं पुढच्याच चेंडूला तो खेळाडू बाद झाला आहे. मघाशी अत्यानंदाने उत्फुल्ल झालेले तत्पक्षीय आतां दुःखाचे सुस्कारे सोडीत आहेत व मघाशी त्याच्या क्रीडा-प्रभावाने दुःखी झालेले त्याचे विपक्षीय आतां आनंदाने नाचूं लागले आहेत. ह्या दोघांच्याहि वाट्याला खराखुरा क्रीडानंद येणें अशक्य आहे. खराखुरा क्रीडानंद त्या तटस्थाच्या वाट्याला येत आहे; कारण थोड्या वेळापूर्वी त्या खेळाडूच्या क्रीडापाटवाचें कौतुक करणारा तो तटस्थ आतां त्याच क्रीडापटूला बरबाद करूं शकणाऱ्या कुशल गोलंदाजाच्या चेंडूफेकींतील कसब लक्षांत घेऊन आनंदित होत आहे. त्याच्या ह्या आनंदांतहि स्वार्थपर विचारांचा यत्किंचितहि भाग नाही. केवळ उत्कृष्ट क्रीडापाटवाच्या जाणिवेंतून हा आनंद स्फुरलेला आहे व म्हणूनच त्याला खराखुरा क्रीडानंद किंवा कलानंद असें आपण म्हणत आहोंत.

कलाकृतीचा आस्वाद घेणाऱ्या श्रोत्याची, वाचकाची वा प्रेक्षकाची भूमिका ही ह्या तटस्थाच्या भूमिकेसारखीच असावी व असली पाहिजे; तो आपल्या समोर जें दिसतें किंवा आपणाला जें जाणवतें तें सौंदर्यसिद्धीच्या व सत्यदर्शनाच्या नियमांनुसार सुसंबद्ध, सुसंगत, प्रमाणबद्ध, समतोल आहे की नाही हें पाहणार व तें तसें आढळलें की आनंदित होणार यांत संशय नाही. ह्या आनंदांत स्वार्थपर

किंवा अहंभावविशिष्ट असा भाग यत्किंचित्‌हि नसणार हेंहि उघडच आहे. वाङ्मयपरिशीलनाने स्वार्थपर भावना वाचकांच्या मनांत उत्पन्न होत नाहीत असें जें म्हणण्यांत येतें, त्यांतील रहस्यहि हेंच आहे. आपल्या मनश्चक्षूपुढे जीवनांतील एका प्रसंगाचें किंवा अनेक प्रसंगांचें जें चित्र रेखाटलें जात आहे त्यांत सौंदर्यसिद्धीच्या व सत्यदर्शनाच्या सर्व किंवा बहुतेक नियमांचें यथातथ्य पालन झालेलें असल्यामुळे जें सौंदर्य आलेलें आहे, जें चमत्कृतिजनकत्व आलें आहे, त्याच्या जाणिवेने तो रसिक वाचक सुखावतो असेंच दिसून येतें. आपणांस शोकात्मिकांच्या वाचनापासून किंवा दर्शनापासून आनंदच होतो, ह्याचेंहि कारण वरील उपपत्तींतच विशेषत्वाने सापडतें. शोकात्मिकेंत जीवनांतील विशिष्ट अंगांचें जें दर्शन घडविलेलें असेल तें जर ' वस्तुगत रम्यत्व ' साधून म्हणजेच सत्य आणि सौंदर्यसिद्धीच्या नियमांबरहुकुम साधलेलें असेल तर त्यांतील सौंदर्याच्या म्हणजेच प्रमाणबद्धतेच्या, समतोलपणाच्या, यथोचित साम्यविरोधाच्या, रंगसंगतीच्या, भावसंगतीच्या जाणिवेंतून त्याच्या परिशीलनाने होणारा आनंद हा उत्स्फूर्त होईल असेंच वाटतें. उदाहरणार्थ ' एकच प्याला ' ह्या नाटकांतील शेवटचा प्रवेश रंगभूमीवर चालू आहे अशी कल्पना करा; सिंधु मरून पडलेली आहे, सुधाकर तिच्या पायाशीं शोक करीत बसला आहे; त्याने विषप्राशन केलें आहे; शेजारींच रामलाल उभा आहे. जीवनांतील ह्या एका विशिष्ट प्रसंगाचें आपणासमोर चाललेलें हें चित्रण इतकें सुसंबद्ध, प्रमाणशीर आहे की त्याने आपण मंत्रमुग्ध बनलों आहोंत; आपली दृष्टि रंगभूमीवरील ह्या जीवनचित्राचा म्हणजे त्यांतील सत्याच्या सुसंगत दर्शनाचा आस्वाद घेत आहे; त्यांतील सत्यात्मक सौंदर्याच्या दर्शनाने वेडावून गेली आहे; आपल्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असल्या तरी मनाला सौंदर्यदर्शनाचाच आनंद होत आहे.

हा आनंद त्या जीवनांगाचें प्रमाणबद्ध चित्रण होत असल्यामुळे निर्माण झालेला आहे, हें सहज सिद्ध करितां येण्यासारखें आहे. अशी कल्पना करा की सुधाकराचा हा शोक चालू असतांच रंगभूमीवर मृत होऊन पडलेल्या सिंधूला एक जोराची शिंक आली आहे. ह्या यःकश्चित् गोष्टीने काय होते ? मृत सिंधूला आलेली ही शिंक त्या प्रमाणबद्ध चित्रणांत, त्या सुसंगतींत एकाएकीं एक विलक्षण विसंगति निर्माण करते; त्याची प्रमाणबद्धता त्यामुळे ढासळते, त्याच्या समतोलपणाला त्या शिंकेमुळे बाधा येते व त्याचें सुरूप बिघडून

मराठी ग्रंथ संग्रहालय, मुं. स्वतंत्र.
अनुक्रम २३.६७४५ दि: ८-३-६६
क्रमांक ....


त्याला विरूपता येते. ह्याचा परिणाम प्रेक्षकांवरहि कसा होतो तो पहा: एका क्षणापूर्वी मंत्रमुग्ध नागाप्रमाणे त्या जीवनचित्राच्या प्रमाणबद्ध दर्शनाने सुखावलेला व सुधाकराबरोबर अश्रू ढाळणारा प्रेक्षक एकदम पोट धरून हसूं लागतो. त्याच्या कलानंदाची परिसमाप्ति होते; त्याच्या डोळ्यांतील अश्रू नाहीसे होतात व सगळें नाटकगृह तो आपल्या हास्याने दुमदुमून टाकतो; ह्याचें कारण काय हें जर आपण पाहूं गेलों तर हेंच दिसतें की त्याच्यासमोर आतापर्यंत सुसंबद्धपणें रंगविलें जात असलेलें चित्र त्याला एकाएकी विरूप भासूं लागलेलें असतें व त्यामुळेच सौंदर्यदर्शनापासून लाभणाऱ्या आनंदाची प्राप्ती करून द्यावयास तें असमर्थ बनलेलें असतें. मृत सिंधुलाच काय परंतु सिंधु व सुधाकर यांच्या प्रेताशेजारी उभ्या असलेल्या जीवंत रामलालला जरी शिंक आली किंवा खोकल्याची उबळ आली किंवा मध्येच विंगमध्ये उभा राहिलेला एखादा मनुष्य न कळत रंगभूमीवर येऊन उभा राहिला तरी प्रेक्षकांच्या मनश्चक्षूंसमोर व चर्मचक्षूंसमोर चित्रित होत असलेल्या त्या चित्रांतील सौंदर्यांत म्हणजे 'वस्तुगत किंवा वर्णनगत रम्यत्वांत' बिघाड होण्याचा संभव असतो व त्यांत उत्पन्न झालेल्या ह्या बिघाडामुळे त्याच्या दर्शनापासून प्रेक्षकांना होणाऱ्या आनंदांतहि मिठाचा खडा पडण्याचा दाट संभव असतो.

याचें कारण तो प्रेक्षक किंवा वाचक या ठिकाणी जीवनाचें कलेने केलेलें चित्रण अवलोकित असतो; प्रत्यक्ष जीवन अवलोकित नसतो. त्याची दृष्टी ही चित्राकडे पाहणाऱ्या प्रेक्षकाची असते; चित्राकृतीने सुखावणाऱ्या रसिक तटस्थाची असते; त्या चित्रांतील प्रमाणबद्ध आकृतींत यत्किंचितहि बिघाड झाल्याने तिच्या दर्शनापासून त्याला होणाऱ्या आनंदला बाधा येणार असते. तो प्रत्यक्षाचें दर्शन घेत नसतो, तर विशिष्ट अंगांची विशिष्ट पद्धतीने गोठवण करून निर्मिलेलें प्रत्यक्षाचें चित्र तो अवलोकित असतो. म्हणूनच त्याला त्यांतील सौंदर्यात, म्हणजे चित्राकृतींत उत्पन्न झालेली विसंगति यत्किंचितहि सहन होत नाही. हेंच जर तो जीवनाचें प्रत्यक्षावलोकन करीत असता तर काय झालें असतें? तो प्रत्यक्ष जीवनांतील एखाद्या सिंधूचा व सुधाकराचा मृत्यू अवलोकित असतां व अगदीं त्याच वेळी शेजारीं उभ्या राहिलेल्या रामलालला खोकल्याची उबळ आली असती किंवा शिंक आली असती, तरी त्याची शोकाकुलवृत्ति

अविचलित राहिली असती, तो हसला नसता; तो गंभीरच राहिला असता, कारण त्याची भूमिका तेथे कलास्वाद घेणाऱ्या तटस्थाची असत नाही; त्याच्या मनांत त्या दृश्याने त्या वेळीं ज्या भावना उद्दीपित होतात, त्यांत स्वार्थपर भाग असतो; त्या भावना त्याला कार्यप्रवण करतील; परंतु आनंद देणार नाहीत.

तेव्हां कलानंदाचा आस्वाद घेतांना आपण सहृदय तटस्थाच्या भूमिकेंत असतों व आपणांस जें दिसत असतें, जें जाणवत असतें—तें चर्मचक्षूंसमोर असेल किंवा मनःचक्षूसमोर असेल—त्यांतील प्रमाणबद्ध आकृतीच्या, सौंदर्यसिद्धीच्या, भावसंगतीच्या जाणिवेने आपणांस सौंदर्यदर्शनाचा व सत्यदर्शनाचा आनंद होत असतों असेंच मला वाटतें. कदाचित् कलानंदाच्या अनेक कारणांपैकी हें एक कारण असेल, परंतु कलाकृति ही प्रथमतः सौंदर्यकृति असल्यामुळे तें एक प्रधान कारण आहे—नव्हे, मूल कारण आहे असें ठरतें. वामन मल्हारांनी कलानंदाच्या उपपत्तींत 'वस्तुगत रम्यत्वाला किंवा वर्णनगत रम्यत्वाला' जें महत्त्व दिलेलें आढळतें व 'आनंद तादात्म्यानुभवापेक्षां प्रेक्षकोचित बाह्य दृष्टीनें पाहण्यामध्येच आहे' असें जें म्हटलेलें आढळतें त्यांतील मर्महि हेंच होय असें मला वाटतें. वर ज्या प्रकारची विचारसरणी मांडण्याचा मीं प्रयत्न केला आहे तशाच प्रकारची विचारसरणी ह्या संबंधांत वामनरावांना अभिप्रेत असावी असें मानावयाला जागा आहे, एवढें खरें.

## आणखी कांही वाङ्मयीन प्रश्न :

अलीकडे बाह्य परिस्थितीमध्यें सापेक्षतः स्थिरता व निश्चितता आलेली आहे, पण अन्तःसृष्टि मात्र ढासळत चालली आहे; ज्या उच्च, व्यापक, सोत्साह व आत्मप्रत्ययपूर्ण वृत्तीने व दृष्टीने पाहिल्याशिवाय महाकाव्याची निष्पत्ति होऊं शकत नाहीं ती दृष्टी अलीकडे फारशी दिसत नाही; ह्यामुळेच अलीकडे महाकाव्यें निर्माण होत नाहीत, हें वामनरावांचें मत, ते म्हणतात त्याप्रमाणे, महाकाव्याच्या अनिर्मितीला आजचे विवेकपद व अज्ञेयवाद हे कारण आहेत, ह्या प्रो. रा. श्री. जोग ह्यांच्या मताशीं पूर्ण जुळणारें असेंच आहे. जातां जातां वामनरावांचें आणखी एक वाङ्मयविषयक मत सांगावयाचें म्हणजे असें की कोणत्याहि आत्मचरित्रपर लिखाणांत आत्मविशदीकरण, आत्मप्रकटीकरण असावें परंतु आत्मसमर्थनपर भाग नसावा, असलाच तर

त्यांत तात्त्विक व व्यापक दृष्टीचा उत्कर्ष दिसावा, वाङ्मय-कलेचा उत्कर्ष दिसावा, असें त्यांना वाटत असे. हें आपलें मत त्यांनीं भाट्यांच्या ‘ प्रेम की लौकिक ?’ ह्या आत्मचरित्रवजा कादंबरीवरील परीक्षणांत व तात्यासाहेब केळकर यांच्या ‘गतगोष्टी’च्या परीक्षणांत व्यक्त केलें आहे. वामनरावांचीं हीं वाङ्मयांतील अनेक प्रश्नांबाबतचीं मतें त्यांच्या विवेचनात्मक लिखाणांत इतस्ततः विखुरलेलीं असलीं तरी त्यांच्या साहित्यप्रज्ञेचा खराखुरा आविष्कार त्यांच्या गोवें येथील अध्यक्षीय भाषणांत व त्यांनी श्रीं. मर्ढेकर यांच्या ‘ वाङ्मयीन महात्मता ’ ह्या संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेंतच झालेला आहे असें वाटतें. त्यांच्या गोवें येथील अध्यक्षीय भाषणांत काव्य, नाटक इत्यादि वाङ्मयाच्या सर्वच प्रमुख शाखांसंबंधी त्यांनी केलेलें विवेचन हें अत्यंत मूलग्राही व उब्दोधक उतरलेलें आहे. त्यांतील कांही विशेषांचा वर उल्लेख केलेलाच आहे, तेव्हा त्यावर अधिक न रेंगाळतां त्यांनी मर्ढेकराच्या संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत व्यक्त केलेल्या एक दोन मतांचाच विचार करून हें वाङ्मयविवेचन पुरें करतों. ‘ वाटलें तें लिहिलें ’ हें तत्त्व कितपत बरोबर आहे, भय व भयानक रस यांत काय भेद आहे ह्या सारखे सदर प्रस्तावनेंत चर्चेसाठी घेतलेले प्रश्न त्यांनी खरोखर ह्यापूर्वींच चर्चिलेले आहेत; येथें त्यांनी अगदीं नव्यानेच उपस्थित केलेल्या प्रश्नांत कलाकृति ही रसिकार्थ, परार्थ, निवेदनार्थ आहे का आत्मतुष्टयर्थ, आत्माविष्कारार्थ, स्वार्थ ( self expression ) आहे, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. ह्या प्रश्नांचें वामनरावांनी दिलेलें उत्तर असें आहे की कलाकृति ही रसिकाकरितांच असते व हा रसिक कलावन्त स्वतःच असूं शकतो; स्वेतर रसिक असावयालाच पाहिजे असें जरी नाहीं, तरी सामान्यतः स्वेतर रसिकाशिवाय कलावन्ताचें पूर्ण समाधान होत नाहीं. या मताला अनुसरूनच वामनराव असें सुचवितात की ‘ सौंदर्यभावनेने जन्म दिलेली कलाकृति ही साहजिक स्वभावसिद्ध आविष्कारासारखी असली तरी हा आविष्कार केवळ आत्मपर नसून परापेक्ष असावा.’ ह्या नंतर ह्यासंबंधीच्या श्री. मर्ढेकरांच्या मताचें विशदीकरण करण्यासाठी म्हणून म्हणा किंवा कांही अन्य कारणांमुळे म्हणा ते ह्या आविष्कारासंबंधी असें म्हणतात की सौंदर्य-जन्य आनंदाला ‘ ग्रथित, निबद्ध करणाऱ्या व्यापारांत ( कांही कलांच्या बाबतींत तरी ) कांही गौण, आनुषंगिक गोष्टी अनिवार्यपणें, अपरिहार्यतेने येतात.’—‘ या अनिवार्य, अपरिहार्य गौण

आनुषंगिक गोष्टींमुळें कलावन्ताला दिसलेलें मूळ सौंदर्य रसिकाला किंवा रसिकांना त्याच स्वरूपांत न दिसण्याचा संभव असतो; आणि रसिकाला किंवा रसिकांना आपल्या आनंदांत वाटेकरी करण्याच्या इच्छेमुळे **कांही दोष** साहजिकपणेच [ सामान्य कलावन्ताच्या कलाकृतीमध्ये तरी ] उत्पन्न होतात.'

## आत्मनिष्ठा व आत्माविष्कार :

वामनरावांचें वरील विवेचन श्री. मर्ढेकर यांच्या ज्या विचारसरणीवर सामान्यतः प्रकाश टाकणारें आहे, त्या विचारसरणीचें स्वरूप काय आहे हें येथे विशद करणें अभिप्रेत नाही. श्री. मर्ढेकरांच्या ह्या विचारसरणीचें स्वरूप व त्यावरील आपलीं मतें प्रस्तुत लेखकाने इतरत्र विस्तारशः व्यक्त केलेलीं आहेत. येथे फक्त श्री. वामन मल्हार यांच्या वरील विचारसरणीशींच आपणांस कर्तव्य आहे. 'कलानंद हा केवळ आत्मनिष्ठच राहता, नामरूपात्मक व्यक्तीभवनाची किंवा व्यक्तीकरणाची आवश्यकताच नसती, तर **हे दोष** संभवते ना' असें ते म्हणतात. वामनरावांची वरील विचारसरणी-जी श्री. मर्ढेकरांच्या विचारसरणीशीं बरीचशीं जुळते--ही बरीचशी पटण्यासारखी आहे यांत संशय नाहीं : परंतु ते ज्या गौण, आनुषंगिक गोष्टी अपरिहार्यतेने सौंदर्याविष्कार होत असतांना त्यांत अवतरतात असें म्हणतात त्यांना '**दोष**' ह्या नांवाने कां संबोधावें हें कळत नाही. कलावन्ताला घडलेल्या सौंदर्य-दर्शनाची आपणाला कल्पना येणें शक्य नाही; कारण तो त्याचा खाजगी अनुभव आहे. आपण जें मत बनविणार तें आपणासमोर त्याच्या कलाकृतीचें जें रूप दिसतें त्यावरून बनविणार ना? तें रूप जर सुरूप असेल, तर तें त्याच्या मूळ सौंदर्यानुभवाशीं जुळतें आहे, सुसंगत आहे, किंवा नाही हें पाहण्याची आपणास काय गरज? एखादे वेळी तें त्याच्या मूळच्या सौंदर्यानुभवाशीं थोडें फार 'अप्रामाणिक' असूनहि सुरूप असूं शकणार नाही काय? तें जर विरूप असलें तर तें विरूप कां झालें याची मीमांसा, आपण जें दिसतें त्यावरूनच करणार ना? त्यासाठी आपणांस त्या कलाकृतीचें जें रूप जाणवतें तेंच उपयोगी पडणार; त्याची परीक्षा करून त्यावरून आपण फार झालें तर असें म्हणूं शकूं की ह्या कलाकृतीच्या बाबतींतील त्या कलावंताचा सौंदर्यानुभव-किंवा त्याला सौंदर्यभावानुभव म्हणा-हा फारसा सखोल नसावा किंवा तो तसा असला तरी त्या कलावन्ताच्या

ठिकाणी आवश्यक तें अभिव्यक्तिसामर्थ्य नसावें: त्याचें अभिव्यक्तिकौशल्य कोण-कोणत्या बाबतींत अपुरें पडतें तेंहि कदाचित् आपण सांगूं शकूं. परंतु ही विरूपता कलावन्त आपल्या मूळच्या सौंदर्यभावनेशीं अप्रामाणिक राहिल्यामुळे आलेली आहे हें आपण कशाचे आधारावर म्हणूं शकूं? जोपर्यंत त्या कलावन्ताच्या मूळच्या सौंदर्यानुभवाचें स्वरूप आपणांस कळत नाही (व तें माहिती होण्याची अतीन्द्रिय दृष्टीशिवाय फारशी शक्यताहि नाही) तोपर्यंत आपणांस असें कधीच म्हणतां येणार नाही. वामनराव एवढें कबूल करतात की, 'मनांतील प्रेम, आदर, इत्यादि भावना व्यवहारांत जशा कोणाला दिसत नाहीत, मुखचर्या, हावभाव, शब्द, कृति इत्यादिकांनी व्यक्त केल्यावरच त्या कळतात, आणि म्हणून कित्येक वेळा मनांतल्या सद्भावनेचा विपरीत अर्थ होऊन संसारांत गैरसमज, भांडणें वगैरे माजतात, त्याचप्रमाणे कलावन्ताने निर्मिलेल्या कृतींतील गर्भित भावनेसंबंधीहि घडून येते, व कलावन्ताला कित्येक वेळा विनाकारण दूषणें देण्यांत येतात.' परंतु कलावन्ताची मूळ भावना कृतींत व्यक्त होत असतां ती 'दूषित' होते हें मात्र ते कबूल करतात, व तें चमत्कारिक वाटतें. अभिव्यक्तीच्या वेळीं मूळच्या अनुभूतीशीं 'प्रतारणा' होऊं नये म्हणून कितीहि खटपट केली तरी कलावन्ताच्या प्रकृतिधर्मानुसार व अभिव्यक्तीसाठी तो जीं साधनें वापरतो त्या साधनांच्या प्रकृतीनुसार ती थोडीफार घडणार हें निश्चित. परंतु हा जो फरक, मूळची अनुभूति कृतींत अभिव्यक्त होत असतां तिच्यांत पडत असतो त्याला 'प्रतारणा,' 'दोष' असल्या वाईट शब्दांनी संबोधावें असें मला वाटत नाही. कारण मला असें वाटतें की अभिव्यक्तीच्या आवश्यकतेमुळेच हें जें मूळच्या अनुभूतीचें थोडेंफार बदललेलें असें स्वरूप आपणास कलाकृतींत पाहण्यास मिळतें, त्यानेच त्या कृतीला तिचें स्वतःचें असें रूप प्राप्त होतें. आपण त्या कृतींतील सौंदर्य अजमावतों तें ह्याच स्वरूपावरून ना? मग तें मूळच्या एका विशिष्ट अनुभूतीचें अविकृत वा विकृत स्वरूप आहे काय, ह्या प्रश्नाशीं आपणांस काय कर्तव्य? सौंदर्यसिद्धीच्या नियमानुसार ह्या अभिव्यक्त रूपांत सौंदर्य आलेलें आहे की नाही एवढेंच आपण बघायला हवें. तें सौंदर्य तेथे आढळलें की त्या कृतीला कलाकृति वा सौंदर्य-कृति असें म्हणावयास हा मूळच्या अनुभूतींत पडलेला फरक आपणास थोडाच प्रत्यवाय करणार आहे? शिवाय

वर सांगितल्याप्रमाणें कलावन्ताच्या मूळ अनुभूतीचें स्वरूप तरी आपणांस कोठे ठाऊक असतें ? व तें कळून घेण्याला तरी कोणता मार्ग असतो ? आपल्यापुरती ' सौंदर्य ' हीच कलेची कसोटी आहे. आपणासमोर असलेली कृति जर ह्या कसोटीस उतरत असेल तर तिच्यांतील सौंदर्य कसें साधलेलें आहे तें आपण पाहावें; तें साधतांना मूळच्या सौंदर्य-भावनेशीं ' प्रतारणा ' झालेली आहे काय हें पाहण्याची आपणांस जरूरी नाहीं. कारण पुष्कळ वेळां असेंहि होत असण्याचा संभव आहे की मूळच्या कल्पनेंत, लिहूं लागल्यावर, रंगवूं लागल्यावर, गाऊं लागल्यावर वा इमारत रचूं लागल्यावर कलावन्त जे सहजगत्या फेरफार करतो, तिच्या मूळ स्वरूपाची फारशी फिकीर न करतां तो तिला जीं वळणें घ्यावयाला लावतो,–की ज्या वळणांनी, फेरफारांनी व रंगच्छटांनी तिचें मूळचें रूप जाऊन तिला वेगळेंच रूप येतें—त्यामुळे त्याच्या कृतीला आपलें अंतिम सौंदर्य लाभत असतें. मग असें असतांना मूळ अनुभूतीची अभिव्यक्ति होत असतांना घडणाऱ्या ह्या अपरिहार्य व कांही ठिकाणीं आवश्यक त्या फेरफारांना ' दोष ' ह्या शब्दानें कां संबोधावयाचें तें कळत नाही.

## वाङ्मयसेवकांना संदेश :

ह्या प्रकरणाचा शेवट करण्यापूर्वी वामनरावांची वाङ्मयाच्या ध्येयस्थितीबद्दलची कल्पना समजावून घेणें औचित्याला धरुन होईल असें वाटतें. ही कल्पना वामनरावांनी स्वतः जें वाङ्मयविषयक कार्य केलें त्याला धरूनच आहे. ' बुद्धिपुरस्सर किंवा बोधपूर्व वाङ्मयाचा उगम सत्यसंशोधन किंवा सत्यकथन, सौजन्यपृथक्करण व सौजन्यबोध आणि सौंदर्यमीमांसा व सौंदर्योपासना ह्यांमध्यें आहे ' असें ते आपल्या गोव्याच्या भाषणांत म्हणतात. ह्याच भाषणांत त्यांनी वाङ्मयांत अवतरणाऱ्या सत्याचें, सौजन्याचें व सौंदर्याचें स्वरूप काय असतें ह्याची विस्तारशः मीमांसा केली आहे. ही मीमांसा मराठी टीकात्मक वाङ्मयांत एकमेवाद्वितीय आहे असें म्हणावयास हरकत नाही. ह्या मीमांसेच्या शेवटी त्यांनी वाङ्मयसेवकांचें कार्य म्हणून जें सांगितलें आहे तें कोणत्याहि अस्सल पुरोगामित्वाच्या वा नवमताच्या कल्पनेला उजळा देईल

असल्या प्रकारचें आहे; मराठी साहित्य सेवकांना वामनरावांनी दिलेला हा संदेश आहे: " असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणें व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें आपलें अवतार-कृत्य आहे. अर्थात् कंसादिकांना ज्याप्रमाणे कृष्णाची भीति वाटत होती त्याचप्रमाणेच दुर्जनादिकांना आपली भीति वाटली पाहिजे. दौर्जन्य कोठेहि व कोणत्याहि क्षेत्रांत असो, तें आपणांस असह्य झालें पाहिजे, अन्याय हा सरकारचा असो, किंवा संस्थानाधिपतींचा असो, हिंदूंचा असो किंवा मुसलमानांचा असो, ब्राह्मणांचा असो किंवा ब्राह्मणेतरांचा असो, तो नाहीसा करण्याकडे वाङ्मयाची प्रवृत्ति झाली पाहिजे. हें काम निर्भयपणे झालें पाहिजे, परतंत्रता कोठल्याहि क्षेतांतली असो, ती सामाजिक असो, धार्मिक असो, वाङ्मयात्मक असो, आपणांस ती अवंद्य असली पाहिजे व सर्वांना अवंद्य होईल अशी आपली वाङ्मयप्रवृत्ति पाहिजे. दास्य राजाचें असो, संस्थानिकांचें असो, रूढींचें असो, किंवा पुरातन शास्त्रांचें असो, त्याचें निर्मूलन करण्यास आपण प्रवृत्त झालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रिमूर्तींचें ध्यान, भजन व पूजन आपण केलें पाहिजे व कृत्रिम रूढि, परंपरा, संकेत, इत्यादिकांचें दास्य, वर्चस्व, किंवा बंधकत्व पार झुगारून दिलें पाहिजे. व झुगारून देण्यास लोकांना शिकविलें पाहिजे. हें व्रत आपण स्वीकारलें व आपली वाङ्मयात्मक तपश्चर्या या ध्येयाला अनुसरून झाली तर तुष्टि, पुष्टि व शांति यांचा लाभ आपणांस व जगास मिळून दैवी संपत्तीचें जगांत साम्राज्य होईल व उच्चतम कलाविलासांत रममाण होऊन अलौकिक अशा सात्त्विक आनंदाचे आपण वाटेकरी होऊं. " वामनरावांचा हा संदेश प्रत्येक वाङ्मयसेवकाने आपल्या हृदयाशीं बाळगावा असाच आहे. त्यांतून सूचित झालेलें ध्येय इतकें उज्ज्वल आहे की त्या ध्येयाने प्रेरित होऊन वाङ्मय-निर्मिति करणाऱ्या लेखकाच्या कृतींत सौंदर्य ह्या नाही त्या स्वरूपांत अवतरल्या खेरीज राहणार नाही. वामनरावांची अशी खात्री होती की आज जरी कलाप्रियतेला, नीतिप्रियतेला आणि ज्ञानप्रियतेला व्यक्तीच्या मनांत, समाजांत किंवा वाङ्मयांत गुण्यागोविंदाने वागतां येत नसलें तरी " कालान्तराने हेहि दिवस जातील, आणि व्यक्तीला काय किंवा समाजाला काय जें सत्य तेंच शिव व सुंदर वाटूं लागेल, जें सुंदर त्यांतच सत्य आणि शिवत्व प्रतिबिंबित होईल,

आणि जें शिव तें बुद्धीला सत्य म्हणून पटेल आणि भावनांना सौंदर्यपूर्ण वाटेल !"

### वाङ्मयविवेचक वामनराव :

वामन मल्हारांचें वाङ्मयीन तत्त्वज्ञान हें असें आहे. संख्येने अल्प असलेल्या लेखांतून व भाषणांतून तें विखुरलेलें असलें तरी त्याचा दर्जा अतिशय वरचा आहे; त्याची उपकारकता निर्विवाद आहे; त्यांतून व्यक्त झालेली साहित्य-प्रज्ञा बावनकशी आहे; त्याचें स्वरूप अत्यंत व्यापक असल्यामुळे सर्व प्रमुख वाङ्मयीन प्रश्नांवर अचूकपणे मार्गदर्शन करण्याचें सामर्थ्य त्यांत आहे; त्यांत कोठेंहि अतिशयोक्ति नाही; कोठेंहि न सापडलेलें किंवा न सापडणारें सापडल्याचा आव आणलेला नाही; सत्यसंशोधनाच्या एकमेव हेतूने त्याचें लेखन झालेलें आहे; त्याला सौजन्यबोधाची व सौंदर्योपासक दृष्टीची जोड आहे. वामनरावांनी हें वाङ्मयीन तत्त्वज्ञानाचें विवेचन १९१०।११ सालापासून तों १९४१।४२ पर्यंत म्हणजे आपल्या मृत्युकालापर्यंत केलें. ह्या तीस वर्षांच्या कालखंडांत अध्ययन, अध्यापन व प्रत्यक्ष वाङ्मयलेखन ह्यांमुळे त्यांच्या साहित्यविषयक चिकित्सक दृष्टींत विलक्षण सामर्थ्य आलेलें होतें; त्यामुळे त्यांच्या १९३० नंतरच्या उत्तरकालीन वाङ्मयचर्चात्मक लिखाणांत सत्तत्त्वांचा शोध घेणाऱ्या शास्त्रज्ञाच्या नजरेंतील स्थिरता दिसून येते; अनावश्यक, अप्रस्तुत, गौण गोष्टींकडे दुर्लक्ष करून मुळाकडेच झटकन् लक्ष केन्द्रित करण्याची शक्ति दिसून येते. वामनराव विषयाचा फापटपसारा माजवीत बसत नाहीत; ते झटकन् त्याच्या गुह्यालाच हात घालतात व त्याचें स्वरूप स्पष्ट करून तदनुरोधाने त्यावर आधारलेल्या इतर प्रश्नांची सोडवणूक करतात. त्यांच्या पुष्कळशा लेखांतून व भाषणांतून आपणांस असें दिसतें की त्यांनी चर्चेला घेतलेल्या कोणत्याहि वाङ्मयीन प्रश्नाचें उत्तर तत्त्वदृष्ट्या ते विवेचनाच्या पहिल्याच परिच्छेदांत देऊन टाकतात व मग त्याच्या तपशीलाची छाननी करीत बसतात. ही पद्धत ज्याने त्या प्रश्नाचें बराच काळ मनन केलेलें आहे व ह्या मननाच्या अन्तीं ज्याच्या मनांत त्याचें स्थूलमानाने उत्तर स्फुरलेलें आहे अशा तत्त्वसंशोधकाची असते. ह्याच पद्धतीचा वामनराव सामान्यतः अवलंब करीत असल्यामुळे

अप्रस्तुत, गौण अशा गोष्टींची त्यांच्या चर्चात्मक लिखाणांत विवेचना झालेली नाही हें स्वाभाविकच आहे. साहित्याच्या तंत्रापेक्षा त्याच्या मंत्रावरच त्यांचें लक्ष अधिक केन्द्रित झालें हेंहि या पद्धतीला अनुलक्षूनच आहे. अमुक एका प्रस्तावनेच्या किंवा लेखाच्या किंवा भाषणाच्या 'निमित्ताने तरी वाङ्मय-विषयक कांही प्रश्नांबाबतचीं आपलीं मतें अधिक स्पष्ट व निश्चित व्हावींत' ह्या इच्छेने आपण लिहीत आहोंत, आपला अनुभव असा आहे की 'कित्येक वेळां शिकवितां शिकवितां किंवा लिहितां लिहितां माझीं मतें मला अधिक सुस्पष्टपणें आणि निश्चित स्वरूपांत कळलीं आहेत' असेंच ते म्हणत असत. ही गोष्ट खरी होती; तीं मतें त्यांना शिकवितां शिकवितां किंवा लिहितां लिहितां लक्षांत आलीं होतीं; परंतु ह्याचाच अर्थ असा कीं त्यांवर त्याच्या अगोदर खूपसें मनन झालेलें होतें, त्यांची चर्वणा झालेली होती, बराच काळपर्यंत मनांत तत्संबंधी मंथन झालेलें होतें; व त्या मंथनाचा परिपाक म्हणून शिकवितां शिकवितां किंवा लिहितां लिहितां विशिष्ट वाङ्मयीन तत्त्वांचें नवनीत त्यांच्या हातीं लागलें होतें. वामनरावांचें बरेंचसें वाङ्मयविवेचनात्मक लिखाण हें १९३० नंतर झालेलें असलें तरी ते मराठी वाङ्मयविवेचकांच्या इतिहासांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, न. चिं. केळकर, बाळकृष्ण अनंत भिडे यांच्याच काल-खंडांत मोडतात. प्रो. वा. ब पटवर्धन, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर किंवा बाळकृष्ण अनंत भिडे यांजपेक्षा वामनराव हे केळकरांनाच अधिक जवळचे वाटतात. श्रीपाद कृष्णांच्या साहित्यचर्चात्मक लिखाणांत रसिकतेबरोबरच पंडितगिरी आहे, व त्यांची भूमिका ही शोधकापेक्षा उपदेशकाचीच अधिक आहे. प्रो. पटवर्धन ह्यांच्या लिखाणांत एकांतिकता बरीच आहे, विचारांचा समतोलपणा त्यांना साधलेला नाही; वाङ्मयीन प्रश्नांचीं उत्तरें शोधतांना 'कारणा-नामनेकता' हें जें तत्त्व हृदयाशीं बाळगावें लागतें तें त्यांना फारसें मान्य नाही असें वाटतें; शिवाय त्यांच्या वाङ्मयीन मतावर इंग्रजी वाङ्मयाच्या विशिष्ट पद्धतीने केलेल्या अभ्यासाची छाप आहे; बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या टीकालेखांत सरलत्व, वाङ्मयांतील स्थूलसत्यांबद्दल आस्था, ऐतिहासिक दृष्टि इत्यादीचा आढळ होत असला तरी कल्पनाशक्तीचा व व्यापक सहानुभूतीचा अभाव दिसतो; वाङ्मयाच्या मूलतत्त्वांचा शोध घेऊं इच्छिणाऱ्या दुर्दम्य इच्छेची उणीव भासते; दुसरी एक गोष्ट ह्या सर्वच विद्वानांच्या लिखाणांत

आढळते ती ही की, त्यांचें लिखाण हें बरेंचसें एकमार्गी आहे : इतिहास, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, भौतिकशास्त्रें, समाजशास्त्र इत्यादींच्या मूलतत्त्वांच्या अभ्यासाने मूळच्या वाङ्मयीन सौंदर्यदृष्टीला जी विशालता, व्यापकता व विशुद्धता येणें आवश्यक असते, ती तेथे आलेली नाही; म्हणूनच ती संकुचित भासते; वामनरावांच्या वाङ्मयीन दृष्टींत ही विशालता, व्यापकता, सर्वग्राहकता आहे. त्यामुळेच त्यांचें वाङ्मयचर्चात्मक लिखाण हें केळकरांच्या तत्समान लिखाणाच्या जवळचें ठरतें. दोघांचीहि वाङ्मयीन दृष्टि अनेक संबद्ध विषयांच्या व्यासंगाने व्यापक बनलेली आहे; त्यामुळेच दोघांनीहि केलेलें वाङ्मयविवेचन हें त्याच्या व्याप्तीच्या मर्यादा लक्षांत घेतां इतरांच्या-पेक्षा अधिक सर्वांगपरिपूर्ण वाटतें; परंतु त्यांतहि थोडासा फरक आहे. केळकरांत नाही म्हटलें तरी थोडीफार पंडितगिरी आहे; थोडीफार केवळ क्रीडेची हौस आहे; थोडाफार फापटपसारा माजविण्याची, साध्यासुध्या गोष्टीं-करता पानोनपानें खर्च करण्याची आवड आहे, उपदेशकाची, हरिदासाची भूमिका त्यांना अगदीच आवडत नाही असें नाही; हास्यविनोदमीमांसेसारख्या विषयावरील ग्रंथाचीं कित्येक पानें अनावश्यक मजकुराने अडविणें त्यांना फारसें अयोग्य दिसत नाही : वामनरावांच्या ठिकाणी नेमका कशाचा तिटकारा असेल तर तो ह्याचा आहे : विद्वत्व आणि कवित्व यासारख्या आपल्या अति आवडीच्या विषयावर ते आपल्या वेगवेगळ्या निबंधांतून वारंवार विवेचन करतांना आढळतील; त्यामध्ये बरीचशी विशिष्ट तत्त्वचर्चेची पुनरुक्ति झालेलीहि आढळेल, परंतु अशीं स्थळें थोडीं. सामान्यतः त्यांची वृत्ति ही वर वर्णिल्या-प्रमाणे स्थिरचित्त, तत्त्वदर्शी-सत्यसंशोधकाचीच असलेली आढळेल. परीक्षण लेखांतहि ते परीक्षित ग्रंथांतील दोषस्थळांवर रेंगाळत राहणार नाहीत, अकारण लेखनक्रीडा करीत बसणार नाहीत. केळकरांच्या हास्यविनोदमीमांसेचें परीक्षण करितांना त्यांना जे तिच्यांत अनेक दोष दिसले त्यांचें विवरण करीत बसण्याऐवजीं त्यांनी फाउलरच्या ' मॉडर्न इंग्लिश यूसेज ' ह्या ग्रंथांत विनोद ह्या सदराखाली जें एक विनोदप्रकारांचें वर्गीकरण करणारें उद्बोधक कोष्टक दिलेलें आहे तेंच भाषान्तरित करून मराठींत दिलेलें आहे. काय नको तें सांगत बसण्यापेक्षा काय हवें तें शोधून काढणें व पुढे मांडणें त्यांच्या विवेचक प्रकृतीला अधिक आवडत असे.

वामनरावांच्या समकालीन वाङ्मयविवेचकांतील त्यांचें स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न येथे अभिप्रेत नाही. तें निश्चित होण्याला अद्याप कालावधीची जरूरी आहे; परंतु आधुनिक मराठी साहित्यचर्चात्मक लिखाणाचें विवेचन करितांना पुष्कळसे लोक वामन मल्हारांचें नांव विसरतात असें दिसून येतें; तेव्हां असें होऊं नये एवढ्याच कारणाकरिता थोड्याबहुत विस्ताराने त्यांच्या वाङ्मयीन तत्त्वज्ञानाचें स्वरूप शक्य तोंवर त्यांच्याच शब्दांत आपणांसमोर मांडलें. तें किती उज्ज्वल आहे, ह्याची आपणांस कल्पना आल्यास त्यांच्या साहित्य-चर्चात्मक लिखाणाचा अधिक सखोल अभ्यास होण्यास मदत होईल; व सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्यांचेंच सतत ध्यान, भजन आणि पूजन करण्याबाबत त्यांनी जो साहित्यिकांना महामंत्र दिलेला आहे त्याचें मनन आणि प्रतिपालन त्यांच्या ललितकृतींतून व ललित चर्चेंतून होण्यास सोयीचें जाईल.

# वामनरावांचें तत्त्वचर्चात्मक लेखन

तत्त्वज्ञ ह्या दृष्टीने वामनरावांची वेगळी ओळख करून देतांना मनाला थोडेसें चमत्कारिक वाटतें हें खरें. वामनरावांचें ललितलेखन, त्यांनी केलेली साहित्यचर्चा ह्यांत त्यांची तत्त्वज्ञ ह्या दृष्टीने ओळख होत नाही काय? वामनराव हे ज्या अर्थी प्रथम तत्त्वज्ञ आहेत व नंतर ललितलेखक वा वाङ्मय समीक्षक आहेत अशी आपली खात्री आहे त्याअर्थी त्यांची तत्त्वज्ञ ह्या दृष्टीने वेगळी ओळख करून घेण्याची आवश्यकताच कां? असा प्रश्न विचारला जाणें साहजिक आहे. परंतु आवश्यकता एवढ्यासाठीं की विषयाच्या वर्गीकरणाच्या दृष्टीने तें सोयीचें जाईल अशी कल्पना आहे. वामनरावांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यांच्या सगळ्याच वाङ्मयांत विखुरलें आहे हें खरें. आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची विलक्षण छाप आपल्या समग्र वाङ्मयावर उमटविणारे जे थोडे लेखक अर्वाचीन मराठी साहित्यसेवकांत आहेत, त्यांत वामनरावांची योग्यता फार मोठी आहे; परंतु आपल्या सगळ्याच लिखाणांतून त्यांनी जो तत्त्वशोध केलेला आहे त्याचें स्वरूप नीटसें लक्षांत येण्यासाठीं तो ज्या ज्या वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांच्या द्वारा झाला आहे, त्या त्या वाङ्मयप्रकारांच्या आधारें त्याचा विचार करणें विषयविवेचनाच्या दृष्टीने सोयीचें जाईल असें वाटल्यावरून तसेंच करण्याचें योजिलें आहे.

वामनरावांचें हें जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यांच्या ललितकृतींतून जितकें व्यक्त होत आहे, तितकेंच परंतु वेगळ्या स्वरूपांत त्यांच्या तत्त्वचर्चात्मक लिखाणांतून व्यक्त होत आहे. ह्या तत्त्वचर्चात्मक लिखाणांतून तें प्रगट होत असतांना वामनरावांच्या विवेचक, सत्यशोधक बुद्धि शक्तीचा एक वेगळाच विलास त्यांतून प्रतीत होत असल्यामुळे त्यांच्या ह्या लिखाणाचें वेगळें समीक्षण होणें अगत्याचें आहे. वामनरावांच्या नीतिशास्त्रविषयक, किंवा अन्यशास्त्र विषयक मतांची चिकित्सा करणें प्रस्तुत लेखकाच्या कुवतीबाहेरची गोष्ट आहे; तेव्हां तो ती कधीहि करणार नाही. वामन मल्हारांच्या जीवनविषयक वेगवेगळ्या प्रश्नांवरील मतांचें दर्शन जरी त्याला ह्या पृष्ठांतून अस्पष्टपणें कां होईना घडवितां आलें तरी तो त्यांत स्वतःला धन्य मानील.

**तत्त्वचर्चात्मक लिखाणः स्थूल स्वरूप :**

वामनरावांचें तत्त्वचर्चात्मक लिखाण हें त्यांच्या 'नीतिशास्त्रप्रवेश' व 'साक्रेटिसाचे संवाद' ह्या दोन ग्रंथांत, 'विचारविलासां' तील 'ज्ञान हें विष की अमृत?' आणि 'पक्षद्वेष आणि पक्षभेद' ह्या लेखमालांत आणि त्यांनीं 'विविधज्ञानविस्तार,' 'केसरी,' 'लोकशिक्षण,' 'धर्मजागृति,' 'रत्नाकर' 'प्रतिभा,' 'सह्याद्रि,' 'विहंगम' इत्यादि नियतकालिकांतून जे वेळोवेळी लेख लिहिले त्यांत समाविष्ट झालें आहे. त्याचें स्वरूप सगळीकडे सारखेंच आहे असें नव्हे: त्यांतील कांहीं प्रबंधात्मक आहे, कांही निबंधात्मक आहे तर कांही संवादात्मक आहे. त्यांत एकाच विषयाची चर्चा झाली आहे असेंहि नव्हे: धर्म, नीति, आत्म्याचें अमरत्व, ज्ञानाचें स्वरूप व त्याचें कार्य, कर्म, भक्ति, योग, वेदान्त, आधिभौतिकशास्त्रांचें स्वरूप व त्यांचें कार्य, गीतार्थ, इतिहासाचा उपयोग इत्यादि अनेक प्रश्न त्यांत चर्चेला आलेले आहेत : तत्त्वज्ञान, वेदान्त, मानसशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांची शिकवणूक पचवून तें केलेलें असल्यामुळे त्यांत सर्वत्र ह्या शास्त्रांच्या ज्ञानाची प्रभा फाकलेली दिसत आहे; ह्या सर्वच लिखाणाला ह्या शास्त्रज्ञानाने विलक्षण उजळा आलेला आहे. त्यांतहि त्यांच्या वाङ्मयचर्चेंतल्याप्रमाणेच वामनरावांची भूमिका ही शोधकाचीच आहे; परंतु त्यांच्या वाङ्मयचर्चात्मक व तत्त्वचर्चात्मक लिखाणांत थोडा फरक आहे: त्यांच्या तत्त्वचर्चेंत सुबोधता अधिक आहे; तिच्यांतील शोधक हा वाचकाला कांही वेळां बोटीं धरून घेऊन जातांना आढळतो; अर्थात् कांही लेखकांप्रमाणे सर्वत्र नव्हे, तर कांही दुर्गम ठिकाणीं; वाचकाच्या बुद्धीबद्दल अनादर दिसेल इतकें हें मार्गदर्शन 'बाल'बोध नसतें. वाचकाच्या बुद्धीला त्यांत सपाटून वाव दिलेला असतो. आपल्या हरघडीच्या जीवनांतील दृष्टान्तांची पखरण ह्या सगळयाच लिखाणांत मोठ्या मार्मिकपणे झालेली आहे, त्यामुळे त्याची सुबोधता अनंत पटींनी वाढलेली आहे. 'नीतिशास्त्रप्रवेश' लिहिणाऱ्या लेखकाची दृष्टी ही शोधकाचीच खरी, परंतु ज्या शास्त्रतत्त्वांचा आपण शोध घेत आहोंत, त्यांची आपल्या अल्पशिक्षित वाचकांना फारशी माहिती नाही, तेव्हां त्यांच्या उद्बोधनार्थ आपणास जरा हळूहळू प्रवास करावयाला हवा ह्याची जाणीव तेथे आहे. त्यामुळेच त्याचें वाचन सामान्य जिज्ञासू वाचक आनंदाने करूं शकतो. लोकमान्यांनी 'गीतारहस्य'

लिहितांना जो केसरीचा सामान्य सुजाण वाचक डोळ्यासमोर ठेवला होता व त्याच्या उद्बोधनार्थ अत्यंत सुगम लिखाण करण्याचें योजिलें होतें, तसलाच वाचक वामनरावांनी 'नीतिशास्त्रप्रवेश' लिहितांना किंवा आपलें इतर तत्त्वचर्चात्मक लिखाण लिहीत असतांना आपल्या डोळ्यापुढें ठेवला असावा असें दिसतें. लोकमान्य टिळक ज्याप्रमाणे 'गीतारहस्य' लिहितांना मध्येच एखादा अवघड शब्द आला की त्याचा अर्थ सोप्या शब्दांत विशद् केल्याशिवाय पुढें जात नाहीत, त्याप्रमाणे वामनराव सामान्य जिज्ञासू वाचकाच्या सुखबोधार्थ आपलें लिखाण करीत आहेत असें वाटतें. अर्थात् हें तत्त्वचर्चात्मक लिखाण असल्यामुळे आणि सत्याचा शोध लागल्यानंतर तत्संबंधी अल्पतम का होईना आग्रह धरण्याची प्रवृत्ति स्वाभाविकच असल्यामुळे ह्या लिखाणांत तशा प्रकारचा अभिनिवेश, कांही ठिकाणीं जो दिसून येतो तो युक्तच व म्हणूनच मोठा सुखावह वाटतो. सत्याबद्दलच्या आवडींतूनच विवादप्रवृत्तीचा पुष्कळ वेळा विकास होत असतो. वामनरावांच्या ह्या सत्प्रवृत्त विवादशक्तीचा स्वच्छंद विलास आपणांस त्यांच्या ह्या तत्त्वचर्चात्मक लिखाणांत पहावयास मिळतो. परंतु त्यांच्या विवादाला तर्कटाचें स्वरूप कधीच येत नाही. त्यांची विनोदबुद्धीहि त्यांत सदैव जागृत आहे; तिचें मंदस्मित त्या तत्त्वचर्चेच्या गांभीर्याच्या मागे एक सारखें डोकावत आहे; त्यामुळे एकंदर लिखाणांत सुभगता, प्रसन्नता अवतरलेली आहे. शिवाय हें सर्वच लिखाण केवळ सत्यजिज्ञासेच्या दृष्टीने केलेलें असलें व मिल्लप्रमाणे लेखकहि 'Better a Socrates dissatisfied than a pig satisfied' असें स्वतःच्या सत्यलालसेबद्दल स्वतःच म्हणत असला, तरी एक गोष्ट नक्की की हें सगळें सत्यशोधन मानवजातीच्या सुखांत, श्रेयसमध्ये कशी भर घालूं शकेल हें दाखविण्याकडेच लेखकाची स्वाभाविक प्रवृत्ति आहे; त्यामुळेंच तें मानवनिरपेक्ष सत्यशोधन झालेलें नाही. त्यामुळेच ह्या सत्यशोधनांत रुक्षता, कठोरपणा, नीरसता आलेली कोठेहि दिसत नाही. सर्वत्र मानवी सुखाची, कल्याणाची खरीखुरी सुजाण कळकळ दिसून येते. त्यांत कठोरता जर कोठे आलेली दिसत असेल तर तीहि माणसाच्या अंतिम हिताच्या मार्गांत येणाऱ्या असत्तत्त्वांचें निर्मूलन करतांनाच आलेली आहे, असें आढळून येतें. दुसरी एक गोष्ट वामनरावांच्या ह्या लिखाणांत दिसून येते

ती अशी कीं त्यांत कांही ठिकाणी, अत्यंत कठीण वाटणारा असा विषय आपण सोपा करून मांडूं शकूं ह्या आत्मविश्वासाने भाषेचा डौल न बिघडूं देतां व विवेचनाची पातळी यत्किंचित्‌हि खाली सरकूं न देतां साधलेलें प्रशंसनीय लेखनकौशल्य आपणांस पाहावयास मिळतें. वामनरावांच्या लिखाणांत क्रीडेचा भाग जर कोठे येत असेल तर तो येथेंच, असें मला वाटतें. तत्त्वचर्चा करणें यांत ज्यांना खराखुरा आनंद, सत्यशोधन करीत राहणें यांतच ज्यांच्या मनाचें खरेंखुरें समाधान, त्यांच्या तत्त्वचर्चात्मक लिखाणांत हा आनंद, हें समाधान, ही शांति व तुष्टी प्रतिबिंबित झालेली दिसलीं यांत काय नवल? येथेच फक्त वामनराव लेखनद्वारां तत्त्वशोधनाची क्रीडा करितांना आढळतात; त्यांत रंगून गेलेले, समरस झालेले, हास्य, गांभीर्य, विचारशीलता, आनंद, सत्याभिनिवेश, दुःख इत्यादि भावभावनांचे प्रसंगानुसार खेळ खेळत असलेले असे दिसतात. ते आपल्या परिचयाचेच वामनराव आहेत; फक्त त्यांच्या मनः-प्रकृतीला अत्यंत अनुकूल, परिपोषक अशा वातावरणांत ते वावरत असल्या-मुळे त्यांची मूर्ति ही अधिक कांतिमान्, अधिक सतेज, अधिक प्रेमळ, अधिक विचारशील अशी भासत आहे, एवढेंच.

**आगरकरी पंथांतला विवेकवादी :**

वामनरावांच्या ह्या तत्त्वचर्चात्मक लिखाणांतील व्यक्तिमत्त्वाचें दर्शन घेतां घेतांच त्यांच्या ह्या लिखाणाकडे प्रत्यक्ष वळलेलें चांगलें. कारण ह्या लिखा-णांतील प्रमुख स्थळांचा मागोवा घेत असतांनाच आपणांस तें दर्शन अधिक चांगल्या रीतीने होण्याचा संभव आहे; अर्थात् कोणत्या स्थळांचें विशेष दर्शन घ्यावयाचें, कोणाची केवळ धूळभेट घ्यावयाची व कोणाला डावलून जावयाचें हें ठरविणें जरा कठीणच आहे. परंतु त्यांतील कोणतींहि स्थळें निवडलीं तरी त्यांत वामनरावांच्या ठिकाणी असलेल्या बऱ्याच विवेचकशक्तींचा विलास पाहावयास मिळणार असल्यामुळे आपली निवड अचूक होईल का नाही ह्याबद्दल फारशी भीति बाळगण्याचें कारण नाही. प्रथम म्हणजे वामनराव हे विवेक-वादी होते. 'मी आगरकरी पंथांतला विवेकवादी आहें आणि अशा माणसाला 'नवमतवादी' म्हणावयाचें असल्यास मी तसा आहें, नसल्यास नाही'[1]–' असें

(१) मी आणि नवमतवाद : वा. म. जोशी; प्रतिभा फेब्रु. १९३६

ते स्वतःविषयी म्हणत असत. आगरकर विचारांप्रमाणेच भावनांचें महत्त्वहि ओळखून होते व त्यांचा विवेकवाद क्रांतिकारक असला तरी त्यांचें धोरण क्रम-वादाला अनुकूल होते असें तेच आपल्या आगरकरांवरील लेखांत म्हणतात. वामनरावांनी केलेली ही आगरकरांच्या भूमिकेची छाननी त्यांनाहि लागू पडते; फक्त आगरकरांच्या अंगची धडाडी, त्यांची लढाऊ वृत्ति त्यांचा अभिनिवेश, त्यांचा दीर्घोद्योग, त्यांची चिकाटी वामनरावांच्या ठिकाणी नव्हती. आगरकरांनी आपल्या आचारांतून आणि विचारांतून पुरस्कारलेली विवेकवाद्याची भूमि वामनरावांनी अंगिकारलेली होती खरी; परंतु तसें करितांना तिला अधिक विचा-रांचे, अधिक संयमांचे, अधिक सौजन्याचे व सौंदर्यदृष्टीचे बंध घातलेले होते; त्यामुळे आगरकरांच्या लेखांतून व्यक्त होणारें तिचें स्वरूप जितकें सहजगत्या वाचकांचे डोळे दिपवून टाकतें, तितकें वामन मल्हारांच्या लिखाणांतून व्यक्त होणारें तिचें रूप नेत्रांना दीपवीत नाही. त्याची प्रभा स्निग्ध, कोमल आहे असेंच वाटतें; तिच्यांत दाहकता नाही, प्रखरता नाही, नेत्र दीपवून टाकण्याची शक्ति नाही. आगरकरांच्या विवेकवादाने त्यांना अधिक कृतिप्रवण केलें, वामनरावांच्या विवेकवादाने त्यांना अधिक विचारप्रवण केलें : अधिक अन्तर्मुख बनविलें : आपोआप आगरकरांच्या लेखणींतील अभिनिवेश गेला, तो वामन-रावांच्या लेखणींत उतरला नाही. परंतु वामनरावांच्या लिखाणांत अभिनिवेश नाही असें नाही; त्यांच्या लिखाणांतहि सत्याबद्दलचा त्यांचा अभिनिवेश ठिक-ठिकाणीं दिसून येतो; परंतु कोणत्याहि सत्याचा धडाडीने पुरस्कार करूं लागतांच वामनरावांना इतरहि सत्यें दिसत असल्यामुळे त्यांच्या ह्या पुरस्कारामध्ये आगर-करांची मुसंड येत नाही. आपल्याला लोक संशयात्मा म्हणतात, परंतु आपण तसे नसून आपलीं बऱ्याच प्रश्नांवर निश्चित अशीं मतें आहेत व तीं आपण वेळोवेळीं तितक्याच निश्चितपणे मांडलेलीं आहेत; फक्त आपल्याला कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर शोधून काढतांना त्याचीं अनेक अंगें लक्षांत येतात व तदनुरोधाने विचार करितांना एका उत्तराने आपलें समाधान होत नाही, व मग त्याच प्रश्नाचा अधिक विचार व्हावयाला हवा, जोपर्यंत असा विचार होत नाही, तोपर्यंत त्या प्रश्नाचें निर्णायक असें उत्तर देतां येत नाही, असें आपण म्हणतों, असें ते स्वतःसंबंधी

---

( १ ) आगरकरांचें वैशिष्ट्य—वा. म. जोशी; प्रतिभा जून १९३५

नेहमी म्हणत असत. वामनरावांची भूमिका ही विवेकवाद्याची होती, हें खरें, परंतु ती कृतिप्रवण विवेकवाद्याची नव्हती तर विचारप्रवण विवेकवाद्याची होती असें जें मी म्हणतों तें एवढ्यासाठी. कृतिप्रवण विवेकवादी हा कृतीला अधिक महत्त्व देत असल्यामुळे संशोधित सत्यांचा पुरस्कार त्यांच्या सामाजिक उपयुक्ततेकडे लक्ष देऊन अत्यंत हिरीरीने करण्याकडे त्याचें लक्ष असतें. विचारप्रवण विवेकवादी हा सत्यसंशोधनामध्येच अधिक रंगून गेलेला असल्यामुळे सांपडलेल्या सत्यांच्या निरलस पुरस्कारापेक्षा तीं सत्येंच अधिक विशुद्ध करून आपल्या जाणिवांचें क्षेत्र अधिक अधिक विस्तृत करण्याच्याच मागें तो जास्त असतो; व त्यांतच समाधान मानतो; परंतु याचा अर्थ त्याच्याकडून सत्याचा पुरस्कार होत नाही, असा नाही; ज्या अभिनिवेशाने तो पहिल्याकडून होतो, त्या अभिनिवेशाने तो दुसऱ्याकडून होत नाही, एवढेंच. आगरकर आपल्या दृष्टीने सत् ठरलेल्या पक्षाचें समर्थन करितांना व तद्विरुद्ध पक्षियांचें म्हणणें खोडून काढतांना प्रसंगीं दयामाया विसरतात व प्रतिपक्षियांची रेवडी उडवितात. त्यांच्या भावनांकडे लक्ष द्यावयाला त्या वेळी त्यांना वेळ नसतो. वामनरावांकडून हें जमणें कधीच शक्य नव्हतें. 'कटु कर्तव्य करण्याचें श्रेष्ठ धारिष्ठ पाहिजे. पण कटु कर्तव्य करतांना दुसऱ्यांना दुःख देण्याची पाळी येते तिजबद्दल हळहळ वाटावी' अशी त्यांची शिकवणूक असे[1]. 'भावनांचें भलतें स्तोम न माजवतां त्यांचें महत्त्वमापन व त्यांची मूल्यमीमांसा विवेकाने करून त्यांची विशिष्ट परिस्थितींत योग्यायोग्यता' ठरविण्याची आगरकरांचे ठिकाणी जी विशेष शक्ति होती, तिच्यांत आगरकरांचें वैशिष्ट्य होतें, 'प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु' असें म्हणणारे टिळक हे आगरकरांच्या मानाने मागासलेलेच होते. विवेकवाद थोडाबहुत अंतर्यामी मान्य असतांनाहि त्याचा निःसंदिग्धपणे पुरस्कार डॉ. भांडारकर, ज्योतिबा फुले, रानडे, टिळक, चिपळुणकर यांच्यापैकीं एकाच्याहि लेखणींतून झाला नाही, तो आगरकरांच्याच लेखणींतून झाला, यांत त्यांचा मोठेपणा आहे, असें जें वामनरावांचें म्हणणें होतें व आगरकरांविषयी त्यांच्या ठिकाणी जो कमालीचा आदर होता तो त्यांच्या वरील

१ "प्रो. वा. म. जोशी व विजयकृष्ण : ( खुलासा व कांही प्रश्न ) प्रतिभा फेब्रु. १९३५.

भूमिकेशीं संबद्धच होता. आगरकर ह्या बाबतींत आपल्यापेक्षा श्रेष्ठ होत, आगरकरांची धडाडी आपल्यांत नाहीं ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आगरकरांप्रमाणेच त्यांच्या विवेकवादी भूमिकेला व्यक्तिस्वातंत्र्य हें अत्यंत प्रिय होतें; आगरकरांप्रमाणेच तेहि ह्या व्यक्तिस्वातंत्र्याला समाजहिताकरिता एका विशिष्ट मर्यादेपर्यंत मुरड घालावयाला तयार होते; परंतु ' मजूरशाही ' चा किंवा कोणत्याहि ' शाहीचा ' अवलंब केल्यास माणसाच्या व्यक्तित्वाचा विकास अधिक होईल की नाही ह्याबद्दल त्यांना शंका होती. ह्यासंबंधांत ते म्हणत असत, ' समाजहिताकरितां व्यक्तिस्वातंत्र्य कांही बाबतींत विशिष्ट मर्यादेपर्यंत नियमित होतें व व्हावें असें मी मानतों; पण कांहीं नवमतवाद्यांना जी मजूरशाही प्रिय व पूज्य आहे तींत वाजवीपेक्षा फाजील व्यक्तिस्वातंत्र्यनाश होईल अशी मला भीति वाटते. ' एवढ्यासाठी कोणत्याहि ' शाही ' चा पूर्ण स्वीकार किंवा पुरस्कार त्यांनी केला नाही. कोणतीहि ' शाही ' स्वीकारतांना तिच्या द्वारां मानवांचें अधिकांत अधिक हित होईल किंवा नाही हें बघावयाचें असतें; एकंदर समाजाच्या सुखाला विघातक होणार नाही अशा स्वरूपाचे आचार, विचार व उक्ति स्वातंत्र्य ज्या ' शाहीं ' त व्यक्तीला अधिकांत अधिक मिळेल ती ' शाही ' व्यक्ती मान्य करील हें उघडच आहे; म्हणूनच वामनराव म्हणत असत की ' खरा प्रश्न व्यक्तिस्वातंत्र्याच्या सापेक्ष संभवाचा आहे. हा संभव मजूरशाहींत अधिक आहे असें दाखविल्यास ती शाही स्वीकारण्यास हरकत नाही. माझ्या मतें भांडवलशाहीचें हल्लीचें स्तोम पुष्कळ कमी केल्यास, मजूरशाहीच्या शेवटच्या टोकापर्यंत न जातांहि सध्याची स्थिति सुधारून व्यक्तिस्वातंत्र्याचा सापेक्ष संभव वाढणें शक्य आहे. '

### विवाहसंस्थेचें पावित्र्य मानणारा नवमतवादी :

वामनराव विवेकवादी होते, परंतु मूर्तिभंजक नव्हते तें ह्याच कारणामुळे. आगरकरांप्रमाणे त्यांचा विवेकवाद क्रमवादालाच अनुकूल होता. मानवाने आपल्या उपयोगासाठी, आपल्या आत्मिक समाधानासाठी, आपल्यांतील सत्त्वांचा विकास होण्यास मदत व्हावी एवढ्यासाठी व एकंदर मनुष्य-जातीच्या अंतिम सुखाच्या दृष्टीने ज्या संस्था स्थापन केलेल्या आहेत व लहानाच्या मोठ्या केल्या आहेत, त्या नष्ट करण्याच्या वामनराव विरुद्ध होते.

ह्या संस्था मनुष्यकृत असल्यामुळे त्यांच्यांत कालमानाप्रमाणे बदल करण्याचा व व्यवहारांत त्यांना कांही अपवाद मान्य करण्याचा अधिकार समाजाला आहे व हा अधिकार समाजानें विशिष्ट परिस्थितींत बजवावा असें ते प्रतिपादीत असत; ते असल्या संस्थाचें पावित्र्य मान्य करणारांपैकी एक होते. ह्या संस्थांपैकी विवाहसंस्थेसंबंधीचीं आपलीं मतें त्यांनी वेळोवेळीं व्यक्त केलीं आहेत : "आपल्या समाजांतील विवाहासंबंधींच्या चालीरीतींत, मतांत, वृत्तींत व धोरणांत पुष्कळ बदल व्हावा असें मानणारा म्हणून मला 'नवमतवादी' म्हणावयाचें असल्यास म्हणावें, तसेंच विवाहसंस्थेचें पावित्र्य मानणारा म्हणून 'जीर्णमतवादी' असें मला म्हणावयाचें असल्यास तसें म्हणावें." असें ते आपल्या 'मी आणि नवमतवाद' ह्या 'प्रतिभें'तील लेखांत म्हणतात. वामनरावांची 'नवमतवादा'वरील मतें त्यांच्या 'नव्या मनूं' तील 'नवमतवादाविषयीं मला काय वाटतें ?' ह्या लेखांत व तदनंतर 'प्रतिभा' पाक्षिकांतून त्या लेखावर जी चर्चा झाली त्या चर्चेंतून व्यक्त झालेलीं आहेत. विवाहसंस्था ही जर मनुष्यकृत आहे व ह्या सर्व गोष्टी जर वामनरावांना मान्य आहेत, तर वामनराव विवाहसंस्थेला 'पवित्र' हें नसतें विशेषण कां लावतात अशा स्वरूपाची शंका प्रो. र. धों. कर्वे व श्री. बेडेकर नांवाचे एक चर्चिक, ह्यांनी त्या वेळीं विचारलेली होती. ह्या दोघांच्या प्रश्नाला उत्तर देतांना वामनरावांनी जें पुढील विधान केलेलें आहे तें त्यांची ह्या प्रश्नाबाबतची भूमिका स्पष्ट करतें: तर्क, बुद्धि, अनुमान ह्यांवरच भिस्त न ठेवतां सद्भावनांना वामनरावांच्या विवेकवादी विचारसणींत केवढें महत्त्वाचें स्थान होतें हें त्यावरून दिसतें: ते म्हणतात, "विवाहसंस्था ही देवाने निर्माण केलेली असली, ती मनुष्यकृत असली, ती 'संस्कार' स्वरूपाची नसून 'करार' स्वरूपाची असली, तरी तिची उपयुक्तता, आवश्यकता, उपकारकता, मानसोन्नतिकारकता, आदरणीयता इत्यादि विशेषाकडे पाहतां ती 'वंद्य,' 'पूज्य,' 'पवित्र' आहे असें मला म्हणावेसें वाटतें; आणि याचें कारण हेंच की असले शब्द वापरल्याखेरीज या संस्थेबद्दलचा माझा आदर[1] व तत्सम इतर भावना थोडक्यांत

१ विवाहाचें 'पावित्र्य' म्हणजें काय ?—'प्रतिभा' सप्टेंबर १९३६

व्यक्त करणें मला कठीण पडतें. " कोणत्याहि नवीन विचारसरणीचा पुरस्कार करितांना तिचे पुरस्कर्ते उत्साहाच्या भरांत, अभिनिवेशामुळें वा अन्य कांही कारणांनी त्या विचारसरणीचें सर्वांगीण स्वरूप स्पष्ट करण्याऐवजी तिच्यांतील एकाच विशिष्ट अंगावर जेव्हा जोर देतात व असें करीत असतां आपल्यासमोर असलेल्या श्रोत्यांची किंवा वाचकांची, त्यांतील तत्त्व तेवढें ग्रहण करण्याची शक्ति कितपत आहे, ह्याकडे जेव्हां यत्किंचित्‌हि लक्ष पुरवीत नाहीत, तेव्हा त्यांच्या ह्या मतप्रतिपादनाचा परिणाम कसा विपर्यस्त होतो ह्याचें चित्र वामनरावांनी आपल्या ' विस्तवाशी खेळ ' ह्या नाटकांत व इतरत्रहि रंगविलें आहे. अशा प्रकारच्या विचारणीशी, तिचें यथार्थ ज्ञान करून घेतल्याशिवाय खेळणें हें विस्तवाशी खेळण्यासारखेंच आहे असें वामनारावांना त्यांवरून सुचवावयाचें आहे. विशेषतः लैंगिक नवमतवादाचे पुरस्कर्ते जेव्हां आपलीं मतें अभिनिवेशाने प्रतिपादतात. तेव्हा त्या मतांतील कोणता भाग तेवढा समोरच्या वाचकांकडून वा श्रोत्यांकडून ग्रहण केला जातो व त्यांतून निर्माण झालेल्या विपर्यस्त कल्पनांमुळे कोणत्या चुका त्यांजकडून अजाणता घडतात, ह्याची जाणीव ह्या प्रतिपादकांना नसते, असें वामन मल्हारांना वाटत असे; व ह्या लैंगिक नवमतवादाचा पुरस्कार करणाऱ्या लोकांनी नेहमी आपलें म्हणणें सुविद्य व शाहण्या लोकांपुढेंच मांडावें, परंतु अडाणी लोकांचा त्यांनी बुद्धिभेद करूं नये असें वामनराव म्हणत असत. ह्या संबंधांत वामनरावांनी केलेलें कार्य द्विविध आहे. त्यांनी आपल्या इतर लेखांतून व ' विस्तवाशीं खेळ, ' सारख्या ललितकृतींतून तर ह्या लोकांना, त्यांच्या हातून कळत न कळत घडणाऱ्या ह्या प्रमादाची जाणीव करून दिलेली आहेच. परंतु शिवाय ' ॲडलर ' व [१] ' फ्रॉयड ' यांच्या भूमिकांचें अत्यंत सुबोधपणें स्पष्टीकरण करणारे असे लेखहि त्यांनी नियतकालिकांतून लिहिलेले आहेत. ह्या दोन्हीहि लेखांतून वामनरावांनीं फ्रायडची भूमिका स्पष्ट केली असून तो बोधरहित कामव्यापाराबरोबरच बोधरहित अहंभाव व्यापारहि मानीत असे, ॲडलरचा तर कामप्रेरणेपेक्षा अहंभावावरच अधिक विश्वास होता व ह्या दोघांच्याहि तत्त्व-

१ अल्फ्रेड ॲडलर : विहंगम १९३७ नोव्हेंबर.

फ्रॉयड् आणि कामवासना : नोव्हें. १९३९ सह्याद्रि.

ज्ञानाचें सार म्हणजे ' आत्मवंचनेने रोग होतो, आत्मज्ञानाने रोगनाश होतो ' हेंच होतें असें त्यांनी अत्यंत सोप्या भाषेंत व दृष्टान्तउपमादि अलंकारांची योजना करून सामान्य वाचकाला * समजावून दिलें आहे.

---

* ह्याच संदर्भात वामनरावांच्या तत्त्वचर्चेचा एक विशेष लक्षांत येतो; तो असा की पाश्चात्य शास्त्रज्ञांनीं प्रतिपादलेल्या वा संशोधिलेल्या कोणत्याहि तत्त्वाचें विशदीकरण करितांना ते अभावितपणे त्या तत्त्वाशी संबद्ध असलेलें आपल्या वेदान्तांतील एखादें तत्त्व पुढे मांडीत असत; व मग ह्या दोहोंतील साम्य झटकन् उघड करून दाखवीत असत. प्रो. महादेव मल्हार यांच्या सान्निध्यांत वेदान्तमतांचा पूर्व वयांतच भरपूर अभ्यास झालेला असल्यामुळे त्यांचें अंतरंग वामनरावांना सुपरिचित होतें; त्यामुळे पाश्चात्य व पौर्वात्य मतामतांतील हीं साधर्म्य-स्थळें त्यांच्या झटकन् लक्षांत यावींत, हें स्वाभाविकच होतें. ह्याच फ्रॉयडवरील लेखांतच पाहाना: आत्मज्ञानाने रोगनाश होतो ह्या फ्रॉयडच्या मताचें विशदीकरण करितांना वामन मल्हारांना सहज वेदान्तांतील ' ज्ञानान्मोक्षः ' हें तत्त्व आठवतें, व तें वरील संदर्भात निराळ्या अर्थाने कसें खरें ठरतें तें दाखवून ते दुसऱ्या तसल्याच एका तत्त्वाकडे वळतात : ते म्हणतात, ' पश्चात्तापेन शुद्धति ' असें आपण म्हणतों. परंतु याच वचनांत थोडासा फरक करून ' पश्चात् ज्ञानेन शुद्धति ' असें म्हटलें असतां फ्रॉयडचें म्हणणें लक्षांत येण्याला सोपें जातें. पौरस्त्य वा पाश्चात्य विचारांतील साधर्म्य-स्थळांची अशा प्रकारची तुलना त्यांनीं आपल्या ' नीतिशास्त्रप्रवेशा 'त जागोजागीं केली आहे; व ह्याबद्दल त्या ग्रंथाचे प्रस्तावनालेखक प्रि. गो. चिं. भाटे यांनी मोठे प्रशंसेचे उद्गार काढलेले आहेत. ' आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त ' ह्या प्रो. म. म. जोश्यांच्या संवादात्मक प्रबंधाला वामनरावांनी जी एक पुरवणी जोडलेली आहे, तिच्यांतहि हाच विशेष आढळतो. वेदान्तमत व आधुनिक विचारवाद्यांचें मत यांचा समन्वय घालण्यांतील वामनरावांचें कौशल्य त्यांच्या सगळ्याच तत्त्वचर्चात्मक लिखाणांतून दिसून येतें. आपला ' साक्रेटिसाचे संवाद ' हा ग्रंथ तर वामनरावांनीं बोलून चालून ' आपल्या तत्त्वज्ञानाचें व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचें मराठी वाङ्मयमंदिरांत आपणांस सुलभतेनें व यथार्थतेने दर्शन व्हावें' ह्या हेतूनेच लिहावयास घेतलेला होता व 'प्लेटोने लिहिलेल्या सर्व

## जनहितवाद : टिळक व वामनराव :

वामनरावांची विवेकवादी ह्या दृष्टीने प्रथमपासून अगदीं शेवटपर्यंत असलेली ही भूमिका लक्षांत घेतली म्हणजे जीवनांतील वेगवेगळ्या प्रश्नांबाबत असलेल्या त्यांच्या विचारसरणींत, कांहीं थोडे अपवाद सोडून, अथपासून इतिपर्यंत जी बरीचशी स्थिरता दिसून येते तिची संगति लागू शकते. आपल्या आयुष्यांतील कोणत्याहि वेळीं त्यांनीं आत्यंतिक स्वरूपाचीं मतें प्रतिपादलेलीं नसल्यामुळे आपल्या मतांमध्यें कालान्तराने फारसा बदल करण्याची वेळ त्यांना फार वेळा आलेली दिसत नाहीं. धर्म, नीति, कर्म, ज्ञान, कार्याकार्यनिर्णय इत्यादि विषयांचें त्यांनीं 'नीतिशास्त्रप्रवेशां' त केलेलें विवेचन हें त्यांच्याकडून उत्तरकालांत झालेल्या लेखनांतील ह्या प्रश्नांसंबंधीच्या अधूनमधून झालेल्या विवेचनाशीं तोलून पाहिलें की त्यांत बरीचशी एकवाक्यता आढळते. 'नीति-शास्त्रप्रवेशा' च्या लेखनानंतरच्या युद्धोत्तर कालांत वामनरावांच्या मनावर साम्यवादी विचारसरणीचा बराच परिणाम झाला व त्यांनी आपल्या देव-विषयक, धर्मविषयक व नीतिविषयक मतांचें पुनर्निरीक्षण व पुनर्मापन केलें यांत संशयच नाहीं. परंतु 'नीतिशास्त्रप्रवेश' लिहितांनाहि त्यांची भूमिका ही स्थिरचित्त विवेकवाद्याचीच होती, टिळकांप्रमाणे आध्यात्मवाद्याची नव्हती, हें ध्यानांत बाळगलें पाहिजे. म्हणूनच कोणत्याहि नवीन विचारसरणीकडे त्यांचें त्या वेळीहि दुर्लक्ष नव्हतें असें दिसतें. मिल्लच्या जनहितवादाचा अर्थ त्याच्या हेतूचा विपर्यास न होऊं देतां कोणत्या रीतीने लावला जावयाला हवा याची त्यांना पूर्ण कल्पना होती व लोकमान्य टिकळांनीं 'गीतारहस्यांतून' जनहित-वादावर घेतलेले आक्षेप त्यांनीं आपल्या ग्रंथांत जे सप्रमाण खोडून काढले आहेत, त्यांत त्यांनी आपली ही कल्पना स्पष्ट केलेली आहे. वामनरावांच्या 'नीतिशास्त्रप्रवेशाच्या' अगोदर मराठींत धर्म, नीति वगैरे संबद्ध प्रश्नांची चर्चा करणारा 'गीतारहस्या' इतका महत्त्वाचा दुसरा एकहि गद्य ग्रंथ नव्हता; व

---

संवादांचें तसेंच झेनोफोनच्या आठवणींचें व ॲरिस्टॉटलच्या ग्रंथाचें मराठींत भाषान्तर झाल्यास तें उपयुक्त, बोधप्रद व **स्वाभिमानाला परिपोषक** होईल' अशी त्यांना कल्पना होती व त्याच दृष्टीने 'साक्रिटिसाचे संवाद' ह्या भाषान्तराच्या रूपाने त्यांनी पहिला हप्ता वाचकांपुढे ठेविला होता.

'गीतारहस्याचा' तत्कालीन वाचकांच्या मनावर बराच खोलवर परिणाम झालेला होता. ह्या दृष्टीने ' गीतारहस्यांत ' टिळकांनी जनहितवादावर घेतलेले आक्षेप खोडून काढण्यांत वामनरावांनी नवविवेकवाद्यांच्या दृष्टीने बरेंच मोठें कार्य केलें होतें. ' जनहिताच्या अभिवृद्धीच्या इच्छेनें केलेल्या कर्मापासून एकंदरींत अखेर दुःखाभिवृद्धीच झाली तरी ' परहिताभिवृद्धीची इच्छा ' ही सदिच्छा कांहीं खोटी ठरत नाही व तिचें महत्त्वहि ' नित्यमित्रद्धीच्या ' इच्छेहून विशेष कमी लेखता येत नाही, हें ध्यानांत धरलें की जनहितवादावरील आक्षेपांची धार बोथट होईल हें तर्कपटु वाचकांना सांगावयास नकोच ' असें ते ह्या सर्व आक्षेपांचें खंडन केल्यानंतर लिहितात; कर्त्याच्या बुद्धीकडे न पाहतां कर्माची नीतिमत्ता अगर अनीतिमत्ता ठरवूं पाहण्याचा दोष सुखवादामध्ये आहे असें टिळकांनी जें म्हटलें आहे तें यथार्थ आहे असें वामन मल्हार म्हणतात; परंतु त्यांचें म्हणणें असें आहे की हा दोष सर्व सुखवादी लोकांवर लादतां येणार नाही; कारण मिल्लने, मनुष्याची नैतिक योग्यता ही त्याच्या आचरणाच्या फलावरून न ठरवितां, तो ज्या बुद्धीने तें आचरण करतो त्यावरून ठरवावी, असें स्पष्ट म्हटलेलें आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. ' नीतिशास्त्रप्रवेशा 'चें लेखन करितांना वामनरावांनी स्वीकारलेली भूमिका ही ह्याप्रमाणे सर्वत्र चिकित्सक विवेकवाद्याचीच दिसते. ते नवीन विचारसरणींचा परामर्ष घेत असोत किंवा जुन्या विचारसरणींतील मर्म स्पष्ट करून सांगत असोत त्यांच्या मतांत आत्यंतिकता किंवा अभिनिवेश अकारण कोठेहि दिसत नाही. सगळीकडे सत्याचें, आपल्याला अवगत असलेलें, स्वरूप अविकृतपणें मांडावयाचें हेंच त्यांचें धोरण आहे : निर्गुण ब्रह्म सगुण कसें झालें याची उपपत्ति टिळकांना देखील लागत नाही, व त्यांनी तसें ठिकठिकाणी ' गीतारहस्यां ' मध्ये कबूलहि केलेलें आहे असें दाखवून वामन मल्हार म्हणतात कीं, टिळक ही उपपत्ति शेवटीं विवर्तवादाने लावतात; टिळकांच्या ह्या उपपत्तीविषयीं आपलें मत देतांना ते लिहितात, " विवर्तवादाचा खरा अर्थ ह्या ठिकाणीं हा आहे की ' उपपत्ति लागत नाहीं '; पण असें स्पष्टपणे म्हणणें पुष्कळांना जड जातें, म्हणून ते ' विवर्तवाद ' हा गूढार्थक व मोहकारक शब्द घालून स्वतःची व इतरांची फसवणूक करून घेत असतात ! "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23894 क्र. 7756

**विवेकशीलता :**

सत्य हें साध्य नसून जीवित अधिक सुखमय, निर्विघ्न, समाधानकारक करण्याचें तें एक साधन आहे, सत्याने कार्याचा कमीअधिक महिमा ठरतो असें नसून कमीअधिक कार्यमहिम्यास अनुसरून सत्यत्व ठरतें असें प्रतिपादणारा साधनवाद ( Pregmatism or Instrumentalism ) आपल्याकडील नैय्यायिकांचा मताशीं कसा जुळतो हें वामनराव 'नीतिशास्त्रप्रवेशांत' सुबोधपणे दाखवितात, परंतु ह्या प्रश्नाविषयीं आपलें निश्चित मत झालेलें नसल्यामुळे त्याचा स्वीकार करण्यापूर्वी त्यावर तज्ज्ञांनी अधिक विचार करणेंच योग्य, असें ते शेवटीं बजावतात. साधनवाद आपणांस अमान्य आहे, सत्य हें साधनरूप नसून तें साध्यरूप आहे असें आपलें मत त्यांनी पुढे मर्ढेकरांच्या ग्रंथाला जोडलेल्या प्रस्तावनेंत एके ठिकाणीं मांडलेलें आहे. 'नीतिशास्त्रप्रवेशांत' त्यांनी आनुवंशिक संस्कारांसंबंधी जें विवेचन केलें आहे त्यांतहि त्यांची ही विवेकशीलवृत्ति दिसून येते. आपल्यांतील सहज किंवा स्वभावसिद्ध गुण मातापिते आपल्या अपत्यांना देऊं शकतात ह्याबद्दल फारसा वाद नसला तरी अनुभवप्राप्त, संपादित किंवा उपार्जित गुण अपत्यांमध्ये संक्रान्त होतात किंवा नाही ह्या प्रश्नाबाबत बराच वाद असल्यामुळे त्याचें अस्तिपक्षी व नास्तीपक्षी उत्तर देणाऱ्या उभयपक्षीय मतांचें दर्शन मराठी वाचकांना घडवून वामनराव म्हणतात, "ह्या वादासंबंधाने तज्ज्ञ लोकांची एकवाक्यता नसल्यामुळे सामान्य लोकांनी या प्रश्नाविषयीं तटस्थ वृत्तीच स्वीकारणें युक्त होय." ह्याच ग्रंथांतील एका लेखांत वामन मल्हारांनी जे लोक भौतिक शास्त्राचे शोध घेऊन वेदान्तसमर्थन करूं पाहतात, त्यांच्या विचारांत कोठकोठे घोटाळा झालेला दिसून येतो हें दाखवून दिलेलें आहे व लेखाचा समारोप करितांना अशा रीतींने वेदान्तसमर्थन करूं पाहणाऱ्याने 'माझ्या पक्षाला यावें, असें माझें म्हणणें नाही, कारण मला पक्षच नाही! त्यानें विचार करावा, एवढीच माझी इच्छा' आहे, असा स्पष्ट खुलासा केला आहे. आधिभौतिक शास्त्रांतील शोधांकडे पाहण्याची वामनरावांची दृष्टीसुद्धा किती चिकित्सक होती व मर्मग्राही होती हें त्यांच्या 'वनस्पतींना संवेदना असतात काय ?' ह्या 'नीतिशास्त्रप्रवेशाला' जोडलेल्या परिशिष्टांतील लेखांत दिसून येतें. ह्या लेखामध्ये त्यांनी 'घड्याळाची क्रिया किती तरी शहाणपणाची असते, पण घड्याळाला त्या

क्रियेचें पूर्ण अज्ञानच असतें, हें तत्त्व ध्यानांत ठेवलें म्हणजे वनस्पतींच्या क्रिया कितीं जरी हुषारीच्या दिसल्या तरी त्यांचें ज्ञान त्यांना असेलच असें म्हणतां येणार नाही अशी साधार शंका व्यक्त केली आहे. ‘ नीतिशास्त्रप्रवेशा ’च्या काळी सर्वतोमुखीं झालेल्या सर जगदीशचंद्र बोस ह्यांच्या शोधावरील वामनरावांचा उपनिर्दिष्ट लेख अत्यंत वाचनीय आहे.

## विकासवाद व वामनराव :

ह्याच दृष्टीने ‘ नीतिशास्त्रप्रवेशां ’तील ‘ विकासवाद व नीतिशास्त्र ’ हें प्रकरण वामनरावांची तत्त्वजिज्ञासू ह्या दृष्टीने असलेली भूमिका समजावून घेण्यास अत्यंत उपयुक्त आहे. ह्या प्रकरणांत वामनरावांनी उत्क्रांतिवाद किंवा विकासवाद ह्यांचीं सर्वव्यापी सूत्रें प्रथम स्पष्ट केलीं असून नंतर त्यांतील व्यंगें स्पष्ट केलीं आहेत. जडापासून जीवाची, सचेतनत्वाची, साहंकारत्वाची उत्पत्ति कशी होते हें विकासवादाला कसें सिद्ध करतां येत नाही हें दाखवून मग वामनराव नीतिमत्तेचा जन्म व विकास कसा होतो याविषयीची स्पेन्सरची उपपत्ति म्हणजे स्पेन्सरचा सुखवाद सविस्तर विशद करतात. स्पेन्सरनें कल्पिलेल्या आदर्शभूत किंवा नीतिदृष्ट्या पूर्णविकसित मानवाची प्रतिमा कोणत्या स्वरूपाची आहे हें सांगून मग स्पेन्सरच्या उपपत्तीवर आपले आपेक्ष त्यांनी सादर केले आहेत. मानवांचीं सगळीं कृत्यें हीं सुखप्रेरित नसतात; सुखकारक कर्में हीं नेहमींच आयुष्यसंरक्षक असतात असें नाही; नैतिक सद्गुण हे स्वप्राणरक्षणास किंवा जातिरक्षणास नेहमीच उपयोगी पडतात असें नव्हे; विकासवादाचें जें नैतिक ध्येय आहे त्यांतील ‘ उच्चत्व ’ हें खरें ‘ उच्चत्व ’ नव्हे, विकासवादामध्यें ‘ आहे ’ व ‘ असावें ’ या मूलभूतभेदाकडे दुर्लक्ष केलेलें असतें, सृष्टीचा न्याय व सुसंस्कृत मनुष्याचा न्याय एक नव्हत वगैरे अनेक आक्षेप वामनरावांनी येथे विकासवाद व सुखवाद ह्यांजवर घेतलेले आहेत; परंतु या वादावर हे आक्षेप घेऊन वामनराव स्वस्थ बसत नाहीत; त्यांना दुसरीहि बाजू दिसते व मग ते विकासवादांत नीतिशास्त्राच्या परिपोषाला व प्रगतीला उपयुक्त अशीं कोणकोणतीं तत्त्वें आहेत, तें पाहूं लागतात. विकासवादाने समाज व व्यक्ति यांमधील द्वैत हें बुद्धिदृष्ट्या तरी कांही अंशाने कमी झालें आहे; नीतितत्त्वें हीं स्थलकालपरत्वें भिन्न असतात व असावींत ही

जाणीव ह्या वादाने उत्पन्न केली आहे, सुखाची इच्छा धरणें हें पाप आहे अशा प्रकारची जी कांही—वामनरावांच्या मतें ' थोड्याच '—लोकांची कल्पना होती, ती कांही अंशाने तरी विकासवादानें दूर केली आहे--इत्यादि चांगल्या गोष्टी विकासवादाने आपणांस दिलेल्या आहेत, हें ते स्पष्ट करतात. ह्या प्रकरणाच्या उत्तरार्धांतहि विकासवादाला विसाव्या शतकांत जी नवी पालवी फुटूं लागलेली होती तिचें थोडक्यांत यथोचित दर्शन घडविण्याचा प्रयत्न वामनरावांनी जीवशक्तिवाद, जीवप्रेरणावाद, अंतःस्फूर्तिवाद ह्यांवरील विवेचनांच्या रूपाने केला आहे. कोणत्याहि नव्या किंवा जुन्या मतांतील ग्राह्याग्राह्य भाग कोणता हें ठरवितांना वामनरावांच्या वृत्तीमध्यें चिकित्सक समतोलपणा दिसून येतो : वरील विवेचन हें त्याच समतोलवृत्तीचें द्योतक आहे.

## कार्याकार्य निर्णयाची कसोटी :

' नीतिशास्त्रप्रवेशां 'तील ' कार्याकार्य ठरविण्याची कसोटी ' हें प्रकरण, केसरींतील ' कार्याकार्यव्यवस्था ' हा लेख व ' धर्मजागृती 'मध्ये ह्या लेखांतील विचारसरणीवर जी टीका आली होती, तिला उत्तर म्हणून लिहिलेला ह्याच नांवाचा एक छोटा लेख हे तिन्हीहि लेख वामनरावांनी आपल्या एका आवडीच्या प्रश्नाची चर्चा करण्याकरितां लिहिलेले आहेत. ह्यांतील पहिलें हें 'नीतिशास्त्रप्रवेश' ह्या प्रबंधांतील एक प्रकरण असल्यामुळे त्यांतील विवेचन हें अधिक सांगोपांग आहे; त्या विवेचनाचा निष्कर्ष एवढाच आहे कीं स्थितप्रज्ञ जो असतो त्याचें मन शुद्ध असल्यामुळे कार्याकार्य-व्यवस्था लावण्याच्या वेळीं ' अधिकांचें अधिक हित ' किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या कसोटीची त्याला जरूरी लागत नाही, परंतु इतर सामान्य माणसांना मात्र ह्या कसोटीची आवश्यकता असते. आत्मज्ञान झाल्यानंतर लोकसंग्रहार्थ आसक्तिविरहित कर्में करावींत किंवा नाही ह्या प्रश्नासंबंधी टिळकांच्या अभिप्रायाप्रमाणे गीता ' करावींत ' असें म्हणत असली, ' केलींच पाहिजेत ' असें म्हणत नसली तरी ' ज्याला सुवास नाही तें चंदन कसलें किंवा गोड नाहीं ती साखर कसली याप्रमाणेंच परहिततत्परता नाहीं, तो सज्जन कसला ' असा प्रश्न वामन मल्हार कर्मयोगपक्षीयांच्या बाजूने विचारतात व आत्मज्ञानानंतरहि अशींच कर्में करण्याची आवश्यकता कशी आहे तें सुचवितात; परंतु एवढ्यानेच वामन-

रावांचें ह्या प्रश्नाबाबतचें कुतूहल संपलेलें दिसत नाही. गीतेमध्ये कार्याकार्य निर्णयाची कसोटी सांगितलेली आहे काय, हा प्रश्न त्यांनीं 'नीतिशास्त्रप्रवेशां'-तील हें प्रकरण लिहिल्यानंतर अनेक वेळां चर्चेला घेतलेला आहे; व ही अशा प्रकारची कसोटी गीतेंत सांगितलेली नाहीं, हें सप्रमाण सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या संबंधांत वर उल्लेखिलेले 'केसरी' व 'धर्मजागृतीं' तील लेख आणि पुढे १९३६ सालीं बडोद्याला दिलेलें एक व्याख्यान व त्या व्याख्यानाला अनुलक्षून 'लोकशिक्षणां'त लिहिलेला एक संभाषणात्मक लेख इत्यादि त्यांनी केलेलें लिखाण विचारांत अवश्य घ्यावयाला पाहिजे. ह्या सर्वच लेखांतून वामनरावांना असें म्हणावयाचें आहे की महाभारतांतील अर्जुनाला कार्याकार्यनिर्णयाचा निकषग्रावा नको होता, तर (१) 'कार्य कोणतें' हें निश्चयाने सांगणारा 'आप्त' मनुष्य व (२) सकृद्दर्शनीं अकार्य दिसणारें कर्म केल्याचें जें पाप, त्यापासून अभय, ह्या दोन गोष्टी पाहिजे होत्या; आणि श्रीकृष्णाने या दोन गोष्टी त्याला पुरतेपणीं पुरविल्या, परंतु सर्वसामान्य माणसास सदासर्वदा आपल्या नेहमीच्या जीवनव्यवहारांत उपयोगी पडेल अशी कार्याकार्यनिर्णयाची कसोटी श्रीकृष्ण भगवद्गीतेंत सांगूं शकला नाहीं. 'सर्वभूतहिते रतः' ह्या शब्दप्रयोगांत अखिल 'मानवजातीचें कल्याण' ही जी कसोटी सुचविलेली दिसते ती 'अत्यंत अप्रत्यक्ष रीतीने' सुचविण्यांत आलेली आहे, ह्या प्रश्नाचा कायमचा निर्णय लावण्यासाठी सोपपत्तिक विवेचन करून त्याचे शेवटीं सुचविण्यांत आलेली नाही, असें वामनरावांचें म्हणणें होतें. गीतेंत कार्याकार्यसंबंधीच्या श्रीकृष्णाने सुचविलेल्या कसोट्यांचें विवरण करतांना वामनरावांनी आपल्या 'लोकशिक्षणां' तील लेखांत एक आणखी शंका उपस्थित केली आहे. ती म्हणजे अशी की गीतेमध्ये आत्मा हा कांही स्थळीं 'अकर्ता' मानलेला आहे, तर कांहीं ठिकाणी श्रीकृष्णाने अर्जुनाला विधिनिषेधात्मक उपदेश केलेला आहे; तेव्हा ह्या दोन गोष्टींची संगति लावावयाची कशी ? ह्या परस्परविरुद्ध असणाऱ्या गोष्टींमध्ये एकवाक्यता आहे असें टिळकांनी 'गीतारहस्यां'त दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. टिळक असें म्हणतात : "मोकळ्या वाफेंत कांही जोर नसतांहि ती एखाद्या भांड्यांत कोंडली म्हणजे मग त्याच वाफेचा भांड्यावर ज्याप्रमाणे दाब बसूं लागतो, त्या न्यायाने अनादिपूर्व कर्मार्जित जड देह व इंद्रियें

यांनी परमात्म्याचा अंशभूत जीव कोंडला गेला, म्हणजे त्या कोंडींतून त्याची सुटका करून देणारीं (किंवा मोक्षानुकूल) कर्मे करण्यास देहेन्द्रियाची प्रवृत्ति होऊं लागते. यालाच व्यावहारिक दृष्ट्या 'आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति' असें म्हणतात." परस्परविरोधी विधानांत हा एकवाक्यता दाखविण्याचा टिळकांनी केलेला प्रयत्न वामनरावांना 'सदोषच' वाटतो. ते म्हणतात, "त्यांतली खरी गोष्ट अशी आहे की गीतेमध्ये सांख्यांचें तत्त्वज्ञान घेतलें आहे, आणि या तत्त्वज्ञानांत 'पुरुष' आणि 'प्रकृति' यांचें जें आत्यंतिक द्वंद्व कल्पिलें आहे तें स्वीकारून व्यवहाराला आवश्यक असलेलें 'आत्मकर्तृत्व' हि मान्य केलेलें आहे; पण ह्या दोन गोष्टी, उपमांची व दाखल्यांची कितीहि हातचलाखी केली तरी तर्कदृष्ट्या सुसंगत होणें अशक्य आहे... आत्मा हा 'कर्ता' मानिला तरच विधिनिषेधात्मक उपदेश मनुष्याला करणें युक्त होईल व आत्म्याचें कर्तृत्व मानण्यास मी तयार आहें."*

---

* वामनरावांचा 'लोकशिक्षणा'तील हा लेख ज्याप्रमाणे त्यांच्या संशोधनात्म व तत्त्वजिज्ञासु वृत्तीचा दर्शक आहे तसाच त्यांचे ठिकाणीं अगदीं उपजतच असलेल्या विवादप्रवृत्तीचाहि दर्शक आहे. ह्या चौदापंधरा पानांच्या लेखांत वामनरावांनी गीतेंतील कार्याकार्यनिर्णयाबाबतचें तत्त्वज्ञान संभाषणात्मक पद्धतीने विशद केलें असून गीतार्थ लावतांना सत्यान्वेषकाला जी विसंगति कांही ठिकाणीं दिसून येते ती मार्मिकपणे दाखवून दिली आहे. 'नीतिशास्त्र-प्रवेशा'त वामनरावांनी टिळकांच्या विचारसरणीशीं आपला कोठकोठे मतभेद होतो, तें स्पष्ट केलेंच आहे; पण ह्या लहानशा लेखांतहि गीतेंतील 'आत्म-कर्तृत्वा' संबंधीचें तत्त्वज्ञान संपूर्णपणें सुसंगत आहे असें दाखविण्याबाबत टिळकांची जी 'हातचलाखी' दिसून येते ती वामनरावांनी वर दाखविल्याप्रमाणे उघडकीस आणलेली असून ह्या विचारसरणींतील दोषदर्शन खुबीदारपणे केलें आहे. श्रीकृष्ण व आधुनिक अर्जुन वामनराव ह्या दोघांमध्ये झालेला हा कल्पित संवाद त्यांतील अत्यंत उद्बोधक तत्त्वचर्चेसाठीं, त्यांत प्रगट झालेल्या गीतेवरील धावत्या भाष्यासाठी ज्याप्रमाणे नेहमीच वाचनीय व मननीय ठरेल, त्याचप्रमाणे त्यांतून ठिकठिकाणीं प्रगट होणाऱ्या वामन मल्हारांच्या प्रसन्न विनोदवृत्तीसाठी, त्यांतील अत्यंत सुबोध व खोचदार संभाषणशैलीसाठी

व त्यांत अथपासून इतीपर्यंत पसरलेल्या शांत, प्रसन्न, बौद्धिक व भावनिक वातावरणासाठींहि रसिक, मर्मज्ञ व तत्त्वजिज्ञासू वाचकांच्या अनेक दिवस लक्षांत राहील यांत संशय नाही. अर्थात्च हा संवाद वाचतांना आपण एखादा गंभीर तत्त्वचर्चात्मक प्रबंध वाचीत आहोंत असा कोठेहि भास होत नाही. वामनरावांच्या 'रागिणीं'तील विजयगांवकर मंडळींचा किंवा 'सुशीलेच्या देवां'तील सोनगांवकर मंडळींचा हा हंसत खेळत चाललेला तत्त्ववाद आहे असेंच आपणांस वाटतें. तत्त्वचर्चा करणें हें वामन मल्हारांच्या आवडीचें खरें; पण ती संवादरूपाने करावयाची त्यांना अभिजात आवड; त्यांची ही आवड व संवादात्मक पद्धतीने तत्त्वचर्चा करण्याचें त्यांचें कसब 'आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त' ह्या आपल्या बंधूंच्या छोट्याशा संभाषणात्मक ग्रंथाला त्यांनी जोडलेल्या संभाषणात्मक पुरवणीमध्येहि दिसून येतें. वामन मल्हारांची ही पुरवणी मूळ ग्रंथाइतकीच, किंबहुना त्यापेक्षाहि अधिक सुबोध आणि वाचनीय झाली आहे त्याचेंहि कारण हेंच आहे. जगांतील दुःख, पाप, वैषम्य, नैर्घृण्य इत्यादि गोष्टी ईश्वराला कशा खपतात, नीतिमत्ता सुधारत गेली म्हणजे ज्ञानहि कसें 'सुधारतें' अथवा वाढतें, मनुष्याच्या हातून पाप घडलें असतां त्याला कोणत्या हेतूने शिक्षा करावयाची, 'कर्मवाद' हा नीतिदृष्ट्या समाधानकारक आहे काय ह्या प्रश्नांचा उहापोह वामन मल्हारांनी ह्या शंकित व जिज्ञासु यांतील काल्पनिक संवादांत मोठ्या खुमासदारपणे केला आहे. वामनरावांच्या ठिकाणी संवादात्मक रूपाने तत्त्वचर्चा करण्याची ही आवड कशी उत्पन्न झाली असावी, ह्यासंबंधी विचार करतां असें वाटतें की प्रत्यक्ष जीवनांत त्याजकडून अशी संवादरूपानेच बरीचशी तत्त्वचर्चा रोज घडत असल्यामुळे ती तशीच संवादरूपाने कागदावर उतरविणें त्यांना सोयीचें जात असावें; शिवाय वामनरावांना तत्त्वाइतकीच व्यवहाराचीहि अतिबोचक जाणीव असल्यामुळे ही तत्त्वचर्चा, कल्पित का होईना परंतु व्यक्तींच्या तोंडून करण्याने ते ह्या दोन्हीहि गोष्टी साधू शकत असत. व्यक्ती व्यक्तीशीं बोलूं लागली की ती केवळ तत्त्वप्रतिपादन करूं शकत नाही; कारण तें कितपत व्यवहार्य आहे हें समोरची व्यक्ती पडताळून, पारखून पाहावयास नेहमी सज्ज असते. व्यक्तींना, स्त्री-पुरुषांना बोलते करून वामनरावांनी केलेली किंवा करविलेली तत्त्वचर्चा ही तत्त्व व व्यवहार यांचा सुंदर मेळ घालतांना आढळते : त्यामुळे कोठल्याहि एकांतिक

मताचा पुरस्कार होणें आपोआपच टळतें;—आणि वामनरावांच्या ठिकाणी असलेल्या कलात्मतेमुळे ह्या व्यक्ती निर्जीव अशा कधीच भासत नाहीत; त्या जीवंत वाटतात : अगदी श्रीकृष्ण व आधुनिक अर्जुनाच्या * ह्या संवादांतहि तसा आभास होतो, तर त्यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तींबाबत तो होत असेल यांत काय नवल ? तेव्हां अशा 'जीवंत' व्यक्तींच्या तोंडून ही तत्त्वचर्चा होत असल्यामुळे ती अत्यंत परिणामकारक उतरते; खरीखुरी, अस्सल वाटते; जीवनाशी संबद्ध वाटते; जीवंत व्यक्तींच्या वादांत जो थोडासा सुखद अभिनिवेश असतो, तो तींत उतरतो.

---

* '**भगवद्गीता**' हा वामनरावांचा किती आवडीचा ग्रंथ होता हें तत्संबंधीचे त्यांच्या एकंदर सगळ्याच लिखाणांत जे जागोजाग उल्लेख येतात त्यावरून, त्यांतील तत्त्वज्ञानाची व तत्त्ववाक्यांची पेरणी त्यांच्या लेखनांतून जी सहजतया सर्वत्र झालेली आढळते त्यावरून, व 'मनोहर' मासिकासाठीं 'माझें आवडतें पुस्तक' ह्या विषयावर लिहिलेल्या लेखांत इतर बऱ्याच ग्रंथांचा परामर्श घेऊन वामनरावांची लेखणी शेवटी 'भगवद्गीते'च्या गळ्यांत जी माळ घालतांना दिसते, त्यांवरून सहज दिसून येतें. शेवटीं ज्या लेखाचा उल्लेख केला त्यांत वामनराव 'गीतारहस्य' व 'भगवद्गीता' ह्या दोन ग्रंथांवर थोडा वेळ घुटमळतात, असें दिसतें, परंतु शेवटी निवड होते ती 'भगवद्गीते'चीच. वामनरावांचे भगवद्गीतेवरील एकदोन शंकालेखहि त्यांच्या ठिकाणी असलेल्या गीतार्थजिज्ञासेची साक्ष देतात. वर उल्लेखिलेल्या लेखांखेरीज 'विचार विलासां'तील 'योगक्षेम म्हणजे काय ?' हा लेखहि ह्या संबंधांत लक्षांत घेण्याजोगा आहे. गीतेमध्ये 'योगक्षेम' हा शब्द ज्या ज्या संदर्भांत आलेला आहे त्या त्या ठिकाणी त्याचा अर्थ टिळक आणि शंकराचार्य म्हणतात त्याप्रमाणे 'संसारांतील नित्य निर्वाह' असा नसून तो 'निःश्रेयस' किंवा 'पारमार्थिक कल्याण' असा असावा असें वामन मल्हार त्या श्लोकांचा अर्थ स्पष्ट करून सुचवूं इच्छितात. त्यांच्या मतें ईश्वर भक्तांचा योगक्षेम चालवितो म्हणजे त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करतो. असें नव्हे, तर त्यांनी अध्यात्मामध्ये जी प्रगति केलेली असते, ती फुकट जाऊं नये अशी व्यवस्था करितो; त्यांची त्यांत अधिक प्रगति होईल असें करतो. हें आपलें म्हणणें पुढें मांडण्यापूर्वी

## ज्ञान, कर्म, भक्ति व योग :

'नीतिशास्त्रप्रवेशा'तील वेगवेगळ्या प्रकरणांत वामनरावांनी चर्चिलेल्या सर्वच प्रश्नांचा परामर्श आपणांस येथें घेतां येणें शक्य नाही; तो घेण्यासाठी आपणांस मूळ ग्रंथांतील विचार प्रकरणशः येथे सारांशरूपाने मांडायला हवेतः विस्तारभयास्तव तसें न करतां ज्ञान, कर्म, भक्ति व योग ह्यांवरील त्यांचीं ह्या ग्रंथांत प्रतिपादलेलीं मतें कोणत्या स्वरूपाचीं होतीं ह्याची थोडक्यांत त्यांच्याच शब्दांत पाहणी करूं. कोणतेंहि ज्ञान हें अनुपयुक्त नाही; सगळेंच ज्ञान हें उपयुक्त आहे; मात्र ज्ञानाच्या उपयुक्ततेचें क्षेत्र जिज्ञासातृप्तीहून विस्तृत हवें; ज्ञान हें केवळ आत्मसंतोषासाठी नसून इतरांच्या उपयोगाकरितां आहे व ज्ञानहीन कर्म हें नीतिदृष्ट्या कुचकामाचें ठरतें, असें वामनरावांचें म्हणणें आहे. हेंच विचारसूत्र कायम ठेवून ते पुढे असें म्हणतात की धर्मतत्त्वविवेचन म्हणजे धर्माचरण नव्हे; आपणांस शाब्दिक, निःसत्त्व, वैराग्यपूर्ण वेदाभ्यास-जडत्व नको आहे; तर उत्साही, वीर्यवान्, प्रेमपूर्ण व आनंदी कर्मयोग पाहिजे आहे; धर्मतत्त्वें केवळ विवेचून भागणार नाही; धर्माचरण केल्या-शिवाय धर्मतत्त्वें पूर्णतया कळणारच नाहीत. सत् याचें पूर्ण ज्ञान होण्याकरितां

---

वामनरावांनी 'गीताभाष्यकारांना व गीतारहस्यकारांना जें पसंत तें पसंत न करणाऱ्याची मूर्खांत गणना व्हावयाची, म्हणून शंका घेण्यास मन कचरतें; परंतु सत्यस्वरूप ईश्वराची या क्षणी अनन्यभक्ति केली तर या आचार्यद्वयांच्या मतां-बद्दल शंका घेण्याचें धाडस केल्याच्या पापाबद्दल तो **सत्यस्वरूप ईश्वर** आपणास विशेष कांही शासन करणार नाही या भावनेने' आपण ह्या शंका प्रदर्शित करीत आहोंत व तत्समर्थनार्थ पुरावे देत आहोत असें म्हटलें आहे. परंतु आपलें मत पुढे मांडल्यानंतर दुसऱ्या अध्यायांतील

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।

ह्या श्लोकांतील 'निर्योगक्षेम' या शब्दाचा अर्थ 'माझ्यासारखा लावणें जरी शक्य असलें तरी तें मला समाधानकारक वाटत नाही' असें वामनरावांनी लेखाच्या शेवटीं प्रांजलपणें कबूल केलें आहे. वामनरावांच्या सत्यभक्तीचें व निराग्रहीवृत्तीचें हें एक उत्तम उदाहरण होय.

सत्कर्मं—मग तीं अल्पज्ञानयुक्त का असत ना – केलींच पाहिजेत; कारण अंगी बाणलेल्या ज्ञानालाच खरें ज्ञान म्हणतात, अर्थात् पूर्ण ज्ञानी माणसाचें ज्ञान हें सदाचरणाच्या द्वारें व्यक्त होईल; प्रकाश देणें हें जसें सूर्यावर लादलेलें ओझें नव्हे तर त्याचा जसा तो धर्म आहे, त्याप्रमाणेच ज्ञानी मनुष्यांचा लोकसंग्रहार्थ कर्म करणें हा धर्म आहे; निर्वीर्य ज्ञान हें 'निर्बल किंवा व्यथित लावण्यासारखें आहे.' (वामनरावांची ही उपमा किती यथोचित आहे याची रसिकांना कल्पना येईल; अशा अनेक समर्पक उपमादृष्टान्तांनी 'नीतिशास्त्र-प्रवेशाचीं' पानें भरलेलीं आहेत.) सत्संगतिहीन, सत्कर्मशून्य ज्ञान हें नीरस आहे: ज्ञान हें दोन प्रकारचें असतें; एक भावानात्मक व दुसरें बौद्धिक; बौद्धिक ज्ञान हें दारू न घातलेल्या बंदुकींतल्या गोळीप्रमाणे आहे; भावनात्मक ज्ञानाच्या गोळीमागे प्रेमाची प्रेरणा आहे, तेव्हां ज्ञानाला भक्तीची जोड ही दिलीच पाहिजे; योगामध्ये जें आत्मनिग्रहाचें तत्त्व आहे तें चांगलें आहे; परंतु कोणत्या कार्यासाठी आत्मनिग्रह केला जातो, हें कळल्याशिवाय आत्मनिग्रहाची नीतिदृष्ट्या काय किंमत आहे, हें सांगतां येणार नाही; सारांश नैतिक ध्येय हें केवळ कर्मपर, केवळ ज्ञानपर, केवळ आत्मनिग्रहपर, केवळ भक्तिपर किंवा केवळ संन्यासपर नाही तर समुच्चयपर आहे.

## नीतिशास्त्राची शिकवण :

वामनरावांच्याच शब्दांत शक्य तोंवर ज्ञान, कर्म, भक्ति व योग यांजवरील त्यांचीं मतें वरील परिच्छेदांत दिलीं आहेत. वामनरावांच्या 'नीतिशास्त्रा'ची शिकवण बरीचशी ह्या मतांत अन्तर्भूत झाली आहे असें वाटतें. त्यांच्या मतें आपल्या कक्षेतील जी परिस्थिति आहे तिच्यावर ज्ञानकिरणांचा अधिक प्रकाश पाडून तिच्यांत अधिक रमणीयता व साधुत्व आणण्याचा प्रयत्न करणें हेंच नीतीचें मुख्य तत्त्व आहे, 'नीतिमत्ता ही सुखेच्छेची सासू म्हटलें तर ही सासू आपल्या सुनेचा सदा सासुरवास करते असें नाही. सून जेव्हां आपली पायरी सोडून उन्मत्तपणा करूं लागते, तेव्हाच सासूला आपला अधिकार गाजवावा लागतो.' 'नीतिशास्त्राचे डोळे आपल्या स्वाभाविक सदभिरुचीची दृष्टी अधिक सूक्ष्म व व्यापक करतात. पण डोळे किती जरी चांगले असेल तरी मार्ग आक्रमून जाण्याला पायांची आवश्यकता

राहतेच; त्याप्रमाणे नीतिशास्त्राने संसारांतील गूढस्थलें कितीही सुप्रकाशित केलीं, तरी सद्वासना, सुशिक्षण, सत्संगति इत्यादि प्रवर्तक कारणांशिवाय हा प्रकाश फुकट जाण्याचा संभव आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.' नीतिशास्त्राचा उपयोग काय ह्या प्रश्नाची चर्चा करतांना वामनरावांनी काढलेला हा निष्कर्ष त्यांच्या नीतिशास्त्रविषयक तत्त्वविचारांचें सार आहे. 'नीतिशास्त्रप्रवेशां'तील एका स्वतंत्र प्रकरणांत साधुत्व, सौंदर्य व सत्य ह्या त्रिपुटीच्या स्वरूपाची चर्चा केलेली असली तरी ह्याच तीन तत्त्वांचें मानवी व्यवहारांना अनुलक्षून केलेलें विशदीकरण ह्या ग्रंथाच्या सगळ्याच पानांतून झालें आहे असें मानावयाला हरकत नाहीं; ह्या तिघांमध्यें अविरोध ज्या क्षणीं दिसूं लागेल त्या क्षणीं मानवी समाजाची सांस्कृतिक प्रगति पूर्णावस्थेला गेली असें समजण्यांत येईल. हा अविरोध निर्माण करण्याचा प्रयत्न करणें ह्यांतच मनुष्याच्या कर्तृत्वाची पराकाष्ठा आहे. सर्व शास्त्रांचें कार्य ह्याच अंतिम हेतूकडे लक्ष देऊन झालें पाहिजे. ह्यांतच मानवसमाजाच्या संस्कृति-विकासाच्या धडपडीची सांगता आहे. ही अवस्था मानवसमाजाला प्राप्त होईल असाच प्रयत्न माणसांकडून समंजसपणे झाला पाहिजे, असें वामनरावांना म्हणावयाचें आहे. ह्या अवस्थेंत नीतिमत्तेला जें समंजसपणाचें वाटेल तेंच इंद्रियांना व रसिकतेला प्रिय होईल; अपवित्र आचरण इंद्रियांना आनंददायक होणार नाही; सर्व शास्त्रें व त्यांचे सिद्धान्त हे नीतीला व धर्माला पोषक असेच होतील व त्या वेळीं धर्माची व नीतीची आज्ञा शिरसावंद्य मानणें याच्यांतच रसिकतेला, कलात्मकतेला, सौंदर्याला मौज वाटूं लागेल.

## धर्म व नीति : विचारसरणींतील उत्क्रान्ति :

वामनरावांची धर्मनिष्ठेबाबतचीं ' नीतिशास्त्रप्रवेशां ' तील ' धर्मनिष्ठा व नीतिनिष्ठा ' ह्या प्रकरणांत प्रतिपादिलेलीं मतें वर मुद्दामच विशद केलेलीं नाहीत. ह्याचें कारण असें कीं १९२१ सालीं 'विविध-ज्ञान-विस्तारा'च्या ज्युबिली अंकांत वामनरावांनी ' धर्म व नीति ' ह्या विषयावर चाळीस एक पानांचा जो निबंध लिहिलेला आहे, तो वाचला असतां या विषयाचे बाबतींत ' नीतिशास्त्र-प्रवेशा ' च्या प्रसिद्धीनंतर म्हणजे १९१९ नंतर त्यांच्या मनांत थोडाबहुत बदल झालेला होता असें दिसून येतें. ( हा आपल्या मतांतील बदल वामनरावांनी

ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तींत स्वतःच एका टीपेंत कबूल केला आहे.) हा जो वरील प्रश्नांसंबंधी त्यांच्या मतांत बदल झालेला होता, त्याचेंच उत्क्रान्त स्वरूप आपणांस त्यांनी १९२७ साली 'रत्नाकरांत' लिहिलेल्या 'ध्येय हाच देव' ह्या लेखांत व १९२९-३० साली त्याच मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या 'सुशीलेचा देव' ह्या कादंबरींत त्यांनी सूचित केलेल्या विचारसरणींत पहावयास मिळतो. 'रत्नाकरां'तील आपल्या लेखांत वामनराव म्हणतात, "ईश्वर मानला नाही तर नीति निराधार होईल असें कांही म्हणतात (व मीहि कांही दिवस मानीत होतों). नीति ही धर्माची सहचारिणी झाली म्हणजे सौभाग्याने ती जशी शोभते तशी धर्माशी फटकून वागणारी कौमार्यावस्थेंतील नीति शोभत नाही असें मी म्हणत असें व म्हणतोंहि; पण ईश्वराशिवाय धर्माचें धर्मत्व नष्ट होतें असें मात्र मला अलीकडे वाटत नाहीं." वामनरावांचें हें मत त्यांनी १९२७ साली व्यक्त केलेलें आहे, परंतु 'विविध ज्ञानविस्तारां'तील त्यांच्या लेखांत (१९२१) त्यांच्या ह्याच मताचा पूर्वोच्चार झालेला आढळतो; 'ध्येय हाच देव' हें 'सुशीलेचा देव' ह्या कादंबरींत १९२९-३० सालीं प्रतिपादिलेलें सार-तत्त्व 'ध्येयें म्हणजेच आधुनिक कालांतील देव असें म्हणण्यास मला तरी हरकत नाही' ह्या शब्दांमध्यें वामनरावांनी आपल्या ह्या १९२१ सालांतील लेखांत प्रथम प्रतिपादलें होतें. ध्येयपूजा व देवपूजा या दोन गोष्टींमधील एकत्व ह्या लेखामध्ये सिद्ध केलें असून, ज्या ध्येयाची पूजा करावयाची तें ध्येय **स्वतःचें** असलें पाहिजे, इतरांच्या देवाची किंवा ध्येयाची पूजा ही खरी देवपूजाच नव्हे, तो 'स्वधर्म' च नव्हे, असें स्पष्ट करून ह्या दृष्टीने पाहतां मिल्ल, ब्रॅडलॉ, आगरकर, गोळे वगैरे लोकांना धर्मच्युत म्हणण्यापेक्षा तुमच्या आमच्या सारख्यांना 'अधार्मिक' या सारखीं निंदाव्यंजक विशेषणें लावणें उचित होणार नाही काय, असें त्यांनीं विचारलें आहे. ह्या लेखाच्या उत्तरार्धात 'उच्चतम धर्मनिष्ठेचें' वामनरावांनी जें स्वरूप वर्णिलेलें आहे तें त्यांच्या लेखनांतील उत्तम उताऱ्यांत सहज मोडेल असें आहे, "तार्किक ज्ञान हें धर्मनिष्ठेचें शरीर आहे. भावनेच्या तेजस्वी ज्योतीने हें ज्ञानात्मक शरीर व्यापिलें व आपलेसें करून टाकलें म्हणजे मग या अवस्थेला आपण 'धर्म' ही संज्ञा देतों. ज्ञानात्मक शरीर जसजसें वृद्धिंगत होत जातें आणि भावनारूपी चेतनायुक्त प्राण

जसजसा शुद्ध होत जातो, तसतसा धर्म हा शुद्ध, तेजस्वी, व पावन स्वरूप धारण करूं लागतो," असें वामनराव म्हणतात. अगदीं ह्याच विचारसरणींतून उत्क्रान्त झालेले आपले विचार वामनरावांनी आपण 'धक्के देणारीं मतें' प्रतिपादित आहोंत असें प्रथमच स्पष्ट करून आपल्या वरील लेखानंतर सात वर्षांनी लिहिलेल्या 'रत्नाकरां'तील एका लेखांत व्यक्त केले आहेत. अर्थात् हे विचार व्यक्त करण्याच्या दरम्यानच्या काळांत त्यांच्या मनावर साम्यवाद व कम्युनिझम ह्या विचारसरणींचा बराच संस्कार झालेला होता हें उघड आहे; कारण 'रत्नाकरां'तील ह्या लेखांत त्यांनी एके ठिकाणीं समाजसत्तावादाच्या अंगिकाराचें सुखस्वप्नच एका परिच्छेदांत रंगविलें आहे. (व ह्या नंतरच प्रसिद्ध झालेल्या 'सुशीलेच्या देवां'तील सुशीलेच्या नवयुगीन विश्वकुटुंब संस्थेच्या कल्पनेवर त्याचा परिणाम झालेला आहेच.) त्रिकालाबाधित नीतिनियम सापडावेत एवढ्यासाठी विवेकबुद्धि गहाण ठेवून एखाद्या शास्त्रापासून किंवा देवापासून 'त्रिकालाबाधित नियम उसने आणण्याइतके आपण त्रिकालाबाधित्वाला भाळलेलों नाही,' असें त्यांनी यांत स्पष्ट विधान केलेलें असून ध्येयवाद्यांना नास्तिक कसें म्हणतां येईल, हा मागल्या लेखांतीलच प्रश्न फिरून अधिक अभिनिवेशाने विचारला आहे. ध्येय हाच आधुनिक काळांतील देव आहे ह्या आपल्या आवडत्या तत्त्वाचें प्रतिपादन करतांना, "'देव' शब्द शि-व असा लिहिला तरी चालतो, वि-ष्णु असा लिहिला तरी चालतो, God असा लिहिला तरी जर चालतो तर मग ध्ये-य असा लिहिला म्हणून बिघडलें कोठे ?" असा खोचक विनोदप्रश्न वामनरावांनी येथें विचारला आहे. ह्या लेखाचा शेवट करतांना ध्येययुद्धें म्हणजे "जेथें दोन्ही पक्षांना प्रामाणिकपणे आपलें ध्येय न्यायाचें वाटतें अशीं ध्येययुद्धें" आपल्याला प्रिय आहेत, कारण तीं फार दिवस टिकत नाहीत व जोपर्यंत चालतात तोंपर्यंत देखील त्यांत विषारी दूषक भाग नसतो, असें वामनरावांनी आपलें मत स्पष्ट शब्दांत दिलेलें आहे. वामनरावांचें हें ध्येयपूजेबाबतचें मत 'विचारविलासां'तील 'ज्ञान हें विष की अमृत ?' ह्या लेखमालेंतील दुसऱ्या लेखांत ते जे ध्येयपूजा करणाऱ्यांना 'कृतिकवि' ही पदवी अर्पण करतात, त्यांतून सूचित होणाऱ्या विचारसरणीशीं कसें जुळतें हें दाखवितां येण्यासारखें आहे; ह्या लेखांत वामनरावांनी मुसोलिनीलाहि

' कृतिकवि ' ही पदवी दिलेली आहे; ती पदवी तत्कालीन परिस्थितीच्या दृष्टीने योग्य असली तरी ह्याच विचारसरणींतून पुढें ध्येययुद्धांबाबतची वर उल्लेखिलेली त्यांची विचारसरणी जी उत्क्रान्त झाली आहे ती कितपत सयुक्तिक होती हा प्रश्न उरतोच. वामनरावांची ही विचारसरणी त्यांना आजच्या काळांत बदलावी लागली असती असेंच वाटतें. ध्येयें हीं जेव्हां माणसांपेक्षां अधिक प्रबळ होतात, माणसांचें हित साधणें हें त्यांचें जें कार्य, तें बाजूला राहून तीं जेव्हां मानवांना आपल्या स्वच्छंद विलासासाठी राबवतांना दिसतात, म्हणजेच तीं जेव्हां साधन-रूप टाकून देऊन साध्य-रूप बनतात; माणूस जेव्हां मानवांचें कल्याण साधण्यासाठी विशिष्ट ध्येयाचा अंगिकार न करतां, ध्येयाच्या मागें लागून पुष्कळ वेळां तें गांठण्याच्या भरांत मानवांचें अकल्याण झालें तरी त्याची पर्वा करीनासा होतो, जेव्हां ध्येय हेंच मानवापेक्षां श्रेष्ठ ठरतें, त्या वेळी परत ' ध्येय हाच देव ' ह्या विचारसरणीची फेरतपासणी करण्याची वेळ येते. माणूस ध्येयाच्या हातांतील बाहुलें बनला कीं ध्येय हें माणसाला खाऊन टाकतें व मानवजातीला उपद्रव देतें, हें आजच्या युरोपीय परिस्थितीकडे पाहिलें असतां दिसून येण्यासारखें आहे. प्रत्येकाला आपलें ध्येय प्रियच आहे; परंतु ज्याप्रमाणे पूर्वी निरनिराळ्या देवतांचा उपासकांत प्राणांतिक झगडे झाले व त्यांत मानवांची व त्याच्या संस्कृतीची अपरिमत हानि झाली, त्याचप्रमाणे आज निरनिराळ्या ध्येयांनी वेडीं झालेलीं माणसें, त्यां मागील हेतूंची अंतिम दृष्ट्या असलेली एकवाक्यता नजरेआड करून, एकमेकांचीं डोकीं फोडीत आहेत व म्हणूनच ध्येय हा देव मानून फायदा काय ? ध्येययुद्धें वामनराव म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच दूषित-भाग विरहित आहेत काय ? खरीखुरीं ध्येययुद्धें कधी तरी संभवनीय आहेत काय ? मानवाचा स्पर्श झाल्यावर ध्येयसुवर्णाची कालान्तराने माती व्हावी असा तर संकेत नाही ना ? आज कोणती ध्येयप्रेरित संस्था मानवाने अकलुषित ठेवली आहे ? असले अनेक प्रश्न स्वाभाविकच *समंजसाच्या डोक्यांत ह्या विचारानंतर घोळूं लागतात.

---

* ' प्रतिभे 'तील ' विजयकृष्णा 'ने असल्याच प्रकारचे कांही आक्षेप ' सुशीलेचा देव ' ह्या कादंबरीवर घेतले होते. पहाः ' प्रतिभा ' १९३५.

' नीतिशास्त्रप्रवेश ' ह्या वामनरावांच्या ग्रंथाला प्रो. गो. चिं. भाटे ह्यांनी उपोद्घात लिहिलेला आहे. त्यांच्या मतें नीतिशास्त्रावरील मराठींतील अगदीं पहिल्याच असणाऱ्या ह्या ग्रंथाचें वैशिष्ठ्य पुढील गोष्टींत आहे : ' आपल्या इकडे नीतिशास्त्र होतें. पण युरोपांत परिपक्व दशेस आलेली विशिष्ट शास्त्रीय विवेचनपद्धति आपल्या इकडे नव्हती. या दृष्टीने आपल्या वाङ्मयांत नीतिशास्त्र नव्हतें असेंहि म्हणतां येईल. रा. जोशी यांनी आपल्या पुस्तकांत युरोपिअन शास्त्रीय विवेचनपद्धतीचा उपयोग केला आहे व आपल्या इकडील बहुतेक नीतिविषयक कल्पना त्यांत गोविल्या आहेत...शिवाय निरनिराळ्या मतांचा विचार करतांना व त्यांचें खंडनमंडन करतांना व त्यांतील गुणदोष दाखवितांना त्यांनी समतोलपणा, निरभिमानता व सत्यप्रीति दाखविली आहे. हीच खरी शास्त्रीय वृत्ति होय व त्यांचें एकंदर विवेचन विकारवशतेच्या किंवा दुरभिमानाच्या दोषापासून अलिप्त आहे. " प्रिं. भाटे यांनी १९१९ सालीं दिलेलें हें प्रशस्तिपत्र आजहि ' नीतिशास्त्रप्रवेशांतील ' मजकुराच्या स्वरूपाची यथोचित कल्पना देऊं शकतें असेंच वाटतें.

## साक्रेटिसाचे संवाद

वामन मल्हारांच्या ' साक्रेटिसाचे संवाद ' ह्या ग्रंथाचा प्रकाशनकाल जरी १९२२ हा असला तरी तो ग्रंथ वामनरावांकडून १९१५।१६ सालींच केसरी-मराठा पत्रांत काम करीत असतां सवडीनुसार लिहिला गेला असें दिसतें. ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत वामनराव म्हणतात, " वर्तमानपत्राच्या धंद्यांत असतां त्या धंद्याला आवश्यक असें जें लेखन-वाचन करावें लागतें तें बहुधा क्षणमात्र महत्त्वाचें असतें हें अनुभवास येऊन मनाला असमाधान वाटूं लागलें. व उच्चतम आणि अधिक महत्त्वाचें लेखन-वाचन करण्याचे प्रयत्न पुष्कळ दिवसपर्यंत काळाच्या अभावामुळे व शारीरिक अस्वास्थ्यामुळे व स्वभावसिद्ध आलस्यामुळे व्यर्थ गेले; तथापि मनाने एकदा उचल करून गोल्डन ट्रेझरी सेरीज मधील ' सॉक्रेटिक डायलॉग्ज ' या पुस्तकाचें मराठींत भाषान्तर करण्याचें काम माथीं मारलें; व तें हळूहळू संपून व पुष्कळ दिवस हस्तलिखित स्वरूपांतच रुमालांत पडून राहून आज छापील स्वरूपांत बाहेर पडत आहे. " मागेच एका टीपेंत सूचित केल्याप्रमाणे वामनरावांनी

हा ग्रंथ ' आपल्या तत्त्वज्ञानाचें व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचें मराठी वाङ्मयमंदिरांत आपणांस सुलभतेने व यथार्थतेने दर्शन व्हावें ' व हें दर्शन आपल्या ' स्वाभिमानाला परिपोषक ' असें व्हावें ह्या हेतूने मूलतः लिहिलेला आहे. त्याचप्रमाणे ' प्लेटोने लिहिलेल्या सर्व संवादांचें तसेंच झेनोफोनच्या आठवणींचें व ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांचें मराठींत भाषान्तर झाल्यास तें उपयुक्त, बोधप्रद होईल ह्या भावनेने **हा पहिला हप्ता** वाचकांपुढे ठेविला आहे ' असें वामनरावांनीं पुढें म्हटलें आहे. ह्यावरून वामनरावांच्या मनांतून हे सगळेच ग्रंथ मराठींत पुढेमागे भाषान्तरित करावयाचे होते, असें दिसून येतें. या पुस्तकाला जो उपोद्‌घात जोडलेला आहे त्यांत साक्रेटिसाचें चरित्र, त्याचे गुणविशेष व त्याचें तत्त्वज्ञान हीं दिलीं आहेत. याशिवाय प्रत्येक संवादाला जे स्वतंत्र उपोद्‌घात लिहिले आहेत, त्यांत त्या त्या संवादाला अनुरूप अशी माहिती देऊन प्रसंगोचित प्रश्नांची चर्चाहि केली आहे.

### महाराष्ट्राचे साक्रेटीस :

साक्रेटिसाचें वामनरावांनी लिहिलेलें चरित्र वाचीत असतां जी एक सुखद जाणीव आपल्या मनाला वारंवार होते ती हीच की साक्रेटिसाच्या गुणविशेषांचें वामनरावांनी रेखाटलेलें हें चित्र आपल्या त्यांच्यासंबंधीच्या कल्पनाचित्राशीं किती तरी ठिकाणीं जमतें व वामनरावांच्या लेखणीने साक्रेटिसाच्या संवादांचाच अनुवाद करण्याचें ठरविलें व त्याचेंच चरित्रलेखन करण्याचें योजलें या घटनांतील औचित्य मनाला झटकन् पटतें. साक्रेटीस आणि वामनराव ! वामनरावांना महाराष्ट्राचे साक्रेटीस म्हणण्याची वहिवाटच आहे : साक्रेटिसाचें तत्त्वज्ञान विशद् करीत असतां ' आपण साक्रेटिसापासून काय शिकलें पाहिजे, ' हें वामनरावांनी एके ठिकाणीं स्पष्ट केलें आहे. त्यांत हल्ली आपण धर्मजागृतीविषयी, देशाभिमानाविषयी, भक्तीविषयी, प्रेमाविषयी वगैरे पुष्कळ बोलतों, पुष्कळ भाषणें ऐकतों व पुष्कळ लेख लिहितों; पण ह्या शब्दांचें साक्रेटिसाच्या पद्धतीने बरोबर लक्षण करण्याचा प्रयत्न दृष्टोपत्तीस येत नाही, असें दाखवून अशा प्रकारचा ' हिंदी साक्रेटीस ' आपल्यांत जन्माला यावा अशी मोठ्या कळकळीने आपली इच्छा व्यक्त केली आहे. वामनराव ' हिंदी साक्रेटीस ' नसले तरी थोडेफार ' महाराष्ट्राचे साक्रेटीस ' होते यांत संशय नाही. साक्रेटिसासंबंधी वामनराव म्हणतात, ' त्याच्या

मनाचा मोठेपणा व त्याची निरभिमानता हे गुणहि ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. स्वतः मोठा बुद्धिवान् व आचरणाने फार शुद्ध असा असून लोकांच्या मानसिक दौर्बल्याकडे व नैतिक दोषांकडे तो विशेष कडक नजरेने पहात नसे. लोकांच्या मतांतील व विचारांतील चुका तो दाखवून देई, पण हें करतांना त्यांचें मन न दुखविण्याची तो काळजी घेई...इतरांच्याच नव्हे तर स्वतःच्याहि स्वभावांतील, विचारांतील व आचारांतील हास्यास्पद विसंगतींची त्याला पूर्ण जाणीव होती व तो बोलतां बोलतां विनोदबुद्धीने एखादी विसंगति दाखवून देऊन श्रोत्यांना हसवीत असे.. साक्रेटीस हा वास्तविक तत्त्ववेत्ता नसून तत्त्वजिज्ञासू होता, असें म्हटलें तरी चालेल. त्याने अथेनियन लोकांना एखादें तात्त्विक ' दर्शन ' दिलें नाही, तर त्याने त्यांना विचार करण्याची वृत्ति कशी असावी, हें शिकविलें. त्याच्यापासून त्यांना ज्ञानाचा गड्डा मिळाला नाही, तर ज्ञानप्राप्तीची दिशा कळली. त्यांचें अज्ञानपटल त्यानें दूर केलें नाही, तर अज्ञान आहे ही जाणीव उत्पन्न केली. ' हीं विधानें साक्रेटिसाइतकेंच वामनरावांच्याहि गुण-विशेषांचें यथोचित वर्णन करितात असेंच त्यांच्या वाङ्मयाचा प्रत्येक वाचक म्हणेल; विशेषतः वरील विधानांतील शेवटचें विधान वामनरावांची तत्त्वज्ञ या नात्याने असणारी भूमिका समजावून घेण्यास अत्यंत सोयीचें आहेः साक्रेटिसाप्रमाणेच वामनराव हे तत्त्ववेत्ते नसले तरी तत्त्वजिज्ञासू होतेः त्याच्याप्रमाणेच त्यांनीहि आम्हां मराठी वाचकांस एखादें तात्त्विक ' दर्शन ' दिलेलें नसलें तरी कोणत्याहि प्रश्नावर विचार कसा करावा हें शिकविलें आहे; व साक्रेटिसाप्रमाणेच त्यांच्याकडून आम्हांला एखाद्या विषयावरील ज्ञानाचा विशेष गड्डा मिळालेला नसला तरी ज्ञानप्राप्तीची दिशा कळलेली आहे व आमच्या अज्ञानाची जाणीव झाली आहे.

## साक्रेटीस, येशू ख्रिस्त व भीष्माचार्य :

साक्रेटिसाबद्दल वामनरावांच्या मनांत नितान्त आदर होता व हा आदर ह्या ग्रंथांतील वेगवेगळया संवादांना लिहिलेल्या उपोद्घातांतून जागोजाग व्यक्त झाला आहेः परंतु त्याची विशेष मौज आपणांस फिडो या संवादाला वामनरावांनी लिहिलेल्या उपोद्घातांत पहावयास मिळते. फिडो या संवादाचे

विषय, साक्रेटीस हा मृत्युसमयीं कसा वागला व त्याने आत्म्याचें अमरत्व कसें सिद्ध करून दाखविलें हे आहेत; ह्यांतील पहिल्याची म्हणजे साक्रेटिसाच्या मृत्युसमयीच्या वर्तुणुकीची मीमांसा करतांना वामनरावांनी येशू ख्रिस्तावर जीवनाच्या अन्तीं आलेला प्रसंग व साक्रेटिसावर आलेला प्रसंग ह्यांची प्रथम तुलना केली असून त्या दोहोंतील साधर्म्य स्पष्ट केलें आहे; परंतु हें साधर्म्य प्रगट करीत असतांच त्यांनी असें दाखवून दिलें आहे की अगदी मरणाचे वेळीं ईश्वराला काकुळतीने हांका मारणारा ख्राइस्ट हा अनुकंपनीय वाटतो; परंतु साक्रेटिसाची मृत्युसमयापर्यंत दिसून येणारी धीरोदात्त सात्त्विक समाधान-वृत्ति ही त्या उदास प्रसंगाच्या ' महादापत्तीरूपी कृष्णमेघमालेला चित्रविचित्र करून तिला एक प्रकारचें रम्य, उदात्त, उदास, मोहक व वंद्य स्वरूप प्राप्त करून देते; ' एक प्रकारचें दिव्य रम्यत्व आणते; व म्हणूनच ख्राइस्टचें पूर्वचरित्र साक्रेटिसाच्या पूर्वचरित्रापेक्षा अधिक सात्त्विक व उत्साहजनक असलें, तरी केवळ अंतकालाचाच विचार करतां ख्राइस्टपेक्षा साक्रेटिसाबद्दलच अधिक आदर वाटतो, हें ख्रिस्ती मनुष्यालाही कबूल करावें लागेल. ह्यानंतर पुढे वामनरावांनी अन्तकालीन साक्रेटिसाची तुलना महाभारतांतील, शरशय्येवर पडून राहिलेल्या व पांडवकौरवादींना राजधर्म, वर्णाश्रमधर्म इत्यादि गहन विषय समजावून देणाऱ्या भगवान् भीष्माचार्यांशी केली आहे. ह्या तुलने-अन्तीं ते जो निष्कर्ष काढतात तो असा की सर्व बाजूंनी विचार करतां भीष्माचार्य हे दिव्य, अमानुष कोटींतले वाटतात, तर साक्रेटीस हा आपल्या-तलाच पण आपल्यापेक्षा बराच श्रेष्ठ असा मानव वाटतो. भीष्माचार्यांच्या ' दिव्यते ' बरोबर ' दूरत्व ' येतें व ' दूरत्वा ' बरोबर मिथ्यात्वाचा आरोप येण्याचा संभव असतो. परंतु साक्रेटिसाच्याबाबत तसें कांही एक होत नाही. तो मनुष्यच वाटतो. ह्या सर्व तुलनात्मक विवेचनाचे शेवटीं साक्रेटिसाच्या श्रेष्ठत्वाला कारणीभूत असलेलें त्याचें ' मनुष्यत्व ' स्पष्ट करून वामनराव म्हणतात, " साक्रेटीस हा ख्राइस्टप्रमाणे अनुकंपनीय वाटत नाही व भीष्माप्रमाणे तो आपल्या अतिमानुष तेजाने डोळे दिपहूनहि टाकींत नाही, " तो आपल्या मनुष्यत्वामुळे आम्हाला अधिक जवळचा वाटतो. अधिक प्रिय होतो व त्याचें व्यक्तिचित्र हें आमच्या मनावर अधिक खोलवर परिणाम करितें.

**साक्रेटीस : दोषदर्शन :**

साक्रेटिसाबद्दल वामनरावांचे ठिकाणीं ह्याप्रमाणें विलक्षण आदर असला तरी त्याच्या स्वभावांतील व मतांतील दोषांचें दर्शनहि त्यांनी टाळलेलें दिसत नाही. एके ठिकाणी साक्रेटीस हा 'सत्य' हें 'सत्य' आहे, हीच त्याची महती, सदाचार हा सत् आहे म्हणूनच तो मान्य असें प्रतिपादतांना आढळतो तर दुसरीकडे ( झेनोफोनच्या मतें ) तो एखाद्या कृत्याच्या उपयुक्ततेवरून किंवा अनुपयुक्ततेवरून तें सत् किंवा असत् आहे हें ठरवितांना दिसतो ( साधनवाद ? )—अशा रीतीची वरील प्रश्नाबाबतच्या त्याच्या विचारांत विसंगति दिसते असें वामन मल्हार यांनी दाखवून दिलें आहे. ( अर्थात् ह्याच्याच पुढच्या परिच्छेदांत साक्रेटीस हा स्वतःच आपलीं मतें हीं संस्कारार्ह समजत असे, त्यांचें तत्त्वशोधन हें पूर्णतेस पोचलेलें नव्हतें, त्यास अनेक अंगें होतीं, त्याचें आचरणहि अनेकांगी व अनेकमुखी होतें, असें सांगून वामनरावांनी ह्या विसंगतीचें आपल्या नेहमीच्या पद्धतीने स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. ) ' साक्रेटिसाचें आत्मसमर्थन ' ह्या संवादाच्या प्रस्तावनेंतहि त्यांनी साक्रेटिसाच्या स्वभावांतील कांहीं दोष मोठ्या मार्मिकपणे दाखविले आहेत. ते म्हणतात, ' साक्रेटीस लोकांचें हित करूं गेला व शेवटी लोकच त्याजवर उलटले, म्हणून आपण लोकांना दोष देतों. परंतु ह्यांत साक्रेटिसाकडेहि दोषाचा थोडा वाटा जातो. लहान मुलाशीं कसें वागावें, हें ज्या गुरूला समजत नाही तो उत्तम गुरूच नव्हे. समाज बालिश आहे हें खरें, पण बालिश समाजाला पोक्त मनुष्य समजून जो त्याच्याशी वागेल तोहि बालिश बुद्धीचाच म्हटला पाहिजे, नाही का ? ' वामनरावांनी विचारलेल्या ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठी आपण विचार करूं लागतों न लागतों तोच पुढल्याच परिच्छेदांत ते साक्रेटिसाच्या अतुल मनोधैर्याचें व लोकहितेच्छेचें कौतुक करतांना आढळतात; परंतु कसेंहि म्हटलें तरी वरील दोषदर्शन लक्षणीय आहे यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणे ह्याच प्रस्तावनेंत ते पुढें असें कबूल करतात की साक्रेटिसाने आपल्या आत्मसमर्थनपर भाषणांत जे मुद्दे पुढे मांडले आहेत त्यांतील कांहीं मुद्दे आपणांस आतां अगदीं ' बाष्कळपणाचे नाही तरी पोरकटपणाचे तरी वाटतात. ' हे मुद्दे कोणते ते वामनरावांनी पुढे दिलेले आहेत; परंतु हे मुद्दे किती पोरकटपणाचे आहेत हें

दाखवून देत असतांना सत्यदर्शी वामनराव ही गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देतात की साक्रेटिसाच्या कांही चुकीच्या भासणाऱ्या कोटिक्रमांत त्यांचें खरें विचाराअन्ती बनलेलें मत प्रतिबिंबित झालेलें आहे. उदाहरणार्थ, ते असें म्हणतात की 'मनुष्य पाप करतो तें बुद्धिपुरस्सर नसतें, त्याच्या हातून तें घडतें, तेव्हां मी माझ्या पापाबद्दल जबाबदार नाही' असें जें साक्रेटीस म्हणाला, तें त्याचें खरोंखरीचें मत होतें. ह्या ठिकाणीं माणसाला प्रवृत्तिस्वातंत्र्य आहे किंवा मनुष्य हा परवश आहे हा जो नीतिशास्त्रांतील प्रश्न उद्भवतो, त्याचें उत्तर देण्याचें वामन मल्हारांनी टाळलें आहे; तें अर्थात्‌च 'नीतिशास्त्रप्रवेशांतील' सातव्या प्रकरणांत व आपल्या इतर * लेखांतून वामनरावांनी विस्तारशः दिलेलें आहे. वामनरावांना आत्म्याचें प्रवृत्तिस्वातंत्र्य मान्य होतें, हें उघडच आहे.

**भाषादोष : साक्रेटिसाची विवादप्रवृत्ति :**

ह्या संवादांचें भाषान्तर करितांना वामनरावांनी जितकें भाषेकडे लक्ष द्यावयाला हवें होतें, तितकें दिलेलें दिसत नाही. प्रस्तुत निबंधाच्या अन्य भागांत (पहिल्या प्रकरणांत) ह्या संवादांतील कांही भाषादोष दाखविले आहेत; तेव्हां त्यांची पुनरुक्ति येथे करीत नाही. येथे एवढेंच नमूद करतों की 'युथिफ्रान' ह्या संवादाची भाषा ही अनेक ठिकाणीं सदोष आहे. त्यांतील बऱ्याच ठिकाणी ह्या भाषादोषांमुळे अर्थबोध नीटसा होऊं शकत नाही. पुष्कळ ठिकाणी मुद्द्यांची निष्कारण पुनरुक्ति झाल्यासारखें वाटते; त्यामुळे ह्या संवादाचें वाचन कांहीसें कंटाळवाणें होतें, साक्रटिसाची विवादपद्धतीच अशी होती की तिच्यांत सरलत्वापेक्षा वक्रोक्तीला, वक्रमार्गालाच अधिक महत्त्व होतें. कोणत्याहि विधानांतील सत्यत्व पारखण्यासाठी तो एकदम त्याजवर घाव घालून त्याची चिकित्सा करून तें पारखण्याच्या भानगडींत पडत नसे; तर तत्समान असें दुसरें विधान घेऊन म्हणजे तत्समान व्यवहाराला अनुलक्षून केलेलें असें विधान घेऊन त्याची सत्यासत्यता प्रथम पारखीत असे व मग त्यावरून मूळ विधानाचें सत्यत्व वा असत्यत्व अजमावण्याच्या तो भरीस पडत असे. साक्रेटिसाचें मुख्य तत्त्व म्हणजे वाद करतांना प्रत्येकाने शब्दांचें अगोदर 'लक्षण' (व्याख्या) स्पष्ट केलें पाहिजे, हें होतें; व ह्यावरच भर देऊन, आपल्या प्रतिपक्षास हें

* 'देव करवितो कां मनुष्य करतो ?' : लोकशिक्षण. मासिक.

'लक्षण' करावयास लावून तो त्याच्या विधानांची अव्याप्ति, अतिव्याप्ति किंवा त्यांत दडलेला हेत्वाभास उघड करून दाखवीत असे; त्याच्या सर्व संवादांची घडण अशा प्रकारची असल्यामुळे त्यांचें भाषान्तर करितांना शब्दांच्या अतिसूक्ष्म अर्थांकडे अत्यंत लक्ष पुरवावें लागतें, हें उघडच आहे. वामनरावांनी हें लक्ष पुरविलें नाही, असें म्हणणें नाही; परंतु कांही ठिकाणी जितकें पुरविलें जाणें आवश्यक होतें तितकें पुरविलें न गेल्यामुळे त्यांच्या इतर लिखाणांत न सांपडणारी दुर्बोधता ह्यांत थोडी फार आली आहे, असें खेदाने म्हणावें लागतें.

**साक्रेटिसाचें आत्मसमर्थन :**

असें असलें तरी साक्रेटिसाच्या आत्मसमर्थनाचें भाषांतर मात्र अथपासून इतीपर्यंत सुरस उतरलें आहे. त्यांत कोठेहि अर्थनिष्पत्तीला अडचण पडत नाही. साक्रेटिसाच्या व्यक्तिमत्वावर संपूर्णपणे प्रकाश टाकणारें असें हें आत्मसमर्थनपर भाषण त्यांतील अनेक तत्त्वविचारांकरितां प्रसिद्धच आहे. या भाषणाचे शेवटचे दोन भाग विशेष परिणामकारक उतरले आहेत; विशेषत: देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावल्यानंतरचें साक्रेटिसाचें मृत्यूच्या स्वरूपासंबंधीचें भाषण त्याच्या विचारशीलतेची व सत्यशोधक वृत्तीचीच केवळ साक्ष पटवितें असें नाही, तर ह्या सत्यशोधनाच्या व्यवसायामध्ये ज्या विलक्षण ज्ञानानंदाचा आस्वाद त्याला घ्यावयास मिळत असे, त्याची यथोचित कल्पना आपणांस तें वाचीत असतां येऊं शकते. या अद्वितीय ज्ञानानंदाचा आस्वाद घेतांना व घेण्यासाठी अनेकदा मरण आलें तरी तें स्वीकारण्याची तो दाखवीत असलेली तयारी ही केवळ 'बोलाचा'ची एक प्रकार आहे असें वाटत नाही. मृत्यूच्या प्रदेशांत गेल्यावर हेसिऑड, होमर, ओडिसिअस, सिसिअस, ह्या सारख्या मोठमोठ्या कर्तृत्ववान् स्त्रीपुरुषांना भेटण्याची व त्यांच्याशीं संवाद करण्याची संधि आपणांस प्राप्त होईल ह्या कल्पनेने साक्रेटीस आनंदून जातो; हा खरा तत्त्व-जिज्ञासूचा आनंद. 'त्यांच्याशीं संभाषण करणें, त्यांच्या संगतींत राहणें, आणि प्रश्न विचारून विचारून त्यांची कसोटी पाहणें; या गोष्टी करण्यास जर सांपडलें तर आपणाला एक प्रकारचें निरतिशय सुख होईल, असें मला वाटतें,' असें तो म्हणतो. 'निंदेची मुस्कटदाबी करण्यापेक्षा आपणांमध्ये

शक्य तेवढें निर्दोषत्व आणण्याचा प्रयत्न करणें अधिक सोपें व अधिक चांगलें आहे." असलीं त्याच्या तोंडचीं ह्या भाषणांतील किती तरीं वाक्यें आपल्या सहज लक्षांत राहतात. साक्रेटिसाला स्वतःच्या शहाणपणाची वाजवी जाणीव होती, आपणाला देहान्तशासन करण्यांत आपल्यापेक्षा अथेनियन लोकांचेंच खरेंखुरें नुकसान कसें आहे, हें त्यानें स्पष्ट केलें आहे. आपल्या ठिकाणी 'धाष्टर्य व निलाजरेपणा' ह्या दोन्ही गोष्टी नसल्यामुळे आपल्या नशिबीं हें लौकिक अपयश कसें आलें आहे हें तो दाखवितो. ह्या आत्मसमर्थनपर भाषणाची सुरवात ज्या खेळकर, उपहासप्रधान अशा वृत्तींतून झाली आहे त्या वृत्तीचा भाषणाच्या शेवटी शेवटी लय होत जाऊन उत्तरार्धावर गांभीर्याची, शांतीची, उदास समाधानाची, उदात्त तत्त्वविचारांची छाया पसरली आहे. वामनरावांनी ह्या उदात्तरम्य विचारचित्रांतील रंगसंगति, छायाप्रकाश, सुरूपता आपल्या भाषान्तरांत कायम राखली आहे.

## 'क्रिटो' व 'भगवद्गीता'

वामनरावांनी हे संवाद पाश्चात्य व पौर्वात्य विचारांतील साधर्म्यस्थलें लक्षांत यावींत व तदनुसार स्वाभिमानाचें पोषण व्हावें ह्या हेतूने भाषान्तरित केलेले असल्यामुळे त्यांच्या उपोद्घातांत त्यांनी असलीं अनेक साधर्म्यस्थलें सूचित केलीं आहेत. उदाहरणार्थ 'क्रिटो' ह्या संवादांत साक्रेटिसाच्या 'क्रिटो' नांवाच्या एका वयस्क व श्रीमन्त मित्राने त्याच्या देहान्त शिक्षेच्या आधल्या दिवशीं त्याची तुरुंगांतून सुटका करण्याचा प्रयत्न केला असतां त्या समयीं साक्रेटिसाने त्याजबरोबर केलेला तत्त्ववाद आलेला आहे. ह्या वादाचा थोडक्यांत व 'शब्दापेक्षा भावार्थाकडे' अधिक लक्ष देऊन सारांश देतांना वामन मल्हार असें दाखवितात की त्यांतील मुख्य प्रश्न व भगवद्गीतेंतील प्रश्न हे दोन्हीहि तत्त्वतः सारखेच आहेत : "एकीकडे आपलें स्वहित, आणि आपल्या उच्च मनोवृत्ति व दुसरीकडे समाजहित व दुसऱ्या उच्च मनोवृत्ति यांचा कलह चालला असतां काय करावें हा दोहींचा प्रश्न आहे...कर्तव्य करण्यांत आपली किंवा दुसऱ्याची प्राणहानि होत असली, तरी तें 'कर्तव्य,' 'कर्तव्यच' समजावयाचें की काय असा दोहींमधला सामान्य प्रश्न आहे. भेद एवढाच आहे की 'दुसऱ्याचे प्राण घेणें,' हें अर्जुनाचें एक उच्च कर्तव्य

त्याला सांगत होतें, व ' लोक आपला प्राण घेत आहेत, तो त्यांना घेऊं दे ' हें साक्रेटिसाचें एक उच्च कर्तव्य त्याला सांगत होतें. न्यायदृष्टीने-धर्मदृष्टीने-जें उच्चतर कर्तव्य ठरेल तें करावें; कर्तव्याची उच्चनीचता किंवा अवश्यकरणीयता ( हा शब्द वामनरावांनी बनविलेला आहे. ) कशी ठरवावयाची हा प्रश्न दोन्ही ठिकाणीं किंचित् मुग्ध ठेवलेला आहे; ( गीतेंत कार्याकार्यनिर्णयाची कसोटी सांगितलेली नाही असेंच वामनरावांचें मत होतें, हें मागे दाखविलेंच आहे. ) पण अमुक गोष्ट अवश्यकर्तव्य असें एकदा ठरल्यावर त्यायोगें होणारी स्वप्राणहानि किंवा परप्राणहानि गौण महत्त्वाची आहे, असा दोहोंमधील भावार्थ आहे." अशा प्रकारचें ह्या दोन प्रसंगांतील साधर्म्य अत्यंत सुबोधपणे स्पष्ट करून वामनराव म्हणतात, " शस्त्रास्त्रें घेऊन शत्रूशीं लढण्यांत जें धैर्य लागतें तें पळून जाण्याची संधी आली असतां देखील तुरुंगांतच राहून स्वधर्म म्हणून आपल्या हातानेच विषाचा प्याला पिण्यास लागणाऱ्या धैर्यापेक्षा कमी दर्जाचें आहे असें मला वाटत नाही. " वामनरावांनी हा ग्रंथ ज्या हेतूने लिहावयास घेतला होता तो हेतू लक्षांत न घेतां केवळ चिकित्सक दृष्टीने जरी वरील साधर्म्यदर्शनाकडे पाहिलें तरी त्यांतील मार्मिकता व त्याची प्रयोजकता पटल्याशिवाय राहणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम
क्रमांक

## आत्म्याचें अमरत्व :

फिडो या संवादांतील तात्त्विक कोटिक्रमांचा थोडक्यांत सारांश देण्याची वामनरावांची इच्छा होती, परंतु विस्तारभयास्तव तसें न करतां त्यांतील मुख्य प्रश्नाचा म्हणजे ' आत्म्याच्या अमरत्वा 'चा आधुनिक शास्त्रीय दृष्टीने ऊहापोह करावा व तो तसा ऊहापोह करीत असतांनाच त्याच्या ओघांत येईल तसतसा त्या संवादाचा सारांश देऊन त्यांतील गुणदोषांचें आविष्करण करावें, असें त्यांनी शेवटी योजलेलें दिसतें. कारण हा उपोद्घात लिहीत असतांच त्यांनी ' आत्म्याचें अमरत्व ' ह्या विषयावर एक स्वतंत्रच प्रबंध लिहिला आहे. ( ह्याच विषयाचा सांगोपांग परामर्श वामनरावांनी ' नीतिशास्त्रप्रवेशा 'तील चौदाव्या प्रकरणांत घेतला आहे. ) ह्या प्रबंधांत आत्मा हा अमर आहे असें सिद्ध करण्यासाठी जीं प्रमाणें देण्यांत येतात, त्यांची वामनरावांनी अनुक्रमाने चिकित्सा केली आहे. वामनरावांनी

चिकित्सेसाठीं घेतलेलीं प्रमाणें पुढील प्रकारचीं आहेत: ( १ ) आप्तवाक्य, ( २ ) आध्यात्मिक शोधकांचे प्रयत्न ( Psychical researches ), ( ३ ) जन्मतःच दिसून येणाऱ्या विलक्षण मानसिक शक्तींवरून पूर्वसंस्काराविषयी अनुमान, ( ४ ) प्लेटोचीं प्रमाणें : ' ज्ञान म्हणजे पूर्वीच्या ज्ञानाचें स्मरण,' ' इतरेतरोत्पत्ति, ' सत्तत्त्ववाद ' (Doctrine of Ideas). हीं चारीं प्रमाणें चिकित्सापूर्वक खोडून काढल्यानंतर वामनराव आत्म्याच्या अमरत्वाबद्दलचा सिद्धान्त न्यायशास्त्रदृष्ट्या जरी असिद्ध असला तरी नैतिक आकांक्षेचा किंवा प्रेमाच्या दृष्टीने तो खरा मानणें आवश्यक आहे, अशा प्रकारची विचारसरणी पुढे मांडणारें जें पांचवें प्रमाण आहे त्याचें विवेचन करितात. ह्या विवेचनाचा निष्कर्ष म्हणून मांडतांना ते म्हणतात, " म्हणजे ह्याचा अर्थ असा की सृष्टिदेवतेची, आधिभौतिक शास्त्राची व इतिहासाची साक्ष बाजूला सारून सात्त्विक मनुष्य आपल्या कोमल हृदयाची, आपल्या सदभिरुचीची, आपल्या दुराधिरोहिणी आकांक्षेची, आपल्या सदिच्छेची साक्ष विश्वसनीय मानतो " व पुढें विचारतात, " आत्म्याच्या अमरत्वाबद्दल हीच साक्ष त्याने कां खरी मानूं नये ? " अगोदरचीं सगळीं प्रमाणें खोडून काढतांना वामन मल्हार जेवढी न्यायबुद्धि दाखवितात, तेवढीच हें शेवटचें प्रमाण पुरस्कारितांना ते सहानुभूति दाखवितात. बुद्धीपेक्षा सद्भावनांना वामनरावांच्या वैचारिकेंत वरचें स्थान होतें असें जें सारखें वाटतें, तें त्यांच्या लेखनांतील, भाषणांतील व उक्तींतील असल्या स्थळांमुळेच. नीतिशास्त्राचा पाया सद्वासना, सद्भावना, सुशिक्षण व सत्संगति ह्यांत आहे असें प्रतिपादणारे वामनराव ते हेच होत. ह्या शेवटच्या प्रमाणाचा वामनरावांनी जो सहानुभूतिपर विचार केला आहे व ' याच्यांत कांही वावगें असें नाही ' असा जो अन्तीं शेरा मारला आहे, तो त्यांच्या नेहमीच्या चिकित्सक सत्यशोधक वृत्तीला साजेसा नसला तरी त्यांच्या प्रेमळ, समंजस व कलात्म वृत्तीला शोभेसा आहे असेंच म्हटलें पाहिजे. अगोदरचीं प्रमाणें खोडून काढतांना दिसून येणारी त्यांची कठोर न्यायबुद्धि येथेच कां पांगुळली ह्याचा विचार करूं लागल्यावर वामनरावांच्या ठिकाणीं मनुष्यमात्राच्या ठिकाणच्या सद्भावनांबद्दल असणारा विश्वास व तत्संबंधीचें प्रेम ह्या दोन्हीहि गोष्टी किती दृढ होत्या याची जाणीव होते; त्यांच्या न्यायबुद्धीला येथे मृदुता येते, तिचे

सत्यान्वेषी नेत्र येथे सहानुभूतीने चमकूं लागतात, ते ह्यामुळेच. जें बुद्धि पटवून देऊं शकत नाही, तें भावना जाणूं शकते हेंच त्यांना येथे दाखवावयाचें आहे जणूं.

परंतु ह्याच प्रबंधांत परलोकविद्येसंबंधी विवेचन करितांना व ह्या विद्येच्या मदतीने आत्म्याचें अमरत्व कसें सिद्ध होऊं शकत नाही हें दाखवीत असतांना वामनराव अशा एका स्थळी येऊन पोंचतात की तेथे त्यांचे त्यांनाच असें वाटूं लागतें की आपण घालीत आहोंत तो वितंडवाद तर नव्हे ना ? आपल्याला आलेल्या ह्या शंकेचें निरसन करितांना वामनरावांनी जें विवेचन केलें आहे तें अस्सल विवेकवाद्याला लाजवील असें आहे. वामनराव लिहितात, " यावर शंका घेणें म्हणजे शंकेखोरपणाचा अतिरेक करण्यासारखें दिसतें व असला शंकेखोर मनुष्य वितंडवादी भासतो; परंतु एवढ्याच पुराव्यावरून ( अन्योन्य-संपूरक लेखांवरून ) भुतांचें अस्तित्व मानलेंच पाहिजे असें मात्र नव्हे; एवढें म्हटल्याशिवाय या लेखकाला राहवत नाहीं. युक्तिवादाने एखाद्या प्रश्नाचा विचार करूं लागल्यावर युक्तिवाद त्याला जिकडे नेईल तिकडे मनुष्याने जावें. म्हणजे युक्तिवादाचाच निर्णय खरा असें मात्र नव्हे; युक्तिवादापेक्षाहि अधिक योग्यतेचीं म्हणजे त्याला अगोचर असलेलीं अशीं कांही तत्त्वें आहेत. तीं आपण खुशाल खरीं मानावींत व त्यांना अनुसरून चालावें. परंतु तीं युक्तिवादाने सिद्ध होतात असें उगीच म्हणूं नये, किंवा लोकांना भासवूं नये. आत्म्याचें अमरत्व श्रद्धेय असेल, पण तें युक्तिवादाने सिद्ध होतें किंवा नाही याचा विचार करूं लागल्यावर लोक आपल्याला वितंडवादी म्हणतील, ह्या भीतीला फारशी भीक घालूं नये असें या लेखकाला वाटतें. "

### साक्रेटिसाच्या संवादांचें भाषांतर : उपकारकर्ता :

वामनरावांच्या ठिकाणीं स्वाभाविकच असलेली तत्त्वजिज्ञासा त्यांनी केलेल्या ह्या साक्रेटिसाच्या संवादांच्या भाषांतरामुळें अधिक वाढीस लागली हें तर खरेंच; शिवाय तिला एकप्रकारचें वळण लावण्याचें कार्य ह्या संवादांच्या भाषांतराने साधलें. अगोदरच संवादरूपाने तत्त्वचर्चा करण्याची वामनरावांना आवड; त्यांत संवादरूपाने तत्त्वचर्चा करणाऱ्यांचा अधिराजा जो साक्रेटीस त्याच्या संवादांचेंच भाषांतर करण्याचें कार्य आत्मसुखबोधार्थ स्वीकारलेलें,

तेव्हां ह्या संवादांचें भाषांतर होत असतां वामनरावांच्या मूळच्या तत्त्वचिंतनपर वृत्तीला अत्यंत परिपोषक असें तत्त्वविचारांचेंच खाद्य जसें त्यांतून मिळालें, त्याचप्रमाणें त्यांच्या लेखनप्रकृतीला साजेसें असें क्षेत्रहि त्यांत आढळलें व ह्याचा तिच्या भाविकालांतील विकासावर यथोचित परिणामहि झाला. प्रत्येक तात्त्विक स्वरूपाच्या प्रश्नाकडे अनेक अंगांनी पाहिलें पाहिजे ही जी वामनरावांच्या ठिकाणी खऱ्या तत्त्वजिज्ञासूला शोभणारी अशी समजूत दिसून येते, ती दृढमूल करावयाला साक्रेटिसाच्या संवादांचें हें भाषांतर बरेंचसें कारण झालें असावें असें वाटतें. असें मुख्यतः वाटण्याचें कारण असें की वामनरावांनी हें जें भाषांतर केलें तें दुसऱ्याच्या सांगण्यावरून, दुसऱ्यांकरितां केलें नव्हतें, तर अन्तःप्रेरणेने व आत्मसुखबोधार्थ केलें होतें; अर्थातूच त्यांच्या लेखनप्रकृतीवर त्याचा सुपरिणाम अधिक खोल झाला असेल हें उघडच आहे.

### अप्रकाशित राजकीय लिखाण :

वामनरावांच्या इतर तत्त्वचिंतनपर व तत्त्वचर्चात्मक लिखाणाचा विचार करितांना ज्या एकदोन गोष्टी आढळून येतात त्यांचा प्रथम निर्देश करून मग त्यांतील प्रमुख लेखांकडे वळूं. वामनरावांनी ' विश्ववृत्ता ' मधून, ' केसरी ' व ' मराठा ' मधून व ' संदेश ' मधून जें राजकीय स्वरूपाचें वर्तमानपत्री लिखाण केलें त्याचें वाचन प्रस्तुत लेखकाने केलेलें नसल्यामुळें त्याचें स्वरूप काय होतें हें सांगतां येणें त्याला कठीण आहे. ' विश्ववृत्त ' मासिकांतील निवडक निबंधांचा जो संग्रह विजापूरकरांनी प्रसिद्ध केलेला आहे, त्यांत ' बहिष्कारयोग व आपला जोर ' हा वामनरावांचा एकच लेख संग्रहित केलेला आहे. हा लेख १९०६–७ सालच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर लिहिलेला असल्यामुळे त्यांत स्वदेशी व बहिष्कार हे प्रश्न प्रामुख्याने चर्चेला आले आहेत. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, जात्यभिमानाचा अव्हेर व स्वार्थत्यागानें व उत्साहानें आचरिलेल्या बहिष्कारव्रताचें स्वतः घालून दिलेलें उदाहरण ह्यांशिवाय हा बहिष्कारयोग साध्य होणार नाही असें वामनरावांनी म्हटलें आहे. त्यांत ' केसरीचें ' उदाहरण घेऊन वामनरावांनी असें म्हटलें आहे की " लोकमान्य टिळकांना आपण स्वार्थत्यागाचे पुतळे मानतों, पण ' केसरीचा ' कागद स्वदेशी होण्यास त्यांनी

किती वेळ घेतला ? व हल्ली तरी तो नेहमी स्वदेशीच असतो काय ? आधी त्यांना स्वदेशी व्रत ठाऊक नव्हतें काय ? पूर्वीची पुण्यांतील स्वदेशी चळवळ त्यांना ठाऊक नव्हती काय ? आज केसरीकारांना वर्षास दहा पंधरा हजार रुपये उत्पन्न आहे. त्यापैकी वर्षास पांच सहा हजार पैसाफंडास देण्यास ते तयार आहेत काय ? " परंतु पुढे केसरीकारांच्या इतरांपेक्षा अधिक असलेल्या स्वार्थत्यागाचें तोंड भरून वर्णन करून वामनराव म्हणतात की, तथापि मुद्दा हा की "आमच्यासारखे कमधीराचे लोकच फार आहेत." शेवटच्या वाक्यांतील 'कमधीराचे' हें विशेषण शेवटी वामनरावांनी स्वतःकडेच लावून घेतलें, ह्यांतच त्यांच्या वृत्तींतील मौज आहे. वामनरावांचे हे सगळे राजकीय स्वरूपाचे लेख एकत्रित होणें आवश्यक आहे; त्यामुळे त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वावर मोठासा नवीन प्रकाश पडेल असें नाही, परंतु तारुण्यांतील तडफदार विचार व्यक्त करितांना त्यांतहि जो संयम, जो प्रतिपक्षाबद्दल व त्याच्या विचारप्रणालीबद्दल आदर त्यांनी ठिकठिकाणी व्यक्त केलेला असेल त्याच्या दर्शनाने व जाणिवेने वामनरावांचें वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व अधिक पूर्णत्वाने प्रतीत होईल यांत संशय नाही.

## संशोधनाची आवड :

ह्या राजकीय स्वरूपाच्या लेखनाशिवाय वामनरावांनी जे इतर किरकोळ लेख लिहिले आहेत त्यांत अधूनमधून कॉलेजमध्ये ऐतिहासिक कागदपत्रांतील मजकूर शिकवीत असतां जीं अर्थविवरणाच्या दृष्टीने शंकास्पद अशीं स्थळें त्यांच्या वाचनांत आलीं, त्यांची जिज्ञासूवृत्तीनें नोंद करणारे लेख त्यांनी जे मधून मधून लिहिलेले आहेत, त्यांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. आपल्या उर्वरित आयुष्यांत आपल्या हातून कांही तरी संशोधनात्मक अशी कामगिरी व्हावी अशी वामन मल्हारांची इच्छा होती असें आपण ऐकतों; ही संशोधनपर कामगिरी त्यांचे हातून कितपत झाली असती ह्याबद्दल संशयच असला तरी कदाचित् जी थोडीफार झाली असती तिचें स्वरूप किती सत्यप्रसाराला उपकारक झालें असतें हें ह्या अत्यल्प शंकालेखांवरून दिसून येतें. 'सभासदाच्या बखरींतील कांही पाठ' ह्या लेखांत इष्ट पाठ सुचवितांना वामनरावांनी जें सौजन्य, जी निरभिमानता, जी सत्यभक्ति व जी कुशाग्रबुद्धि दाखविली आहे ती लक्षांत घेतां उत्तरवयांत संशोधनकार्य हातीं घेण्याबाबतची

त्यांची महत्त्वाकांक्षा किती स्वाभाविक होती याची कल्पना येते. ह्याच दृष्टीने त्यांचे गीतार्थाबाबत लिहिलेले शंकालेखहि वाचण्यासारखे आहेत.

## दोन नामांकित लेखमाला :

वामनरावांच्या स्फुट लिखाणापैकीं त्यांनी लिहिलेल्या दोन लेखमालांचा परामर्श घ्यावयाचा राहिला; ह्या लेखमाला म्हणजे वामनरावांच्या तत्त्वचिंतनपर, विवादात्मक लिखाणाचे दोन सुंदर नमुने होत. ' ज्ञान हें विष की अमृत ? ' ' ज्ञानवृद्धि ही जीवितांतील काव्याची हानि करते काय ? ', ' ज्ञान धर्माला व नीतीला पोषक नाही काय ? ' व ' ज्ञानवृद्धीबरोबर येणारा अज्ञेयवाद ' हे पहिल्या लेखमालेंतील चारीहि लेख पुणे येथील सारस्वत मंडळापुढे व मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये वामन मल्हारांनी दिलेल्या व्याख्यानांतून जन्माला आलेले आहेत. ह्या चारीहि लेखांतून वामनरावांच्या तत्त्वशोधन-पद्धतींतील सगळेच गुणविशेष प्रकर्षाने व्यक्त झाले आहेत. अगदी पहिल्याच निबंधामध्ये आपणाला अमान्य असलेला ज्ञानाविरुद्धचा ' ज्ञान हें विष ' हा पूर्वपक्ष वामनरावांनी जो मांडलेला आहे तो त्यांच्या नेहमींच्याच ' दुसऱ्याचें खरें हृद्गत कळल्याशिवाय खरा आदर वाटणार नाही व खरा आदर वाटल्या-शिवाय खरा समेट होणार नाही ' ह्या ब्रीदवाक्याला अनुसरूनच मांडलेला असल्यामुळे तो सर्वांगपरिपूर्ण व म्हणूनच अत्यंत प्रत्ययकारक उतरला आहे; ह्या पक्षाची बाजू मांडतांना वामनरावांनी संपूर्ण परमनप्रवेश करून अस्सल विवादपटूचा सगळा अभिनिवेश त्यांत ओतला आहे. ज्योतिःशास्त्र, मानव-वंशशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र एवढेंच नव्हे तर निरुक्तिशास्त्र व भाषाशास्त्र यांतील अनेक उदाहरणें देऊन हीं शास्त्रें जीवनांतील किती तरी, कोमल, रम्य, आदरणीय व पूज्य वस्तु आज कशा रसशून्य, सौंदर्यहीन, मृतप्राय बनवीत आहेत हें सप्रमाण स्पष्ट करून शेवटीं " संसारांतील काव्य जावो, रमणीयता जावो, नीति जावो, धर्म जावो, पण ज्ञानाने ' सत्य ' च जर अधिक अस्पष्ट, अस्थिर, अनिश्चित केलें, व पुढे पुढे जिज्ञासाहि निरुत्साही, हीनबल व मंदतेज केली, तर मग कठीणच अवस्था आली म्हणावयाची ! ' अशी भीति व्यक्त करून भावात्मक परिणामाचा उत्कर्ष साधला आहे. ' अर्जुनाला क्षत्रियोचित कर्माच्या बाबतींत ज्याप्रमाणे

नैराश्य व दौर्बल्य प्राप्त झालें, त्याप्रमाणे ज्ञानार्जनाच्या बाबतींतहि सामान्य माणसाला विचारान्तीं कधी कधी व कांही वेळ तरी जें हृदयदौर्बल्य येतें, " त्याचें ह्या पहिल्या निबंधांत वामनरावांनी अगदी हुबेहुब चित्र रेखाटलें आहे. त्यामध्ये प्रतिपक्षाची बाजू समजाऊन घेण्याबाबत ज्याप्रमाणें खरीखुरी आस्था दिसून येते, त्याचप्रमाणे समजून घेतलेल्या भूमिकेचें परिणामकारक विशदीकरण करण्यास आवश्यक असलेली तद्रूप होण्याची व तद्रूप झाल्यावर स्वाभाविकच ती भूमिका एक प्रकारच्या हिरीरीने व अभिनिवेशाने वाचकांसमोर मांडण्याची शक्तीहि दिसून येते.

## एक शंका :

हा पूर्वपक्ष जितक्या अभिनिवेशाने मांडलेला आहे तितक्याच अभिनिवेशाने वामनरावांनी उत्तरपक्ष मांडलेला आहे यांत कांहीच नवल नाही; कारण तो त्यांना मान्य असलेला असा त्यांचा स्वतःचाच पक्ष आहेः ज्ञानवृद्धि ही जीवितांतील काव्याची हानि करीत नाही हा उत्तरपक्ष करीत असतांना काव्यशक्ति ह्या शब्दाचा शब्दसृष्टींतील अर्थ, लाक्षणिक अर्थ, प्रतिभाशक्ति हा अर्थ असे वेगवेगळे अर्थ घेऊन त्यावरून शास्त्रज्ञान हें मनुष्याला गद्यमय व रसशून्य बनवीत नाही, संसारांतील काव्य कमी करीत नाही, मनुष्यजातीची रसोपभोग घेण्याची व रसनिर्मिति करण्याची शक्ति हीनबल करीत नाही तर तें उलट मनुष्याला अधिक काव्यमय, सौंदर्यदर्शी बनविते हें सिद्ध केलें आहे. विद्वत्त्व आणि कवित्व परस्परांना मारक नसून तारक आहेत, परिपोषक आहेत अशा प्रकारचें आपलें अत्यंत आवडतें मत वामनरावांनी आपल्या अनेक लेखांतून प्रतिपादलेलें आहे; येथेंहि त्यांनी तेंच मत परंतु विशेष हिरीरीने मांडलेलें दिसतें. वामनरावांचा हा सगळा उत्तरपक्ष वाचूनहि जी एक शंका शिल्लक उरते ती अशी की ज्ञानवृद्धीने एकंदर मानवी जीवितांतील काव्य कमी होत नसेल, परंतु तर्क, अनुमान इत्यादि बौद्धिक शक्तींच्या कार्यावर आधारलेलें आजचें ज्ञानार्जन हें बुद्धीला थोडेंफार काठिण्यच आणीत नाही काय ? अशा ज्ञानार्जनाच्या मागे सतत लागलेला मानव जीं सत्यें अवलोकतो तीं तर्कबुद्धिप्रेरित कल्पनाशक्तीच्या विलासाने भासमान् झालेलीं असतात : त्यांचें स्वरूप कार्यकारणात्मक असें असतें. हीं सत्यें, कलावंत जीं सत्यें अवलोकितो त्यांपेक्षा

भिन्न स्वरूपाचीं असतात. कारण कलावंताची कल्पनाशक्ति ही तर्कप्रेरित नसते तर भावप्रेरित असते : तेथे तर्क किंवा अनुमान या शक्तींचाच केवळ खेळ नसतो; व म्हणूनच कलावंताला जीं सत्यें दिसतात तीं शास्त्रीय सत्यांपेक्षा स्वरूपाने वेगळीं असतात, असें म्हणावें लागतें. मनुष्याच्या कल्पनाशक्तीस जसें वळण लावावें तसेंच थोडेंबहुत लागत असतें. शास्त्रीय कल्पनाशक्ति ही कोणत्याहि वस्तूचे किंवा घटनेचे कार्यकारणभाव शोधून काढण्यास उत्सुक असणार व ह्या तिच्या कार्यांतून जी सत्यनिष्पत्ति होईल ती कलात्म सत्यें कितपत तिच्या पदरांत टाकील याबद्दल संशयच आहे. तीं जीं सत्यें तिच्या पदरांत टाकणार तीं शास्त्रीय सत्येंच असणार, व त्यांचा उपयोग ज्ञानाची वाढ करण्याकडे झाला, तरी कलात्म सत्यें अवलोकण्याची मनाची शक्ति त्यामुळे कालान्तराने थोडीफार हीनबल होणार यांत संशय नाही. तर्काधिष्ठित ज्ञानार्जनापासून अप्रत्यक्षपणे होणारी ही काव्याची हानि वामनरावांनी इतरत्र कबूल केली आहे; परंतु ह्या निबंधांत मात्र त्यांनी आपला उत्तरपक्ष मांडतांना ह्या मुद्याचा कोठे ओझरतांहि उल्लेख केलेला नाही. शास्त्रीय कल्पनाशक्ति ही बुद्धिप्रेरित असते हा मूलस्वरूपी भेद मान्य केल्यानंतर तर्काधिष्ठित ज्ञानार्जन हें कोणत्या प्रकारच्या कल्पनाशक्तीचा परिपोष करते हा प्रश्न सुटतो व ज्ञानवृद्धि ही जीवितांतील काव्याची हानि करीत नसली तरी सतत केलेल्या तर्काधिष्ठित ज्ञानार्जनाचा परिणाम हा माणसाच्या ठिकाणी भावसौंदर्य पाहण्याची जी शक्ति असते ती अप्रत्यक्षरीत्या हीनबल करण्यांत होतो हें सिद्ध होतें असें वाटतें.

**'ज्ञान धर्माला व नीतीला पोषक नाही काय ?** ह्या आपल्या वरील मालेंतील तिसऱ्या निबंधांत वामनरावांनी धर्म म्हणजे काय हाच प्रश्न उपस्थित केला असून त्यावरील मागे, १९२१ सालीं 'विविधज्ञानविस्तारांत' व पुढे १९२७ सालीं 'रत्नाकरां'त दिलेलें आपलें मतच येथेहि विस्तारानें मांडलें आहे. 'न हि सत्यात्परो धर्मः' किंवा 'परोपकार भूतदया हाच धर्म' किंवा

> धृतिः क्षमा शमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।
> धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ।

इत्यादि 'धर्म' शब्दाचे अर्थ घेऊन ज्ञानवृद्धि ही खऱ्याखुऱ्या धर्मतत्त्वांना यत्किंचितहि बाधक झालेली नाही हें स्पष्ट केलें आहे. ज्ञानाने ईश्वरा-

विषयीची आस्तिक्यबुद्धि कमी झालेली आहे काय ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना वामनरावांनी जीं मतें व्यक्त केलीं आहेत तींच पुढें 'रत्नाकरां'तील लेखांत व ' सुशीलेचा देव ' या कथेंत व्यक्त झालीं आहेत. ( ह्या संबंधीच्या वामनरावांच्या मतांचें संपूर्ण दर्शन मागेंच एका परिच्छेदांत केलेलें आहे. ) ' देवपूजा म्हणजे ध्येयपूजा ' असें हेगेलपक्षीय लोकांचें म्हणणें पडेल व आपलेंहि म्हणणें असेंच आहे, फक्त 'माझा धर्म तोच खरा धर्म' असें मानणाऱ्यांपैकी आपण नाही, गीतेंत सांगितल्याप्रमाणें, पण किंचित् निराळ्या अर्थाने प्रत्येकाचा ' स्वधर्म '—म्हणजे त्याला पटलेला धर्म—त्याला श्रेष्ठ होय, असें मानणारांपैकी आपण एक आहोंत, असें वामनरावांनी येथे बजावलें आहे व वर उल्लेखिलेल्या लेखांतल्याप्रमाणेंच ' कोंट ( Comte ), मिल, ब्रॅडलॉ, आगरकर इत्यादिकांना ' सत्य ', ' आदर्शभूत मानवजाति ', ' समाजसेवा ' किंवा अशाच प्रकारचीं ध्येयें ईश्वराचे ठिकाणीं होतीं, व ते या ईश्वराची दृढभावाने, निष्कामबुद्धीने, स्वार्थत्यागपूर्वक निरंतर पूजा करीत होते; अर्थात् ते नास्तिक नव्हते—हें जर तुम्ही कबूल करीत असाल, तर ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि ही धार्मिकतेला आवश्यक नाही, असें म्हणण्याचें कोणालाच कारण नाही. पण असा जर अर्थ मान्य नसेल—तर मात्र आमची अधार्मिकांत गणना झालेली पुरवली...असें म्हणण्याची कित्येकांना पाळी येईल ' असें आपलें ह्यासंबंधीचें मत स्पष्ट शब्दांत मांडलेलें आहे. वर निर्देशिलेल्या निबंधांतील वामन मल्हारांचा सत्याभिनिवेश त्यांचें वैचारिक पुरोगामित्व पुरेपूर पटवून देतो. खरेखुरें आधुनिकत्व कशांत आहे याचें वामनरावांना सम्यक् ज्ञान झालेलें होतें; त्यामुळेच त्यांच्या हातून आधुनिकांचा, सच्चा नवमतवाद्यांचा, यथार्थाने पुरोगामि असणाऱ्यांचा अतोनात फायदा झाला आहे. वामनरावांची ही खऱ्याखुऱ्या सत्यांचा शोध लावून त्यांचा प्रसार करणारीं विवरणें पाहिलीं की पुष्कळ वेळां असें वाटतें की वामनरावांच्या अगोदर महाराष्ट्रांत जी कर्त्या सुधारकांची पिढी होऊन गेली तिच्या कार्याचें तत्त्वज्ञान ग्रंथित करण्यासाठीं ह्या तत्त्वयोगी कलावन्ताचा अवतार झाला असावा. ह्याच कर्त्या सुधारकांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील कार्याची तात्त्विक बैठक वामनरावांनी आपल्या धर्म, नीति, सत्य, सौजन्य, कर्म, योग, सौंदर्य इत्यादींवरील विवेचनांच्या द्वारां सुस्थिर केली आहे.

शास्त्राध्ययन हें खऱ्याखुऱ्या धार्मिक व नैतिक सद्भावनांना कसें बाधक ठरत नाही हें ह्या तिसऱ्या निबंधांत दाखविल्यानंतर वामनराव ज्ञानवृद्धीबरोबर येणाऱ्या अज्ञेयवादाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असतें तें आपल्या चवथ्या निबंधांत स्पष्ट करतात. आज अज्ञेयवाद हा केवळ अत्यंत गहनगूढ असणाऱ्या प्रश्नांसंबंधानेच आहे हें प्रथम स्पष्ट करून व तर्काच्या साहाय्यानेच सिद्ध होत असलेलें तर्कशक्तीचें समर्यादत्व गृहीत धरून वामनराव म्हणतात, " तर्कापलीकडील जे पारलौकिकादि विषय आपल्या इकडे मानिले आहेत, त्यासंबंधी देखील माझें तरी मत असें आहे की तर्काशिवाय दुसरें एखादें ज्ञानसाधन--वेद, श्रद्धा, सहृदयत्व, intuition, योगमार्गातील समाधि वगैरे वगैरेपैकीं एखादें ज्ञानसाधन—असलें तर तें मानावें, पण एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे की या साधनाने होणारें ज्ञान आणि तर्काने होणारें ज्ञान यांची एकवाक्यता केल्याशिवाय तें ज्ञान खरें व टिकाऊ समाधान देऊं शकणार नाही. दुसरें असें की जोंपर्यंत अशी एकवाक्यता झालेली नाही, तोंपर्यंत तर्काची मुस्कटदाबी करून भागावयाचें नाही. ' वामनरावांचें हें मत मागें परलोकविद्येविषयींच्या त्यांच्या विवेचनांतील वर उद्धृत केलेल्या मताशीं तुलण्यासारखें आहे. तर्काखेरीज असलेलीं इतर ज्ञानसाधनें वामनरावांना मान्य आहेत; मात्र त्या सर्व साधनांपासून होणाऱ्या ज्ञानाची अंतीं एकवाक्यता झाली पाहिजे व हें तर्काला पटलें पाहिजे हें त्यांचें अत्यंत आवडतें मत होतें. मागील पानांवरील त्यांच्या मतांच्या विवेचनांत तें ठिकठिकाणी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेलाच आहे. प्रस्तुत निबंधांत इतिहासाच्या ज्ञानानें शेवटीं अज्ञेयवाद माजतो हें विधान खोडून काढतांना वामनराव म्हणतात, " अमुक सिद्धांत स्थापन करण्याकरितां किंवा खोडून काढण्याकरितां इतिहास-संशोधन करावयाचें नाही, तर सत्य शोधून काढण्याची इच्छा मनुष्यमात्रामध्ये असते तिची तृप्ती व्हावी, म्हणून तें करावयाचें. ' ' इतिहासाचा उपयोग ' ह्या आपल्या ' लोकशिक्षणां 'त लिहिलेल्या निबंधांतहि वामनरावांनी थोडक्यांत ह्या विषयाचा वरील दृष्टीनेच परामर्श घेतला आहे.

## वामनरावांची ज्ञानभक्ति :

ह्या अज्ञेयवादावरील निबंधाचा शेवटचा भाग वाचीत असतां वामनरावांची ज्ञानभक्ति किती दृढ व निष्ठापूर्ण होती याचा प्रत्यय येथें येतो. वामनरावांच्या

ठिकाणचा तथाकथित संशयात्मा पार लोप पावलेला असून ह्या ठिकाणीं बोलत आहे तो निश्चयात्मा आहे असें दिसतें. ह्या बोलण्यांत तेज आहे, सामर्थ्य आहे, प्रत्यय आहे व ज्वलंत निष्ठा आहे. पुढील शब्द वामनरावांचेच आहेत. " ज्ञान हें उच्चतम आनंद देणारें आहे, तें संसाराला रमणीयता आणणारें आहे, तें नीतिपोषक आहे, तें खऱ्या धर्माशीं अविरोधीच नव्हे तर अनुकूल आहे, अशी माझी कल्पना आहे; आणि समजा तें आनंददायक नाही, तें धर्माला वगैरे पोषक नाही असें ठरलें, तथापि मी म्हणेन की, मला ज्ञान पाहिजे, मग धर्माचें वगैरे काय व्हायचें असेल तें होवो. अज्ञानावर आधारलेला धर्म मला नको आहे. घोड्याच्या डोळ्यांना झांपडीं बांधून व सभोंवती काय आहे हें त्यापासून लपवून त्याला आखीव रस्त्यावरून आपण चालवितों त्याप्रमाणे माझ्यापासून परिस्थितीचें खरें ज्ञान लपवून मला जर कोणी परंपरेच्या आंखीव रस्त्यावरून नेऊं लागला, तर त्या विरुद्ध बंड करणें माझें कर्तव्यकर्म आहे असें मी समजेन. 'ज्ञानान्मोक्षः' असें शास्त्र सांगतें, पण 'ज्ञानान्नरक :' अशी जरी कोणी मला धमकी दिली, तरी 'त्वमेव शरणं मम' असें ज्ञानालाच मी म्हणणार. अज्ञानांत सुख असेल, तर तें सुख कमी दर्जाचें आहे. Ignorance is bliss हें कोणाला ? तर पशूंना. ज्ञानाबरोबर जबाबदाऱ्या अधिक येतील, पापांची जाणीव अधिक तीव्र होईल. जाचक प्रश्न अधिक उत्पन्न होतील, तथापि ज्ञान तें ज्ञान. तें सोडून अज्ञानाची कांस धरणें विचारी माणसाला शक्य नाही.'

ह्या लेखमालेंतील विवेचन हें विवादचातुर्याने, गांभीर्याने व सत्याभिनिवेशाने केलेलें असल्यामुळे त्यांत वामनरावांच्या भाषाशैलीचे विविध विलास एकाच वेळीं पहावयास सांपडतात : पहिल्या निबंधांत कांही ठिकाणीं उपरोध व वक्रोक्ति यांच्या निरुपम विलासाची शोभा आहे. दुसऱ्या निबंधांतील, स्त्रियांच्या केशपाशांत, फुलांत व नयनांत अडकलेल्या कविमनाचें वामनरावांनी केलेलें वर्णन तर अगदीं गडकऱ्यांच्या 'कवीच्या कारखान्यांतील' कांही वाक्यांची वाचकांना आठवण करून देतें. ठिकठिकाणी काव्य आहे व उत्कृष्ट कल्पनाजन्य विनोद आहे. तिसऱ्या व चवथ्या निबंधांतील विवेचन मात्र विनोदाला फारसा थारा देत नाही : तें तत्त्वगंभीर आहे, परंतु त्यांतील सत्याभिनिवेश इतका प्रखर आहे की तो ज्या भाषेंतून अवतरला आहे तिचे ठिकाणीं ओजोगुणाची आपोआपच प्रतीति होत आहे.

## दुसरी लेखमाला :

उरता उरली ‘ पक्षभेद आणि पक्षद्वेष ’ ही लेखमाला. ही माझ्या समजुती प्रमाणें वामन मल्हारांची राजकीय व सामाजिक सुधारणांबाबतची १९११ ते १९२० ह्या काळांतील भूमिका समजाऊन घेण्यास अत्यंत उपयुक्त आहे. ह्या निबंधमालेचीं तीन पुष्पें असून तीं तिन्हीहि वामनरावांनी १९१५ सालीं ‘ केसरी’च्या अंकांतूनच लिहिलेलीं होतीं. ही निबंधमाला लिहावयाला नैमित्तिक अशीं कोणतीं कारणें झालीं हें कळायला मार्ग नाही; परंतु राजकीय क्षेत्रांत जहाल व मवाळ हे जे दोन पक्ष त्यावेळी जारी होते, त्यांच्या अनुयायांचा अतिरिक्त पक्षाभिमान वामनरावांसारख्या समचित्त माणसाला मोठा दुःसह झाला असावा असें दिसतें. हे लेख केसरींतून लिहिलेले असल्यामुळे स्वाभाविकच जहालपक्षाची बाजू विशेष परिणामकारकपणे रंगविण्याची जबाबदारी ते लिहितांना वामनरावांवर असावी असें वाटतें; परंतु ही अप्रत्यक्षपणें अंगावर असलेली जबाबदारी वामनरावांच्या सत्यान्वेषी समतोल बुद्धीच्या फारशी आड आलेली ह्या लेखांतून कोठेंहि दिसत नाही; एवढेंच नव्हे तर ह्या लेखमालेंतील दुसऱ्या पुष्पांत तत्कालीन सामाजिक सुधारक वा ‘ नेमस्त ’ ह्या व्यक्तीची वैचारिक भूमिका कोणत्या स्वरूपाची असते हें समजावून सांगतांना त्या भूमिकेचें जें तन्मयतेने वर्णन केलें आहे, तें वाचल्यावर वामनराव हे प्रच्छन्न नेमस्त तर नव्हते ना अशा प्रकारची शंका आल्याशिवाय राहत नाही. नेमस्ताच्या ह्या भूमिकेचें वर्णन वा विशदीकरण करितांना वामनराव जितके त्या भूमिकेशीं समरस झाल्यासारखे वाटतात तितके जहाल ह्या ‘ राजकारणी सुधारका ’ची भूमिका रंगवितांना तिच्याशीं समरस झाल्यासारखे वाटत नाहीत. हा कदाचित् वाचनाचा दोष असेल, परंतु तसा अनुभव आहे; परंतु ह्याचा अर्थ वामनरावांना मवाळ पक्ष मान्य होता असा नसून त्यांनीं ह्या लेखमालेच्या पाहिल्याच लेखांत स्पष्ट केल्याप्रमाणें ‘ दुसऱ्याचें हृद्गत कळल्याशिवाय त्याविषयी खरा आदर वाटणार नाही व खरा आदर वाटल्याशिवाय खरा समेट होणार नाही, ’ हेंच त्यांचें ब्रीदवाक्य असल्यामुळे त्यांनी ‘ केसरी’ला अमान्य असलेल्या नेमस्त पक्षाची बाजू इतकी परिणामकारकपणे मांडली असावी. राजकीय जहाल पक्षाचें म्हणणें समजावून सांगतांना वामनरावांनी राष्ट्रीय सभेचा इतिहास

थोडक्यांत सांगून 'कामें न करणाऱ्या संस्था नुसत्या जगून काय करावयाच्या ?' ह्या प्रश्नाने जो त्याचा समारोप केला आहे, तोहि तत्कालीन नेमस्त पक्षांतील समंजस वाचकांना निःसंशय विचारार्ह वाटला असेल; परंतु ह्या लेखमालेंतील अगदी शेवटचा 'देशाभिमानाचा आणि अकलेचा मक्ता एका पक्षासच दिलेला नाही.' हा लेख त्यांतील वैचारिकतेसाठी आणि वाङ्मयीन मूल्यांसाठी सर्वोत्कृष्ट वाटतो. 'मतभेद हा प्रकृतिभेदावर व परिस्थितिभेदावर बऱ्याच अंशांनीं अवलंबून असतो.' ह्या विचारसूत्रावर ह्या संबंध लेखाची उभारणी केलेली असल्यामुळे त्याचें स्वरूप स्वाभाविकपणेंच अति-उदात्त व खऱ्या-खुऱ्या शहाणपणाने, समंजसपणाने, सत्यभक्तीने मंडित झालेलें आहे. ह्या लेखाच्या शेवटी वामनरावांनी साधलेलें राष्ट्रशरिराचें रूपक किती उत्कृष्ट उतरलें आहे ह्याची कल्पना त्यांच्या लेखनशैलीचें विवेचन करतांना प्रस्तुत निबंधांत इतरत्र दिलेलीच आहे.

### तत्त्वशोधक वामनराव :

वामनरावांच्या चर्चात्मक लिखाणाचा परामर्श येथेच संपतो; त्यांतून तत्त्वचिंतक ह्या दृष्टीने वामनरावांच्या भूमिकेचें जें दर्शन घडतें तें त्यांच्या इतर भूमिकांशीं संबद्ध असेंच आहे; वामनराव संशयात्मा नव्हते तर जीवनासंबंधीच्या अनेक प्रश्नांबाबत त्यांचीं मतें निश्चित स्वरूपाचीं होतीं; त्यांची भूमिका ही आगरकरी विवेकवाद्याची असली तरी ती त्यापेक्षां अधिक विचारप्रवण, अधिक समंजस, अधिक व्यापक अशी होती; ह्या भूमिकेला जुन्या इतकेंच नव्याशीहि समरस होणें सोपें जात होतें; किंबहुना असेंच म्हणतां येईल की ही भूमिका जितकी नव्यांना मार्गदर्शक होती तितकीच जुन्यांना कोणत्याहि प्रकारचा अन्याय न होऊं देण्याबाबत दक्ष होती. अर्थात्च तिच्यांत नव्याजुन्यांतील उत्तमांचा समावेश झालेला दिसल्यास त्यांत नवल नाही; वामनराव हे नव्या पिढीचे आवडते लेखक होते व त्यांचेबद्दल जुन्या पिढींतील लोकांनाही आदर होता ह्याचें कारण हेंच आहे; कोणत्याहि स्वरूपाच्या आत्यंतिक विचारसरणीबद्दल साशंकता हा वामन मल्हारांच्या वैचारिकतेचा मनोधर्म होता व ह्या साशंकतेंतून निर्माण होत असलेल्या चिकित्सेंतून ती विचारसरणी पारखून घेतली जात

असल्यामुळे त्याचक्षणीं तिच्यांतील सत्यांश व अर्थात् ग्राह्यांश कोणता हेंहि वाचकांना कळण्यास सुलभ जात होतें. नवविचारांचें साक्षेपाने स्वागत करून त्यांची सहानुभूतीने परंतु तितक्याच शंकेखोरपणाने छाननी करण्याची व त्यांतून निष्पन्न झालेल्या सतत्त्वांची जुन्या विचारसरणींतील समान तत्त्वांशीं जोड घालून देण्याची व अशा रीतीने वेगवेगळ्या विचार-तत्त्वांचे दुवे जुळवून ज्ञानाची प्रगति मागल्यास धरूनच होत आहे, मागल्यास तुडवून वा लाथाडून होत नाही, हें दाखविण्याची हातोटी वामनरावांना सहजतया साधलेली होती. ही त्यांचे ठिकाणी असलेली हातोटी त्यांच्या अत्यंत तत्त्वगंभीर लिखाणापासून तों ‘ विवाहित स्त्रियांचीं कांही कर्तव्यें ’ ह्यासारख्या अगदीं मोकळ्या मनाने लिहिलेल्या नभोवाणीवरील भाषणांपर्यंत सर्वत्र दिसून येते. जेथे जेथे वामनराव आहेत, तेथे तेथे तडजोड, तोंडमिळवणी, सुसूत्रता साधण्याची खटपट आलीच असें समजावयास हरकत नाही. परंतु असें होत असतां पांढऱ्याला काळें म्हणण्याची हातचलाखी होणार नाही. एखाद्या धवल तत्त्वावर जर कांही अनिष्ट संकेतांची व विचारांची धूळ सांचलेली असेल, तर ती मात्र हळूंच फुंकर मारून दूर सारली जाईल व तिच्या आडचें त्या तत्त्वाचें धवलत्व परत नजरेस येईल अशी व्यवस्था करण्यांत येईल. अन्याय केलेल्याला शासन व्हावें ह्या वृत्तीपेक्षां कोणालाहि अन्याय होऊं नये हीच वृत्ति अधिक प्रभावी आहे असें दिसून येईल.

वामनरावांनी आपल्या तत्त्वचिंतनात्मक लिखाणांतून कोणत्याहि प्रकारची सर्वस्वी नवीन किंवा क्रांतिकारक उपपत्ति मांडलेली नाही, हें खरें आहे. वामनरावांनी मराठी वाचकांना कोणतेंहि नवीन ‘ दर्शन ’ दिलेलें नाही किंवा एखाद्या नव्या तत्त्वज्ञानाचा जारीने पुरस्कारहि केलेला नाही. ह्या दृष्टीने ते तत्त्वज्ञ नसतील, परंतु त्यांची वृत्ति तत्त्वजिज्ञासूची होती व साक्रेटिसाप्रमाणे त्यांनीहि ह्याच वृत्तीची जपणूक केली, ती वाढीला लावली व तिच्या विलासांतून किती आल्हाददायक, सुरूप, सुरस अशीं फुलें फळें आपणांस मिळूं शकतात तें स्वतःच्या लिखाणाने दाखवून दिलें. वामनरावांच्या ह्या समतोल, सत्यदर्शी, प्रसन्न व सौजन्ययुक्त तत्त्वजिज्ञासूवृत्तीचा अवलंब करणें हाच त्यांची खरीखुरी शिकवणूक अंगिकारण्याचा भाग आहे. आपल्या अनुभवांचें व विचारांचें सार वामनरावांनी ‘ विचारलहरीं ’तील एका लेखांत

ग्रथित केलें आहे. वामनरावांच्या एकंदर वैचारिकेची बैठक समजावून घ्यावयाला हा लेख अत्यंत उपयुक्त आहे. त्यांतीलच कांही वाक्यें येथे उद्धृत करून त्यांच्या तत्त्वचिंतनात्मक लिखाणाचा हा धांवता परामर्श संपवितों:

* * * *

" सौजन्य हें वेष, भाषा, जाति, किंवा धर्म यांवर अवलंबून नसून तें ' माणुसकी ' वर अवलंबून आहे आणि ही माणुसकीच मनुष्याला मनुष्यत्व देते, निदान मनुष्यत्वामध्ये ही माणुसकी हेंच प्रधान अंग आहे. "

* * * *

" इतिहास, काव्य, गद्य वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्म, मानसशास्त्र इत्यादि विषयांसंबंधी मीं जें अल्पस्वल्प वाचलें आहे त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे, की पूर्ण सत्य कोणत्याहि एका कवीच्या, इतिहासकाराच्या, दर्शनकाराच्या, किंवा धर्मसंस्थापकाच्या हातीं लागलेलें नाहीं...अशा स्थितींत अमुकच सिद्धांत खरा असा आग्रह धरण्यांत फायदा काय ? शिवाय आपलीं मतें हीं खरोखर पुष्कळ वेळां आपल्या पूर्वशिक्षणावर, आपल्या सहजप्रवृत्तींवर, आपल्या गूढ व सुप्त वासनांवर अवलंबून असतात —आपण निर्विकार चित्ताने विचार करण्याचें ठरविलें तरी आपल्या भावना, आपले हितसंबंध, आपल्या अन्तःकोषांतील गूढ, सुप्त व बोधरहित वासना यांचा परिणाम न कळत होत असतोच असतो— हें सर्व ध्यानांत घेतलें म्हणजे विशिष्ट मताबद्दलचा आग्रह किती दुराग्रहस्वरूप आहे हें ध्यानांत येतें आणि अशी वृत्ति होऊं लागते की ईश्वरास्तित्वादि गूढ गहन प्रश्नांबद्दल ज्याने त्याने आपलीं प्रामाणिक मतें स्वतःपुरतीं अवश्य स्वीकरणीय मानावींत, लोकांनाहि स्वीकारण्यास सांगावींत, पण त्याबद्दल आग्रह धरू नये. आणि दुसऱ्याचे मतभेद दिसल्यास माणुसकीच्या दृष्टीने ते त्याज्य किंवा निंद्य आहेत असें तर मुळीच मानूं नये. "

* * * *

' सामाजिक जाति व लौकिक धर्म इत्यादिकांतील भेद खरोखर वेष-भाषा-दिकांप्रमाणे बाह्य आहेत, अंतरात्म्यांतील चांगुलपणा त्यांवर विशेष अवलंबून नाही. त्यांना आज काल जें भलतें महत्व प्राप्त झालेलें आहे तें नाहीसें होईल तो सुदीन ! '

* * * *

'आपल्या समाजांतील शिष्ट लोकांची चाल रीत, सत्पुरुषांची शिकवणूक स्वतःच्या मनाशीं शांतपणें केलेला सर्वांगीण विचार, इत्यादि गमकांवरून ज्याने त्याने आपलें कर्तव्यअकर्तव्य ठरवावें व त्याप्रमाणें वागावें एवढाच 'मनःपूतं समाचरेत' ह्याचा अर्थ. कर्तव्याकर्तव्य ठरवितांना आपल्या मनोविकारांना आपण बळी पडत नाहीना, आत्मवंचना तर आपण करून घेत नाही ना, प्रचलित शिष्टाचार, धर्मवचनें वगैरेचा त्याग करणें आपणांस प्रशस्त वाटत असल्यास असा त्याग करण्यापूर्वी आपण पूर्ण व सर्वांगीण विचार निर्विकार चित्ताने केलेला आहे ना, अशा प्रकारचे प्रश्न मनाला अर्थात् विचारलेच पाहिजेत, पण हे विचारून झाल्यावर आणि मन व मत निश्चित झाल्यावर आपला 'सदसद्विवेक' म्हणा किंवा 'आत्मतुष्टि' म्हणा किंवा 'स्वस्य च प्रियमात्मनः' म्हणा, हीच शेवटी नीति-अनीतीची कसोटी आहे हें ओळखावें आणि त्याप्रमाणे वागावें. नीति-अनीति-आचार-विचारांच्या बुडाशीं गेल्यावर मनुष्य आपल्या प्रामाणिक बुद्धीला अनुसरून स्वतःचें व दुसऱ्याचें हित साधण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा नाही एवढेंच महत्त्वाचें तत्त्व हातीं लागतें. हें स्वहित व परहित ( स्वसुख किंवा परसुख नव्हे हें ध्यानांत धरावें ) साधण्याची जी इच्छा आहे ती किती दृढ, प्रबल, विचारयुक्त व निर्विकार आहे एवढ्यावर मनुष्याची नीतिमत्ता अवलंबून असते—तो कोणतीं वस्त्रें परिधान करतो, तो काय खातो—पितो, तो मक्केकडे तोंड करून अल्लाची प्रार्थना करतो की पूर्वेकडे तोंड करून सूर्याला अर्घ्य देतो, तो जातीने ब्राह्मण आहे का अब्राह्मण आहे, तो स्वजातीय स्त्रीशीं विवाह करतो का परजातीय स्त्रीशीं इत्यादि गोष्टींवर त्याची नीतिमत्ता अवलंबून नाही. या गोष्टी बाह्य, गौण व आनुषंगिक आहेत. खरें सौजन्य, खरी नीतिमत्ता, खरें धार्मिकत्व यांहून महत्त्वाच्या, जिव्हाळ्याच्या, आंतर लक्षणांवर अवलंबून आहे.'

* * * *

'मला मतविरोध नको आहे असें मुळींच नाही. प्रत्येकानें आपापल्या मताचा पुरस्कार केलाच पाहिजे. अर्थात् विरोध हा अपरिहार्यच आहे. पण हलकटपणाचा विरोध आणि सौजन्ययुक्त विरोध यांत फरक आहे...या जगांत पूर्ण सत्य कोणाच्याच हातीं न लागल्यामुळें ( तसेच गैरसमज, भिन्न भिन्न हितसंबंध, भिन्न कर्तव्यें इत्यादि गोष्टींमुळे ) प्रामाणिक विरोधाची

शक्यताच नव्हे तर अपरिहार्यता कोणाच्याहि लक्षांत येईल. पण विरोधामध्यें बालिशता, कुत्सितपणा, कुचेष्टा करून प्रतिष्ठा मिळविण्याची बुद्धि, एखाद्याला एकादा शत्रु म्हटल्यानंतर त्याच्या पाठीस लागून व जें हातीं येईल तें फेंकून किंवा मारुन त्याची जणू काय शिकार करावयाची अशा प्रकारची रानटी प्रवृत्ति-इत्यादि गोष्टींचा अभाव असला पाहिजे.'

* * * *

'युद्धें व्हावयाचींच असलीं तर...धर्म-युद्धें मला पाहिजे आहेत, धार्मिक युद्धें नको आहेत.'

* * * *

वामनरावांचीं वर दिलेल्या मतांसारखीं सूचक मतें त्यांच्या सर्वच लिखाणांत पसरलीं आहेत. त्यांची निवड करून तीं सुसंगतपणें वाचकांपुढें मांडण्यापेक्षां त्यांतील, आपल्या अनुभवांचें सारच अशीं स्वतः वामन मल्हारांच्या दृष्टीने असलेलीं त्यांचीं मतें उद्धृत करणें इष्ट वाटलें, म्हणून तसें केलें. सत्य व सौजन्य अंगीं बाणलेल्या व सत्य, सौंदर्य व सौजन्य यांच्या संशोधनार्थ, प्रगटीकरणार्थ व शक्य तोंवर प्रचारार्थ आपली लेखणी अथपासून इतीपर्यंत शिणविणाऱ्या ह्या आधुनिक मराठी तत्त्वयोगी कलावन्ताच्या व्यक्तिमत्त्वाचें जेवढें चिंतन करावें तेवढें थोडेंच आहे; तेव्हां झालें तेवढें अपुरें झालें याची जाणीव असूनहि येथें नाइलाजानें पूर्णविराम देतों.

पुरवणी :

# कथावाङ्मयांतील तत्त्वशोधन

वामनरावांच्या ललितवाङ्मयांतून प्रगट झालेल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे याची ओझरती ओळख त्यांच्याललित-वाङ्मयाचा विचार करीत असतां उद्भवलेल्या इतर प्रश्नांचें विवरण करीत असतां आनुषंगाने थोडीफार आपण करून घेतलीच आहे; तीच अधिक सखोल व्हावी ह्या इच्छेनें हें छोटेसें वेगळें प्रकरण लिहीत आहें; वामनरावांची पहिली कादंबरी जी ' रागिणी ' तिचें स्वरूपच काव्यशास्त्र-विनोदात्मक असल्यामुळें व सर आर्थर हेल्प्स यांच्या Friends in Council सारखें पुस्तक लिहावें ह्या मूळ इच्छेंतून तिचें बरेंचसें लेखन झालेलें असल्यामुळे तिच्यामध्ये नाना विषयांवरील तत्त्वचर्चा अवतरल्या हें स्वाभाविकच आहे. ( ह्या तत्त्वचर्चांचे विषय किती अनेकविध आहेत हें मागे त्यांची एक त्रोटक यादी देऊन दाखवलेंच आहे. ) ह्या तत्त्वचर्चांतून वामनरावांनी जीं मतें मांडलेलीं आहेत, तींच त्यांच्या त्यानंतरच्या तत्त्वचिंतनात्मक लिखाणांत विस्ताराने आलेलीं असल्यामुळे व आपण त्याचें बरेंचसें विस्ताराने परीक्षण केलेलें असल्यामुळे त्यांचें स्वरूप परत समजावून घेणें म्हणजे पुनरुक्तीचा दोष स्वीकारणें होय असें ठरणार आहे; तेव्हां ह्या वेगवेगळया विषयांवरील वादांतून दर्शित झालेल्या त्यांच्या मतांची ओळख करून घेण्याऐवजीं एकंदर कादंबरींतून त्यांनी जें जीवनविषयक तत्त्वज्ञान सूचित केलेलें आहे, तें कोणतें हें पाहण्याचा प्रयत्न करूं. केवळ कथानकाच्या दृष्टीने ह्या प्रश्नाचा विचार करतांना जीं दोन नांवें विशेषत्वाने डोळ्यापुढे येतात तीं म्हणजे भय्यासाहेब व रागिणी ह्यांचीं होत. भय्यासाहेबांची धर्मजिज्ञासा, त्या प्रबळ धर्मजिज्ञासेच्या तृप्तीसाठीं रागिणीच्या प्रेमाचा त्याग करावयाचा की रागिणीच्या प्रेमासाठीं धर्मजिज्ञासेकडे दुर्लक्ष करावयाचें हा त्यांच्यापुढे पडलेला प्रश्न, धर्मनिष्ठा कीं सांसारिक कर्तव्य असा त्याच प्रश्नांतून निघालेला उपप्रश्न, म्हणजेच स्वोन्नति की स्वेतरांचें सुख असें त्यांतून निर्माण झालेलें विचार-प्रमेय, स्वोन्नतीसाठीं त्यांच्याकडून झालेला रागिणीचा त्याग व शेवटीं प्रियव्रह्म-स्वामींच्या उपदेशावरून परत सांसारिक कर्तव्यांचा स्वीकार इत्यादि विचार-सूत्रांनी ह्या कादंबरीचें वीणकाम झालेलें असल्यामुळे त्यांतून सूचित होणारें

वामन मल्हारांचें सदरहू प्रश्नांसंबंधींचें तत्त्वज्ञान लक्षांत येण्याजोगें आहे. त्याचप्रमाणे भय्यासाहेब व रागिणी ह्यांच्यानंतर जीं आनंदराव व उत्तरा हीं दोन नांवें लक्षांत येतात त्यांच्या जीवनचित्रांतील—त्याला ' जीवन चित्र ' असें म्हणतां येईल किंवा नाही हा प्रश्नच आहे; कारण त्यांत कांहीं फारसें ' घडतें ' असें कोठेंच वाटत नाही; बरेचसें स्थिर आहे तें—सूचित होणारे प्रश्नहि तत्त्वतः वरच्या सारखेच आहेत. देशाभिमानाचें व्रत आणि उत्तरेचें प्रेम ह्यांत घोटाळणारें आनंदरावांचें मन प्रियब्रह्मस्वामींच्या उपदेशावरून म्हणा, आदेशावरून म्हणा किंवा स्वयंप्रेरणेने म्हणा शेवटीं उत्तरेबरोबर विवाहपाशांत अडकून राहावयास तयार होतें, तें कार्याकार्याबद्दलच्या कोणत्या विचाराने, असा प्रश्न उपस्थित होतो. ह्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें वामनरावांनी भय्यासाहेब व रागिणी यांच्या अंतिम भेटीपूर्वीच्या प्रियब्रह्मस्वामींच्या लांबलचक भाषणांतून व कादंबरीच्या शेवटीं असलेल्या त्यांच्या आत्मगतांतून सविस्तर दिलीं आहेत; "धर्माचें अंतरंग प्रेम व बहिरंग परोपकार. हृदयांत प्रेमनिर्झर असल्याशिवाय धर्मवृक्ष वाढत नाही. धर्मवृक्षाचें जीवन शुद्धप्रेम व त्याचें फळ पवित्र वीर्यकर्म, व त्याचा अंगभूत सुवास म्हणजे निःश्रेयस व शांत सुख. परमेश्वर-पूजा म्हणजे मूर्तिपूजा नव्हे, योगासन नव्हे, किंवा तीर्थाटन नव्हे; तर परोपकारकर्म, पवित्रकर्म, प्रेमकर्म, वीर्यकर्म; धर्माचें बीज प्रेमांत आहे, प्रेम म्हणजे सर्व भूतांविषयीं आत्मभाव. प्रेम म्हणजे स्वाभिमानविस्मृति-स्वार्थत्याग-आत्मयज्ञ...आत्मप्राप्ती पाहिजे आहे, तर आत्माभिमान सोडा; आत्मयज्ञाशिवाय आत्मप्राप्ती नाहीं...प्रेमाने प्रेरित होऊन स्वार्थत्यागपूर्वक जगांतील दुःख, पाप, अज्ञान वगैरे कमी करणें याचें नांव परोपकार. पवित्रकर्म किंवा वीर्यकर्म, वस्तुतः एकच असून त्याचेहि अनेक प्रकार आहेत. परोपकार द्रव्यदानांतच आहे असें नाही, वीर्य रणांगणांतच दृष्टोत्पत्तीस येतें असें नाही; व पावित्र्य देवपूजेनेच प्राप्त होतें असेंहि नाही; जगांत जें गाढ अज्ञान आहे, जीं हृदयद्रावक दुःखें आहेत, जीं प्राणघातक संकटें आहेत, जीं घोर पापें आहेत, नयनशल्यभू जी कुरुपता आहे, त्यापैकी एखादी तरी अनिष्ट गोष्ट स्वतःला त्रास सोसून जो जगांतून कमी करील, तो आपल्या परीने व आपल्या मानाने परोपकारी, पवित्राचरणी वीरच आहे...धर्माभिमान किंवा देशाभिमान एकाच स्वरूपांत दिसतो, असें नाही. आत्मप्राप्ती एकाच मार्गाने होते असें नाही.

आत्मप्राप्ती एकाच मार्गाने होते असें समजणें चुकीचें आहे. मार्ग भिन्न असले तरी सर्व मार्गांच्या मुळाशीं मात्र एकच कल्पना आहे; ती ही की मनाचें नियमन करा, क्षुद्र अभिमान सोडा, सर्व भूतमात्रांना आत्मतुल्य समजा, आत्मा प्रेममय करा व द्वैतभाव सोडून द्या, म्हणजे तुम्हाला खरें आत्मसुख-खरा ब्रह्मानंद प्राप्त होईल...खरी स्थिति अशी आहे की, मनुष्याला केवळ कर्तव्य-कर्में आहेत, हक्क नाहीत ! दुसऱ्याने कसें वागावें, हा त्या दुसऱ्याचा व जग-चालकाचा प्रश्न आहे, आपला नाही. आपण आपलें कर्तव्यकर्म केलें, म्हणजे आपलें कार्य संपलें...आपलें जीवित-कर्तव्य म्हणजे आपला आत्मा प्रेममय करून स्वार्थत्यागपूर्वक परोपकार करणें हें ठरल्यावर आपणाला कोणत्या प्रकाराने जगांतील ज्ञान, प्रेम, रमणीयता, सदभिरुचि इत्यादि गोष्टी वाढवितां येतील, कोणत्या प्रकाराने इतरांना अधिक सुख किंवा साहाय्य देतां येईल, याचा ज्याचा त्याने आपल्या मनाशीं विचार करावा, आणि आपलें शरीरबल, बुद्धिसामर्थ्य, परिस्थिति, स्वाभाविक प्रवृत्ति, आवड इत्यादि गोष्टींचा विचार करून परिस्थितीच्या अनुकूल्याप्रमाणे, आपल्या मगदुराप्रमाणे व आवडी-प्रमाणे आपलें कर्तव्यकर्म ठरवावें व त्यापासून रतिमात्रहि हलूं नये. ''

प्रियब्रह्मस्वामींनी विजयगांवकर मंडळींना व विशेषतः भय्यासाहेब व आनंदराव यांना केलेल्या उपदेशांतील हीं कांही सूचक वाक्यें आहेत. यांतून व्यक्त झालेलें वामनरावांचें तत्त्वज्ञान त्यांच्या इतरत्र सूचित झालेल्या विचारसरणींशीं पूर्णपणे जुळणारें असेंच आहे. जीवनव्यवहारांत माणसाने कोणतीं ध्येयें डोळ्यासमोर ठेऊन वागावें हें सांगतांना प्रियब्रह्मस्वामींनी जीं मूल्यें सूचित केलीं आहेत, तींच मूल्यें वामनरावांनी आपल्या गोव्याच्या अध्यक्षीय भाषणांतून लेखकांना संदेश देतांनाहि सूचित केलीं आहेत असें दिसतें. त्यांच्या सर्वच लिखाणांत ह्या बाबतींत एकवाक्यता आढळते. भय्यासाहेबांनी रागिणीशीं विवाह करून जी विशिष्ट जबाबदारी अंगिकारिली होती, तिचा त्याग करणें हें धर्मदृष्ट्या योग्य नव्हतें व ' जगाच्या कल्याणाच्या दृष्टीनेहि हें अनिष्ट होतें ' आणि देशहिताच्या कोणत्याहि सत्कार्याच्या आड न येणाऱ्या उत्तरेशीं लग्न लावण्यांत आनंदरावांकडून आपल्या देशभक्तीच्या व्रताचा यत्किंचित्‌हि भंग होत नव्हता, असें आपलें मत वामनरावांनी वरील तत्त्वप्रतिपादनाच्या अन्तीं प्रियब्रह्मस्वामींकडून सूचित केलें आहे. 'रागिणी' तील

प्रियब्रह्मस्वामी व 'आश्रमहरिणी'तील पूर्णप्रज्ञऋषी हीं दोन व्यक्तिचित्रें थोडीं फार अपार्थिव वाटत असलीं व इहलोकांतील सामान्य व्यक्तींच्या जीवनांत त्यांनी घातलेलें लक्ष थोडेंफार अवास्तव वाटत असलें, तरी त्यांच्या मार्फत जी जीवनाविषयीची समंजस व उदात्त शिकवण दिली गेली आहे, तिच्या अत्युच्च दर्जामुळे ह्या इतर शंका वाचकाच्या मनांत फार वेळ टिकत नाहींत; तो त्या बऱ्याचशा गृहीतच धरून चालतो. सुलोचनेने केलेला पुनर्विवाह हा आत्मोन्नतिकारक कसा ठरतो ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना पूर्णप्रज्ञऋषींनी 'क्षुद्र सुखाविषयीं खरें वैराग्य प्राप्त होऊन सर्व जगताकडे समतेने व प्रेमदृष्टीने पाहणें व तदुन्नतीकरितां उत्साहपूर्वक अहर्निश प्रयत्न करणें याचेंच नांव आत्मोन्नति' ही आत्मोन्नति ह्या शब्दाची केलेली व्याख्या व 'मनांत अहर्निश सुखोपभोगाचे विचार चालले असून देहदृष्ट्या स्वीकारलेलें वैराग्य हें खरें वैराग्य नव्हे' असें केलेलें स्पष्टीकरण हीं वर उद्धृत केलेल्या प्रियब्रह्मस्वामींच्या विचारांशीं पूर्णपणें जुळतील अशींच आहेत. कार्याकार्यनिर्णयाची पूर्णब्रह्मांची कसोटी व प्रियब्रह्मांची कसोटी एकच आहे; व ती म्हणजे प्रेम, सर्व भूतांच्या ठायी आत्मभाव, स्वार्थत्यागपूर्वक परोपकार, स्वाभिमानविस्मृति, आत्मयज्ञ हीच. ह्या दृष्टीने विचार करतां 'रागिणी' व 'आश्रमहरिणी' ह्यांमधील विचारसूत्र एकच आहे; फरक एवढाच की 'आश्रमहरिणीं'त ही स्वाभिमानविस्मृतीची, आत्मयज्ञाची कसोटी ज्या मानवी व्यवहारांना लावण्याबाबत पूर्णप्रज्ञांकडून धौम्याला उपदेश करण्यांत येतो त्या मानवी व्यवहारांचें स्वरूप थोडेसें भिन्न व अपवादात्मक व म्हणूनच की काय कोण जाणें कादंबरीकालीन विशिष्ट सामाजिक प्रश्नांना उपकारक आहे. धौम्याच्या गैरहजेरींत, तो मृत झाला असें समजून सुलोचना गभस्तिगतीशीं पूर्णप्रज्ञांच्या संमतीने विवाहबद्ध होते, व आपल्या पुनरागमनानंतर ह्या गोष्टीची जाणीव झालेला धौम्य पूर्णप्रज्ञांना सल्ला विचारतो, तेव्हां ही कसोटी सांगण्यांत आली आहे. 'आश्रमहरिणी'च्या दुसऱ्या आवृत्तींत धौम्य, सुलोचना व गभस्तिगति हीं तिघेहि एकत्र संसार करतात असें वर्णन वामनरावांनी केलेलें असलें व तसें करण्यांत त्यांनी वैचारिक दृष्ट्या विशेष धैर्य दाखविलेलें असलें, तरी त्यामुळे वरील तत्त्वज्ञानाचा भंग झालेला नाहीं; उलट त्याला बळकटीच आलेली आहे. 'आश्रमहरिणी' सारख्या कल्पित पौराणिक कथेंतून वामनरावांना स्त्रियांच्या पुनर्विवाहांतील निर्दोषता सूचित

करावयाची असली तरी ती त्याजकडून अत्यंत कलात्मकतेने व म्हणून परिणामकारकतेने सूचित झालेली आहे व त्या कथेची बैठक ज्या तात्त्विक विचारसरणीवर झालेली आहे ती 'आत्मोन्नति'बाबतची विचारसरणी 'रागिणी'तील विचारसरणीशीं तंतोतंत जुळेल अशीच आहे. ती तिचीच सख्खी बहीण आहे.

वामनरावांची हीच सर्वांभूतीं आत्मभावाची, स्वाभिमानविस्मृतीची, आत्मयज्ञाची, जगांतील अनिष्टें कर्तव्यबुद्धीने दूर करण्याबाबतची जी विचारसरणी आहे तिचेंच परिणत स्वरूप आपणांस त्यांच्या 'सुशीलेच्या देवां'त पहावयास मिळतें. 'रागिणी,' 'आश्रमहरिणी' ह्यांचें लेखन व 'सुशीलेचा देव' ह्या कथेचें लेखन ह्यांच्या दरम्यान जीं दहा पंधरा वर्षें गेलीं होतीं त्यांत वामनरावांची देवविषयक, धर्मविषयक व नीतिविषयक मतें कोणकोणत्या बाबतींत बदललीं होतीं हें गेल्या प्रकरणांत स्पष्ट केलेलेंच आहे; परंतु हीं मतें इतकीं बदललेलीं नव्हतीं कीं तीं त्यांच्या वरील विचारसरणीशीं विसंगत वाटावींत. ह्या कालान्तराने विकसित झालेल्या मतांची पूर्वतयारी 'रागिणी' 'आश्रमहारिणी'च्या काळापासूनच झालेली होती. त्यांचीं बीजें त्याचवेळीं पेरलीं गेलीं होतीं. तीं त्याच विचारसरणींतून स्वाभाविकपणे उत्क्रान्त झालेलीं मतें होत असेंच मानावयाला भरपूर जागा आहे. वर प्रियव्रह्मस्वामीच्या भाषणांतील जीं वाक्यें उद्धृत केलीं आहेत, त्यांतून प्रगट होणाऱ्या विचारसरणीच्या पायावरच वामनरावांच्या कथावाङ्मयांतील जीवनविषयक तत्त्वज्ञानाची सगळी इमारत उभारलेली आहे. ह्या इमारतीला वेगवेगळी शोभा आणण्याचा प्रयत्न त्यांच्या वेगवेगळ्या कादंबऱ्यांतून झालेला असेल, परंतु तिच्या खालील विचारसरणीचा पाया हा अढळ आहे. 'पावित्र्य देवपूजेनेच प्राप्त होतें असें नाहीं' असें सूचक वाक्य उच्चारणारे प्रियव्रह्म व ह्यानंतरच्या आपल्या 'नीतिशास्त्रप्रवेशांत,' (१९१९) विविधज्ञानविस्तारांतील (१९२१) लेखांत व रत्नाकरांतील (१९२७) टिप्पणींत आपलीं परिणत मतें व्यक्त करणारे वामनराव ह्यांत फारसा फरक पडलेला नाहीं असें दिसून येईल. ध्येय हाच देव समजणारी सुशीला आपली ध्येयाची कल्पना सकुंचित ठेवूं इच्छित नाहीं : तिचें 'ध्येय' हें प्रियव्रह्माच्या 'धर्मा' इतकेंच व्यापक आहे. फक्त 'धर्म' ह्या शब्दाऐवजीं 'ध्येय' हा शब्द वापरला आहे. परोपकार, सर्वभूतीं प्रेम, निःस्वार्थ दया, भूतमात्राच्या हिताबद्दल दक्षता,

सर्व प्रकारचे अन्याय, सर्वप्रकारची विषमता दूर करण्याकरितां निरलस प्रयत्न करण्याची तयारी इत्यादि गोष्टींचा समावेश तिच्या 'ध्येयाच्या' कल्पनेमध्ये जसा झाला आहे तसाच प्रियव्रह्मांच्या 'धर्मा'मध्ये झाला आहे. असल्याच ध्येयाचा ध्यास तिला व तिच्या संवगड्यांना लागलेला आहे; तिच्या बालपणाच्या देवविषयक कल्पनांचें हें प्रौढवयांतील परिणत स्वरूप प्रियव्रह्माने वर्णिलेल्या धर्माच्या स्वरुपाशीं सर्वतोपरी जुळणारें असेंच आहे; त्यावर साम्यवादाची, विश्वकुटुंबवादाची किंवा आणखी एखाद्या नवमतवादाची छाया पडलेली असेल, नाही असे नाही, परंतु ती छाया अशी नाही की जिच्यामुळे तें सर्वस्वी नवीन, अगोदरील विचारसरणीपासून सर्वच बाबतींत वेगळें, असें भासावें; 'रागिणी' 'आश्रमहरिणीं'तील व्यापक विचारसरणींतून तें उत्क्रान्त झालेलें आहे असेंच दिसून येतें. गिरिधररावांचा किंवा रावबाचा सुखवाद हा अन्तीं आत्मोन्नतिकारक ठरण्याऐवजीं आत्मविनाशकच कसा ठरतो हें दाखवितांनाहि वामनरावांनीं आपल्या पूर्वीच्याच विचारसरणीची री ओढली आहे : स्वाभिमानविस्मृति, आत्मत्याग, आत्मयज्ञ, सर्वभूतरतवृत्ति इत्यादि कसोट्यांना रावबाचा सुखवाद उतरणेंच शक्य नाही : म्हणूनच तो घातक ठरतो. ध्येय हाच देव हें तत्त्व प्रतिपादणारी सुशीला रावबाचा सुखवाद हा ध्येयस्वरुप व म्हणूनच देवस्वरुप मानणें शक्य नाहीं : कारण तिची ध्येयाची कल्पना अत्यंत व्यापक आहे. वामनरावहि तो तसा मानीत नाहीत. प्रियव्रह्माच्या कसोटीला उतरण्याचें सामर्थ्य त्या सुखवादामध्ये नाही. प्रियव्रह्माच्या कसोटीला उतरण्याचें थोडेंफार सामर्थ्य बाळू, सुनंदा व सुशीला यांच्या ध्येयवादामध्येच आहे, त्यांच्या विचारसरणींत आहे व म्हणूनच त्यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवलेलें ध्येय हें वामनरावांच्या मतें देवरुप होऊं शकत आहे, 'मनुष्यांत उच्च प्रवृत्ति आणि मनोवृत्ति आहेत. त्याला स्वार्थ प्रिय असेल; पण 'स्व' मध्यें तो कुटुंबाचा-देशाचा-मनुष्यजातीचाहि समावेश करतांना आढळतो. स्वार्थाबरोबर त्याला परार्थहि प्रिय आहे. स्वार्थ बहुधा प्रबळ असतो; पण परार्थहि कित्येक वेळां प्रबळतर होऊं शकतो. शिवाय ज्ञानाने व अनुभवाने खरा स्वार्थ आणि परार्थ यांचा अविरोध जसजसा दिसून येऊं लागतो, तसतसा स्वार्थप्रवृत्ति व परार्थप्रवृत्ति यामध्येहि साहजिकच अविरोध उत्पन्न होऊं लागतो ... आज लोकांमध्ये ज्ञानवृद्धि होत आहे ... व्यक्तीव्यक्तींचे, राष्ट्राराष्ट्रांचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २३५७५ वि. निबंध

हितसंबंध एकमेकांत निगडित झाले आहेत याची जाणीव उत्पन्न होऊन दुसऱ्याचं हित किंवा अनहित तें वस्तुतः आपलंहि हित किंवा अनहित हें अनुभवांतीं व्यक्तींना व राष्ट्रांनाहि चांगलं कळूं लागलं आहे. संशयी, स्वार्थी, कलहात्मकवृत्ति शेवटीं आपल्यालाच घातुक होते हें तत्त्व पटूं लागलं आहे. विश्वासाने विश्वास वाढतो व मनुष्य विश्वासार्ह होतो, तसंच प्रेमाने प्रेम वाढतं आणि मनुष्य प्रेमार्ह होतो या तत्त्वाचाहि अनुभव अनेकांना अनेक क्षेत्रांत येत आहे—अशा स्थितींत भविष्यकाळीं विश्वकुटुंबवाद लोकांना पटेल व तो त्यांना चांगलं यशहि देईल असं कां मानू नये ? ' सुशीलेच्या तोंडच्या अनेक उत्कृष्ट भाषणांपैकीं एका भाषणांतील हीं वाक्यें आहेत. ह्या वाक्यांतून जें जीवनविषयक तत्त्वज्ञान ग्रथित झालेलें आहे तें सर्वस्वी नवीन नसून केवळ प्रियब्रह्माच्या तत्त्वज्ञानाचा तो वामनरावांनी एकोणीसशे तीस सालीं केलेला अनुवाद आहे असेंच वाटतें. प्रियब्रह्म ज्या भूतदयेने प्रेरित होऊन धर्माचें स्वरूप स्पष्ट करतो, त्याच भूतदयेने प्रेरित होऊन सुशीला व तिचे संवगडी आपलें विश्वकुटुंबसंस्थेचें ध्येय आखतात; फरक एवढाच कीं त्यांच्या विचारसरणीच्या मागे केवळ भूतदया नाही; तर सामाजिक अन्यायांचें व विषमतेचें डोळसपणे केलेलें परीक्षण आहे व त्यांतून निष्पन्न झालेल्या कारणमीमांसेचें वैचारिक पाठबळ तिला आहे : तिचें स्वरूप अधिक बौद्धिक आहे. परंतु कसेंहि असलें तरी ज्या विश्वकुटुंबवादाचें दर्शन वामनरावांनीं प्रस्तुत कादंबरींतील उत्तरार्धांत ठिकठिकाणी सुशीला, बळवंतराव व सुनंदराव यांच्याकडून करविलें आहे त्याचें स्वरूप प्रियब्रह्माने रेखाटलेल्या आदर्श समाजचित्राशीं जमेल असेंच आहे. यांत फक्त कांही तपशील नवा आहे : " हल्लींची समाजव्यवस्था म्हणजे अव्यवस्था आहे...खरा प्रकार असा आहे की समाजाचा पाया डळमळीत आहे अशी लोकांना शंका येऊं लागली आहे.... समाजाचा डोलारा ताबुताप्रमाणें हलत आहे; हा डोलारा एकदां गडगडून पडला तर नवीन इमारत मजबूत पायावर बांधतां येईल अशी कांहीं लोकांना कल्पना सुचूं लागली आहे....आम्हाला वाटतं कीं खाजगी मालमत्तेचीं, दिखाऊ धर्मश्रद्धेचीं आणि ढोंगी शिष्टाचाराचीं खुळं एकदां मोडलीं म्हणजे समाजाला सत्याची भाषा समजूं लागेल आणि ती भाषा तो वापरू लागेल. आणि खऱ्या विचारविनिमयाचा, अन्योन्य साहाय्याचा आणि सात्त्विक आनंदोपभोगाचा

मार्ग मोकळा होईल. '' ह्या सुनंदरावाच्या कांहीं विधानांतील तपशील अगदीं नवा आहे; हा नवा तपशील, दरम्यानच्या काळांत वामनरावांच्या विचार-सरणीवर जो साम्यवादासारख्या नवमतवादाचा परिणाम झाला, त्यामुळे त्यांत अवतरलेला असला तरी त्याच्या मागची तात्त्विक भूमिका 'रागिणी'च्या लेखनापासूनच तयार झालेली असल्यामुळे त्या भूमिकेंतच अधिक रंग भरून ती विशेष सुस्पष्ट करण्यापलीकडे त्याने वेगळें कांहीं साधलें आहे असें वाटत नाहीं. 'रागिणी'तील भूतदयेला आतां अधिक मार्मिक ज्ञानदृष्टीची जोड मिळाली आहे. समाजांतील दुःखाचीं, विषमतेचीं कारणें काय आहेत ह्याची जाणीव असलेली ही ज्ञानदृष्टि केवळ दुबळ्या भूतदयावाद्याचीं नसून डोळस साम्य-वाद्याची आहे असें वाटत असलें, तरी एकांतूनच दुसरी विकसित झाली आहे, हेंच खरें. एवढेंच नव्हे तर असेंहि म्हणतां येईल की पहिलीचें अधिष्ठान अत्यंत अविचल असें असल्यामुळेच दुसरीचें मंदिर त्यावर उभारतां आलें आहे. 'सुशीलेच्या देवांतील' विश्वकुटुंबवाद हा प्रियब्रह्माच्या भूतदया-वादाचाच अधिक विवेकपूर्ण, अधिक शास्त्रशुद्ध, नवमताला अधिक जवळचा असा अवतार आहे; त्याचें हिरीरीनें प्रतिपादन करण्याच्या भरांत त्यामुळे मनांत उद्भवलेल्या एखाद दुसऱ्या शंकेकडे वामनरावांचें दुर्लक्ष झालेलें असलें किंवा तशा प्रकारचें दुर्लक्ष त्यांनी जाणूनबुजून केलेलें असलें तरी तिची कल्पना वाचकास आल्याशिवाय राहत नाहीं. विश्वकुटुंबी समाज-व्यवस्थेमध्यें व्यक्ति-स्वातंत्र्यावर घाला येणार नाही काय ? ह्या बळवंतरावांनी सुशीलेला विचार-लेल्या प्रश्नाचें उत्तर देण्याचें तिने टाळलें आहे व बळवंतराव हे स्वतःच आपल्या शंकेचें पुढेमागे निरसन करतील असें म्हटलें आहे; परंतु कथेच्या शेवटापर्यंत हें शंकानिरसन बळवंतरावांकडून झालेलें नाही मागच्या प्रकरणांत वामनरावांचा मजूरशाहीविरुद्ध किंवा कोणत्याहि शाहीविरुद्ध आक्षेप काय होता, हें स्पष्ट केलेंलंच आहे. तोच व्यक्तिस्वातंत्र्यनाशासंबंधीचा आक्षेप ह्या ठिकाणी वामनरावांनी विश्वकुटुंबवादावर घेतलेला असून त्याचें उत्तर त्यांना सांपडलेलें नाही.

विवाह-संस्थेबाबतचीं वामनरावांचीं मतें कोणत्या स्वरूपाचीं होतीं व त्या संस्थेचें 'पावित्र्य' त्यांना कोणत्या कारणांकरितां सदैव अविचल राहावें असें वाटत होतें तें मागील प्रकरणांत स्पष्ट केलेंलेंच आहे. सुशीलेकडून वामनरावांनी

प्रतिपादलेलीं ह्याच प्रश्नासंबंधीचीं मतें लक्षांत घेतां त्यांच्या वरील सगळ्या मतांतील संगति नीटशी लक्षांत येते. विश्वकुटुंबवादी सुशीलेच्या मतें ' स्त्री पुरुषांचीं मनें विवाहाला अनुकूल झालीं आणि तीं वय, रोगहीनत्व, शिक्षण, अभिरुचि वगैरे दृष्टींनी परस्परांना अनुकूल असलीं म्हणजे मग विवाहविधि हा एक अपत्यांच्या हिताकरितां व समाजाच्या व्यवस्थेकरितां उघडपणें करण्याचा विधि आहे. परस्परांची अनुरुपता व अनुकूलता आहे तोंपर्यंतच या विधीचें बंधकत्व व पावनत्व. " ही अनुरुपता व अनुकूलता नष्ट झाल्यावर तो विवाह न ठरतां केवळ ती एक अगम्यगमनाची कायदेशीर परवानगी ठरते, परस्परांचें प्रेम नसतांना एकमेकांना चिकटून राहणारे स्त्रीपुरुष ' धर्माबद्दलच्या भ्रांतीने अधर्म्य भोग ' घेत असतात असें सुशीला प्रतिपादते. व ह्या दृष्टीने पाहतां हल्लीच्या विवाहपद्धतीमुळे समाजामध्यें अधर्म्यसंबंध किती प्रमाणांत बोकाळत आहे याचा उल्लेख करून सुशीला दुःख व्यक्त करते. सुशीलेचीं हीं सगळींच मतें तिच्या क्रांतिवादी विचारसरणीला साजेशीं असलीं तरी त्यांतही ती अपत्याच्या व समाजाच्या व्यवस्थेकरितां विवाहविधीची जरूरी गृहीत धरते हें लक्षांत घेण्याजोगें आहे. वामनरावांची क्रांतिकारक सुशीला वामनरावांच्या पुढे दोन पाउलें चालत असली तरी तिलाहि त्यांना आवश्यक वाटत असलेलीं कांहीं सामाजिक बंधनें मान्य करावीं लागत आहेत. विवाहसंस्थेचें ' पावित्र्य ' तिने वामनरावांच्या इतक्या निश्चयात्मकतेने प्रतिपादलेलें नसलें तरी त्या संस्थेचें ' पावनत्व ' तिला एका विशिष्ट मर्यादेपर्यंत संपूर्णपणें मान्य आहे असेंच दिसून येतें. क्रांतिवादी सुशीला शेवटीं बळवंतरावाशीं विवाहबद्ध होते हीहि घटना सूचकच आहे.

' इंदु काळे व सरला भोळे ' ह्या आपल्या कथेंतून वामनरावांनी जी विचारसरणी पुढे मांडलेली आहे ती त्यांच्या पहिल्या तिन्हीहि कादंबऱ्यांतील विचारसरणीला पूरकच असली तरी तिचें स्वरूप कांही विशिष्ट प्रश्नांपुरतें मर्यादित आहे. ' रागिणी 'तील भय्यासाहेब किंवा आनंदराव आपल्या इष्ट ध्येयसिद्धीसाठीं विवाहबंधनें तोडून टाकण्यासाठीं किंवा स्वतःवर लादून न घेण्यासाठीं धडपडत असतात: प्रस्तुत कथेंतील नारायण पाठक हा देशाभिमानाच्या वा धर्मजिज्ञासेच्या भावनेने प्रेरित झालेला नसला तरी इतिहाससंशोधन-कार्याच्या मागे लागलेला ज्ञानयोगी आहे व वैवाहिक

बंधनांच्या जाळ्यांत स्वतःस न सांपडूं देण्याचा सारखा प्रयत्न करीत आहे. ज्ञानयोग विरुद्ध प्रेम, देशभक्ति विरुद्ध संसार व कला विरुद्ध नीति अशीं तीन द्वंद्वें वामनरावांनी ह्या कादंबरींतून नारायणराव व काशी ढवळे, विनायकराव व सरला, व इंदु काळे, भाऊ काळे व बिंदुमाधव म्हसकर या तीन जोड्या कल्पून आपल्यापुढे उभीं केलीं आहेत. नारायण पाठक, विनायकराव व इंदु काळे हीं तिघेंहि आपापल्या ध्येयांनी वेडावून गेलीं आहेत. 'जगांतलीं प्रेमं म्हणजे वेडं! शौक कसलाहि असो, तो केव्हां तरी शोककारक व्हावयाचाच!' हें नारायण पाठकाने विनोदबुद्धीने लिहिलेलें वाक्य ह्या कथेचें विचारसूत्र लक्षांत ठेवावयाला सोयीचें आहे. 'जें जितकें दिसण्यांत सुंदर तितकी त्याला कीड लागण्याची भीति अधिक. जें जितकें समाजाला उपकारक तितकें तें व्यक्तीला मारक.' हा त्याच नारायणराव पाठकाने नमूद केलेला सृष्टीचा व इतिहासाचा त्रिकालाबाधित सिद्धांत इंदूच्या कलाप्रेमाला, विनायकरावांच्या देशप्रीतीला व नारायणराव पाठकाच्या संशोधनकार्याच्या वेडाला लावला म्हणजे काय निष्पन्न होते? 'मनुष्यजन्म हा ज्ञानप्राप्तीकरितां नसून देहधर्म संभाळून शक्य तेवढें ज्ञान मिळवावें, शक्य तेवढा कलाविलासाचा आनंद उपभोगावा, शक्य तेवढे इतरांच्या उपयोगी पडून त्यांना आनंद देण्याचा प्रयत्न करावा, एवढ्याकरितां मनुष्यजन्म आहे. केवळ देहसुखाने समाधान व्हावयाचें नाही, कारण आपण पशु नाही. केवळ ज्ञानमार्गाने समाधान व्हावयाचें नाही, कारण आपणाला जिज्ञासेशिवाय इतर आकांक्षाहि आहेत. केवळ कलेच्या पाठीमागे लागून उपयोगी नाही, कारण एकटी कला ज्ञानाची व नीतीची भूक शमवूं शकत नाही. केवळ कर्ममार्ग उपयोगी नाही; कारण ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे व कलेशिवाय आयुष्य नीरस आहे,' अशा प्रकारचें विवरण करून नारायण पाठकास लग्न करून घेण्यास आग्रह करणाऱ्या विनायकरावांच्या वरील वाक्यांतच ह्या कादंबरींतील वामनरावांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें सार आहे. विनायकरावांचा कर्मवाद समाजोपयोगी असला तरी व्यक्तीला 'मारक' झाला आहे असेंच दिसून येते, परंतु त्यांत एकप्रकारचा 'नित्य शाश्वत आनंद आहे, निःश्रेयस सुख आहे' असें वामनरावांचें मत आहे; व तें बरोबरच आहे. विनायकरावांचा ध्येयवाद वा कर्तव्यवाद हा प्रियव्रतांच्या, पूर्णप्रज्ञांच्या व सुशीलेच्या स्वाभिमानविस्मृतीच्या, आत्मयज्ञाच्या, आत्मत्यागाच्या,

सर्वभूतरतवृत्तीच्या विचारसरणीशीं जमेल असाच असल्यामुळे त्याला वामन-रावांचा आशीर्वाद मिळाला यांत नवल नाहीं.

वामनरावांच्या ह्या फक्त चार प्रमुख ललितककथांतून व्यक्त झालेल्या त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें स्वरुप कोणत्या प्रकारचें आहे याची ठोकळपणे चर्चा केली : तिच्यांतून निष्कर्ष निघाला तो असा की त्यांच्या ह्या सगळ्याच ललित-वाङ्मयांत अनुस्यूत झालेलें तत्त्वज्ञान एकरुपात्मक आहे. तें एकाच व्यापक सर्वभूतहितात्मक विचारसरणींतून उत्क्रान्त झालेलें आहे; त्याला अधून मधून सबळ वैचारिकांची जोड मिळालेली असली व कांहीं ठिकाणीं तदंतर्गत कांही विशिष्ट प्रश्नांवरच कटाक्षानें अधिक प्रकाश पाडलेला असला, तरी त्याच्या सुसूत्रपणांत कोठेंहि बिघाड आलेला नाही. अगदीं पहिल्या ललितकथेपासून तो शेवटच्या लिखितापर्यंत तें एकसंध आहे असेंच दिसून येतें. ह्याचें कारण उघडच आहे : वामनरावांनी ज्या काळी आपली पहिली कादंबरी लिहिली त्याच काळी त्यांच्या मनाची एक विशिष्ट स्वरूपाची तात्त्विक बैठक तयार झालेली होती, वाचनाने, मननाने व प्रत्यक्ष आचरणाने त्यांनी आपल्या डोळ्यापुढे नीतिविषयक काहीं विशिष्ट ध्येयें व जीवनविषयक कांहीं विशिष्ट मूल्यें आकारलीं होतीं, त्यांचा निधिध्यास लावून घेतला होता, तीं अंगीं बाणण्याचा प्रयत्न केलेला होता : त्यामुळें त्यांतून अंकुरित झालेलें जीवन-विषयक तत्त्वज्ञान त्यांच्या पुढील ललितकृतींतून अधिक पल्लवित व फलभाराने युक्त झालें आणि अगदीं अखेरपर्यंत त्याच्या पूर्वरुपाला कोठेंहि बाधा आली नाही, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. वामनरावांच्या तत्त्व-चिंतनात्मक वाङ्मयाच्या सागराला येऊन मिळणाऱ्या ह्या त्यांच्या ललितकृतींतील तत्त्व सरितेचें पात्र तिच्या उगमस्थानापाशींच डोळयांत भरेल इतकें विस्तीर्ण आहे : तिला फारशा उपनद्या जशा मिळालेल्या नाहीत तसेंच सागराला येऊन मिळण्यापूर्वी तिने फारशीं वळणेंहि घेतलेलीं नाहीत. ह्या नदींत स्नान केल्यानंतर आपल्यामध्ये ‘ सद्विचार करण्याची व ओळखण्याची, तसेंच सद्भावनांनी प्रेरित होण्याची व त्यांची मूल्यमीमांसा करण्याची शक्ति ’ आलेली आहे, असें जर वाचकांना आढळून आलें तर त्यांत ‘ मला धन्यता वाटेल ’ असे उद्गार स्वतः वामन मल्हारांनीच काढले आहेत.

# इंदु काळे आणि सरला भोळे

## आणखी कांही विचार

'इंदु काळे व सरला भोळे' हें पुस्तक मीं कांही दिवसांपूर्वीं परत एकदां वाचून संपविलें. हें माझें त्या पुस्तकाचें कमींत कमी चवथें वाचन असावें. परंतु मला वाटतें, अजूनहि मी तें पुस्तक परत केव्हांतरी मोठ्या आनंदानें वाचूं शकेन. श्रेष्ठ वाङ्मयाचें वाचन हें मनाची अस्थिरता थोडी फार तरी घालवितें. ज्याप्रमाणें निसर्गाच्या सान्निध्यांत मनाला एक प्रकारचें श्रेष्ठ समाधान लाभतें, चित्तवृत्ति शुचिर्भूत होतात त्याचप्रमाणें श्रेष्ठ वाङ्मयानें होत असावें. कारण आज हें पुस्तक वाचून खालीं ठेवतांना माझ्या मनाची हुरहूर थोडी कमी झाली होती. जीवनाची एक सुजाग जाणीव आपणांस झाली आहे—निदान होत आहे, असें वाटत होतें. 'To understand all is to forgive all' हें इंग्रजी सुभाषित या कादंबरींत एके ठिकाणीं विनायकरावांनीं वापरलें आहे. जें विनायकरावांच्या ठिकाणीं बाणलें होतें तें आपल्याहि ठिकाणीं बाणावयाला हवें असें कादंबरीच्या शेवटीं मला वाटलें. परंतु जगांत हीच गोष्ट अत्यंत कठीण आहे, नाहीं? अगदीं आपल्या जवळच्या व्यक्तींची देखील आपणांस ओळख नसते. मला वाटतें, ही ओळख करून घेण्याचीच आपल्या ठिकाणीं पुरेशी इच्छा नसते. आपण स्वतः-मध्येंच एवढे दंग असतों कीं अगदीं आपल्या भोंवतालच्या व्यक्तींकडेहि त्यांची ओळख करून घेण्याच्या दृष्टीनें आपण बघूंच शकत नाहीं. आपण जे थोडेफार ह्या व्यक्तींना ओळखतों ते त्या व्यक्तींचे व आपले हितसंबंध जेथें खटकतात तेथेंच ओळखीत असतों. म्हणजे आपली त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टि ही शेवटीं स्वार्थपर विचारांनींच प्रेरित असते. ही 'माझी' बायको, हा 'माझा' मित्र, हा 'माझा' भाऊ, ही 'आमची' मोलकरीण, तो 'मला' चांगला वाटतो, 'मला' दुष्ट वाटतो—या प्रत्येक ठिकाणीं 'मी'ला एवढें महत्त्व असतें कीं त्या मानानें ज्या व्यक्तींबद्दल आपण बोलत असतों तिला कांहींच नसतें. पुष्कळसे लेखक हे त्यांनीं रंगविलेल्या व्यक्तींना यथार्थपणें ओळखूं शकतात कीं नाहीं याची मला शंकाच आहे. त्यांच्या लेखनांत जीवनदर्शनापेक्षां आत्मप्रदर्शनाचाच भाग

पुष्कळदां अधिक असतो असें मला वाटतें. वामनरावांच्या ठिकाणीं ही दुसऱ्यांना ओळखण्याची स्वाभाविकच ओढ आहे. ही दुसऱ्यांना ओळखण्याची कला आत्मविस्मृतीशिवाय आपल्या अंगीं बाणणें शक्य नाहीं. स्वतःला विसरल्याशिवाय आपण दुसऱ्यांत रंगून जाऊं शकत नाहीं. 'इंदु काळे व सरला भोळे'-तील विनायकरावांप्रमाणेंच वामनरावहि प्राणिमात्राला समजून घेण्याचा प्रयत्न करितात—म्हणजे प्राणिमात्राचें मन, त्या मनाची प्रक्रिया समजावून घेण्याचा प्रयत्न करितात; व म्हणूनच त्यांच्याबरोबर त्यांचा वाचकहि प्राणिमात्रांच्या बाबतींत संजस आणि क्षमाशील बनूं शकतो. विनायकराव, सरला, इंदु, भाऊ काळे, नारायण पाठक व काशी ढवळे हीं माणसें अमुक एका विशिष्ट प्रकारेंच कां वागतात हें आपणांस कळूं शकतें व म्हणूनच आपणहि त्यांना संपूर्णपणें ओळखूं शकतों, त्यांच्या जीवनाचें सुजाणपणें आकलन करूं शकतों. मला वाटतें, जीवनाकडे सुजाणपणें पाहण्याची वृत्ति जो लेखक आपल्यामध्यें थोड्याफार प्रमाणांत कां होईना, परंतु निर्माण करूं शकतो त्याचें वाङ्मय एक वेगळें समाधान आपणांस देऊं शकतें. कोइस्लरसारख्या एखाद्या अत्यंत बुद्धिमान् लेखकापेक्षांहि असला लेखकच मला अधिक आवडतो.

असल्या लेखकाच्या बाबतींत 'वास्तव' व 'ध्येय' इत्यादींबाबतचे प्रश्न उद्भवत नाहींत. त्यानें घडविलेलें वास्तवाचें दर्शन असेंच असतें कीं तद्वारां 'काय आहे' व 'काय असावें' हें एकाच वेळीं वाचकांच्या लक्षांत येतें. एवढेंच नव्हे तर मनुष्य कसा आहे, त्याची धडपड काय होण्यासाठीं चालू आहे व ह्या धडपडींत तो अयशस्वी कां होत आहे या तिन्हीहि गोष्टींची कल्पना त्यांतून एकदम येऊं शकते.

तद्वारां माणसांच्या ठिकाणीं असणाऱ्या स्वभावसिद्ध उणीवा जशा आपल्या लक्षांत येतात त्याचप्रमाणें त्यांचें सामर्थ्यहि लक्षांत येतें. अशा प्रकारचा लेखक जीवनाचा वास्तवपूर्ण आलेख रेखाटीत असतांच जीवनाचा आदर्श सुचवीत असतो. वामनरावांच्या कादंबऱ्या वाचतांना मला नेहमीं असें वाटतें कीं पुरुष आणि स्त्री हे दोघेहि आपल्या प्रकृतिसिद्ध उणीवांवर मात करून पुष्कळदां चारित्र्याचा केवढा उच्चांक गांठूं शकतात हें सांगण्याची वामनराव पराकाष्ठा करीत असावेत. त्यांची 'सुशीलेचा देव' ही कादंबरी वाचतांना किंवा ही

' इंदु काळे व सरला भोळे ' वाचतांना हीच गोष्ट आपणांस विशेषत्वानें जाणवते. ह्या कादंबऱ्यांच्या जगांत वावरणारे स्त्री-पुरुष आचार-विचारांची जी पातळी गांठण्याचा एकसारखा प्रयत्न करितांना दिसतात ती पातळी जर आपणांस गांठतां आली तर किती बरें होईल असेंच आपणांस त्या कादंबऱ्या वाचतांना वाटतें. बाळू, सुनंदा, सुशीला, किंवा सरला, विनायकराव, भाऊ काळे व नारायणराव ह्यांच्या आचार-विचारांचें जग किती विलोभनीय आहे ! वास्तविक लौकिक अर्थानें हे सगळे दुःखी जीव आहेत. त्यांच्या जीवनांत सुखांपेक्षां दुःखांचाच वांटा जास्त आहे; व ह्या त्यांच्या दुःखी जीवनाचेंच चित्र वामनरावांनीं रेखाटलेलें आहे. परंतु हें त्यांचें वरवर पाहतां दुःखी असलेलें जीवनच आपणांस विलोभनीय वाटतें. त्यांत जो त्यांना एक उच्च प्रकारचा सात्त्विक आनंद लाभत असला पाहिजे तो आनंद आपल्या वांट्याला यावा अशीच आपली मनोमन इच्छा असते. हा मोठा गमतीदार अनुभव आहे नाहीं ! आपल्याला ध्येयवादी वेडे व्हावेसें वाटावें—ध्येयांच्या बरोबर जीं दुःखें येतात तीं सोसावीसें वाटावें हें नवलच नव्हे का ! परंतु असें वाटतें हें खरें; व ह्यालाच मी ' वास्तव ' व ' ध्येय ' यांचा मिलाफ असें म्हणतों. वामनरावांच्या कादंबऱ्या हीच ओढ आपल्या ठिकाणीं उत्पन्न करितात व म्हणूनच जीवन-शिक्षणाच्या दृष्टीनें मी त्यांना विशेष महत्त्व देतों. जीवनाकडे सुजाणपणें पाहण्याचा हीं माणसें आपापल्या परीनें प्रयत्न करीत आहेत हें आपणांस कळून येतें. वामनरावांच्या कादंबऱ्यांतील एकहि महत्त्वाचें पात्र जीवनाला सर्वस्वीं शरण जातांना दिसत नाहीं. प्रत्येकजण जीवनाशीं झगडण्यांतच धन्यता मानीत आहे; व अशा रीतीनें झगडतांना जीं सुखदुःखें अनुभवाला येतात तीं अनुभवीत आहे, असें दिसून येतें; व म्हणूनच ह्या व्यक्ति-चित्रांचा वाचकांच्या मनावर होणारा परिणाम जीवनाला उपकारक ठरल्याशिवाय राहत नाहीं.

ह्या कादंबरीसंबंधीं जी एक गोष्ट मला खटकते ती मात्र येथें लिहून ठेवतों. वामनरावांनीं इंदु काळे, बिंदुमाधव, भाऊराव काळे ह्यांचे मार्फत कलाप्रेम विरुद्ध नीतिप्रेम ह्यामधील अनाद्यनंत झगडा चित्रित केला आहे अशीच आपली समजूत आहे; व ही आपली अशी समजूत व्हावयाला कादंबरींतहि ठिकठिकाणीं आधार आहे. कादंबरींत ह्या प्रकरणीं जे शब्द वापरले आहेत व जीं

वाक्यें योजलेलीं आहेत त्यांतून हाच प्रश्न या व्यक्तींच्या जीवन-चित्रांच्या द्वारां वामनरावांना व्यक्त करावयाचा होता ही गोष्ट सिद्ध होते. परंतु खरोखर ह्या व्यक्तिचित्रांच्या द्वारां वामनराव तो प्रश्न व्यक्त करूं शकले आहेत काय? मला वाटतें, ते प्रस्तुत कादंबरींत सदर प्रश्नाचें सम्यक् दर्शन घडवूं शकलेले नाहींत. नारायणराव पाठक व विनायकराव भोळे ह्यांच्यामार्फत ते जसे ज्ञानजिज्ञासा विरुद्ध प्रेम आणि देशसेवा विरुद्ध संसार ह्या प्रश्नांचें जीवनव्यवहारांतील उग्र स्वरूप दर्शवूं शकले आहेत तसे इंदु काळे व बिंदुमाधव ह्यांच्यामार्फत कला विरुद्ध नीतीचा प्रश्न ते व्यक्तवूं शकलेले नाहींत. याचें कारण अगदीं साधें आहे. कोणत्याहि जीवन-प्रमेयाचें यथार्थ दर्शन जर घडवावयाचें असेल तर लेखकाला त्याची अपरिहार्यता दर्शवावी लागते. जेथें मानवी बुद्धि कुंठित होते तेथेंच खरें प्रमेय निर्माण झालेलें असतें. जो प्रश्न केवळ मानवी बुद्धीनें खटपट करूनहि सोडवितां येत नाहीं त्यालाच प्रमेयाची योग्यता येत असते. म्हणूनच जेव्हां समाजजीवनांतील एखादें प्रमेय हें कथा वा नाटक ह्यांच्या द्वारां चित्रित करावयाचें असतें तेव्हां तें ज्या व्यक्तींच्या जीवनांत निर्माण झालें त्या व्यक्ति सामर्थ्यशाली दाखवाव्या लागतात. जें मी मी म्हणविणाऱ्या मोठमोठ्या बुद्धिमंतांनाहि टाळतां येत नाहीं तें सर्वसामान्यांना टाळतां येत नाहीं हें कांहीं वेगळें सांगावयास नकोच. तेव्हां मी मी म्हणविणाऱ्या बुद्धिमंतांच्या बाबतींत तें प्रमेय निर्माण होतें असें दाखविलें कीं तें सर्वसामान्यांच्या बाबतींतहि निर्माण होईल हें वेगळें सांगण्याची मग गरजच राहत नाहीं. तेव्हां मानवी बुद्धि ह्या प्रमेयाशीं झगडतांना कुंठित झाली आहे असें दाखविण्यांतच त्या प्रमेयाची अपरिहार्यता वाचकांना पटविण्याची शक्यता असते. कलाप्रेम विरुद्ध नीतिप्रेम ह्यांमधील झगडा जर कादंबरींतून दाखवावयाचा असेल तर तो ज्या व्यक्तींच्या जीवनांत दाखवावयाचा त्या व्यक्ती कांहीं लेच्यापेच्या नाहींत ह्याबद्दल प्रथम वाचकांची खात्री झाली पाहिजे; त्या व्यक्ती आपापल्या परीनें असामान्य आहेत, विचारवंत आहेत, व्यक्तित्वसंपन्न आहेत, कर्तव्यदक्ष आहेत, परंतु असें असूनहि कांहीं अव्यक्त शक्तींमुळें म्हणा, मनुष्यसुलभ विकारांमुळें म्हणा किंवा कांहीं अनाकलनीय कारणांमुळें म्हणा, कळत नकळत त्यांना त्या प्रमेयापुढें हात टेकावे लागत आहेत असें दाखविलें गेलें पाहिजे.

तसें ‘ इन्दु काळे आणि सरला भोळे ’ ह्या कादंबरींत दाखविलें गेलेलें नाहीं. सदर कादंबरीमध्यें इन्दु काळे व बिंदुमाधव हीं जीं दोन व्यक्तिचित्रें रेखाटलेलीं आहेत तीं दोन्हीहि कमकुवत मनाच्या दोन व्यक्तींचीं चित्रें आहेत. त्यांतल्या त्यांत बिंदुमाधव ह्या व्यक्तीबद्दल यत्किंचितहि आदर वाचकांच्या मनांत उत्पन्न होत नाहीं; एवढेंच नव्हे तर असल्या यःकश्चित् इसमाच्या आहारीं इन्दु काळे कशी गेली ह्याचेंच आश्चर्य आपणांस सदर कादंबरी वाचीत असतां वाटतें. बिंदुमाधवाच्या व्यक्तिचित्राला वामनराव फारसा उठावच देऊं शकलेले नाहींत. वस्तुतः बिंदुमाधवाचें एकंदर कथानकांतील स्थान फारच महत्त्वाचें आहे; परंतु असें असूनहि त्याचें व्यक्तिचित्र फारसें आकार धरूं शकलेलें नाहीं. कलाप्रेमापोटीं त्याचें ठिकाणीं जें एक प्रकारचें विलोभनीयत्व निर्माण झालें होतें असें वामनराव म्हणतात तें विलोभनीयत्व ते वाचकांना पटवून देऊं शकलेले नाहींत. या विलोभनीयत्वाच्या केवळ वर्णनापेक्षां त्याचें प्रत्यक्ष दर्शन घडविणेंच अधिक इष्ट होतें. परंतु असलें दर्शन वामनराव घडवूं शकले नाहींत. कारण विलोभनीय अशा कलाप्रेमी बिंदुमाधवाची व्यक्तिरेखाच आमच्या डोळ्यापुढें त्यांना नीटशी रेखीवपणें चित्रितां आलेली नाहीं. अशी परिस्थिति असल्यामुळें बिंदुमाधवाचें व्यक्तिचित्र हें एका संधिसाधू भामट्याचें व्यक्तिचित्र ह्या दृष्टीनेंच फक्त आपल्या डोळ्यांत भरतें--तेंहि खरें सांगावयाचें म्हणजे डोळ्यांत भरत असें नाहीं. त्या स्वरूपांत अस्पष्ट का होईना, तें आपल्या डोळ्यापुढें येतें एवढेंच; परंतु एक कलावन्त ह्या स्वरूपांत तें आपल्या डोळ्यापुढें येत नाहीं. कारण कलावन्त हा नीति-अनीतीच्या बाबतींत थोडासा सैल असला तरी ह्या सर्वांपेक्षां त्याला कलेची अधिक चाड असते; कलेच्या आड तो कांहींहि येऊं देत नाहीं. त्याची आपल्या कलेवरील भक्ति ही अव्यभिचारिणी असते. आपल्या कलेच्या आराधनेंत तो रंगलेला असला कीं त्याला शरीरसुखाची त्या क्षणीं तरी दाद नसते. त्याची वृत्ती सर्वच बाबतींत बेपर्वा असते. त्याला फक्त एक आपल्या कलेची पर्वा असते; व ह्या त्याच्या असल्या कलंदर वृत्तीमुळेंच तो विलोभनीय ठरत असतो; त्याच्याभोंवतीं रम्याद्भुततेचें वलय निर्माण होत असतें; व त्याच्याकडे कांहीं व्यक्ती त्यामुळेंच आकृष्ट होत असतात. असल्या कलावंताच्या सहवासांत असतांना मग त्या व्यक्तींना असे अनुभव येतात कीं, ते प्रचलित नीतिकल्पनांना धक्के देणारे ठरतात. मॉमने ‘ Moon and Sixpence ’ या आपल्या नितान्तसुन्दर

वाक्यें योजलेलीं आहेत त्यांतून हाच प्रश्न या व्यक्तींच्या जीवन-चित्रांच्या द्वारां वामनरावांना व्यक्त करावयाचा होता ही गोष्ट सिद्ध होते. परंतु खरोखर ह्या व्यक्तिचित्रांच्या द्वारां वामनराव तो प्रश्न व्यक्त करूं शकले आहेत काय ? मला वाटतें, ते प्रस्तुत कादंबरींत सदर प्रश्नाचें सम्यक् दर्शन घडवूं शकलेले नाहींत. नारायणराव पाठक व विनायकराव भोळे ह्यांच्यामार्फत ते जसे ज्ञानजिज्ञासा विरुद्ध प्रेम आणि देशसेवा विरुद्ध संसार ह्या प्रश्नांचें जीवनव्यवहारांतील उग्र स्वरूप दर्शवूं शकले आहेत तसे इंदु काळे व बिंदुमाधव ह्यांच्यामार्फत कला विरुद्ध नीतीचा प्रश्न ते व्यक्तवूं शकलेले नाहींत. याचें कारण अगदीं साधें आहे. कोणत्याहि जीवन-प्रमेयाचें यथार्थ दर्शन जर घडवावयाचें असेल तर लेखकाला त्याची अपरिहार्यता दर्शवावी लागते. जेथें मानवी बुद्धि कुंठित होते तेथेंच खरें प्रमेय निर्माण झालेलें असतें. जो प्रश्न केवळ मानवी बुद्धीनें खटपट करूनहि सोडवितां येत नाहीं त्यालाच प्रमेयाची योग्यता येत असते. म्हणूनच जेव्हां समाजजीवनांतील एखादें प्रमेय हें कथा वा नाटक ह्यांच्या द्वारां चित्रित करावयाचें असतें तेव्हां तें ज्या व्यक्तींच्या जीवनांत निर्माण झालें त्या व्यक्ति सामर्थ्यशाली दाखवाव्या लागतात. जें मी मी म्हणविणाऱ्या मोठमोठ्या बुद्धिमंतांनाहि टाळतां येत नाहीं तें सर्वसामान्यांना टाळतां येत नाहीं हें कांहीं वेगळें सांगावयास नकोच. तेव्हां मी मी म्हणविणाऱ्या बुद्धिमंतांच्या बाबतींत तें प्रमेय निर्माण होतें असें दाखविलें कीं तें सर्वसामान्यांच्या बाबतींतहि निर्माण होईल हें वेगळें सांगण्याची मग गरजच राहत नाहीं. तेव्हां मानवी बुद्धि ह्या प्रमेयाशीं झगडतांना कुंठित झाली आहे असें दाखविण्यांतच त्या प्रमेयाची अपरिहार्यता वाचकांना पटविण्याची शक्यता असते. कलाप्रेम विरुद्ध नीतिप्रेम ह्यांमधील झगडा जर कादंबरींतून दाखवावयाचा असेल तर तो ज्या व्यक्तींच्या जीवनांत दाखवावयाचा त्या व्यक्ती कांहीं लेच्यापेच्या नाहींत ह्याबद्दल प्रथम वाचकांची खात्री झाली पाहिजे; त्या व्यक्ती आपापल्या परीनें असामान्य आहेत, विचारवंत आहेत, व्यक्तित्वसंपन्न आहेत, कर्तव्यदक्ष आहेत, परंतु असें असूनहि कांहीं अव्यक्त शक्तींमुळें म्हणा, मनुष्यसुलभ विकारांमुळें म्हणा किंवा कांहीं अनाकलनीय कारणांमुळें म्हणा, कळत नकळत त्यांना त्या प्रमेयापुढें हात टेकावे लागत आहेत असें दाखविलें गेलें पाहिजे.

तसें ‘ इन्दु काळे आणि सरला भोळे ’ ह्या कादंबरींत दाखविलें गेलेलें नाहीं. सदर कादंबरीमध्यें इन्दु काळे व बिंदुमाधव हीं जीं दोन व्यक्तिचित्रें रेखाटलेलीं आहेत तीं दोन्हीहि कमकुवत मनाच्या दोन व्यक्तींचीं चित्रें आहेत. त्यांतल्या त्यांत बिंदुमाधव ह्या व्यक्तीबद्दल यत्किंचितहि आदर वाचकांच्या मनांत उत्पन्न होत नाहीं; एवढेंच नव्हे तर असल्या यःकश्चित् इसमाच्या आहारीं इन्दु काळे कशी गेली ह्याचेंच आश्चर्य आपणांस सदर कादंबरी वाचीत असतां वाटतें. बिंदुमाधवाच्या व्यक्तिचित्राला वामनराव फारसा उठावच देऊं शकलेले नाहींत. वस्तुतः बिंदुमाधवाचें एकंदर कथानकांतील स्थान फारच महत्त्वाचें आहे; परंतु असें असूनहि त्याचें व्यक्तिचित्र फारसें आकार धरूं शकलेलें नाहीं. कलाप्रेमापोटीं त्याचें ठिकाणीं जें एक प्रकारचें विलोभनीयत्व निर्माण झालें होतें असें वामनराव म्हणतात तें विलोभनीयत्व ते वाचकांना पटवून देऊं शकलेले नाहींत. या विलोभनीयत्वाच्या केवळ वर्णनापेक्षां त्याचें प्रत्यक्ष दर्शन घडविणेंच अधिक इष्ट होतें. परंतु असलें दर्शन वामनराव घडवूं शकले नाहींत. कारण विलोभनीय अशा कलाप्रेमी बिंदुमाधवाची व्यक्तिरेखाच आमच्या डोळयापुढें त्यांना नीटशी रेखीवपणें चित्रितां आलेली नाहीं. अशी परिस्थिति असल्यामुळें बिंदुमाधवाचें व्यक्तिचित्र हें एका संधिसाधू भामट्याचें व्यक्तिचित्र ह्या दृष्टीनेंच फक्त आपल्या डोळयांत भरतें--तेंहि खरें सांगावयाचें म्हणजे डोळयांत भरत असें नाहीं. त्या स्वरूपांत अस्पष्ट का होईना, तें आपल्या डोळयापुढें येतें एवढेंच; परंतु एक कलावन्त ह्या स्वरूपांत तें आपल्या डोळयापुढें येत नाहीं. कारण कलावन्त हा नीति-अनीतीच्या बाबतींत थोडासा सैल असला तरी ह्या सर्वांपेक्षां त्याला कलेची अधिक चाड असते; कलेच्या आड तो कांहींहि येऊं देत नाहीं. त्याची आपल्या कलेवरील भक्ति ही अव्यभिचारिणी असते. आपल्या कलेच्या आराधनेंत तो रंगलेला असला कीं त्याला शरीरसुखाची त्या क्षणीं तरी दाद नसते. त्याची वृत्ती सर्वच बाबतींत बेपर्वा असते. त्याला फक्त एक आपल्या कलेची पर्वा असते; व ह्या त्याच्या असल्या कलंदर वृत्तीमुळेंच तो विलोभनीय ठरत असतो; त्याच्याभोंवतीं रम्याद्‌भुततेचें वलय निर्माण होत असतें; व त्याच्याकडे कांहीं व्यक्ती त्यामुळेंच आकृष्ट होत असतात. असल्या कलावंताच्या सहवासांत असतांना मग त्या व्यक्तींना असे अनुभव येतात कीं, ते प्रचलित नीतिकल्पनांना धक्के देणारे ठरतात. मॉमने ‘ Moon and Sixpence ’ या आपल्या नितान्तसुन्दर

कथेमध्यें चार्लस स्ट्रिकलँडचें जें चित्र रेखाटलेलें आहे तें असल्या प्रकारच्या खऱ्याखुऱ्या कलावंताचें चित्र आहे; व आपणांस तें चित्र पाहत असतां असें दिसतेंच कीं, स्ट्रिकलँडच्या लौकिक जीवनांत प्रचलित नीतिकल्पनांना स्थान नाहीं. असल्या प्रकारच्या कलावंताचें चित्र रेखाटून मग त्या जीवनचित्रांतून कलावंत व नीति यांच्या अन्योन्य संबंधांवर चांगला प्रकाश पाडितां येतो. येथें वामनराव तसें कांहीं करूं शकलेले नाहींत. बिंदुमाधव म्हस्कर हा जोंपर्यंत खऱ्याखुऱ्या कलावंतांचा प्रतिनिधि होऊं शकत नाहीं, तोंपर्यंत त्याच्याकरवीं घडविलेलें कला व नीति यांच्या अन्योन्य संबंधांविषयींचें दर्शन हें दुबळें, अयथार्थ व अप्रत्ययकारक ठरणें अपरिहार्य आहे.

वामनरावांनीं इंदु काळेचें चित्र रेखाटीत असतां ती एक छानछोकीची आवड असलेली, वरवरच्या दिखावू गोष्टींना भुलणारी मुलगी होती असें अगदीं प्रथमपासूनच दाखविलेलें आहे. अशा प्रकारची दुबळी स्त्री बिंदुमाधव म्हस्करा-सारख्या फक्त नांवाच्या कलावंताला बळी पडली असें दाखविल्यानें कलावंत व नीति यांच्या अन्योन्य संबंधांवर खराखुरा प्रकाश पडतो, असें वाटत नाहीं. जगांत असें दिसून येतें कीं, दोन व्यक्तींना परस्परांबद्दल वाटणारें आकर्षण हें नेहमीं त्यांच्या मनाचा दुबळेपणाच व्यक्त करणारें असतें असें नाहीं. अगदीं सामर्थ्यशाली, व्यक्तित्वसंपन्न व बुद्धिमान् व्यक्तीदेखील ह्या आकर्षणापुढें गोगल-गाय बनतात. पुष्कळ वेळां हें आकर्षण मन त्याविरुद्ध प्रयत्न करीत असूनहि निर्माण होत असतें; हें सर्वच व्यक्तींच्या बाबतींत दिसून येतें; परंतु कलेच्या क्षेत्रांत वावरणाऱ्या ज्या व्यक्ति असतात, त्या स्वाभाविकच थोड्याफार प्रकाशां-तील व्यक्ति असल्यामुळें त्यांच्या जीवनांतील असल्या गोष्टींकडे बहुजनांचें लक्ष एकदम वेधलें जातें, आणि कलावंत हे थोडेफार तऱ्हेवाईक असल्यामुळें ते ह्या बाबतींत बहुजनांच्या नीतिकल्पनांना जेणेंकरून धक्का बसेल असें वर्तन करितांना दिसतात. आतां त्यांचें हें वर्तन समर्थनीय ठरतें कीं ठरत नाहीं हा प्रस्तुत वादाचा मुद्दा नसून कादंबरीच्या द्वारां जेव्हां असल्या गोष्टींचें चित्रण करावयाचें असतें तेव्हां तें कोणत्या दृष्टीनें केलें असतां त्याच्या यथार्थ रूपांत होणें शक्य असतें, तें आपण पहात आहोंत; व ह्या दृष्टीनें विचार करितां सदर कादंबरींतील हीं दोन पात्रें हें दर्शन घडवावयास असमर्थ आहेत असें मला म्हणावयाचें आहे: या दोन्ही पात्रांचयाबद्दल कादंबरीकाराच्या

मनांत कादंबरीच्या सुरवातीपासूनच एक प्रकारची अढी आहे. त्यांचें चित्रण हें पूर्वग्रहदूषित आहे. ज्या सहानुभूतीनें, समंजस वृत्तीनें त्यानें विनायकराव, सरला, नारायणराव पाठक इत्यादींचीं चित्रें रंगविलेलीं आहेत त्या सहानुभूतीनें व समंजसपणानें त्यानें ह्या दोघांचीं चित्रें रंगविलेलीं नाहींत. विनायकराव, सरला, नारायणराव हीं माणसें ज्या ज्या क्षेत्रांत वावरत आहेत, त्या त्या क्षेत्रांतील आदर्श माणसें आहेत, त्यामुळें त्यांच्या जीवनांतील दुःखें हीं आपल्या सहानुभूतीचा विषय बनतात व त्यांच्या जीवनचित्रांच्या द्वारां जीवनांतील कांहीं गूढ सत्यांवर प्रकाशहि पडतो. इंदु काळे व बिंदुमाधव म्हस्कर हीं माणसें त्यांच्या जीवनक्षेत्रांतील आदर्श माणसें नाहींत. इंदू काळे हिची कलासक्ति बेगडी आहे व बिंदुमाधव हा तर वरच सुचविल्या-प्रमाणें एक संधिसाधू भामटा आहे. तेव्हां त्यांच्या जीवन चित्रांमार्फत खऱ्याखुऱ्या कलावंतांच्या किंवा कलाप्रेमी व्यक्तींच्या जीवनांतील गुंतागुती किंवा दुःखें वामनराव व्यक्त करूं शकलेले नाहींत. मला असें वाटतें कीं वामनरावांना जसें विनायकरावांच्या किंवा सरलेच्या किंवा नारायणराव पाठकांच्या भूमिकेचें योग्य आकलन झालेलें होतें व म्हणूनच ते त्यांचीं व्यक्ति-चित्रें जशीं जीवंतपणें रेखाटूं शकले, तसें एखाद्या कलावंताच्या मनोभूमिकेचें त्यांना यथार्थ आकलनच झालेलें नव्हतें. त्यामुळें त्यांची बिंदुमाधवाची व्यक्तिरेखा ही ठोकळेबाज झाली. सांकेतिक झाली. ती चैतन्यरहित ठरली; त्यांना जें तत्त्व त्या भूमिकेमार्फत सूचित करावयाचें होतें तें तत्त्व सूचित करावयाला संपूर्णपणें असमर्थ अशी ठरली.

'इंदु काळे व सरला भोळे' या कादंबरींतील हा माझ्या मतें फार मोठा दोष आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. [illegible]
अनुक्रम 23[illegible] दि. [illegible]
क्रमांक [illegible] नों. दि. 30[illegible]

# वामन मल्हार जोशी
# व
# त्यांचा काळ

१८६४ वि. गो. विजापूरकर : जन्म.
विष्णुबुवा जोग : जन्म. शिवरामपंत परांजपे : जन्म.
ह. ना. आपटे : जन्म.
वि. का. राजवाडे : जन्म.

१८६५ मुंबई विधवाविवाहोत्तेजक मंडळ, स्थापना.
' धनुर्धारी ' ( रा. वि. टिकेकर ) जन्म.

१८६६ पुनर्विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना : संस्थापक : विष्णुशास्त्री पंडित.
केशवसुत : जन्म.
गो. कृ. गोखले : जन्म.

१८६७ प्रार्थनासमाज : स्थापना.
मुंबई वक्तृत्वोत्तेजक सभा : स्थापना.
कार्ल मार्क्सचा ' कॅपिटल ' ग्रंथ प्रसिद्ध झाला.

१८६८ ' विविधज्ञानविस्तार ' मासिक सुरू झालें.
' मंजुघोषा कल्पित कादंबरी '–नारो सदाशिव रिसबुड.

१८६९ मुंबईतील पहिला गाजलेला पुनर्विवाह : करमरकर–परांजपे.
लग्नपत्रिकेवर लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, न्यायमूर्ति रानडे प्रभृतींच्या सह्या.
महात्मा गांधींचा जन्म.
निर्णयसागर छापखाना : स्थापना.

१८७० पुण्यांत पुनर्विवाहावर नऊ दिवस जाहीर चर्चा : विरोधकांचा विजय.
सार्वजनिक सभा, पुणें, स्थापना.

१८७१ श्री. कृ. कोल्हटकर : जन्म.
वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणें : स्थापना.
'दम्भहारक' मासिक सुरू. (बंद १८७५).
चंद्रशेखर गोऱ्हे : जन्म.
'मोजनगड' (पहिली ऐतिहासिक कादंबरी)—ले० रा. भि. गुंजीकर.
'मुक्तामाला' (आवृत्ति ३ री)—लक्ष्मण मोरेश्वर हळबे.

१८७२ न. चिं केळकर : जन्म.
कृ. प्र. खाडिलकर : जन्म.
ल. रा. पांगारकर : जन्म.
'राजा शिवाजी' काव्य—म. मो. कुंटे.
सिव्हिल मॅरेज ॲक्ट.
'देशसुधारणेच्छू'–गोव्यांतील पहिलें मराठी मासिक सुरू.

१८७३ सत्यशोधक समाजाची स्थापना : जोतिबा फुले.
'रासेलस'—कृष्णशास्त्री चिपळूणकर.
'गुलामगिरी'—जोतिबा फुले.
जॉन स्टुअर्ट मिल : मृत्यु. वय ६७.

१८७४ 'निबंधमाला' (विष्णुशास्त्री चिपळूणकर) सुरू झाली. (बंद १८८१)
विष्णुशास्त्री पंडितांनीं पुनर्विवाह केला.
भा. रा. तांबे : जन्म. गोविंद कवि : जन्म.
मिश्रविवाहाचा कायदा.

१८७५ आर्यसमाज स्थापना. दयानंद सरस्वतींचें पुण्यांत आगमन.
'कथारत्नावली' मासिक सुरू.
बालहत्या प्रतिबंधक गृह व अनाथ बालकाश्रम, पंढरपूर : स्थापना.
'वऱ्हाड शालापत्रक' सुरू.

१८७६ ' वेदार्थरत्न ' मासिक सुरू.
१८७६-७७ महाराष्ट्रांतील दुष्काळ.
१८७७ ' दीनबंधु ' सुरू. ' षट्दर्शन-चिंतिका ' मासिक सुरू.
१८७८ कृष्णशास्त्री चिपळुणकर मृत्यु : वय : ५४.
ग्रंथोत्तेजक मंडळीचीं स्थापना : संस्थापक न्यायमूर्ति म. गो. रानडे व लोकहितवादी गो. ह. देशमुख.
मराठी ग्रंथकारांचें संमेलन : पहिलें मराठी साहित्यसंमेलन.
' काव्येतिहाससंग्रह ' मासिक सुरू.
' निबंधसार,' मासिक सुरु; ' वेदांतसमूह ' मासिक सुरु.
१८७९ वासुदेव बळवंताचें बंड.
ब्लॅव्हटस्कींचें मुंबईत आगमन.
थिओसॉफिकल सोसायटीची हिंदुस्थानांत स्थापना.
कवि अनंततनय : जन्म.
ना. म. जोशी : जन्म.
'नाट्यकथार्णव ' मासिक सुरु. ' भारतवर्ष ' मासिक सुरु.
१८८० ' ऐतिहासिक नाटकमाला ' मासिक सुरू.
' पुष्पगुच्छ ' मासिक, मुंबई ,,
न्यू इंग्लिश स्कूल-पुणें, स्थापना.
( ३१ आक्टोबर ) संगीत शाकुंतल नाटकाचा ( अण्णासाहेब किर्लोस्कर )—पहिला प्रयोग, पुणें.
१८८१ ' केसरी ' व ' मराठा ' पत्रें सुरू झालीं.
बालविवाहप्रतिबंधक संस्था—पुणें, स्थापना
' बालबोध ' मासिक सुरू.
१८८२ वामन मल्हार जोशी जन्म, जाने. २१. तळें मुक्कामीं. ता. माणगांव जि. कुलाबा
दादोबा पांडुरंग, मृत्यु, वय ६८.
विष्णुशास्त्री चिपळूणकर, मृत्यु : वय ३२.
नाथमाधव जन्म. र. धों. कर्वे जन्म.

| वा. म. जोशी वय | | |
|---|---|---|
| | १८८२ | पंडिता रमाबाई पुण्यास आल्या.<br>बर्वे प्रकरणीं टिळक–आगरकरांना शिक्षा.<br>वेद पाठशाला, पुणें, स्थापना.<br>' निबंधचंद्रिका,' रत्नागिरी. ' तत्त्वविवेक,' पुणें. (मासिकें )<br>'मालिका मासिक' सुरु. ' राजहंस ' मासिक सुरू.<br>' लोकहितवादी ' मासिक सुरू. |
| १ | १८८३ | वि. दा. सावरकर : जन्म. दयानंद सरस्वती : मृत्यु ५९. |
| २ | १८८४ | केशवसुतांची पहिली कविता.<br>डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.<br>महाराष्ट्र गर्लस् एज्युकेशन सोसायटी ( हुजुरपागा ), पुणें, स्थापना.<br>इंग्लंडमध्यें फेबियन सोसायटीची व सोशालिस्ट लीगची स्थापना.<br>श्री. व्यं. केतकर : जन्म.<br>' नारायणराव आणि गोदावरी '—म. वि. रहाळकर.<br>' आर्यमित्र ', ' कादंबरी कलाप ' ( मुंबई ),<br>' बालसुमित्र ', (मुं.) ' ज्ञानदीप '—मासिकें, सुरू. |
| ३ | १८८५ | ह. ना. आपटे ह्यांची पहिली सामाजिक कादंबरी : " मधली स्थिति "<br>राम गणेश गडकरी : जन्म.<br>आण्णासाहेब किर्लोस्कर : मृत्यु वय ४२.<br>राष्ट्रीय सभेची स्थापना.<br>' धन्वंतरी ', ' हिंदुधर्मविवेचक ', ' नीत्युपदेश ', ' सृष्टिज्ञान ' } मासिकें, सुरू. |
| ४ | १८८६ | चार्लस ब्रॅडलॉ ह्या नास्तिकाला कॉमन्स सभेंत बसण्याची परवानगी मिळाली. हा त्याचा हक्क १८८० सालीं काढून घेण्यांत आला होता. |
| ५ | १८८७ | ' काव्यरत्नावली ' (सं. फडणीस ) ह्या प्रसिद्ध मासिकाचा जन्म.<br>' केरळकोकिळ ' मासिक ( सं. आठल्ये ) सुरू. |

वय

६ १८८८ 'सुधारक' पत्र ( सं. गो ग. आगरकर ) निघालें.
वामनरावांचा गोरेगांव येथें मराठी शिक्षणास प्रारंभ.
नूतन मराठी विद्यालय : स्थापना. पुणें.
बालगंधर्व ( ना. श्री. राजहंस ) जन्म.
लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम : स्थापना. पुणें.
ब्राह्मणसभा, मुंबई, स्थापना.
'राजा शिवाजी' कर्ते कुंटे यांचा मृत्यु. वय ५३

७ १८८९ विधवांकरितां पंडिता रमाबाईनीं 'शारदाश्रम' ही संस्था मुंबईस काढली.
इब्सेनच्या नाटकाचा (ए डॉल्स हाउस) इंग्लंडमध्यें पहिला प्रयोग.
पंचहौद चहा बिस्किटप्रकरण.
नाट्यछटाकार दिवाकर यांचा जन्म.

८ १८९० ह. ना. आपटे ह्यांच्या 'करमणूक' पत्राचा जन्म.
ह. ना. आपटे 'पण लक्षांत कोण घेतो': लेखनप्रारंभ.
बालकवि ( त्र्य. बा. ठोमरे ) : जन्म.
संमतिवयाचा वाद.
समाजसुधारणेच्छू पुढाऱ्यांचें प्रतिज्ञापत्रक : लो. टिळक, नामदार गोखले, ह. ना. आपटे प्रभृति ४१ व्यक्तींच्या सह्या.
जोतिबा फुले : मृत्यु वय ६३.

९ १८९१ 'संमति-वया'चें बिल कलकत्त्याच्या वरिष्ठ कायदेमंडळांत मांडण्यांत आलें व पास झालें.
स्वामी विवेकानंद यांची पुण्यास भेट.
चार्लस् ब्रॅडलॉचा मृत्यु; वय ५८.
'लोकमित्र' मासिक ( सं० सडेकर ) : सुरू.

१० १८९२ आयरिश होमरूल बिल ग्लॅडस्टननें पार्लमेंटांत मांडलें.
लोकहितवादींचा मृत्यु : वय ६९.
न्यायमूर्ति रानडे 'हिंदी अर्थशास्त्रावरील निबंध' प्रसिद्ध.

वय

१० १८९२ ह. ना. आपटे 'यशवंतराव खरे' : लेखनप्रारंभ.
दादाभाई नौरोजी—पार्लमेंटचे सभासद झाले.
'पण लक्षांत कोण घेतो' ह. ना. आपटे-पूर्ण झाली. 'मी' कादंबरीच्या लेखनाला प्रारंभ.
महाराष्ट्रांत लो. टिळकांच्या प्रेरणेनें गणपत्युत्सवाला प्रारंभ.

११ १८९३ लॉर्डस सभेनें आयरिश होमरुल बिल फेटाळलें.
तेरा आठवड्यांचा इंग्लंडमधील कोळसे कामगारांचा संप.
'ओरायन'—लो. टिळक.
मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें, स्थापना.

१२ १८९४ हिंदुमुसलमानांचे दंगे. मुंबईस सुरुवात.
माधवराव पटवर्धन यांचा जन्म.
प्रो. ना. सी. फडके जन्म.
'ग्रंथमाला'-मासिक : प्रो. विजापूरकर : सुरु.
पुनर्विवाहितांचा कुटुंबमेळा १ ला, पुणें.
विधवाविवाहोत्तेजक मंडळ, पुणें. स्थापना.
डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी पुणें, स्थापना.
'मनोरंजन' मासिक सुरू झालें.
ग्लॅडस्टनचा राजीनामा.

१३ १८९५ आगरकरांचा मृत्यु : वय ३९.
'ब्राह्मण आणि त्यांची विद्या'-म. शि. गोळे.
ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळी, मुंबई, स्थापना.
रायगडावर शिवाजी उत्सव करण्याचें ठरलें.
हरीभाऊंची 'उष:काल' कादंबरी प्रसिद्ध झाली.
आयर्लंडमध्यें एका गांवीं एका बाईला ती चेटकीण आहे, ह्या समजुतीनें लोकांनीं जाळून टाकलें.

वामन मल्हार यांचें इंग्रजी शिक्षण पुण्यास सदाशिव श्रीधर कोंडेकर ह्यांनी काढलेल्या न्यू प्रेपरेटरी क्लासमध्ये सुरू.
शिक्षक : शंकरराव लवाटे, लक्ष्मणराव पांगारकर वगैरे.

वय

१३ १८९५ लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची स्थापना.

१४ १८९६ मुंबईस प्लेगची साथ : तेथून पुण्यांत व इतरत्र.
श्री शिवाजी उत्सव, रायगडावर सुरू.
डेक्कन सभा स्थापना–पुणें.
अनाथ बालिकाश्रम अथवा Hindu Widow's Home पुणें, स्थापना.
आल्फ्रेड नोबेल यांचा मृत्यु : वय ६३.

१५ १८९७ पुण्यांत सोजिरांचा धुमाकूळ.
लकडी पुलाजवळील विठोबाच्या देवळांत शि. म. परांजपे यांचें सुप्रसिद्ध व्याख्यान : विषय ' राजसूय यज्ञ '.
रँड व आयर्स्ट यांचे पुण्यांत खून.
'ऐतिहासिक लेखसंग्रह' मासिक मिरजला, सुरू.
गोखले माफी प्रकरण.
आर्यन एज्युकेशन सोसायटी, मुंबई, स्थापना.
टिळकांना अटक व शिक्षा.
' पुणेंवैभव ', वाईचें 'मोदवृत्त' व इस्लामपूरचें ' प्रतोद ' ह्यांजवर खटले.
चाफेकरांना अटक.
पुनर्विवाहितांचा कुटुंबमेळा २ रा. अमरावती.
अमरावतीची मवाळ काँग्रेस : टिळकांना झालेल्या शिक्षेचा निषेध झाला नाहीं.
व्हिक्टोरिया राणीचा हीरक महोत्सव.
इंग्लंडकडून आफ्रिडी बंडाचा बीमोड.
हरिभाऊ आपटे ' जग हें असें आहे ' लेखनप्रारंभ.
महादेव मल्हार एम्. ए. झाले; व नोकरीस लागले.

वामन मल्हार यांचें इंग्रजी शिक्षण पुण्यास सदाशिव श्रीधर करंदीकर ह्यांनीं काथलेल्या न्यू प्रेपरेटरी क्लासिसमध्यें चालू.

| | | |
|---|---|---|
| वय १६ | १८९८ | महादेव मल्हार यांची अहमदनगर येथें हेडमास्तर म्हणून नेमणूक. |
| | | अहमदनगर येथें वामन मल्हार मॅट्रिकच्या वर्गात दाखल : सहाध्यायी : (डॉ.) पां. दा. गुणे, (सेनापति) पां. म. बापट वगैरे. |
| | | 'हिंदुधर्म आणि सुधारणा'. म. शि. गोळे : |
| | | वि. स. खांडेकर : जन्म. |
| | | मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय : स्थापना. |
| | | धनुर्धारी (रा. वि. टिकेकर) यांची 'वाईकर भटजी' प्रसिद्ध. |
| | | शिवरामपंत परांजपे : 'काळ' पत्र सुरू झालें. |
| १७ | १८९९ | वामनराव मॅट्रिकची परीक्षा नापास झाले. |
| | | द्रवीड बंधूंचे खून : चाफेकर, रानडे ह्यांना फांशी. |
| | | शिवरामपंतांना सरकारकडून समज. |
| | | हरीभाऊंची 'जग हें असें आहे' पूर्ण झाली. |
| | | बोअर युद्धाला प्रारंभ. |
| | | साने गुरुजी : जन्म. |
| | | मुंबई इलाख्यांत दुष्काळ. (१८९९–१९००) |
| | | गो. ब. देवल 'शारदा' नाटक. |
| | | 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें'—वि. का. राजवाडे. |
| १८ | १९०० | वामन मल्हारांची मॅट्रिकची परीक्षा उतरली : नंबर बराच वर आल्यामुळें शिष्यवृत्ति. |
| | | प्रसिद्ध तत्त्वज्ञ नीत्से ह्यांचा मृत्यु : वय ५६. |
| | | 'धी राइज ऑफ धी मराठा पॉअर'–न्यायमूर्ति रानडे. |
| | | ऑस्ट्रेलियाला कॉमनवेल्थचा दर्जा. |
| | | ग. त्र्यं. माडखोलकर : जन्म. |
| १९ | १९०१ | डेकन कॉलेजांत वामनराव दाखल झाले. कॉलेजच्या टेनिस ज्यूनियर सामन्यांत पहिलें पारितोषिक. |
| | | न्यायमूर्ति रानडे : मृत्यु वय ५९. |

| वय | | |
|---|---|---|
| १९ | | इंटरच्या वर्गात असतांना वामनराव जोशी ह्यांचा गुळसुंदे येथें राहणाऱ्या जोशी कुटुंबांतील मुलीशीं विवाह.<br>महादेव मल्हारांची जुनागडला बुद्रुद्दिन कॉलेजांत संस्कृतचे प्रोफेसर म्हणून नेमणूक.<br>पहिलें नोबेल शांतता पारितोषिक देण्यांत आलें.<br>व्हिक्टोरिया राणीचा मृत्यु : वय ८१. |
| २० | १९०२ | 'धाकट्या सूनबाई'—का. र. मित्र, मनोरंजन ग्रंथप्रसारक मंडळीचें पहिलें प्रकाशन.<br>बंगालच्या फाळणीचा प्रश्न :<br>वेदोक्त प्रकरण : कोल्हापूर.<br>नेपाळ प्रकरण : खाडिलकर नेपाळांत गेले.<br>बिनतारी तारायंत्र.<br>बोअर युद्ध थांबलें. |
| २१ | १९०३ | 'डेक्कन कॉलेज क्वार्टर्ली'मध्यें वामनरावांचा पहिला लेख प्रसिद्ध झाला: 'थंडीनें गोठलेले शब्द' (अनुवादित)<br>श्रीपाद कृष्णांचा 'साहित्यवत्तिशीं' तील पहिला विनोदी लेख 'कुलूप' 'विविधज्ञानविस्तारा'च्या जानेवारीच्या अंकांत प्रसिद्ध झाला.<br>बर्नार्ड शॉनें 'मॅन् अँड सुपरमॅन' लिहिलें.<br>'रंगराव'—काशीबाई कानिटकर.<br>'आर्टिक होम इन् दि वेदाज'—लो. बा. गं. टिळक.<br>एमिल झोला : मृत्यु वय ६२.<br>एच्. जी. वेल्स फेबियन सोसायटींत दाखल झाले.<br>हरबर्ट स्पेन्सर मृत्यु : ८३. |
| २२ | १९०४ | वामनराव बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले.<br>पैसाफंड कमेटी : स्थापना.<br>'ज्ञानप्रकाश' दैनिक झालें.<br>चेकाव्हचा मृत्यु : वय ४४. |

| वय | | |
|---|---|---|
| २३ | १९०५ | बंगालची फाळणी जाहीर झाली. |
| | | बंगालमध्यें क्रांतिकारक संस्थांचा उदय. |
| | | ना. गोखले व बॅ. जीना ह्यांना विलायतेंत चळवळ करण्याकरितां पाठविण्याचें ठरलें. |
| | | भारतसेवक समाज–पुणें, स्थापना. |
| | | केशवसुत मृत्यु : वय ३९. |
| | | ' सायंकाळची करमणूक ', ' प्रेमवेडा ' } नाथमाधव. |
| | | ' मृणालिनी '—का. र. मित्र. |
| | | कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं विद्यापीठाच्या पूर्वपरीक्षेसाठीं स्वदेशी कागद मागितला. |
| | | प्रो. विजापूरकरांना कोल्हापूर कॉलेजांतून काढून टाकले. |
| २४ | १९०६ | वामनराव तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन एम्. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. |
| | | कलकत्त्याची काँग्रेस : अध्यक्ष दादाभाई नौरोजीः स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ह्या चतुःसूत्रीची घोषणा–वामनरावांचें कलकत्त्याला प्रयाण–विजापूरकरांची भेट––विजापूरकरांची राष्ट्रीय शिक्षणाची योजना–– |
| | | ८ जून १९०६ रोजीं कोल्हापुरांत समर्थ विद्यालयाची स्थापना : |
| | | वामनराव विद्यालयांत रुजू झाले. सहकारी : ज. स. करंदीकर, सखारामबापू देसाई वगैरे. |
| | | वामनराव जोश्यांवर विजापूरकरांच्या ' विश्ववृत्त ' मासिकाच्या संपादनाची जबाबदारी. |
| | | ' सुधारणेचा मध्यकाळ '—बा. सं. गडकरी. |
| | | ' भाला ' पत्रावर खटला. |
| | | ' महाराष्ट्र साहित्य परिषद् ' स्थापना. |
| | | बाबा पदमनजी मृत्युः वय ७९. इब्सेनचा मृत्यु : वय ७८. |
| | | वा. गो. आपटे : 'आनंद' मासिक सुरू. |

वय

२५ १९०७ सुरतेची काँग्रेस. जहाल मवाळांचा झगडा. व्यासपीठावर पुणेरी जोडा.

सभाबंदीचा कायदा.

' खेळगडी ' मासिक, महाडला सुरू.

खाडिलकरांचें 'कीचकवध' नाटक.

धनुर्धारी ( रामचंद्र विनायक टिकेकर ) मृत्यु : वय ४५.

म. शि. गोळे : मृत्यु वय ४९.

राजारामशास्त्री भागवत : मृत्यु वय ५६.

२६ १९०८ ' विश्ववृत्तां 'त पं. सातवळेकरांचा ' वैदिक धर्माची तेजस्विता ' हा लेख प्रसिद्ध झाला.

वामनराव व विजापूरकर यांना अटक व शिक्षा.

वामनरावांना तीन वर्षें सक्त मजूरी व १००० रुपये दंड. कराचीच्या तुरुंगांत रवानगी.

शिवरामपंतांना अटक व १९ महिन्यांची शिक्षा.

लो. टिळकांना अटक : ६ वर्षें हद्दपारी. टिळकांचें बचावाचें भाषण ८ दिवस.

टिळकांना झालेल्या शिक्षेच्या निषेधार्थ मुंबईत मजुरांचे दंगे.

पैसाफंड कांचशाळा : तळेगांव : स्थापना.

' परवाची गोष्ट किंवा जग हें असेंच '—नाथमाधव.

' समर्थ विद्यालय ' तळेगांव दाभाडे, (स्थलांतर).

खुदीराम बोस व प्रफुल्लदत्त चक्रवर्ती यांनीं मुजफरपूरला केलेले युरोपियनांचे खून.

२७ १९०९ ना. म. जोशी 'भारत सेवक समाजास' जाऊन मिळाले.

नाशिकच्या कलेक्टरचा खून.

मोर्ले मिंटो सुधारणा.

सेवासदन पुणें–स्थापना.

अनाथ विद्यार्थी-गृह पुणें–स्थापना.

'राष्ट्रोदय' मासिक (नाशिक) सुरू. सं. सी. के. दामले.

| | | |
|---|---|---|
| वय | | सावरकर बंधूंचा खटला. |
| २७ | | कान्हेरे, कर्वे, देशपांडे फांशी गेले. |
| | | कालिकामूर्ति ( भाग १-२ ) ना. गो. दातार. दातारांची पहिली कादंबरी : ( रेनाल्डचें भाषांतर-पुढें रेनॉल्डाच्या कादंबऱ्यांचीं अनेक भाषांतरें दातारांनीं केलीं ). |
| | | 'लीला'—का. र. मित्र. ( आवृत्ति २ री ). |
| | | 'बंगल्यांतील पहिलें गुप्त मंडळ'—नाथमाधव. |
| | | किर्लोस्कर नाटकगृह, पुणें, उद्घाटन. |
| | | काव्यसंग्रह-मासिक बंद. |
| | | कवि विनायक वारले. |
| | | 'काळ' राजद्रोह खटला. |
| | | उत्तर ध्रुवाचा शोध. |
| २८ | १९१० | समर्थ विद्यालयाची झडतीः विद्यालय बेकायदा ठरलें. |
| | | 'काळ' पत्र बंद झालें. 'विश्ववृत्त' बंद पडलें. |
| | | 'प्रेमसंयोग'—वि. सी. गुर्जर. ( पहिली कादंबरी ). |
| | | 'रमा आणि माधव'— का. र. मित्र. ( आ. २ री ). |
| | | भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें स्थापना. |
| | | 'समाजकंटक अथवा वेणू'—प्र. श्री. भसे. भारत गौरव ग्रंथमाला पहिलें पुष्प. |
| | | टॉलस्टॉय मृत्यु : वय ८२. |
| | | मार्क ट्वेन मृत्यु : वय ७५. |
| | | सातवा एडवर्ड : मृत्यु वय ६८. |
| २९ | १९११ | जुनागड मुक्कामीं वामनराव जोशी यांच्या मातेचें निधन. |
| | | ऑक्टोबरमध्यें तुरुंगांतून सुटका. |
| | | सावरकरांना जन्मठेप. |
| | | 'सुधा'—शारदाश्रमवासी. |
| | | सरकारनें बंगालची फाळणी रद्द केली. |
| | | आन्तर्देशिय कॉपिराइट कायद्यांत सुधारणा. |

वय

२९ ‘ श्रुतिबोध ’ मासिक सुरू झालें. ( बंद १९१४ )
समाजशुद्धि मंडळ, मुंबई स्थापना.
दिल्ली राजधानी झाली.
केसरी–मराठा संस्थेंत वामनराव काम करूं लागले.

३० १९१२ गोखले आफ्रिकेस गेले व परतले.
हरीभाऊंची ‘ मायेचा बाजार ’ कादंबरी पुरी झाली.
आर्यभूषण छापखान्यांत वामनरावांनीं इंग्रजी मराठी कोशाचें काम केलें. ( काम अपुरें राहिलें ).
‘ हीरकवलय ’— वि. सी. गुर्जर.
‘ लोकशिक्षण ’ मासिक सुरू.
महाराष्ट्र साहित्य संमेलन ७ वें, अकोला, विदग्ध वाङ्मयाची व्याख्या. ह. ना. आपटे.
मराठी ग्रंथालय, पुणें स्थापना.

३१ १९१३ कुटुंबशिक्षणमाला प्रथम पुष्प : सहकारी कृष्ण : “ ही प्रेमाची मूस कां पुरुषार्थाची कूस ? ’
‘ महाराष्ट्र साहित्य पत्रिका ’ ( विविधज्ञानविस्तारांगत ) प्रारंभ.
‘ विहंगवृंद ’–नाथमाधव.
‘ नवयुग ’ मासिक निघालें.
हरीभाऊंची ‘ कर्मयोग ’ कादंबरी : लेखनप्रारंभ.
‘ जग हें त्रिविध आहे ’—सी के. दामले.
‘ आजपासून पन्नास वर्षांनी ’—कृ. के. गोखले.
सिडने वेब व बियॅट्रिस वेब यांच्या नेतृत्त्वाखालीं ‘ धी न्यू स्टेटस्मन ची स्थापना. बर्नार्ड शॉची आर्थिक मदत.
तात्या नेमिनाथ पांगळ यांची ‘ सरस वाङ्मय रत्नमाला ’ प्रारंभ.
रविंद्रनाथ टागोरांना नोबेल पारितोषिक.
पुनर्विवाहितांचा कुटुंबमेळा ३ रा, पुणें.

| वय | | |
|---|---|---|
| | | स्वामी विवेकानंद–समग्र ग्रंथ—भाग १ ते १३. ले. ग. वा. गोगटे ( लेखनप्रारंभ ) |
| | | 'जाईचा मंडप ' खंड १ ला, ले. जातिहृदय |
| | | ' कपटजाल '— ना. ह. आपटे. |
| ३२ | १९१४ | पहिलें जागतिक महायुद्ध, प्रारंभ. |
| | | टिळकांची मुक्तता. पनामा कालवा सुरू झाला. |
| | | महादेव मल्हार यांची ' सुशिक्षितांचा वेदान्त ' ही 'केसरीं'तील लेखमाला सुरू झाली. |
| | | ' संसार असार '— वि. सी. गुर्जर. |
| | | ' जाईचा मंडप '—खंड २ रा ले. जातिहृदय. |
| | | ' रायक्लब भाग १–२ '— नाथमाधव. |
| | | ' माणिकबाग '—वा. गो. आपटे. |
| ३३ | १९१५ | ' रागिणी 'चें लेखन व प्रसिद्धी. (' मनोरंजन ' मधून प्रथम प्रकरणशः ) |
| | | ' साक्रेटिसाचे संवाद ', वा. म. जोशी : लेखनप्रारंभ. |
| | | ' गीतारहस्य '—बा. गं. टिळक. |
| | | ' न्याय कीं अन्याय '—सी. के. दामले. |
| | | ' ग्रहदशेचा फेरा ' – नाथमाधव. |
| | | ' अपराध कोणाचा ? '–मा. दा. अळतेकर. |
| | | ' आधुनिक सुशिक्षितांचा वेदांत : ' म. म. जोशी. |
| | | प्रो. आइन्स्टाइन ह्यांचा ' सापेक्षतावादा ' चा सिद्धांत जाहीर झाला. |
| | | म. गांधींचें हिंदुस्थानांत आगमन. |
| | | म. गांधी : साबरमती आश्रमाची स्थापना. |
| | | नामदार गोखलेः मृत्यु. वय ५९. फेरोजशहा मेथा : मृत्यु. |
| ३४ | १९१६ | 'आश्रमहरिणी ' : वा. म. जोशी. ( ' मराठामित्र ' मासिकांतून प्रथम क्रमशः प्रसिद्ध ) |
| | | ' साक्रेटिसाचे संवाद ' लेखन चालू. |

| | | |
|---|---|---|
| वय | | ' श्रुतिबोध ' मासिक सुरू झालें. ( बंद १९१४ ) |
| २९ | | समाजशुद्धि मंडळ, मुंबई स्थापना. |
| | | दिल्ली राजधानी झाली. |
| | | केसरी–मराठा संस्थेंत वामनराव काम करूं लागले. |
| ३० | १९१२ | गोखले आफ्रिकेस गेले व परतले. |
| | | हरीभाऊंची ' मायेचा बाजार ' कादंबरी पुरी झाली. |
| | | आर्यभूषण छापखान्यांत वामनरावांनीं इंग्रजी मराठी कोशाचें काम केलें. ( काम अपुरें राहिलें ). |
| | | ' हीरकवलय '— वि. सी. गुर्जर. |
| | | ' लोकशिक्षण ' मासिक सुरू. |
| | | महाराष्ट्र साहित्य संमेलन ७ वें, अकोला, विदग्ध वाङ्मयाची व्याख्या. ह. ना. आपटे. |
| | | मराठी ग्रंथालय, पुणें स्थापना. |
| ३१ | १९१३ | कुटुंबशिक्षणमाला प्रथम पुष्प : सहकारी कृष्ण : " ही प्रेमाची मूस कां पुरुषार्थाची कूस ? ' |
| | | ' महाराष्ट्र साहित्य पत्रिका ' ( विविधज्ञानविस्तारांगत ) प्रारंभ. |
| | | ' विहंगवृंद '–नाथमाधव. |
| | | ' नवयुग ' मासिक निघालें. |
| | | हरीभाऊंची ' कर्मयोग ' कादंबरी : लेखनप्रारंभ. |
| | | ' जग हें त्रिविध आहे '—सी के. दामले. |
| | | ' आजपासून पन्नास वर्षांनी '—कृ. के. गोखले. |
| | | सिडने वेब व बियॅट्रिस वेब यांच्या नेतृत्त्वाखालीं ' धी न्यू स्टेटस्मन ची स्थापना. बर्नार्ड शॉची आर्थिक मदत. |
| | | तात्या नेमिनाथ पांगळ यांची ' सरस वाङ्मय रत्नमाला ' प्रारंभ. |
| | | रविंद्रनाथ टागोरांना नोबेल पारितोषिक. |
| | | पुनर्विवाहितांचा कुटुंबमेळा ३ रा, पुणें. |

| वय | | |
|---|---|---|
| | | स्वामी विवेकानंद–समग्र ग्रंथ—भाग १ ते १३. ले. ग. वा. गोगटे ( लेखनप्रारंभ )<br>'जाईचा मंडप' खंड १ ला, ले. जातिहृदय<br>'कपटजाल'— ना. ह. आपटे. |
| ३२ | १९१४ | पहिलें जागतिक महायुद्ध, प्रारंभ.<br>टिळकांची मुक्तता. पनामा कालवा सुरू झाला.<br>महादेव मल्हार यांची 'सुशिक्षितांचा वेदान्त' ही 'केसरीं'तील लेखमाला सुरू झाली.<br>'संसार असार'— वि. सी. गुर्जर.<br>'जाईचा मंडप'—खंड २ रा ले. जातिहृदय.<br>'रायक्लब भाग १–२'—नाथमाधव.<br>'माणिकबाग'—वा. गो. आपटे. |
| ३३ | १९१५ | 'रागिणी'चें लेखन व प्रसिद्धी. ('मनोरंजन' मधून प्रथम प्रकरणशः )<br>'साक्रेटिसाचे संवाद', वा. म. जोशी : लेखनप्रारंभ.<br>'गीतारहस्य'—बा. गं. टिळक.<br>'न्याय कीं अन्याय'—सी. के. दामले.<br>'ग्रहदशेचा फेरा' – नाथमाधव.<br>'अपराध कोणाचा ?'–मा. दा. अळतेकर.<br>'आधुनिक सुशिक्षितांचा वेदांत :' म. म. जोशी.<br>प्रो. आइन्स्टाइन ह्यांचा 'सापेक्षतावादा'चा सिद्धांत जाहीर झाला.<br>म. गांधींचें हिंदुस्थानांत आगमन.<br>म. गांधी : साबरमती आश्रमाची स्थापना.<br>नामदार गोखलेः मृत्यु. वय ५९. फेरोजशहा मेथा : मृत्यु. |
| ३४ | १९१६ | 'आश्रमहरिणी' : वा. म. जोशी. ( 'मराठामित्र' मासिकांतून प्रथम क्रमशः प्रसिद्ध )<br>'साक्रेटिसाचे संवाद' लेखन चालू. |

१५

वय

वामनरावांनीं केसरी संस्थेची नोकरी सोडली; ४–५ महिने वेकार.

मुंबईस अ. ब. कोल्हटकर यांच्या ' मेसेज ' ह्या इंग्रजी दैनिकाचे दुय्यम संपादक.

' नवपुष्पकरंडक ': वा. म. जोशी. प्रसिद्ध झालें.

प्रो. कर्वे यांनीं ' महिला विद्यापीठा 'ची योजना जनतेपुढें मांडली. विद्यापीठाची स्थापना.

मराठी ज्ञानकोशाचें काम सुरू. सं. डॉ. श्री. व्यं. केतकर.

' देशमुखवाडी '—नाथमाधव.

सुरस ग्रंथप्रसारक मंडळी : सुरस ग्रंथमाला : पुष्प १ लें.

' गोषांतील सुंदर स्त्रिया '–वालचंद रामचंद कोठारी

( रेनॉल्डच्या ' लव्हज ऑफ दी हॅरम ' चें भाषांतर )

होमरुल लीगची स्थापना; लखनौ करार.

गो. ब. देवल : मृत्यु वय ६२.

३५ १९१७ वामनरावांनीं ' मेसेज ' व मुंबई सोडलीं.

' प्रियंवदा ' : का. र. मित्र. ( आ. ४ )

' तिलोत्तमा '– कृ. के. गोखले

' अल्ला हो अकबर '–ना. सी. फडके ( पहिली कादंबरी )

' विमलेची ग्रहदशा '–नाथमाधव.

कलकत्ता कॉंग्रेसः टिळकांचें शिष्टमंडळ विलायतला निघालें. मज्जाव. टिळकांचें चिरोल खटल्याच्या निमित्तानें विलायतगमन.

रशियांतील राज्यक्रांतिः १ फेब्रु. लोकशाही ( केरेन्सी ),
२ ऑक्टो. कम्युनिस्टः ( लेनिन )

दादाभाई नवरोजी, मृत्यु वय. ९२

जबाबदारीच्या स्वराज्याची घोषणा.

भांडारकर प्राच्य संशोधन मंदिर, पुणें, स्थापना.

म. गांधींच्या मनांत चरख्यावर काढलेला सुताची कल्पना प्रथम रुजली.

वय म. गांधी चंपारण्यांत जातात.

३६ १९१८ हिंगणें येथील प्रो० कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रम संस्थेस वामनराव मिळाले.

महिला पाठशाला कॉलेजांत वामनराव प्रोफेसर.

इन्फ्लुएंझाची साथ.

मुंबई इलाखाभर दुष्काळ. ( १९१८-१९ )

वामनरावांच्या पत्नी निवर्तल्या.

' गोविंदाची गोष्ट ' : शि. म. परांजपे.

' दुःखाअन्तीं सुख '-वा. गो. आपटे.

' दोनशें वर्षांपूर्वी '-सी. के. दामले.

' हतभागिनी '-वि. सी. गुर्जर.

पहिल्या महायुद्धाचा शेवट.

मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा रिपोर्ट.

तीस वर्षें व त्यावरील वयाच्या स्त्रियांना इंग्लंडमध्यें मतदानाचे हक्क मिळाले.

बालकवि ( त्र्यंबक बापूजी ठोमरे ) मृत्युः वय २८.

३७ १९१९ ' नलिनी ' : वा. म. जोशी. प्रकाशन.

' नीतिशास्त्रप्रवेश ' : वा. म. जोशी. प्रकाशन.

चिरोल खटल्याचा टिळकांविरुद्ध निकाल.

टिळक विलायतहून आले.

रौलट ॲक्ट पास झाला. पंजाब प्रकरण : गांधींनीं ठरविलेला आत्मशुद्धीचा दिवस.

जालियनवाला बाग येथें गोळीबार : हंटर कमिशन.

एप्रिल ६—अखिल भारतीय सत्याग्रहाला प्रारंभ. अखिल देशभर हरताळ.

रे. ना. वि. टिळक, मृत्यु, वय ५७.

राम गणेश गडकरी : मृत्यु, वय ३४

हरि नारायण आपटे : मृत्यु, वय ५५

' डॉक्टर कादंबरी ' भाग १-३ नाथमाधव

| | | |
|---|---|---|
| वय | | ' शांताराम ' : मा. दा. अळतेकर.<br>गिरणी मजुरांचा संप, मुंबई.<br>तृतीय ( कम्युनिस्ट ) इंटर नॅशनलची स्थापना.<br>महात्मा गांधींनीं ' यंग इंडिया ' ह्या इंग्रजी साप्ताहिकाची व 'नवजीवन' मासिकाची संपादकीय जबाबदारी स्वीकारली. |
| ३८ | १९२० | लोकमान्य टिळक मृत्यु : वय ६४.<br>शिवरामपंतांचें ' स्वराज्य ' पत्र सुरू झालें.<br>गिरणी मजुरांचा संप, मुंबई.<br>असहकारितेचें युग सुरू झालें.<br>लीग ऑफ नेशन्सची बैठक.<br>ब्रिटिश कम्युनिस्ट पार्टीची स्थापना.<br>' मूर्तिमंत गुलामगिरी '–कृ. के. गोखले.<br>' पौर्णिमेचा चंद्र '–वि. सी. गुर्जर.<br>'किर्लोस्कर खबर' मासिक, सं. शं. वा. किर्लोस्करः सुरू झालें.<br>' ज्ञानकोश ' प्रस्तावना खंड, विभाग १ ला प्रसिद्ध झाला. सं. श्री. व्यं. केतकर.(ज्ञानकोश लेखनकाल१९२०–१९२९)<br>वा. ब. पटवर्धनः मृत्यु.<br>कवि रेंदाळकरः मृत्यु. वय ३३.<br>विष्णुबुवा जोग मृत्यु : वय ५६ |
| ३९ | १९२१ | ' साक्रेटिसाचे संवाद '--वा. म. जोशी. प्रकाशन.<br>असहकारितेची चळवळ : विद्यार्थ्यांनीं कॉलेजें सोडलीं.<br>ना. म. जोशी ह्यांनीं सी. आय. इ. किताब नाकारला.<br>स्वराज्य फंड–एक कोट रुपये.<br>मुळशी सत्याग्रह.<br>राजपुत्र मुंबईस आले : विलायती कपड्यांची होळीः पार्शी विरुद्ध हिंदुमुसलमान : लढा.<br>म. गांधींना कॅाँग्रेसने सर्वाधिकार दिले.<br>आयरिश फ्री स्टेटची स्थापना.<br>' उद्यान ' ' नवयुग ' मासिकांचे संपादक व कादंबरी- |

कार ग. वि. कुळकर्णी : मृत्यु : वय ३२.

वय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें, स्थापना.

४० १९२२ म. गांधींना शिक्षा. यंग इंडियांतील लेख आक्षिप्त.

फेर-नाफेर वाद.

टिळक महाविद्यालयाची स्थापना.

नागपूर-झेंडा सत्याग्रह.

'देवता'–वि. सी. गुर्जर ( दु. आ. )

'सापत्नभाव'–नाथमाधव.

'श्रीनिवासराव'–नाथमाधव.

पंडिता रमाबाई : मृत्यु.

बडोदें साहित्य संमेलन : अध्यक्ष : न. चिं. केळकर : काव्यानंदाची उपपत्ति.

४१ १९२३ रविकिरणमंडळ : स्थापना.

'दैनिक लोकमान्य' कार खाडिलकर यांचें 'नवाकाळ' पत्र सुरू झालें.

'महाराष्ट्र साहित्य' : संपादक—विरकुड. सुरू झालें.

'संपूर्ण बंकिमचंद्र'–भाग १—वा. गो. आपटे

'प्रेम कीं लौकिक ?'–गो. चि. भाटे.

धि बॉम्बे व्हिजिलन्स असोसिएशन, मुंबई, स्थापना.

४२ १९२४ असहकारितेचें युग संपलें : गांधींची सुटका.

कॉन्सिलप्रवेशाचें युग.

जातीय दंगे.

इंग्लंडमध्यें पहिलें मजूर सरकार.

आनातोल फ्रान्स : मृत्यु वय ८०.

लेनिनचा मृत्यु : वय ५४

इंग्लंडमध्यें शॉच्या Mrs. Warren's Profession ह्या नाटकावरील बंदी उठली.

'संपूर्ण बंकिमचंद्र' भाग २ रा—वा. गो. आपटे.

'सुखाचा मूलमंत्र'—ना. ह. आपटे.

वय वि. दा. सावरकर : सुटका.
गिरणी मजुरांचा संप मुंबई.
४३ १९२५ दासबाबू वारले.
गिरणी मजुरांचा संप-मुंबई.
अखिल भारतीय चरखा संघ : स्थापना.
'विविधवृत्त' साप्ताहिक सुरु झालें.
'अरुण' मासिक: संपादक: मो. ग. रांगणेकर } सुरू झालें.
'रत्नाकर', : संस्थापक : प्रो. ना. सी. फडके } सुरू झालें.
'वाईकर भटजी' दुसरी आवृत्ति.
'दुटप्पी कीं दुहेरी'— श्री. कृ. कोल्हटकर.
'शामसुंदर'—श्री. कृ. कोल्हटकर.
महाराष्ट्र कुटुंबमाला : सं. ना. वि. कुळकर्णी—प्रारंभ.
प्रथम पुष्प : 'शिपाई'—ना. वि. कुळकर्णी.
'मजूर'—ना. वि कुळकर्णी.
'स्वयंसेवक'—नाथमाधव. 'नटसम्राट्'—नाथमाधव.
'कुलाब्याची दांडी'—ना. सी. फडके.
'संपूर्ण बंकिम चंद्र'— भाग ३, ४–वा. गो. आपटे.
४४ १९२६ स्वराज्यपक्ष हतबल झाला.
प्रतिसहकार पक्षाचा जोर.
'कुलकलंक' भाग १–२—वि. सी गुर्जर.
'पहाटे पूर्वीचा काळोख'— ना. ह. आपटे.
'मुक्तबंध'—मा. दा. अळतेकर.
'गोंडवनांतील प्रियवंदा'—डॉ. श्री. व्यं. केतकर.
'परागंदा'—डॉ. श्री. व्यं. केतकर.
'चिमणी'—भा. वि. वरेरकर.
'जादुगार'—ना. सी. फडके—'रत्नाकरां'तून प्रकरणशः प्रकाशन.
गोविंद कवि : मृत्यु वय : ५२.
वि. गो. विजापूरकर मृत्यु : वय ६२

वय स्वामी श्रद्धानंद यांचा खून, दिल्ली.
४५ १९२७ वामनराव जोशी महिलाश्रम हायस्कुलाचे मुख्याध्यापक.
‘ विचार-विलास ’ ले. वा. म. जोशी. प्रसिद्ध झालें.
जातीय दंगली.
सायमन कमिशनची नेमणूक.
‘ आशावादी ’–डॉ. श्री. व्यं. केतकर.
‘ बंधनाच्या पलीकडे ’–पु. य. देशपांडे.
‘ केरळकोकिळ ’कार आठल्ये, मृत्यु वय : ७५.
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, नागपूर : स्थापना.
खान–पाणदीकर विवाह, पुणें.
‘ समाजस्वास्थ्य ’ सं. र. धों. कर्वे. पहिला अंक.
कृ. के. गोखले मृत्यु.
सी. के. दामले मृत्यु : वय ४९.
४६ १९२८ महादेव मल्हार (वामनराव जोशी यांचे वडील बंधु) वारले.
सायमन कमिशन-आगमन.
नेहरु सुभाष यांचा स्वातंत्र्य संघ.
युवक संघ, कम्युनिस्ट, क्रांतिकारक इत्यादींना जोर.
‘ शरयू ’–नाथमाधव
‘ हृदय विकार ’–नाथमाधव
नाथमाधव (द्वारकानाथ माधवराव पितळे) मृत्यु : वय ४६
मिरत कटाचा खटला.
महाराष्ट्रांत साम्यवादाचे जोराचे वारे.
मुं. इ. युवक परिषद व संघ. स्थापना, मुंबई.
मुं. इ. युवक परिषद २ रें अधिवेशन, पुणें.
श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम–मुंबई, स्थापना.
महाराष्ट्र साहित्य पत्रिका ( स्वतंत्र प्रकाशन ) सुरू.
मुंबई गिरणी कामगार यूनियन ( लालबावटा ) स्थापना.
गिरणी मजुरांचा संप.
‘ यशवंत ’ मासिक निघालें. सं. स. आ. जोगळेकर.

वय

‘ जादुगार ’–ना. सी. फडके.
‘ विधवा कुमारी ’–भा. वि. वरेरकर.
ज्ञानकोशाचें काम संपलें.
इंग्लंडमधील २१ वर्षे वयाच्या स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला.
‘ लोकशिक्षण ’ मासिक परत सुरू झालें. संपादक–जांभेकर.

४७ १९२९ ‘मनोरमा’ मासिक निघालें. सं. प्र. के. अत्रे. (स्त्रियांकरितां)
‘ दौलत ’–ना. सी. फडके.
इंग्लंडमध्यें दुसरें मजूर सरकार.
महाराष्ट्रीय शास्त्रीय परिभाषा मंडळ, पुणें, स्थापना.
शिवरामपंत परांजपे मृत्यु : वय ६५
कवि अनंततनय मृत्यु : वय ५०
गिरणी मजुरांचा संप, मुंबई.
अस्पृश्यांचा सत्याग्रह : पर्वती देवालय.
शुद्धलेखन कमिटी : वामनराव एक सदस्य.

४८ १९३० ‘ सुशीलेचा देव ’: वा. म. जोशी. प्रसिद्ध झाली. ( प्रथम ‘ रत्नाकरां ’तून प्रकरणशः )
मडगांव गोवें येथें भरलेल्या १५ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं वामनराव जोशी.
‘ गांवसासू ’–श्री. व्यं. केतकर.
‘ हृदयाची हांक ’–वि. स. खांडेकर ( पहिली कादंबरी )
‘ ब्राह्मणकन्या ’–श्री. व्यं. केतकर.
सर सी. व्ही. रामन यांना ‘ रामन इफेक्ट ’ साठीं नोबेल पारितोषिक.
इंग्लंडमध्यें कायदेशीरपणें अभिनयकलेला ललितकलेचा दर्जा मिळाला.
सायमन रिपोर्ट : बार्डोली सत्याग्रह : २६ जानेवारी पहिला स्वातंत्र्य दिन. मिठाचा सत्याग्रह.
म. गांधींची दांडीयात्रा.

वय वा. गो. आपटे मृत्यु : वय ५९
वामनरावांचे वडील बंधु ( सावत्र ) वासुदेवराव वारले.

४९ १९३१ ‘ विश्ववाणी ’ मासिक नागपूरला सुरू झालें.
‘ प्रगति ’ साप्ताहिक, मुंबई, सं. शेजवलकर. सुरू.
‘ स्त्री ’ मासिक सं. शं. वा. किर्लोस्कर सुरू झालें.
‘ अटकेपार ’–ना. सी. फडके.
‘ कांचनमृग ’–वि. स. खांडेकर.
‘ सुकलेलें फूल ’–पु. य. देशपांडे.
नाट्यछटाकार गर्गे ( दिवाकर ) : मृत्यु : वय ४२
अ. ब. कोल्हटकर : मृत्यु : वय : ५२
गांधीवाद्यांनीं महाराष्ट्र प्रांतिक जिंकली.
नवभारत ग्रंथमाला, नागपूर. स्थापना.
म. गांधींचें गोलमेज परिषदेसाठीं विलायतला प्रयाण.

५० १९३२ ‘ प्रतिभा ’ मासिक सुरू झालें. संपादक : श्री. गं. दे. खानोलकर. के. ना. काळे, वि. ह. कुळकर्णी.
‘ समाजस्वास्थ ’–सं. र. धों. कर्वे ह्यांजवर फिर्याद : १०० रु. दंड.
‘ निरंजन ’–ना. सी. फडके.
‘ गोदू गोखले ’–भा. वि. वरेरकर ( पूर्वार्ध )
महाराष्ट्र कवि-संमेलन, अधिवेशन १ लें पुणें.
म. गांधींनीं ‘ हरिजन ’ हें इंग्रजी व हिंदी साप्ताहिक सुरूं केलें.
मॅक्डोनाल्ड साहेबांचा जातीय निवाडा : येरवडा करार.
हरिजनांसाठीं गांधीजींचें प्रायोपवेशन.
तिसरी गोलमेज परिषद, लंडन.

५१ १९३३ अस्पृश्यता निवारणासाठीं गांधींचा दौरा.
‘ मुक्तात्मा ’–ग. त्र्यं. माडखोलकर.
‘ कळ्यांचे विश्वास ’–विभावरी शिरूरकर.
‘ लोकशिक्षण ’ मासिक बंद पडलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतरित.
अनुक्रमांक २३६७५ दि. १.

वय ‘ कलंकशोभा ’–ना. सी. फडके.
५१ ‘ सदाफुली ’–पु. य. देशपांडे.
‘ धांवता धोटा ’–वरेरकर.
‘ गोदू गोखले ’–उत्तरार्ध–वरेरकर.
वामनराव जोशी ह्यांची ‘ इंदु काळे व सरला भोळे ’ ‘ प्रतिभे ’ तून क्रमशः प्रसिद्ध होऊं लागली.
हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाला : प्रो. आइन्स्टाइ-नची जर्मनींतून हकालपट्टी.
कोल्हापूरचें साहित्य संमेलन : अश्लीलतेचा ठराव प्रथम अधिवेशनांत आला : नापास झाला.
मिरत कटाचा खटला.
प्रतिभा-साधन कमेटी रिपोर्ट. वामनराव जोशी. एक सदस्य
टिळकांचा पुतळा–चौपाटी, मुंबई.
गॅल्सवर्दीचा मृत्यु : वय : ६५
ॲनी बेझंट : मृत्यु : वय ८६

५२ १९३४ महिलाश्रम हायस्कूलचा मुख्याध्यापकाच्या कामांतून वामनरावांची मुक्तता.
हिंगण्याहून पुण्यास रहावयास आले : मुक्काम : पुतणे प्रो. त्र्यंबक महादेव जोशी यांचेकडे : तरुण बुद्धिमान् मित्रांचा परिवार–चर्चा. आनंदाचा काळ.
‘ पारिजात ’ सं. रघुवीर सामंत. सुरू झालें.
‘ सत्यकथा ’ मासिक सुरू झालें.
‘ मनोहर ’–सं. शं. वा. किर्लोस्कर. सुरू झालें.
‘ विहंगम ’–नागपूर. सुरू झालें
‘ सह्याद्रि ’–संचालक : न. चिं. केळकर. सुरू झालें.
‘ स्मृति-चित्रें ’ : लक्ष्मीबाई टिळक भाग १ ला.
‘ उल्का ’ } ले. वि. स. खांडेकर.
‘ दोन ध्रुव ’ }
‘ परतभेट ’–भा. वि. वरेरकर

‘ भंगलेलें देऊळ ’–ग. त्र्यं. माडखोलकर
‘ हिंदोळ्यावर ’–विभावरी शिरूरकर.
श्री. कृ. कोल्हटकर मृत्यु वय : ६३
डेक्कन कॉलेज बंद झालें.
गिरणी मजुरांचा संप.
अखिल भारतीय काँग्रेस समाजवादी परिषद अधिवेशन १ लें. मुंबई.
नागपूरचें साहित्य संमेलन : अश्लीलतेचा ठराव परत नापास झाला.

५३ १९३५ ‘ इंदुकाळे व सरला भोळे ’–वा. म. जोशी. प्रकाशन.
वा. म. जोशी ह्यांच्या एका मुलाला वेड लागलें.
‘ लोकशिक्षण ’ परत सुरू झालें.
‘ स्मृति-चित्रें ’–लक्ष्मीबाई टिळक, भाग २ रा.
‘ साहित्य-आणि समाजजीवन ’–लालजी पेंडसे.
‘ उद्धार ’–ना. सी. फडके.
‘ कुलदैवत ’–भा. वि. वरेरकर
‘ उघडझांप ’--भा. वि. वरेरकर
‘ नवा मनू ’ साप्ताहिक सुरू झालें : पहिल्याच अंकांत वामनरावांचा लेख ‘ नवमतवादाविषयीं मला काय वाटतें ’
बडोदें साहित्य संमेलन : अध्यक्ष : ना. गो. चापेकर : अश्लीलतेसंबंधीचा ठराव पास झाला; समिती स्थापिली. वामनराव एक सदस्य.
मुंबई विद्यापीठानें मराठी ऑनर्सची पहिली परीक्षा घेतली.
काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव.
सुप्रसिद्ध इंडिया बिल पार्लमेंटनें पास केलें.

५४ १९३६ ‘ विचक्षणा ’--डॉ. श्री. व्यं. केतकर.
‘ ज्योत्स्ना ’ मासिक निघालें : संपादक मंडळ. वा. रा. ढवळे, वि. स. खांडेकर, माडखोलकर वि. ह. कुळकर्णी, दौंडकर, प्रभाकर पाध्ये,

वय ‘ काश्मिरी गुलाब ’–ना. सी. फडके.
‘ शाप ’–ग. त्र्यं. माडखोलकर.
‘ विकारी वात्सल्य ’–भा. वि. वरेरकर.
लक्ष्मीबाई टिळक मृत्यु : वय : ६३, स्मृतिचित्रें : भाग ३।४
पंचम जॉर्जचा मृत्यु.
आठव्या एडवर्डचा राजत्याग.
पिरांदेलोचा मृत्यु : वय ६९.
हिंदुस्थानांत नव्या निवडणुका : काँग्रेसनें आठ प्रांत जिंकले.
५५ १९३७ देशांत काँग्रेसचीं मंत्रिमंडळें.
‘ प्रवासी ’–प्रो. ना. सी. फडके.
‘ आशा ’–प्रो. ना. सी. फडके.
‘ वेणू वेलणकर ’–भा. वि. वरेरकर.
‘ उमलती कळी ’–भा. वि. वरेरकर.
डॉ. श्री व्यं. केतकर : मृत्यु : वय ५३
राजकवि चंद्रशेखर मृत्यु : वय ६६
जेम्स बॅरी : मृत्यु : वय ७७.
जगदीशचंद्र बोस मृत्यु : वय ७९
५६ १९३८ ‘ भटक्या ’–डॉ. श्री. व्यं. केतकर.
‘ विचार–सौंदर्य ’–वा. म. जोशी.
‘ विस्तवाशीं खेळ ’ नाटक–वा. म. जोशी.
वामनरावांचा वेडा झालेला मुलगा वारला: एरंडवणा कॉलेज-वर परत राहावयास गेले. मित्रमंडळीचा सहवास दुरावला.
हिटलर चेंबरलेन यांच्या म्यूनिच करार.
सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक स्टॅनिस्लाव्हिस्की : मृत्यु वय ७५.
केमाल अतातुर्क : मृत्यु : वय ५७
५७ १९३९ दुसरें महायुद्ध सुरू झालें. मंत्रिमंडळांचे राजीनामे.
जीनांनीं पोळलेला मुक्तता दिन.
डॉ. माधवराव पटवर्धन : मृत्यु : वय ४५
म. गांधींचा राजकोट येथील उपवास.

| वय | | |
|---|---|---|
| ५८ | १९४० | विन्स्टन चर्चिलकडे इंग्लंडचा कारभाराचीं सूत्रें आलीं. |
| | | म. गांधींचा वैयक्तिक कायदेभंग. ' हरिजन ' बंद. |
| ५९ | १९४१ | क्रिप्सची शिष्टाई. |
| | | ' समीक्षक ' मासिक सुरू झालें : सं. दि. वि. आमोणकर, वा. ल. कुळकर्णी. |
| | | रविंद्रनाथ टागोर : मृत्यु : वय ८० |
| | | हेन्री बर्गसाँ मृत्यु : वय ८२ |
| ६० | १९४२ | ' चले जाव ' ठराव. पुढाऱ्यांना अटक. |
| | | सामुदायिक कायदेभंग. ' हरिजन ' परत सुरू झालें. |
| | | 'अभिरुचि' मासिक निघालें : संपादक : श्री. पु. आ. चित्रे व सौ. विमल चित्रे. |
| ६१ | १९४३ | वामनरावांचा षष्ठ्यब्दिपूर्ति समारंभ महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं जानेवारी २१ रोजीं साजरा झालाः मानपत्रें, थैल्या अर्पण. |
| | | जुलै २० मुंबई येथें मृत्यु : |
| | | ' विचार-लहरी '-वा. म. जोशी, प्रकाशन. |
| | | म. गांधींना २१ दिवसांचा उपवास. |
| | | नाट्यशताब्दि उत्सवः सांगली. अध्यक्ष : बॅ. वि. दा. सावरकर |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

## प्रस्तुत व्याख्यानांसाठीं उपलब्ध झालेलें प्रो. वा. म. जोशी ह्यांचें वाङ्मय :

**कादंबऱ्या :**

रागिणी १९१५
आश्रमहरिणी १९१६
नलिनी १९१९
सुशीलेचा देव १९३०
इंदु काळे व सरला भोळे १९३५

**स्मृति-चित्रात्मक :**

स्मृतिलहरी.

**कथात्मक :**

नवपुष्पकरंडक १९१६

**चर्चात्मक :**

नीतिशास्त्रप्रवेश १९१९
साक्रेटिसाचे संवाद ( लेखन १९१५-१६ ) प्रकाशन १९२२
आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त ( पुरवणी ) १९१५
विचार-विलास १९२७
विचार-सौंदर्य १९४०
विचार-लहरी १९४३

**नाटक :**

विस्तवाशी खेळ १९४०

**असंग्रहित लेख :**

'बहिष्कार योग व आपला जोर'—प्रकाशन : 'विश्ववृत्त मासिकांतील निवडक लेख' सं. विजापूरकर.

इतिहासाचा उपयोग—लोकशिक्षण. जाने. १९२८.

गीतेंत कार्याकार्यनिर्णयाची कसोटी आहे काय ?—लोकशिक्षण एप्रिल १९३६.

शाप—( समीक्षण )—लोकशिक्षण, डिसेंबर १९३६.
वाङ्मयविलास ( समीक्षण )—लोकशिक्षण, नोव्हेंबर १९३७.
दुहेरी जीवन ( समीक्षण )—मनोहर. नोव्हें. १९४०.
माझें आवडतें पुस्तक – मनोहर. मे १९३९
ध्येय हाच देव—रत्नाकर–ऑक्टोबर १९३७
काश्मिरी-गुलाब ( समीक्षण )—फेब्रुवारी व मार्च विहंगम–१९३७
' यागी ' का ' बागी '—शंका—महाराष्ट्र-साहित्य पत्रिका फेब्रु. १९३८
डॉ. केतकर यांचें शोचनीय निधन—महाराष्ट्र साहित्य पत्रिका १९३७
खुलीं मतें पण ढिले शब्द—महाराष्ट्र-साहित्य पत्रिका. जानेवारी १९४२
प्रो. वा. म. जोशी ह्यांची मुलाखत ( ले. शं. बा. दाते ) सह्याद्रि, फेब्रु. १९३६
नवमतवादावरील विचार—सह्याद्री
फ्रॉयड् आणि कामवासना—सह्याद्री—दिवाळी विशेषांक, नोव्हें. १९३९
अल्फ्रेड ॲडलर—विहंगम, नोव्हें. १९३७
माझें कादंबरीलेखन —विहंगम, फेब्रु. १९३६
महाराष्ट्राची साहित्यिक घटना ( एक पत्र )—विहंगम—मार्च १९३६
प्रो. वा. म. जोशी व विजयकृष्ण ( खुलासा व कांहीं प्रश्न )—प्रतिभा फेब्रु. १९३५
भंगलेलें देऊळ ( समीक्षण )—प्रतिभा--मे. १९३५
आगरकरांचें वैशिष्ट्य--प्रतिभा-जून १९३५
मी आणि नवमतवाद--प्रतिभा-फेब्रु. १९३६
विवाहाचें पावित्र्य म्हणजे काय ?--प्रतिभा-सप्टेंबर १९३६
पुढारी-क्लबांत वामनराव--धनुर्धारी, दिवाळी अंक १९४१
महाराष्ट्र-साहित्य-संमेलन. १५ वें अधिवेशन अध्यक्षीय भाषण--यशवंत एप्रिल व मे. १९३०
वाङ्मयीन महात्मता—प्रस्तावना.
नवमतवादाविषयीं मला काय वाटतें ?—नवा मनू-१९३५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम २३५७५ दि: ८-७-५५
नोंद दि: ३०-७-५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६३९०५

REFBK-0007397

REFBK-0007397